म. ग्रं. सं.

विषय

लेखक

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

५८

७३८

...पुराणिक आणि मंडळी.
... माधवबाग, मुंबई नं. ४

# अजब-ऐने-महाल

अथवा

## पर्शियन भाषेंतील

एक हजार एक दिवसांच्या अद्भुत व

## मनोरंजक गोष्टी.

ह्या,

इंग्रजींतील ' दि पर्शियन टेल्स् ऑर दि थाउजंड ऍंड् वन् डेज् '

या ग्रंथावरून

## हरि कृष्ण दामले

यांनीं मराठींत उतरिल्या.

खंड चवथें.

पुणें येथें

सदाशिव पेठेंत " इंदिरा " छापखान्यांत छापिलें.

शा० श० १८१८.—इ० स० १८९७.

किमत १२ आणे.

[ हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून सर्व
प्रकारचे हक्क मालकांनीं आपणांकडे ठेविले आहेत. ]

# प्रस्तावना.

ह्या ग्रंथाचीं पहिलीं तीन खंडें बरेच दिवस लोकांपुढें आलेलीं आहेत. त्यांस जो त्यांजकडून आश्रय मिळाला, त्यावरून हल्लीं हें चवथें खंड प्रसिद्ध करण्यास ग्रंथकारास उमेद आली हें लिहिण्यास त्यास फार आनंद वाटत आहे.

या खंडांत, पूर्वीच्या खंडांतील डमास्कसच्या राजाच्या गोष्टीच्या संबंधानेंच दुसऱ्या अनेक गोष्टी आलेल्या असून त्या सर्व अत्यंत रसभरित आहेत. या राजाच्या संबंधाची बाकी राहिलेली गोष्ट—अबुलफौरीज याची दुसरी सफर—पुढील खंडांत यावयाची आहे. तथापि हें खंड समाप्त होतांना व पुढच्यास आरंभ करितांना गोष्टीचा तुटकपणा विशेष रीतीनें भासण्यासारखा नाहीं, व तेणेंकरून वाचकांचा रसभंग किंवा घोंटाळा होण्याचा संभव नाहीं.

आतां या ग्रंथाचें बाकी राहिलेलें म्हणजे पांचवें खंड लवकरच प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. कारण पहिल्या तीन खंडांस जो लोकाश्रय मिळाला आहे, त्यावरून पहातां ग्रंथकर्त्यास त्या संबंधानें शंका घेण्याचें कारण राहिलें नाहीं.

हरि कृष्ण दामले.

पुणें, ता० १ फेब्रुवारी, सन १८९७.

# अनुक्रमणिका.

अस्त्राखानचा सदा आनंदी राजा होर्मझ याची गोष्ट. १
अविसेन याची हकीकत. .... .... .... .... ४१
अस्त्राखानचा सदा आनंदी राजा होर्मझ याची गोष्ट
( पुढें चालू ). .... .... .... .... ५८
बद्रुद्दीन लोलो राजा, त्याचा वजीर, व मित्र यांची गोष्ट
( पुढें चालू ). .... .... .... .... ७२
अरूया नामक सुंदर, चतुर, व सत्वशील स्त्रीची गोष्ट. ७३
अबुलफौरीज नामक महान् दर्यावर्दी याच्या सफरींची
हकीकत ( सफर पाहिली ). .... .... .... १०६

# अजब-ऐने-महाल.

## खंड चवथें.

### अस्त्राखानचा सदा आनंदी राजा होर्मझ याची गोष्ट.

राजा म्हणतो,— पांच वर्षांपूर्वीं माझा बाप जिवंत असतां मला एकदां प्रवास करण्याची हुकी आली. त्यावरून मीं त्याकरितां बापाची परवानगी मागितली. त्यानें मला परवानगी देऊन खेरीज माझ्या संरक्षणासाठीं, व परक्या ठिकाणीं मी गेलों असतां तेथें माझ्या योग्यतेप्रमाणें माझा मानमरातब रहावयासाठीं मजबरोबर पुष्कळ लवाजमा दिला; तसेंच हवा तितका रोख पैसा व पुष्कळसें जवाहीरही दिलें. तो म्हणाला, 'राजपुत्रासारखा कुलीन पुरुष जेथें जेथें जाईल तेथें तेथें त्याच्या थोरवीची व औदार्याची लोकांस आठवण राहील अशा प्रकारचीं कृत्यें त्याच्या हातून घडलीं पाहिजेत; नाहीं तर, कोठला एखादा सामान्य मनुष्य आला काय आणि गेला काय, लोकांस त्याचें स्मरण राहण्यासारखें त्याच्या हातून कांहींच होत नसतें. तसें याचें होऊं नये, म्हणून याला वाटेल तितका खर्च करतां येण्यासारखें द्रव्य मला यास दिलें पाहिजे. अशा प्रकारच्या औदार्याचा परिणाम असा होतो कीं, लोक त्याच्या योगानें दिपून जाऊन त्या पुरुषाला जी योग्यता देवानें वास्तविक दिलेली नसते ती त्याच्या अंगीं आहे असें मानितात.'

असो; याप्रमाणें मी सर्व प्रकारच्या जय्यत तयारीनिशीं अस्त्राखान येथून निघालों. आम्ही वोल्गा वगैरे नद्या उतरून कास्पियन समुद्रापर्यंत गेलों; व तेथून पुढें जंद वगैरे कित्येक मोठमोठीं शहरें

फिरलों. ज्या ज्या ठिकाणीं आमचा मुक्काम झाला त्या त्या ठिकाणीं बापाच्या इच्छेप्रमाणें मीं पाण्यासारखा पैसा खर्च करून थोरवी व औदार्य यांविषयीं कीर्ति संपादिली. सारांश, कुलीन, उदार, चतुर व थोर अशा राजपुत्राच्या हातून जसें वर्तन घडणें इष्ट आहे तसेंच वर्तन सर्व प्रकारें मीं केलें.

मजबरोबर आलेल्या लोकांत कांहीं माझ्या बापाच्या दरबारचे मानकरी होते. त्यांपैकीं एक माझा संरक्षक असून मी त्याला फार चहात असें. त्याचें नांव हुसेन असें होतें. तो मोठा सद्गुणी व चतुर असून, मजवर जरी त्याचा ताबा होता तरी एखाद्या द्वाष्ट पंतोजीप्रमाणें तो आपला अधिकार मजवर कधींही चालवीत नसे; इतकेंच नव्हे, तर माझ्या मताप्रमाणें वागून, मला जेणेंकरून सुख होईल अशा गोष्टी करण्यांत तो सदोदित तत्पर असे. फार काय सांगूं? पण माझ्या मनाचा कल अगोदरच ओळखून तदनुरूप तो माझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्याची आगाऊ तयारी ठेवीत असे! विशेषेंकरून याच त्याच्या गुणांमुळें मला तो केवळ जीव कीं प्राण वाटत असे, व या कारणास्तव माझ्या सर्व गुप्त गोष्टी मी त्याजपाशीं सांगत असें.

ओत्रार नामक शहरीं आमचा मुक्काम असतां एके दिवशीं मीं हुसेन यास म्हटलें, 'मला आतां या राजशाई डौलानें प्रवास करण्याचा कंटाळा आला आहे. मला ठिकठिकाणीं लोकांकडून एकसारखा जो मान मिळतो त्याचा मला अगदीं वीट आला असून एखाद्या साध्या मुशाफरास प्रवासामध्यें जो एके प्रकारचा विलक्षण आनंद वाटतो त्याचा मला बिलकूल अनुभव नाहीं. माझी श्रीमंती व माझा थाटमाट हीं, मला ज्या ज्या वस्तु पहाण्याची व ज्या ज्या गोष्टी ऐकण्याची इच्छा आहे ती इच्छा तृप्त करून घेण्याच्या कामीं आड येतात. याकरितां, एखाद्या साधारण मनुष्याप्रमाणें प्रवास करावा, व अगदीं निकृष्ट स्थितीच्या लोकांत मिसळून त्यांशीं संभाषण करावें व त्यांच्या कृतींचें अवलोकन करावें असें माझ्या मनांत

आलें आहे. या प्रयोगानें, आजपर्यंतच्या माझ्या प्रवासक्रमांत बदल होऊन माझें मन रमेल व कदाचित् माझ्या वर्तणुकींतही कांहीं दोष असल्यास ते निघून जातील असें मला वाटतें.'

सदोदित माझ्या मर्जीचा कल पाहून वागणारा हुसेन यानें हें माझें भाषण ऐकून मला आपल्या इच्छेप्रमाणें करण्याविषयीं उत्तेजन दिलें. तो म्हणाला, 'तुम्हीं मनांत आणलेली गोष्ट फारच स्तुत्य आहे, व तुमच्या इच्छेस येईल त्या वेळेस ती करण्यास तुम्हांस कोणत्याही प्रकारची आडकाठी नाहीं. ती गोष्ट करणें म्हणजे विशेष कांहींच नाहीं. या ठिकाणीं आपला लवाजमा ठेवून देऊन आपण दोघे साधारण मुशाफरांप्रमाणें करिझमी शहराकडे सडे चालते होऊं म्हणजे झालें.'

हुसेन हा माझ्या इच्छेप्रमाणें बोलला व तत्काळ मजबरोबर येण्यास तयारही झाला हें पाहून मला अतिशय आनंद झाला. मीं त्यास लागलीच तयारी करण्यास सांगितलें. आमची तयारी फारशी कांहीं करावयाची नव्हतीच. फक्त दोघांस दोन घोडे व कामापुरतें सामानसुमान व पैसा इतकें काय तें बरोबर घ्यावयाचें होतें. तें घेऊन आम्ही जिहून नदी उतरून पलीकडे गेलों, व थोडक्याच दिवसांनीं करिझमी शहरास जाऊन पोहोंचलों.

आम्ही त्या ठिकाणीं एका भटारखान्यांत जाऊन उतरलों. आम्हीं आपला वेष इतका बेमालूम रीतीनें पालटला होता कीं, साधारण वाटसरांहून जास्त योग्यतेचे आम्ही आहों अशी तेथल्या लोकांस शंका सुद्धां आली नाहीं. आम्ही त्या दिवशीं विसांवा घेऊन दुसरें दिवशीं शहर पहावयास बाहेर पडलों तों त्याच्या थोर वैभवाविषयीं जी आमची कल्पना होती ती अगदीं यथार्थ ठरली. तेथें आम्हीं मोठमोठ्या शेंकडों इमारती पाहिल्या. पण त्यांपैकीं एक इमारत पाहण्याकडे आमचें लक्ष्य फारच वेधलें. कारण, तिचें बांधकाम मोठें चमत्कारिक होतें; म्हणजे एका लहानशा मैदानाभोंवतीं सखल असा एक तट असून त्याच्या आंतले बाजूस अंतराअंतरानें फार उंच पण प्रशस्त नव्हेत असे कित्येक किल्ले बांधलेले होते.

या तटाचे आंत जाऊन तेथें काय आहे तें पहावें अशी आम्हांस इच्छा झाली. आम्ही आंत गेलों तों आम्हांस किल्ल्यांतील मनुष्यांची चाहूल लागली. तीं मनुष्यें आम्हांस दिसलीं नाहींत; पण तीं बोलत, हंसत व गात होतीं तें आम्हांस स्पष्ट ऐकूं आलें. त्यावरून आम्हीं अशी कल्पना केली कीं, या ठिकाणीं वेडे लोक कोंडून ठेवलेले असावेत. ही आमची कल्पना अगदीं खरी ठरली. त्या डोकीं बिघडून गेलेल्या लोकांपैकीं एकजण मोठमोठ्यानें आरबी भाषेंत गाणें गात होता. त्यांत त्याच्या प्रियकरणीचें वर्णन असून तिजपुढें स्वर्गींची अप्सराही कांहींच नाहीं असें ध्वनित केलेलें होतें. त्या गाण्यांतील सारांश असा होताः—

'माझ्या प्रेमाचा विषय जी ही सुंदरी तिला प्रत्यक्ष रतीचीच उपमा साजते. तिनें हास्यवदन केलें म्हणजे चांदिणेंच पडलें आहे कीं काय असा भास होतो; तिच्या अधरोष्ठांच्या कांतीपुढें प्रवाळाची कांति कांहींच नाहीं; तिची वेणी म्हणजे जणूं काय भुजंगच आहे; आणि तिच्या हातांची कांति कोंवळ्या पल्लवांच्या कांतीप्रमाणें अत्यंत मनोरम आहे!'

अशा त्या मनुष्याच्या गाण्याच्या लकेऱ्या ऐकून त्याच्या वेडेपणाविषयीं आमची पूर्ण खात्री झाली, तेव्हां मीं हुसेन यास म्हटलें, 'या मनुष्याविषयीं तुला काय वाटतें?' त्यानें उत्तर केलें, 'अहो, वाटायाचें काय आहे? तो वेडा झाल्याकारणानें कांहीं तरी बहकतो आहे, झालें!'

या वेड्या मनुष्याचें आपल्या प्रियकरणीविषयींचें गाणें कांहीं वेळ ऐकिल्यावर दुसऱ्या किल्ल्यापाशीं आम्ही गेलों. तों त्यांतून दुसऱ्या एका वेड्याचें पुढील अर्थाचें गाणें आम्हांस ऐकूं आलें:—

'हे लावण्यलतिके! मी या बंदीशाळेंत पडल्याकारणानें माझ्या अंतरात्म्याला प्राप्त झालेली उदासीनता तुझ्या स्मरणानें आणि चिंतनानें अगदीं नाहींशी होते, व मी जणूं काय गाढ अंधारांतून निघून भगवान् सहस्ररश्मि जो सूर्य त्याच्या प्रकाशानें आल्हाद

पावतों. अगे प्रियमते ! तूं आपल्या दर्शनानें माझें हृदय विदारून टाकलें आहेस खरें, पण तूं मनांत आणशील तर आपल्या कृपाकटाक्षरूपीं अमृतानें त्याला एका क्षणांत सुस्थितीस पावविशील. फार काय सांगूं ? तूं मला प्रत्यक्ष संजीविनीच भासतेस!

याच किल्ल्यांत आणखी दुसरा एक वेडा माणूस होता. तो आपल्या सोबत्याच्या प्रेमभरित आलापांनीं तल्लीन होऊन आपणही तशाच प्रकारचें गाणें निराळ्या सुरांत गाऊं लागला. त्यांतला भावार्थ असा:—

साकी.

**तव विरहें मत्प्रिये ! प्राण हे जाया गे पाहाती ।**
**सत्वर जातिल सुटेल तरि ही दुःसह दुःस्थिति परती ॥**

याप्रमाणें या तिघां वेड्यांचें गाणें आम्हीं ऐकिल्यावर हुसेन मला म्हणतो, 'महाराज, या तिघांच्याही गाण्याचा विषय प्रेम हा आहे, हें स्पष्ट दिसतें; व मला वाटतें, यांचा स्वभाव छांदिष्ट असून कोण्या स्त्रीच्या नादीं हे लागले आहेत, ती यांस प्राप्त न झाल्यामुळें यांचीं डोकीं फिरून जाऊन हे कांहीं तरी बरळत सुटले आहेत!'

अशा प्रकारें हुसेन याचें माझ्याशीं भाषण चाललें असतां त्या शहरचा एक मनुष्य सहजगत्या तेथें आलेला होता, त्यानें तें ऐकिल्यावरून तो मध्येंच आमच्याशीं बोलूं लागला. तो म्हणतो, 'तुम्ही परदेशी असून तुम्हांस येथली कांहींच माहिती नाहीं असें दिसतें. येथल्या सुलतानाची जी अप्रतिम लावण्यवती कन्या आहे तिला पाहून हे लोक वेडे झाले आहेत, व त्या वेडाच्या भरांत त्यांचे हे आलाप निघत आहेत; या लोकांना त्या राजकन्येचें जें येवढें वेड लागलें आहे त्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहीं नाहीं हें खचीत समजा. मी म्हणतों यावर कदाचित् तुमचा भरंवसा बसत नसेल तर तुम्ही शहरांतील वाटेल त्या मनुष्यास विचारा, म्हणजे या तिघां हतभाग्य मनुष्यांस वेड लागण्याचें कारण राजकन्येखेरीज दुसरें कांहीं नाहीं, हेंच तो तुम्हांस सांगेल. ती अद्वितीय सुंदरी पुष्कळ वेळां येथील

सार्वजनिक क्रीडाभुवनांत खेळावयास जाते, त्या वेळीं ती बुरखा घेत नसल्यामुळें लोकांच्या दृष्टीस पडते. पण महाराज! ज्यांना तिचें रूप पहावयास सांपडतें, ते अत्यंत दुर्दैवी होत असें समजा; कां कीं, तिच्या नेत्रकटाक्षरूपी बाणांनीं ते लागलीच विव्हळ होऊन त्यांची अगदीं दुर्दशा होते ! त्यांपैकीं कांहीं जागच्याजागीं थिजून चित्रासारखे स्तब्ध राहतात, व असलें अमोलिक रत्न आपणांस लाभणें अशक्य आहे असें जाणून झुरणीस लागतात, आणि प्राणास मुकतात; व कित्येक वेडे होऊन वाटेल तिकडे वाटेल तसें वरळत फिरूं लागतात. हे लोक असे फिरूं नयेत म्हणून त्यांना या किल्ल्यांत कोंडून ठेवण्याचा सुलतानानें नियम केला असून या कामाकरितां मुद्दाम त्यानें हे किल्ले बांधवले आहेत. सुलतान हा एरवीं पाहिला असतां केवळ सद्गुणांचा पुतळा आहे; पण येवढ्याच बावतींत त्याचें वर्तन अत्यंत दूषणीय आहे. तें असें कीं, आपली कन्या लोकांच्या नजरेस पडली असतां त्यापासून असे अनर्थ होतात हें त्यास ठाऊक असून तो मुलीस बाहेर पडण्याविषयीं मुळींच प्रतिबंध करीत नाहीं; इतकेंच नव्हे, तर तिजपासून लोकांना जो हा ताप होतो तो पाहून त्याला आनंद वाटतो, व आपल्या पोटीं असली विषवल्ली उत्पन्न झाली याचें त्याला मोठें कौतुक वाटतें ! '

याप्रमाणें हा गृहस्थ आमच्याशीं बोलत असतां तितक्यांतच बाहेरून लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्या ठिकाणीं येत आहेत असें आमच्या दृष्टीस पडलें. त्या गर्दींत सुलतानाचे खाजगीपैकीं कित्येक शिपाई असून त्यांनीं बरोबर दोन तरुण मनुष्य आणले होते, व त्यांसह ते किल्ल्याकडेच येत होते. हें पाहून मीं त्या गृहस्थास म्हटलें, ' तुम्हीं आतां सांगितले तशाच प्रकारचे आणखी दोघे वेडे पीर येथें आलेसें वाटतें.' तो म्हणाला, ' हो, आज ती राजकन्या क्रीडाभुवनांत खेळायाला गेली असल्यामुळें येथली वेड्यांची संख्या बरीच फुगण्याचा संभव आहे.' इतकें तो बोलतो तों चटकन् मी तेथून निघालों, व बाहेर जाऊं लागलों. तेव्हां हुसेन माझ्या पाठी-

मागून जलदीनें येऊन मला म्हणतो, 'काहो, इतक्या लगबगीनें कोठें चालला ?' मीं त्यास उत्तर केलें, 'मला ती राजकन्या पहाण्याविषयीं फार इच्छा झाली आहे. तिच्या सौंदर्याचें जें येवढें वर्णन करितात तें खरेंच कीं काय हें प्रत्यक्ष पाहून मी आपल्या मनाची खात्री करून घेणार.'

हें माझें भाषण ऐकून हुसेन याच्या अंगावर कांटा आला, व आजपर्यंत माझ्या इच्छेच्या आड तो कधींच आला नसतां या वेळेस मला नको म्हटल्यावांचून त्यास राहवेना. तो अत्यंत खिन्न होऊन मोठ्या कळवळ्यानें मला म्हणतो, 'महाराज! आपल्या मनांत हा कसला विचार आला आहे? आपल्या अंगांत पिशाच तर संचरलें नाहींना? इतक्यांत जें काय आपण ऐकिलें व पाहिलें त्यावरून उलटा बोध घ्यावयाचा टाकून तुम्ही त्या राजकन्येस पहायाला जातां हें काय? ज्याच्या सत्तामात्रेंकरून या जगाची उत्पत्ति, स्थिति व लय हीं चाललीं आहेत त्या परमेश्वराची शपथ घालून मी तुम्हांला सांगतों कीं, ती राजकन्या पाहण्याचें तुम्हीं बिलकूल मनांत आणूं नका!'

हुसेन याला या गोष्टीची जी येवढी भीति वाटली तिचें मला हंसें आलें. मी त्यास बोललों, 'अरे, माझ्या अंगांत पिशाच संचरलें आहे असें म्हणण्यापेक्षा तुलाच बागुलबोवानें भेवडावून टाकिलें आहे असें मी म्हणतों. अरे, त्या राजकन्येला पाहिल्यानें मला अपाय होईल असा जो तुझा समज झाला आहे तो किती वेडेपणाचा आहे! तिच्या दर्शनानें मी वेडा होईन असें तुझ्या मनांत तरी कसें येतें! आपल्या येथील जनानखान्यांत अप्सरांसारख्या शेंकडों रूपवती स्त्रिया आहेत हें तुला ठाऊकच आहे. पण त्यांपैकीं एकीलाही पाहून माझ्या मनावर अनिष्ट परिणाम झालेला नाहीं. मी वयांत आलों असून त्या मानानें मला असल्या गोष्टींचा छंद बिलकूल नाहीं हें तुला ठाऊकच आहे. माझी अशी वृत्ति पाहून मला कित्येक नांवें सुद्धां ठेवितात. तर असें असतां मी आपला

एकाएकीं त्या राजकन्येस पाहिल्याबरोबर दिवाणा होऊन जाईन अशी कल्पना तुझ्या मनांत येते तरी कशी? तर तुझी खातरजमा असूं दे कीं, त्या राजकन्येस पाहिल्यापासून इतरांची जरी अत्यंत शोचनीय स्थिति झाली आहे, तरी मला त्यापासून कांहींएक धोका होण्याचा संभव नाहीं. माझ्या मनांत जी ही इच्छा उत्पन्न झाली आहे तिजबद्दल व्यर्थ काळजी वाहून तूं आपल्या अंतःकरणांस शिणवूं नको!'

हुसेन हा यावर कांहींच बोलला नाहीं, व मीं जरी आपल्याकडून त्याची हवी तितकी खात्री केली, तरी त्याचें समाधान झालेंसें मला दिसलें नाहीं. तथापि मला आपली इच्छा तृप्त करण्याखेरीज दुसरें कांहींच सुचेना. तेव्हां क्रीडाभुवन कोठें होतें तें मला ठाऊक नसल्यामुळें रस्त्यानें चाललेल्या एका मनुष्यास त्याविषयीं मीं माहिती विचारिली. तो तेथला इमाम म्हणजे मुख्य धर्मगुरु होता. तो म्हणाला, 'गृहस्था! आजचा दिवस तूं क्रीडाभुवनांत जाऊं नको; कां कीं, त्या ठिकाणीं आज राजकन्या खेळायाला गेलेली आहे. तर उद्यां तूं तेथें जावेंस हें मला बरें वाटतें.' मीं त्यास म्हटलें, 'इमाम साहेब, क्रीडाभुवनांत जाण्याचा माझा हेतु राजकन्येस पहावी हाच आहे. दुसरा कांहीं नाहीं. तर मला आजच तेथें गेलें पाहिजे.' तेव्हां तो मोठ्या दिलगिरीनें म्हणतो, 'अरे बाबा! तुला आपल्या जिवाचा कंटाळा आला आहे कीं काय? अथवा तुला वेडा होऊन बंदींत राहण्याची इच्छा झाली आहे कीं काय? राजकन्येस पाहिल्याबरोबर लोकांची काय स्थिति होते हें तुला ठाऊक नाहीं वाटतें! आणि ठाऊक असूनही जर तूं त्या विषवल्लीची प्रचीत घेण्यास तयार झाला असशील, तर तुला आकाबाईचाच फेरा आला असें म्हटलें पाहिजे!'

त्या इमामानें याप्रमाणें माझें मन त्या गोष्टीपासून फिरविण्याविषयीं फार प्रयत्न केला; पण माझा निश्चय बिलकूल ढळेना. शेवटीं माझा दुराग्रह पाहून त्यानें मला मोठ्या कष्टानें क्रीडाभुवनाचा रस्ता

दाखविला. मी जाऊं लागलों तसा रागानें तो मला म्हणतो, 'ठीक आहे. माझा बुद्धिवाद तूं ऐकत नाहींस, तर घे आतां आपल्या पायावर धोंडा पाडून !'

मी त्या इमामास सोडून कांहींसा पुढें गेलों तों एक दवंडीवाला पुढीलप्रमाणें दवंडी पिटीत होता ती मीं ऐकिली:—'सुलतानसाहेबांच्या हुकमावरून तमाम लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, सुलतान साहेबांची कन्या रझिया बेगम ही क्रीडाभुवनांत खेळत आहे. तिला कोणीं पुरुषानें पाहूं नये; व या हुकुमाकडे लक्ष्य न देतां जर कोणी तिला पाहिलें, तर त्यापासून त्याला कांहीं अपाय झाल्यास त्याबद्दल सुलतानसाहेब कोणत्याही प्रकारें जबाबदार नाहींत.'

तरी मी तसाच पुढें चाललों. क्रीडाभुवनाजवळ मी गेलों तों आसपासचे लोक मोठ्या धांदलींत आहेत असें मला दिसलें. त्यांत मुख्यत्वेंकरून तरुण मुलांचे आईबाप हे, त्यांनीं रझियाइजला पाहूं नये म्हणून त्यांना हांका मारण्याच्या व स्वतः घराकडे जाण्याच्या अतिशय लगबगींत असलेले दिसले. ती त्यांची लगबग व त्रेधा पाहून मी फार विस्मित झालों; व यापेक्षांही, हुसेन याला तो प्रकार पाहून जें भय वाटलें त्याबद्दल तर मला फारच नवल वाटून हंसूं आलें. आम्हीं दोघे क्रीडाभुवनाच्या अगदीं जवळ गेलों व पाहिलें तों तेथें सगळे म्हातारेकोतारे लोक आमच्या दृष्टीस पडले, व तेही राजकन्येपासून बऱ्याच अंतरावर होते. ते जरेनें व्यापलेले होते, तरी आपल्यावरही रझिया हिच्या स्वरूपाचा परिणाम होऊन आपल्याला मरेपर्यंत किल्ल्यांत पडावें लागेल कीं काय म्हणून ते भीत होते ! सारांश, जगत्कर्त्यानें बनविलेली ती अपूर्व चीज जवळ जाऊन पाहून नेत्रांचें पारणें फेडणारा पुरुष एकही त्या ठिकाणीं आम्हांला आढळला नाहीं !

असें होतें तरी मी बिलकूल न डगमगतां राजकन्येच्या जवळ चाललों. तेव्हां शेंकडों लोक मोठ्या काकुळतीनें मला 'मागें फीर' म्हणून एकसारखे म्हणूं लागले. तथापि मीं तिकडे मुळींच लक्ष्य

न देतां राज्यकन्येपुढें जाऊन उभा राहिलों. परंतु त्याचा मला कांहींच उपयोग झाला नाहीं; कां कीं, तिचा खेळ संपून तिनें बुरखा देखील घेतला होता. या कारणामुळें त्या वेळीं तिचा चेहरा मला पाहण्यास सांपडला नाहीं. तरी पण तशा स्थितींतही तिच्या तेजस्वितेचा ठसा माझ्या मनावर पूर्ण बसला. असो. ती लागलीच आपल्या दोन सख्यांसह मेण्यांत बसली व राजवाड्यांत निघून गेली. तिजबरोबर शेंकडों शिपायांचा पहारा होता.

नंतर मी हुसेन यास मोठ्या खेदानें म्हटलें, ‘ अरे, किती तरी मी हतभाग्य कीं, थोडक्याच वेळाची चुकामुक पडून राजकन्येच्या दर्शनसुखास मी अंतरलों ! ’ पण हुसेन याला याबद्दल अत्यानंद होऊन तो मला म्हणतो, ‘ अहो, तुम्हांला ती दिसण्याची संधी आली नाहीं, हा ईश्वराचा तुम्हांवर अनुग्रहच होय असें मी समजतों ! कारण, तिला पाहिल्यापासून आपणाला कांहींएक धोका होण्याची भीति नाहीं अशी जरी तुम्हीं माझी खातरजमा केली, तरी मी उघड सांगतों कीं, माझ्या मनाचें समाधान बिलकूल झालें नाहीं; व तुम्हांवरचा तो कठीण प्रसंग टळला याबद्दल मला आनंद वाटत आहे. ’ मी त्यास बोललों, ‘ येवढ्यावरून तुला म्हणजे विशेष आनंद मानण्याचें कारण आहे असें तूं समजूं नको; कां कीं, तुझ्या मताप्रमाणें हा मजवर येणारा कठीण प्रसंग अजीबात टळला असें तूं मुळींच समजूं नको. राजकन्या फिरून खेळायास आली म्हणजे मी तिला पाहिल्याशिवाय कधींही राहणार नाहीं—मग तुझ्यापेक्षां लाखपटीनें का त्याबद्दल भीति मला कोणी घालीना ! ’

असो. तो बाकी राहिलेला दिवस मीं याच गोष्टीचा विचार करण्यांत घालविला. दुसरे दिवशीं सुलतानाच्या हुकुमावरून शहरांत असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला कीं, ‘ राज्यकन्या रझिया बेगम ही इतःपर क्रीडाभुवनांत कधींही खेळावयास जाणार नाहीं, व बुरखा घेतल्याशिवाय कधीं बाहेर पडाणर नाहीं. तिच्या संबंधानें जे अनर्थपात होतात त्यांविषयीं आमच्या राजकार्यधुरंधर मंत्र्यांनीं

आम्हांस नम्रतापूर्वक सविस्तर मजकूर कळवून, असे अनर्थ बंद होण्याची तजवीज व्हावी अशा आशयाचा अर्ज केल्यावरून आम्हीं ही व्यवस्था केली आहे. '

या जाहिरनाम्याच्या योगानें मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. परंतु तितक्याच मानानें हुसेन यास आनंद झाला. तो मला म्हणाला, ' महाराज, आतां मात्र खचीत तुम्हांवरचें संकट टळलें. राजकन्या आतां जनानखान्याचे बाहेर बहुधा निघायाचीच नाहीं, व निघाली तरी तिचें रूप कोणाच्या दृष्टीस पडावयाचें नाहीं. तेव्हां तिजपासून कोणालाही अपाय होण्याची भीति राहिली नाहीं, यबद्दल मी परमेश्वराचे मोठे आभार मानितों. ' मीं त्यास म्हटलें, ' तुझ्या बोलण्याचा सगळा रोंख माझ्या लक्ष्यांत आला. पण हें खचीत समज कीं, त्या सुंदरीला पाहण्याविषयींची मी आपली इच्छा तृप्त केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. आतां इतकें खरें कीं, तूर्त ती गोष्ट घडणें अवघड आहे. पण ती घडण्याचीं साधनें सर्व नाहींतशीं झालीं असें मुळींच नाहीं ! '

मग मी, रझिया हिचें रूप पाहण्यास काय युक्ति योजावी याचा विचार करूं लागलों. मला पुष्कळ युक्ति सुचल्या. पण त्यांत एकच विशेष सोईची व उपयोग होण्यासारखी दिसली. ती अशी. मीं आपल्याबरोबर कांहीं मोहरांचे तोडे व थोडेसें जवाहीर घेतलें, आणि सुलतानाच्या मुख्य बागवानाच्या घरीं गेलों. मीं त्याजपुढें मोहरांचा एक तोडा ठेवून म्हटलें, ' अहो बाबा, या मोहरा तुम्हांला मीं बक्षीस केल्या आहेत, व आणखीही कांहीं चांगलें बक्षीस तुम्हांला देण्याचा माझा विचार आहे. '

तो बागवान पोक्त व सज्जन असून त्याची बायको बहुतेक त्याच्याच वयाची होती. तिच्या नवऱ्यानें हास्यवदन करून मीं दिलेल्या बक्षिसाचा अत्यादरानें स्वीकार केला, आणि म्हटलें, ' अहो साहेब, मला जी ही आपण मेहेरबानी करून देणगी दिली तिजबद्दल मी आपला मोठा आभारी आहें. तथापि आपण जी येवढी

मोठी रक्कम मला दिली तिजबद्दल आपल्या मीं कांहीं तरी उपयोगीं पडावें अशी आपली इच्छा असलीच पाहिजे. तर आपली कोणती चाकरी म्यां करावी येवढें कृपा करून सांगा.' मीं त्यास उत्तर केलें, 'मला एक तुम्हांस विनंति करावयाची आहे. ती ही कीं, राजकन्या रझिया बेगम ही सुलतानाच्या जाहिरनाम्याप्रमाणें आतां बुरख्याशिवाय बाहेर पडावयाची नाहीं, व मला तर तिचें रूप पहाण्याविषयीं अत्यंत उत्कंठा लागली आहे. यासाठीं तुम्ही मला जनानखान्याच्या बागेंत येऊं देऊन एकवार तिचें रूप तेवढें कसें तरी माझ्या नजरेस पडेल असें करा.'

हें ऐकून मीं दिलेली मोहरांची पिशवी त्या म्हाताऱ्यानें तिरस्कारयुक्त मुद्रेनें मजकडे परत टाकिली आणि म्हटलें, 'अरे अविचारी मनुष्या! तूं मला हें कोणतें साहस करावयास सांगत आहेस? बरें समज, तुझा त्या बागेंत प्रवेश होईल असें मीं केलें व तुला ती राजकन्या पहावयास सांपडली, तर त्याचा परिणाम काय होणार? तुला वेड लागून जाईल, व या गोष्टीचा बोभाटा होतां होतां माझी लबाडी सहज बाहेर पडेल; आणि अशा प्रकारें तुला व मला या जोखमीच्या कामाबद्दल चांगलेंच प्रायश्चित्त भोगावें लागेल!' मग थोडा विचार करून म्हणतो, 'तुझा बागेंत प्रवेश होणें फारसें कठीण नाहीं; कां कीं, तुला स्त्रीचा वेष देऊन, रझिया ही तेथें फिरत असेल अशा वेळीं सहज त्या ठिकाणीं नेतां येईल; परंतु ती गोष्ट उघडकीस आल्यावांचून रहावयाचीच नाहीं. जनानखान्याच्या पहाऱ्यावर जे खोजे आहेत ते मोठे काकदृष्टि आहेत. ते केवळ संशयाच्या मूर्तीच असल्यामुळें, त्यांच्या हातांवर तुरी देणें मुष्किलीचें काम आहे. इतकें करूनही ही गोष्ट साध्य झाली तरी तिजपासून तुला आणखी अपाय आहेच. तर एकंदरीनें तूं या गोष्टीचा नाद सोडून दे व उभयतांसही असल्या भयंकर पेंचांत घालूं नको.'

त्या बागवानाच्या या भाषणामुळें माझा उत्साह कमी झाला असें मुळींच झालें नाहीं. मीं त्यास ती मोहरांची थैली परत देऊन

म्हटलें, 'अहो बाबा, तुम्ही माझा अन्हेर करूं नका; या ठिकाणीं माझी कोणाची ओळख नाहीं, माझे कोणी आप्तसोयरे नाहींत, किंवा कोणी स्नेहीसोबती नाहींत; आणि राजकन्येस पाहण्याची तर मला अत्युत्कट इच्छा झालेली आहे. ती इच्छा तृप्त होणें शक्य असेल तर फक्त तुमच्या द्वारेंच होईल, आणि तुम्हीं जर मजकरतां हें मनावर घेणार नाहीं, तर त्या दुःखानें माझा प्राणांत होईल हें खास समजा.' बागवानाचें व माझें झालेलें हें संभाषण त्याच्या बायकोनें ऐकिलें होतें. तेव्हां माझे हे शेवटचे शब्द ऐकून तिला माझी दया आली, आणि माझी विनंति मान्य करण्याच्या बाबतींत माझ्याप्रमाणें तीही त्याला गळ घालूं लागली. तें पाहून तो कांहीं वेळ विचार करीत स्तब्ध राहिला. त्यावरून मला वाटलें कीं, याच्या अंतःकरणाला पाझर सुटला. तशा स्थितींत मी त्यास जवळचे कित्येक हिरे आणखी बक्षीस दिले. ते पाहून, मजकरतां कांहीं तरी केलें पाहिजे असें त्याच्या मनांत आलें. तो म्हणाला, 'अरे गृहस्था! तुझ्या उपयोगीं मीं पडावें अशा हेतूनें तूं मला हा ऐवज दिलास; पण वास्तविक पुसशील तर हा देण्याचें तुला मुळींच प्रयोजन नव्हतें; कां कीं, तुला प्रथम पाहिल्याबरोबरच तुजवर माझी ममता जडून गेली, आणि आतां तर तुझें काम केल्यावांचून राहवयाचें नाहीं असा माझा निश्चय झाला आहे. मी इतका वेळ त्याच गोष्टीचें मनन करीत होतों, व आपणां उभयतांपैकीं कोणाचाही जीव धोक्यांत न घालितां तुझें काम कसें पार पाडतां येईल याविषयीं मीं एक युक्ति योजिली आहे.' हे त्या म्हाताऱ्याचे शब्द ऐकून मला इतका आनंद झाला कीं, त्याच्या भरांत मी त्यास मोठ्या प्रेमानें कडकडून भेटलों. नंतर मीं त्यास म्हटलें, 'बाबा, तुम्हीं कोणती युक्ति योजली आहे ती मला लवकर सांगा. ती समजण्याविषयीं मला पराकाष्ठेची उत्कंठा लागली आहे.' तो म्हणाला, 'मुला, अगोदर तुला हा हल्लींचा पोषाख टाकून अगदीं हलक्या प्रतीचा घातला पाहिजे; कारण, माझ्या मनांत तुला बागेंतील काम करणारा गडी बनवावयाचा आहे. हो;—पण तूं ठाण-

माणांत फार चांगला असून तुझा वर्ण गोरा व चेहरा मोठा सुबक आहे, यामुळें तूं येथें असणें हें खोजे लोकांस खरें वाटणार नाहीं, ह्याला युक्ति काय करावी?' मग थोडा विचार करून तो म्हणतो, 'हं, ठीक आहे. तुझ्या डोक्याला अतिशय खवडे आहेत असा बहाणा मी करतों, व त्यापासून पहाणाराला खंत वाटूं नये यासाठीं मी तुझ्या डोक्याला एके प्रकारचा चमत्कारिक टोप घालतो, म्हणजे झालें. या योगानें तुझी मुद्रा बावळी दिसावयास लागून खेरीज तूं घाणेरडा माणूस आहेस असें ते खोजे समजतील, व तूं त्यांच्या डोळ्यांत खुपणार नाहींस. आतां हा प्रकार कदाचित् तुला पसंत पडणार नाहीं. पण राजकन्येस पाहण्याची तुझी इच्छा तृप्त करण्यास याखेरीज मला दुसरा कोणताही मार्ग सुचत नाहीं.'

त्या म्हाताऱ्या बागवानाची ही योजना मीं पसंत केली, व त्याला हवा होता तसा पोषाख त्यानें मला चढविला. त्याच्या योगानें माझें ध्यान असें विचित्र बनून गेलें कीं, कोणत्याही स्त्रीनें मला पाहिलें असतां मजकडे तिचें लक्ष्य बिलकूल वेधूं नये. हें पोषाखाचें प्रकरण बराच वेळ चालल्यामुळें हुसेन यास कंटाळा येऊन मी काय करीत बसलों आहें हें पहाण्याकरितां तो घरांत आला. माझा चमत्कारिक वेष पाहून त्याला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें, व त्याची आश्चर्यभरित मुद्रा पाहून मला खूबच हंसें आलें; आणि तें पाहून तोही खदखदां हंसायाला लागला. त्यावरून, या सोंगाची बतावणी मजकडून बरोबर होईल कीं नाहीं, व हुसेन याच्या तोंडांत ही गोष्ट राहील कीं नाहीं याबद्दल बागवानाला संशय येऊन तो ही जरा चिंतातुर झाला असें दिसलें. पण या संबंधानें मीं स्वतःविषयीं त्याची पुरी खातरजमा केली, व हुसेन याजबद्दल तर असें सांगितलें कीं, तो माझा प्रत्यक्ष भाऊच आहे, तेव्हां त्याजबद्दलही फिकीर करावयास नको.

हें ऐकून बागवानाची चिंता दूर झाली. तो म्हणाला, 'बस पुरे, याहून ज्यास्त कांहीं मला नको. आतां तुझा बागेंत शिरकाव सहज होईल. त्याबद्दल तूं बिनधोक रहा. तुझ्या भावाला आतां जाऊं दे.

त्यानें वाटेल तर केव्हां केव्हां येथें यावें. मी त्याला तुझी हकीकत कळवीत जाईन.' इतकें झाल्यावर हुसेन निघून गेला व बागवानानें लागलीच मला बागेंत नेलें. त्यानें मला जमीन कशी खणायाची तें दाखवून माझ्या हातीं कुदळ दिली, व मला एक वाफा तयार करण्यास सांगितलें. मी काम करीत असतां तिकडून पुष्कळ खोजे गेले. पण मला पाहून त्यांच्या मनांत कांहीं एक अंदेशा आला नाहीं. ते म्हणाले, 'ठीक आहे; असले बावळट लोकच येथें असतील तेवढे बरे!'

दिवस मावळण्याचे सुमारास माझ्या धन्यास म्हणजे त्या बागवानास वाटलें कीं, हा आतां दमला असावा. त्यावरून त्यानें मला काम बंद करण्यास सांगितलें, व एका हौदाजवळ मला घेऊन गेला. तो हौद संगमरवरी दगडांचा फारच नामी बांधलेला असून त्यांतील पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होतें. तेथें एक कातडें पसरलेलें असून त्यावर आम्हां दोघांकरितां भोजनाचीं ताटें बागवानाच्या बायकोनें नुकतींच आणून ठेविलीं होतीं. त्या ठिकाणीं मद्याच्या कुप्याही ठेविलेल्या होत्या, व एक सारंगीही पडलेली होती. आमचें भोजन झाल्यावर आम्हीं यथेच्छ मद्य प्राशन केलें. तेव्हां तो म्हातारा रंगांत येऊन त्यानें सारंगी हातांत घेतली, व गाण्यास सुरुवात केली.

मी गाण्यावजावण्यांत निष्णात असल्यामुळें त्याचें तें ताकपिठें गाणें मला मुळींच आवडलें नाहीं. तरी पण मीं त्याच्या तोंडावर त्याची स्तुतिच केली. ती ऐकून तो अतिशय खुलला व माझ्या हातीं सारंगी देऊन मला म्हणाला, 'मुला, मीं येवढा वेळ तुला करमणूक केली; आतां तूं थोडीशी मला करावीस हें योग्य आहे. पाहूं दे मला तुझ्यांत हें कसब कितपत आहे तें.' त्याचें तें वेढब व बदसूर गाणेंबजावणें ऐकून मला त्याचा कंटाळा आला होता, व त्याच्या हातून केव्हां सारंगी घेईन व एखादी गाण्याची चांगली लकेर केव्हां मारीन असें मला होऊन गेलें होतें. तेव्हां त्यानें हें सांगितल्याबरोबर मला परात्काष्ठेचें स्फुरण चढलें, व मीं एक अत्युत्तम

चीज अशी वठवून दिली कीं, ती ऐकून म्हातारा गिराकाष्ठेचा खूष झाला, व त्यानें मोठ्या प्रेमानें माझी पाठ थोपटली.

मला वाटलें होतें कीं, मी ह्या गाण्यावजावण्याच्या कामांत कितीही कुशल असलों तरी येथें माझ्या गुणाचें चीज करणारा येऊन जाऊन काय तो म्हाताराच, दुसरें कोण असणार आहे? पण ही माझी समजूत चुकीची ठरली. एके दिवशीं तेथला मुख्य वजीर सहजगत्या बागेंत आला असतां माझ्या गाण्याच्या लकेऱ्या ऐकून मजजवळ आला व गाणें ऐकत उभा राहिला. मी आपला उगीच सहज लहर आल्यावरून गात होतों, यामुळें क्षणाभरानें माझी लहर नाहींशी झाल्याबरोबर तें बंद पडलें. मीं आपल्या नादांत असल्या-कारणानें वजिरास पाहिलें नव्हतें. पण माझें गाणें बंद पडल्या-बरोबर त्याला वाटलें कीं, आपल्याला पाहून हा लाजला आणि यानें तें मुद्दाम बंद केलें. नंतर त्यानें मला हटकल्यावरून मी शरमल्या-सारखें करून तेथून निघून जाऊं लागलों. तेव्हां तो म्हणतो, 'अरे ए, कां–चाललास कां?' मीं उत्तर केलें, 'महाराज, आपणां-सारख्या थोरांपुढें उभें रहाण्याची या पामराची छाती होत नाहीं.' तो म्हणतो, 'कांहीं चिंता नाहीं. तूं कांहीं भिऊं नको. तूं अगोदर कोण आहेस तें मला सांग पाहूं?'

याला उत्तर काय द्यावें हें मला सुचेना; सबब बागवानच माझ्या वतीनें बोलूं लागला. तो म्हणाला, 'सरकार, हा माझ्या हाताखालचा गडी आहे. याला बागेच्या कामासंबंधीं माहिती फारच चांगली आहे. असला हुशार कामकरी मिळाल्यामुळें मला मोठा हातोसा झाला आहे.' इतकें ऐकून घेऊन वजिरानें फिरून मला गावयास सांगितलें. माझें गाणेंबजावणें ऐकून वजीर इतका खूष झाला कीं कांहीं विचारूंच नका! तो म्हणाला, 'हा तर फारच मोठा कसबी दिसतो. मला वाटतें, दरबारचे नामांकित गवय्ये देखील याची बरोबरी करूं शकणार नाहींत!' मग थोडासा माझ्याजवळ येऊन तो म्हणतो, 'अरे, पण तुझ्या डोक्याला हें काय आहे?' हें ऐकून

बागवान त्यास सांगतो, 'महाराज, याचें डोकें खवड्यांनीं भरलें आहे त्याची क्लिस येऊं नये म्हणून त्याच्या डोक्याला हें आच्छादन घातलें आहे.' वजीर म्हणतो, 'अरेरे! हीं गोष्ट फार वाईट आहे. येवढा उणेपणा याच्या अंगीं नसता तर याची किंमतच न होती! व मी यास मोठ्या आनंदानें या भिकार स्थितींतून काढून नेहमीं आपल्याजवळ ठेविलें असतें व भाग्यास चढविलें असतें.'

इतकें बोलून वजीर निघून गेला. दुसरे दिवशीं त्यानें सुलतानास सांगितलें कीं, 'महाराज, आपले बागेंत एक अमोलिक रत्न आहे, तें आपणांस ठाऊक नाहीं.' असें म्हणून त्यानें आदले दिवशींची बागेंत घडलेली सर्व हकीकत त्यास सांगितली. त्यावरून माझें गाणें ऐकण्याविषयीं सुलतानास फार इच्छा झाली. तो म्हणाला, 'मी आज दुपारींच बागेंत जातों, व त्या मनुष्याचें कसब जें तुम्हीं इतकें वाखाणितां तें कसें काय आहे तें पहातों. तुम्ही त्या ठिकाणीं बैठक घालवून उपाहाराची तजवीज ठेवा.'

सुलतानाचा हुकूम झाल्यावर तेथें काय उशीर? आदले दिवशीं त्या म्हाताऱ्या बागवानानें व मीं ज्या हौदाजवळ भोजन केलें त्याच ठिकाणीं जमीन साफ करून नोकरांनीं रुजामे पसरले व सुरेख बैठक तयार केली. जवळच एका मेजावर उत्तम प्रकारच्या मद्याच्या कुप्या त्यांनीं ठेविल्या, व हिरव्या सांटिणीचे दोन लहान लहान तंबू देऊन त्यांत मेवामिठाईचीं ताटें व फळफळावळ हीं ठेविलीं. येवढें होत आहे तों वजीर, दरबारचे इतर मोठमोठे कामगार, गवय्ये, खुषमस्करे, इत्यादिकांसह सुलतानाची स्वारी तेथें आली.

सुलतान मुख्य स्थानीं बसला, व त्यानें इशारत केल्यावर बाकीची सर्व मंडळी आपापल्या दर्जाप्रमाणें ठिकठिकाणीं बसली. तेव्हां मीं उत्तम प्रकारच्या सुवासिक फुलांची परडी भरून सुलतानाचे पायांपाशीं नेऊन ठेविली, व त्यास मुजरा करून दरबारच्या रीतीप्रमाणें मोठ्या अदबीनें परत आपल्या कामास निघून जाऊं लागलों.

सुलतान मजकडे लक्ष्यपूर्वक पहात होता. त्यांतून मुख्यत्वेंकरून माझ्या डोक्याच्या त्या विचित्र आच्छादनाकडे तर तो फिरून फिरून एकसारखा पहात असे. माझें तें एकंदर ध्यान पाहून, वजिरानें ज्याविषयीं आपणाला काल सांगितलें तोच हा मनुष्य असावा असें सुलतानानें सहज ताडलें. तो मला उद्देशून म्हणाला, 'अरे ए खवड्या, तूं या ठिकाणीं काय उद्योग करीत असतोस?' तें ऐकून माझा धनी म्हणजे बागवान जवळच होता त्यानें माझ्या तर्फेनें उत्तर केलें. तो म्हणाला, 'हा माझ्या हाताखालचा कामकरी असून हा आपल्या धंद्यांत फार हुशार आहे.' हें तो इतकें ठासून बोलला कीं, जणूं काय तें सर्व खरेंच आहे असें ऐकणारास भासावें!

सुलतान एकसारखा मजकडे फिरून टक लावून पाहूं लागला. तो बागवानास विचारतो, 'हा पोरगा सारंगी उत्तम वाजवितो व यास गाण्याचेंही अंग फार चांगलें आहे ही गोष्ट खरी काय?' त्यानें उत्तर केलें, 'होय महाराज, ही गोष्ट अगदीं खरी आहे. याच्यासारखा मधुर आवाज तर साऱ्या पृथ्वींत कोणाचा नसेल. एकवार आपण याचें गाणें ऐकाल तर केवळ ब्रह्मानंदांत गुंग होऊन जाल.' त्यावरून सुलतान म्हणतो, 'गाऊं दे तर त्याला. त्याचें गाणें ऐकण्याची मला फार इच्छा झाली आहे.'

त्या ठिकाणीं जे कित्येक खुषमस्करे होते, त्यांपैकीं एकास वाटलें कीं, सुलतान ही सारी माझी थट्टा करीत आहे. त्यावरून तो माझा हात धरून मला आपल्याबरोबर नृत्य[1] करण्यास आग्रह केल्यासारखें दाखवूं लागला. त्याला वाटत होतें कीं, माझा अगोदरच विलक्षण अवतार, आणि त्यांतून मला नृत्य करण्याचें माहीत असण्याचा संभव नसल्यामुळें माझी कृति हास्यास्पद होऊन माझी खूब टर उडेल, व त्या योगानें सारी मंडळी पोट धरधरून हंसेल;

[1] त्या वेळीं पुरुषांनीं करमणुकीखातर नृत्य करण्याची चाल होती असें दिसतें.

पण अशा प्रकारें माझी फटफजिती करून तो स्वतःचा टेंभा जो मिरवणार होता तें सर्वच पारडें जेव्हां फिरलें, तेव्हां त्या बिचाऱ्यालाच 'भीक नको पण कुत्रा आंवरो' असें म्हणण्याची पाळी आली; कारण, त्यानें माझ्या हाताला स्पर्श करतांच त्याची मीं बळकट चिकाटी धरून त्याला इतकें कांहीं जोरानें हालविलें कीं, तें पाहून सारी मंडळी त्याच्या ह्या दुर्दशेबद्दल त्याची फारच थट्टा करूं लागली. नंतर त्याचा हात धरून मीं इतक्या सुरेख रीतीनें नृत्य केलें कीं, माझ्यापुढें तो अगदींच फिका पडून गेला. तें पाहून सुलतान, मुख्य वजीर, व इतर मंडळी यांनीं माझी फारच वाहवा केली.

नंतर मीं वागवानाची सारंगी घेऊन तालसुरावर कित्येक उत्कृष्ट चिजा-म्हणून अशीं कांहीं बहार करून सोडली कीं, सर्व मंडळी अगदीं तल्लीन व थक्क होऊन गेली. त्यांतून विशेषतः सुलतान व मुख्य वजीर हे तर पराकाष्ठेचे खूष होऊन एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. नंतर तंबुरी, सतार वगैरे तीन चार वाद्यें मुद्दाम सुलतानानें आणविलीं होतीं तीं घेऊन मला त्यानें गावयास सांगितलें. तें प्रत्येक वाद्य वाजविण्यांत व त्यावर गाण्यांत माझी अधिक अधिकच प्रवीणता दिसून आल्यावरून सुलतानाची मजवर इतकी कांहीं बहाल मर्जी झाली कीं, ती कांहीं पुसूंच नये. त्यानें लागलीच हजार मोहरांची एक थैली आणून मजपुढें ठेविली. मीं ती सोडून तिच्यांतल्या सर्व मोहरा, तेथें आलेले दरबारचे गवय्ये व शिपाईप्यादे वगैरेंस वाटून टाकिल्या. हें पाहून सर्वांस मोठा अचंबा वाटला. ते म्हणाले, 'हा मनुष्य म्हणजे एक झांकलें माणिक आहे! याचें केवढें, तरी हें औदार्य! असें औदार्य राजपुरुषाखेरीज इतर मनुष्याच्या ठायीं क्वचित्च दिसून येतें!' सुलतानानें मला विचारलें, 'तूं हा पैसा वांटून कां टाकिलास? आपल्या उपयोगाकरितां कां ठेविला नाहींस?' मीं उत्तर केलें, 'महाराज, मला पैशाची काय गरज आहे? आपल्यासारख्या महासमर्थ प्रभूच्या छायेखालीं मी

आहे त्याअर्थी मला कशाचीही उणीव नाहीं.' हें ऐकून सुलतानास अतिशय समाधान वाटलें, व इतर लोकांनीं माझी समयसूचकता पाहून माना डोलविल्या.

नंतर सुलतानानें उपाहाराचे पदार्थ घेऊन येण्याविषयीं नौकरांस हुकूम केला. सर्व मंडळी उपाहार करूं लागतांच तेथील गवय्यांचें गाणें सुरू झालें. ते लोक आपल्या कामांत मोठे कुशल असून त्यांचे कंठ फारच मधुर होते, आणि मधून मधून एकसारखे मद्याचे पेल्यावर पेले चालू असल्यामुळें त्या गायनाच्या थाटास मोठा रंग चढला होता. तथापि तें सर्व सुलतानास नीरस वाटलें— इतका कांहीं त्याचा माझ्या गाण्याबजावण्यासंबंधानें विलक्षण रीतीचा अनुकूल ग्रह झालेला होता !

कांहीं वेळानें सभा बरखास्त झाली. नंतर तेथले सर्व लोक व सामानसुमान जिकडचें तिकडे गेल्यावर मी व तो बागवान असे दोघेच त्या ठिकाणीं राहिलों असतां तो मला म्हणाला, 'तूं प्रथम भेटल्याबरोबर मला मोहरांची थैली बक्षीस दिलीस त्याच वेळेस मीं असें अनुमान केलें कीं, तूं कांहीं कोणी सामान्य मनुष्य नसावास; आणि आतां तर सरकारांनीं तुला येवढें मोठें दिलेलें बक्षीस जेथच्या तेथें तूं लोकांस वांटून टाकिलेंस हें पाहून माझा पहिला झालेला समज अगदीं बरोबर होता अशी माझी पक्कीच खात्री होऊन चुकली; कां कीं, अशीं औदार्याचीं कृत्यें हलक्यासलक्या लोकांच्या हातून कदापि व्हावयाचीं नाहींत !'

मी कोण, कोठला, व माझी पदवी काय हें त्या म्हाताऱ्या बागवानास सांगण्यास आतां कांहीं हरकत नव्हती. तथापि इतक्यांतच तसें करणें बरोबर नाहीं असें मला वाटलें. तरी पण मीं त्यास येवढें सांगितलें कीं, 'मी खानदानींतला मनुष्य आहें.' नंतर हें बोलणें ज्यास्त न लांबवितां मीं त्यास मध्येंच म्हटलें, 'पण म्हातारेबावा, माझा येथें येण्याचा मुख्य उद्देश राजकन्येस पाहण्याचा असून ती तर अजून माझ्या दृष्टीस पडली नाहीं; यामुळें खरोखर मी फार

अधीर झालों आहें.' तो म्हणतो, 'काय? ती अद्यापि तुझ्या दृष्टीस पडली नाहीं? वहावा! ती तर दररोज दासींसह बागेंत फिरायाला येते.' मग थोडासा खिन्न होऊन म्हणतो, 'कांहीं चिंता नाहीं. ती तुझ्या दृष्टीस पडेल; पण देव करो आणि मीं जी ही जोखीम अंगावर घेतली आहे, तिजबद्दल मला पश्चात्ताप करण्याची पाळी न येवो म्हणजे झालें!' तथापि एकंदरीनें त्या सुशील वृद्ध मनुष्यानें मला भीति न घालतां अथवा माझें धैर्य न खचवितां माझ्या इच्छेची वाढ उलटी वृद्धिंगतच केली.

ही गोष्ट झाली त्याच्या दुसरे दिवशीं मीं कांहीं वेळ बागेंत काम केल्यावर एका गुलाबाच्या ताटीशेजारीं पांवा वाजवीत मजेनें पडलों असतां एकाएकीं मजपुढें बुरखा घेतलेली एक स्त्री आली आणि मला म्हणाली, ''अरे गड्या, तो पांवा तूर्त ठेवून दे. राजकन्येची स्वारी बागेंत आली आहे तर तिच्याकरितां थोडींशीं उत्तम सुवासिक फुलें घेऊन ये. हें खरोखर तूं अगोदरच करायाला पाहिजे होतेंस. तूं अनुभवी व फार दिवसांच्या बागवानाचा नोकर असतां तुला तुझें काम बरोबर करतां येऊं नये ही लाजिरवाणी गोष्ट नव्हे काय?' मीं लागलाच उठून जमिनीला हात लावून त्या स्त्रीस मुजरा केला आणि म्हटलें, 'बाईसाहेब बागेंत आल्या ही गोष्ट मला माहीत नव्हती. माहीत असती तर अशी चूक माझ्या हातून झाली नसती. खेरीज हेंही मी तुम्हांस सांगतों कीं, त्या येथें येणार हें मला ठाऊक असतें तर त्यांच्यासारख्या थोर दर्ज्याच्या स्त्रीच्या दृष्टीस माझी ही बावळी मुद्रा न पडूं देण्याकरितां मी कोठें तरी लपून बसलों असतों.'

हें माझें बोलणें ऐकून ती स्त्री खदखदां हंसूं लागली. ती म्हणते, 'अरे, तूं भितोस कां? तुझ्या रोगग्रस्त डोक्यामुळें तूं असा विद्रूप दिसतोस म्हणून तूं कांहीं कोणाचा अपराध केला आहेस असें नाहीं! तेव्हां तुला दृष्टीस पडण्याची येवढी चोरी कशाला पाहिजे? मी तर तुला मुळींच असें तोंड चुकवूं देणार नाहीं; इतकेंच नव्हे,

तर ह्याच घटकेला राजकन्येच्या समोर तुला घेऊन जातें. तुझें व्यंग तिच्या सर्व दासींप्रमाणें तिलाही ठाऊक आहे. तरी तुजबद्दल तिच्या मनांत वाईट ग्रह मुळींच नसून उलटा तुला पाहून तिला आनंदच होईल. जा तर लवकर, परडीभर फुलें घेऊन ये. मी खचीत सांगतें कीं, तिजकडे तूं गेलास म्हणजे तुझा आदरच होईल; कारण, मी तिची दाई असल्यामुळें तिचा स्वभाव मला लहानपणापासून माहीत आहे.'

राजकन्येच्या दाईनें मला जी गोष्ट सांगितली तीहून अधिक प्रिय मला कांहींच नव्हतें! यास्तव मी चटकन् उठून बागवानाच्या घरांत गेलों, व एक परडी घेऊन आलों. थोडक्याच वेळांत ती मीं फुलांनीं भरली, व दाईच्या मागून चाललों. राजकन्या एका मोठ्या लतामंडपांत सोन्याच्या सिंहासनावर बसली असून तिच्या सभोंवतीं एकीपेक्षां एक वरचढ अशा पंचवीस तीस रूपवती तरुण दासी उभ्या होत्या. त्यांच्या सौंदर्याचें वर्णन किती तरी करावें? थोडक्यांत सांगतों कीं, स्वर्गींच्या अप्सराही त्यांजपुढें कांहींच नसतील असें मला वाटतें; आणि अशा अनुपम लावण्यवती स्त्रियांत अग्रेसर जी राजकन्या रझिया बेगम तिच्या रूपाचें वर्णन तर कधींच कोणाच्यानें होणार नाहीं! तिला पाहतांच, एकाएकीं विजेचा चकचकाट होऊन मनुष्य जसा भांबावून जातो व त्याच्या डोळ्यांपुढें अंधारी येते, तद्वत् माझी अवस्था होऊन मी चित्रासारखा स्तब्ध उभा राहिलों!

अशी माझी जी धांदल उडाली तिचें कारण सहजच त्या दासींच्या लक्ष्यांत आलें, व त्या मजकडे पाहून खो खो खो हंसल्या व कौतुकानें माझ्याकडे पाहूं लागल्या. आपल्या धनिणीचें लावण्य पाहून हा चकित झाला व याची अशी त्रेधा उडाली, असा जो त्यांचा समज झाला तो अगदीं बरोबर होता. कारण, खरोखरच त्या अद्वितीय सुंदरीला पाहिल्याबरोबर आपकानें माझी इतकी गाळण करून टाकिली कीं, माझें देहभान नाहींसें होऊन मी केवळ वेडा बनून गेलों!

दाई मला म्हणाली, 'अरे, असा दगडासारखा उभा कां राहि-

लास ? पुढें हो, आणि बाईसाहेबांना तीं फुलें नजर कर. ' हें ऐकून मी जरा शुद्धीवर आलों, व राजकन्येच्या सिंहासनाजवळ जाऊन त्याच्या पहिल्या पायरीवर फुलांची परडी ठेवून दिली; आणि राजकन्येपुढें साष्टांग नमस्कार घातला. ती मला म्हणाली, ' अरे ए, ऊठ; तला एकदां आम्हांस नीट पाहूं दे. ' मी उठून उभा राहिल्यावर त्या सर्व स्त्रियांनीं मला नीट निरखून पाहिलें. त्यांत मुख्यत्वेंकरून माझ्या डोकीचा तो टोप पाहून त्यांना कसेंसेंच वाटलेंसें दिसलें, व त्या फिरून खो खो खो हंसूं लागल्या.

क्षणभर ही गम्मत उडाल्यावर राजकन्येनें माझ्या हातांत एक सारंगी देवविली, आणि मला म्हणाली, ' काल तुझें गाणेंबजावणें ऐकून आमचे बाबा फार खूष झाले; ते इतके कीं, तूं केवळ अप्रतिम कसबी आहेस अशी त्यांनीं मजपाशीं तुझी स्तुति केली. मला ती कांहीं खरी वाटली नाहीं. तथापि तुझें कसब एकवार पहाण्याची मला इच्छा आहे. ' तें ऐकून मीं सारंगी लाविली, व पुढील अर्थाचें गाणें फार मंजुळ, मोहक व हृदयद्रावक सुरांत म्हटलें:—

[ अंजनीगीत. ]

**प्रेम तुजवरी दृढतर बसलें । मदनाग्नीनें हृदय पोळलें ॥**
**प्राप्ति तव परि अशक्य वदलें । मन माझें मजला ॥ १ ॥**
**तुजवरचा हा प्रेमा आतां । नेइल मजला मृत्युसुपंथा ॥**
**परि तव हृदया पाझर सुटतां । होइन कृतकृत्य ॥ २ ॥**

या गाण्याचा अर्थ काय व त्याचा रोंख कोणीकडे आहे हें त्या स्त्रियांस सांगून मीं त्यांस आणखी एकवार हंसवून सोडलें असतें, पण तो अर्थ वगैरे अगोदरच त्यांच्या लक्ष्यांत आला होता असें मला दिसलें. तथापि त्यावरून माझी त्यांनीं टर न उडवितां उलटी मला शाबासकी दिली. याचें मुख्य कारण हें होतें कीं, राजकन्येनें स्वतः प्रथम माझी प्रशंसा केली होती, तेव्हां तिच्या मनाचा हा कल पाहून त्या दासींनींही तदनुरूप वर्तन केलें. यानंतर एका दासीनें माझ्या हातची सारंगी घेऊन मला विणा दिला, व पुढें

कांहीं वेळानें तो परत घेऊन सतार दिली. हीं सर्व वाद्यें मीं इतक्या सुरेख रीतीनें वाजविलीं व तालसुरावर इतकें उत्तम गाइलें कीं, प्रत्येक वेळेस माझी ज्यास्त ज्यास्तच वाखाणणी त्यांनीं केली."

राजकन्या मला म्हणाली, 'अरे गड्या, आतांपर्यंत तूं गाऊन व वाजवून मोठी बहार केलीस यांत कांहीं संशय नाहीं; परंतु मीं असें ऐकिलें आहे कीं, तूं नृत्य करण्यांतही तसाच फार कुशल आहेस. तर तें तुझें कसब एकवार मला पाहूं दे. त्यावरून मीं एक करताल मागून घेतला व तिजपुढें नृत्य करून दाखविलें. तेव्हां तर सर्व दासी अगदीं चकित होऊन गेल्या. कोणी माझ्या चपलतेची, कोणी मंजुळ स्वराची, कोणी वादनपटुत्वाची, अशी एकसारखी माझी स्तुति सर्वजणी करूं लागल्या; ती इतकी कीं, दरबारच्या प्रमुख गवय्यांचें शिरोरत्न त्यांनीं मला करून सोडलें !

त्या दासींच्या तोंडून याप्रमाणें माझी ओतप्रोत स्तुति चालली असतां राजकन्या ही कांहीं एक न बोलतां एकसारखी मजकडे टक लावून पहात होती. इतक्यांत एकाएकीं तिनें मौन सोडलें व सिंहासनावरून खालीं उतरून मोठ्या कळवळ्यानें म्हणाली, 'अरेरे ! हा येवढा गुणवान् तरुण पुरुष आहे, पण याच्या डोक्याला तेवढा तो रोग असल्यामुळें याच्या गुणांची माती होऊन गेली आहे !' इतकें बोलून ती ताबडतोब राजवाड्यांत निघून गेली. तिच्या तोंडचे ते शब्द ऐकून, जणूं काय तिच्या हुकमावरूनच, तिच्या सर्व दासींनीं तेच उद्गार मोठ्यानें काढून अगदीं गोंगाट करून सोडला !

तेथलीं सर्व माणसें राजवाड्यांत परत गेल्यावर मीही तेथून निघून बागवानाच्या घरांत गेलों. तों त्या ठिकाणीं हुसेन हा माझी चौकशी करण्याकरितां आलेला होता तो मला भेटला. मीं दोघांसही उद्देशून म्हटलें, 'सलाम साहेब ! आमची म्यारी गांग

सांपडलों असें त्यावरून त्यांनीं ताडलें. ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत आल्यावरून मीं त्यांस म्हटलें, ‘ माझ्या तोंडचे शब्द ऐकून तुम्ही घाबरून गेलां असें मला स्पष्ट दिसतें. पण तुमची खातरजमा असूं द्या कीं, माझें डोकें अगदीं ताळ्यावर आहे—मला भ्रमबिम कांहीं मुळींच झाला नाहीं. याकरितां तुम्ही आपल्या मनांतली भीति अगदीं टाकून द्या. तथापि इतकें मी खचीत सांगतों कीं, त्या सुंदरीच्या प्रेमपाशांत जे कोणी सांपडतील ते सर्वच वेडे होऊन किल्ल्यावर पडावे असें जर असेल, तर माझीही नेमणूक तेथेंच व्हावी हें योग्य आहे असें मी खचीत सांगतों ! ’

इतकें बोलून मीं बागेंत झालेला सर्व प्रकार त्यांस निवेदन केला; आणि म्हटलें कीं, ‘ आतां यापुढें याच वेषानें राहून नेहमीं राजकन्येला बागेंत रंजवीत जावें अशी माझी इच्छा आहे. ’ हुसेन व तो म्हातारा बागवान या दोघांनींही, मीं आपला हा विचार रहित करावा म्हणून मजपाशीं पुष्कळ प्रकारें बुद्धिवाद केला. पण हुसेन यास, तूं खबरदार अशा प्रकारची गोष्ट माझ्यापाशीं काढशील तर, असें म्हणून मीं गप्प बसविलें, व बागवानास आणखी कांहीं द्रव्य देऊन त्याचेंही तोंड बंद केलें.

दुसरे दिवशीं जेवण झाल्यावर जरा विसांवा घेण्याचें माझ्या मनांत आलें. त्यावरून, बागेंत ज्या एके ठिकाणीं झाडांची खूब गर्दी असल्यामुळें मंडपासारखी गर्द छाया झालेली होती व मधून एक छानदार पाण्याचा पाट चालला होता तेथें बांधावर मी जाऊन बसलों. त्या बांधावर हिरवें चार गवत उगवलेलें असल्यामुळें त्यास मोठी रमणीय शोभा आली होती. त्या ठिकाणीं कधीं कधीं राजकन्या क्रीडा करण्यास येते असें मला समजलें होतें. सबब तिजवर आपलें जें प्रेम बसलें आहे त्यासंबंधानें विचार करीत बसण्याला हें स्थळ चांगलें आहे असें मला वाटलें. माझ्या मनांत शेंकडों चमत्कारिक कल्पना आल्या. त्या इतक्या विलक्षण होत्या कीं, आषक्यानें वेडावून गेलेल्या मनुष्याखेरीज दुसऱ्याच्या मनांत तशा कधींही

यावयाच्या नाहींत. पण हे गोडवे विचार फार वेळ माझ्या मनांत टिकले नाहींत. पाटांतील पाण्यांत पडलेलें माझें प्रतिबिंब सहज माझ्या नजरेस पडल्यावरून माझ्या मनाला स्वतःच्या त्या विचित्र वेषासंबंधानें इतकें कांहीं वाईट वाटलें कीं, तें मला सांगतां पुरवत नाहीं! मी किती तरी हलक्या प्रतीचा व हिडिस माणूस दिसत आहें, व भिकार वेष धारण करण्याची पाळी मजवर आली ही केवढी दुःखाची गोष्ट आहे असें मीं मनांत म्हटलें. माझ्या मनांत आणखी असा विचार आला कीं, 'भगवंता! ज्या राजकन्येवर माझें प्रेम बसलें आहे तिज-पुढें मला असल्या विजातीय वेषानें उभें रहावें लागतें हा माझ्या दैवाचा किती तरी विचित्र योग म्हणावा! याविषयींचें मी जितकें जितकें मनन करतों तितके तितके निराशेचे विचार अधिक अधिकच माझ्या मनांत येतात; कारण उघडच आहे कीं, असल्या या वेड्याविद्या वेषाच्या योगानें तिच्या अंतःकरणांत मजविषयीं प्रेमाचा अंकुर कदापि उत्पन्न होणार नाहीं. तस्मात् माझा एकंदरीनें हा सर्वच अविचार होय.' नंतर मीं आपल्या डोकीचा टोप काढून टाकून म्हटलें, 'माझ्या चेहऱ्याचा सर्व बिघाड करून टाकणारें हें माझें शिरस्त्राण जर मला काढून टाकतां आलें असतें तर माझी तेजस्विता पुष्कळच तिच्या नजरेस पडली असती, व त्याचा मला फारच उपयोग झाला असता!'

याप्रमाणें मी आपल्या स्थितीबद्दल दुःख करीत कांहीं वेळ बसल्यावर, तूर्त आणखी कांहीं दिवस तरी निदान याच स्थितींत रहाणें आपल्याला भाग आहे असा विचार मनांत आणून फिरून मीं तो टोप डोकीस घातला. इतक्यांत राजकन्येची दाई मजकडे आली, व आपला बुरखा काढून तिनें मला म्हटलें, 'अरे ए, मी केव्हांपासून तुला शोधीत आहें. तुला आनंदाची वातमी सांगण्याकरितां मी आलें आहें. ती ही कीं, तुझ्याहून चांगल्या स्थितींतल्या मनुष्याच्यापेक्षांही अधिक उंच पदवीस चढण्याची तुला वेळ आली आहे. हें पहा, राजकन्या रझिया बेगम हिनें काल तुझ्या व्यंगतेकडे लक्ष्य न देतां तुझ्या गुणांचें ग्रहण केलें—तुझें गाणें मोठ्या आनंदानें ऐकिलें—आणि

आज रात्रीं तर ती आपल्या महालांत तुला बोलावून तुझें गाणें ऐक-णार आहे व तुला नृत्य करण्यास सांगणार आहे! तर बरोबर प्रहर रात्रीस तेथें येण्यास तूं चुकूं नको.' असें म्हणून माझ्या उत्तराची वाट न पाहतां ती निघून गेली; व मी इकडे, माझ्या स्थित्यंतरास जो आरंभ झाला त्यापासून काय परिणाम होणार याविषयीं मोठ्या उत्सुकतेनें विचार करीत राहिलों.

मला राजवाड्यांत वेळेवर जाण्याविषयीं बजाऊन सांगण्याचें वास्तविक कारण मुळींच नव्हतें; कां कीं, मला त्यापेक्षां अधिक प्रिय दुसरी कोणतीच गोष्ट नव्हती. असो; मी लागलीच बागवाना-कडे गेलों, व त्यास सांगितलें कीं, 'आज रात्रीं मला राजकन्येकडे जावयाचें आहे, याकरितां कदाचित् मी उजाडेपर्यंतही घरीं परत येणार नाहीं. तर तुम्ही माझी वाट पाहूं नका व काळजी करीत बसूं नका.' नंतर मीं पूर्वी सांगितलेल्या पाटाच्या कडेस मऊ गवतावर विसांवा घेण्याकरितां जाऊन पडलों. त्या वेळेपासून एकसारखा मी, जाण्याची वेळ केव्हां होते म्हणून घटकापळें मोजीत राहिलों. शेवटीं एकदांची ती वेळ येऊन ठेपली. तों एक खोजा मजकडे आला, व मजबरोबर चल, असें मला म्हणाला. त्यानें मला एका आडवाटेनें जनानखान्यांत नेलें, व रझिया हिच्या महालांत माझा प्रवेश करून दिला.

राजकन्या रझिया ही एका कोचावर पडलेली असून तिच्या सर्व दासी खालीं रुजाम्यावर बसलेल्या होत्या व इकडच्या तिक-डच्या गोष्टी सांगून तिला करमणूक करीत होत्या. मला पाहतांच त्या उठून उभ्या राहिल्या, व एकदम सर्वजणी मोठ्या आनंदानें म्हणाल्या, 'ओ हो! हा पहा आला तो कालचा गमती मनुष्य! आतां एकसारखी हा मजा करून सोडील!' नंतर राजकन्या मला म्हणते, 'अरे गड्या, काल तूं बागेंत मला इतकी करमणूक केलीस कीं, आज फिरून तुला केव्हां बोलावून आणीन असें मला होऊन गेलें होतें.' इतकें बोलून, आयती लावून तयार ठेवलेली एक सारंगी तेथें होती ती तिनें माझे हातीं देवून मला गावयास

सांगितलें. तेव्हां त्या प्रसंगास उचित असें एक मनोहर पद मीं म्हटलें. त्यावरून राजकन्या फारच खूष झाली. त्या स्थितींत तिला पाहून माझ्या हृदयांतील आषक अनावर होऊं लागला. पण मीं प्रसंगावधान राखून, तिनें मला आणखी दोन तीन प्रकारचीं वाद्यें देऊन आपलें कसब दाखविण्यास जी आज्ञा केली, तीप्रमाणें यथायोग्य रीतीनें मीं आपलें काम बजाविलें.

यानंतर राजकन्येनें मला नृत्य करण्यास सांगितलें. त्यांत तर मी फारच पटाईत होतों. सबब तिची विशेष रीतीनें वाहवा मिळविण्याकरितां मी अनेक निरनिराळ्या रीतींनीं नृत्य करूं लागलों. इतक्यांत असें झालें कीं, ज्या एके प्रकारचे नृत्यांत अंगाचें विशेष चलनवलन करण्याची जरूर होती तें करीत असतां माझ्या डोकीचा टोप चांगला बसलेला नव्हता तो पट्‌दिशीं खालीं पडला. तेव्हां, माझ्या इतर अवयवांप्रमाणें माझें डोकेंही सर्वोत्कृष्ट असून, तरुण राजबिंड्या पुरुषास शोभण्यासारखे माझे केंसही काळेभोर आहेत असें पाहून माझी लबाडी अर्थात्च त्या सर्व स्त्रियांच्या लक्ष्यांत आली. त्याबरोबर साऱ्या दासींनीं एकदम ओरडून मोठा कलकलाट केला, व राजकन्या अत्यंत कोपयुक्त मुद्रेनें मजकडे पाहूं लागली. तिचे डोळे विस्तवासारखे लाल झाले, व त्याहूनही कडक शब्दांनीं ती मला म्हणाली, 'अरे हरामखोरा ! तूं आपला कोणीकडचा यःकश्चित् गरीब माणूस आहेस असें समजून मीं तुला येथें येऊं दिलें, पण तुझी सोंदेगिरी पूर्णपणें माझ्या लक्ष्यांत आली, व तूं आपल्या कसबानें जरी मला खूष करून सोडलें आहेस, तरी तुझ्या या महान् अपराधाबद्दल तुला मी कडक शासन केल्यावांचून कदापि राहणार नाहीं !' असें म्हणून तिनें आपल्या खोज्यांस बोलाविलें. त्यांनीं एकदम मजभोंवतीं गराडा घातला, व मला मारहाण करीत महालाच्या बाहेर घालवून दिलें. नंतर उजाडेपर्यंत त्यांनीं मला एका कोठडींत कोंडून ठेविलें, व उजाडतांच सुलतानास या गोष्टीची खबर दिली.

सुलतानासमोर मी जातांच तो अत्यंत कोपायमान होऊन मला म्हणाला, 'अरे मातागमनी मनुष्या! तूं अशा प्रकारें हा माळ्याच्या गड्याचा वेष धारण करून आमच्याशीं कां म्हणून लबाडी केलीस? यांत तुझा हेतु तरी काय होता? मला खचीत वाटतें कीं, येथें येऊन आमच्या जनानखान्यांतील स्त्रियांची अब्रू घ्यावी याखेरीज दुसरा तुझा कांहीं उद्देश नव्हता. पण परमेश्वरानें मोठी खैर करून माझ्या घराची अब्रू आज वचाविली. आतां तुझ्या अपराधानुरूप तुला शिक्षा केल्यावांचून मी राहणार नाहीं. आतांच्या आतांच मी साऱ्या शहरभर तुझी धिंड काढवितों, आणि तुजपुढें एक दवंडीवाला चालवून तुझा अपराध लोकांस जाहीर करतों, व नंतर तरवारींनीं व भाल्यांनीं तुझे राईयेवढाले तुकडे करून टाकण्याविषयीं हुकूम करतों. तूं कोण आहेस हें मी तुला विचारण्याच्या भानगडींत पडत नाहीं; कां कीं, तूं खानदानींतला असलास तरी त्याचा येथें कांहीं उपयोग होणार नाहीं. फार काय, पण तूं प्रत्यक्ष राजपुत्र असलास तरी, माझ्यापाशीं असला बेइमानपणा करून मला ठकविण्याचा यत्न केलास याबद्दल तुला देहान्त प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे. येवढ्यानेंच झालें असें नाहीं. ह्या कामीं आणखी एकजण माझ्या क्रोधास बळी गेला पाहिजे. माझ्या बागवानासही तुजप्रमाणेंच मी देहदंडाची शिक्षा देणार; कारण, तुझ्या या पाजीपणाच्या कृत्यांत त्याचें अंग असलेंच पाहिजे यांत संशय नाहीं.'

त्या बिचाऱ्या म्हाताऱ्या बागवानाकडे या गोष्टीसंबंधानें कांहीं एक दोष नाहीं असें सांगून मी त्याचा जीव बचावण्यास पहात होतों. पण माझें ऐकतो कोण! शेवटीं आम्हां दोघांचाही शिरच्छेद करण्यासाठीं आम्हांस मांगाच्या हवालीं करणार, इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें सुलतानाच्या मुख्य वजिरानें त्याजकडे जाऊन त्यास म्हटलें, 'महाराज, आज एक वाईट बातमी आपणांस सांगण्याचें दुर्दैवानें माझ्या कपाळीं आलें आहे. दहा महिन्यांपूर्वी गिझनीच्या राजानें वकिलामार्फत आपल्या कन्येस मागणी घातली असतां आपण त्यास नकार

सांगितल्यावरून त्यास राग आला, व त्याकरितां कंदहाराच्या राजाशीं सख्य करून त्यानें आपला सूड घेण्याचा निश्चय केला आहे. या दोघां राजांनीं आपलीं सैन्यें एकत्र केलीं असून ते आपल्या राज्यावर चाल करून येत आहेत. ते सिंधू नदी उतरून आले आहेत, आणि समरकंद व बुखारा या शहरांच्या दरम्यान कोठें तरी या वेळेस त्यांची हालचाल आहे.'

ही वातमी ऐकून सुलतान घाबरून गेला. तो वजिरास म्हणतो, 'बरें, आतां या संकटाचें निवारण कोणत्या प्रकारें करण्याचा तुम्हीं विचार केला आहे?' वजीर उत्तर करतो, 'या वेळीं एकच उपाय मला दिसतो. तो हा कीं, आपलें सर्व पायदळ एका हुशार व कावेबाज सेनापतीच्या हाताखालीं देऊन त्यास इतक्याच्या इतक्यांत शत्रूंवर पाठवावें, व आपलें सर्व सैन्य जमा करून आपणांस शत्रूंशीं सामना करतां येण्याचें सामर्थ्य येईपर्यंत त्यानें त्यांस गुलकाविण्या दाखवाव्या, अशी व्यवस्था करावी. खेरीज, या कामांत ईश्वर आपणांस सहाय होईल अशीही तजवीज करावी—राज्यांतील सर्व मशिदी सदोदित उघड्या ठेवून एकसारखी तेथें प्रार्थना चालू ठेवावी; राज्यांतील सर्व लोकांनीं कांहीं दिवस एकसारखीं उपोषणें करावीं; गरीबगुरिबांस खैरात वाटावी; व सर्व कैदी—मग त्यांनीं कोणतेही अपराध केलेले असोत—ते बंधमुक्त करावे. अशा उपायांनीं परमेश्वर आपणांस सहाय होऊन आपणांवर आलेलें अरिष्ट निवारण करील अशी माझी खात्री आहे.'

सुलतान वजिरास म्हणतो, 'तुमचा सल्ला मला फार योग्य दिसतो, व त्याप्रमाणें सर्व मी करणार. शत्रूंच्या तोंडावर जें सैन्य ताबडतोब पाठवावयाचें त्याचे अधिपति तुम्हीच व्हा, व मी इकडे जलदी करून फार मोठ्या सैन्याची तयारी करतों, आणि तें तुमच्या मदतीस पाठवितों; म्हणजे पहिलें व हें सैन्य मिळून आपल्या सैन्याचा फारच मोठा जमाव होईल, व तुम्हीं सहज शत्रूंची दाणादाण करून टाकाल. शिवाय तुमच्या सांगण्याप्रमाणें जिकडे तिकडे मशिदींतून

प्रार्थना चालू करण्याविषयीं, गरिबांस दानधर्म करण्याविषयीं, व कैदी सोडून देण्याविषयीं मी हुकूम करतों. फार तर काय, पण इतक्यांतच ज्या दोघां महान् अपराध्यांस मीं देहान्ताची शिक्षा फर्माविली आहे, ती ही रद्द करून टाकतों !' सारांश, अशा प्रकारें सुदैवेंकरून आकस्मिक रीतीनें मी व विचारा तो म्हातारा बागवान या उभयतांचे प्राण वांचले. मी राजवाड्यांतून बाहेर पडल्याबरोबर, आरंभीं या शहरीं येतांच ज्या सराईत आम्हीं बिऱ्हाड ठेविलें होतें, तेथें गेलों. त्या ठिकाणीं हुसेन हा मजविषयीं निराश होऊन दुःख करीत बसलेला मला आढळला. त्याला मजवर आलेल्या संकटाचा सर्व वृत्तांत कळला होता. तेव्हां एकाएकीं सुखरूप मी त्याचे दृष्टीस पडलों याबद्दल त्याला परमावधीचा आनंद व आश्चर्य वाटलें. बागवानाच्या येथें वेष पालटून राहिल्या दिवसापासून या वेळेपर्यंतचा इत्थंभूत वृत्तांत मीं त्यास सांगितला; व इतक्या थरास गोष्ट आली तरी अद्यापि जनानखान्यांत प्रवेश होण्याचा आणखी एखादा नवा मार्ग शोधून काढावा असें माझ्या मनांत होतेंच ! पण हुसेन हा माझ्या पायीं पडून गाहिंवरानें म्हणाला, 'महाराज, आपण होऊन आपल्या पायावर धोंडा पाडून घेत होतां, असें असतां परमेश्वरास आपली करुणा येऊन त्यानें आपल्या विचित्र लीलेनें आपणांस तारलें. याकरतां आतां तरी सावध होऊन फिरून मोहपाशांत सांपडूं नका, व अकालीं मृत्युमुखीं पडण्याच्या भीतीपासून दूर रहा ! अरेरे ! ही झालेली सर्व हकीकत जर तुमच्या वडिलांस कळली, तर त्यांना केवढें दुःख होईल, व तुमच्या अविचाराबद्दल व वेडेपणाबद्दल त्यांना काय वाटेल याची कल्पनाही करतां येणें अशक्य आहे ! महाराज ! मी काय बोललों याचा कृपा करून नीट विचार करा, व या राजकन्येचा नाद सोडून द्या; आणि असें करणें हेंच तुम्हांस उचित आहे. तिच्या मोहपाशांत सांपडल्याकारणानें तुमच्या जिवावर येऊन बेतली होती हें लक्ष्यांत आणून तिजविषयीं तिरस्कार तुमच्या मनांत आला पाहिजे, व विचारानें तुम्हीं आपल्या मनास आळा घातला पाहिजे.

शेवटीं, तुम्हांकरितां माझा जीव तिळतीळ तुटत आहे व माझ्या डोळ्यांतून अश्रु चालले आहेत, हें पाहून तरी निदान तुमच्या हृदयास पाझर सुटो, येवढीच माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे ! तुमचे वडील अगदीं पिकलें पान झाले असून या घटकेस ते कदाचित् स्वर्गाची वाट चालत असतील, आणि असें असेल तर त्यांच्या वियोगानें दुःखित होणाऱ्या त्यांच्या प्रजाजनांचें सांत्वन करण्यास तुम्हांखेरीज कोण समर्थ आहे ? तुम्हांस ते केवळ दैवत समजत असून तुमच्या वियोगाचा एकेक क्षण त्यांस युगाप्रमाणें भासतो, असें असून त्यांच्या ह्या अकृत्रिम व अनुपम प्रेमाचा मोबदला तुम्हीं त्यांस अशा प्रकारें द्यावा हें तुम्हांस उचित आहे काय?'

अशा प्रकारें हुसेन यानें भाषण केलें, त्या योगानें माझ्या अंतःकरणास द्रव आला. मीं त्यास म्हटलें, 'हुसेन, बस पुरे, आतां इतःपर माझ्या छांदिष्टपणाबद्दल तुला बोलण्याचें कारण पडणार नाहीं हें खचींत समज. तुझ्या बुद्धिवादाच्या योगानें माझ्या हृदयांत पूर्ण प्रकाश पडला. तर आतां ह्या अपेशी ठिकाणाहून निघण्याची लवकर तयारी कर. अगे निर्दय राजकन्ये ! तुझ्या निष्ठुरतेच्या व कालगतीच्या योगानें मला तुझी विस्मृति पडो !' आमचें इतकें बोलणें होत आहे तों तो म्हातारा बागवानही तेथें आला व मला म्हणाला, 'सुलसान साहेबांनीं मला कामावरून दूर केलें आहे.' मीं त्यास म्हटलें, 'बरें, कांहीं चिंता नाहीं. तुझी नोकरी जाण्यास ज्या अर्थी मी कारणीभूत झालों आहें, त्या अर्थी तुझें नुकसान भरून देणें मला योग्य आहे. तर आतां तूं इतकेंच कर कीं, मी जातों तिकडे मजबरोबर चल, म्हणजे तुझा निर्वाह पहिल्यापेक्षांही चांगल्या रीतीनें चालेल अशी व्यवस्था मी करून देतों.' तो म्हणाला, 'तुमचा याबद्दल मी मोठा आभारी आहें. पण मला आतां आपली जन्मभूमि सोडून दुसरीकडे जाण्याची इच्छा नाहीं. ज्या खेड्यांत मी जन्मलों तेथें मी आतां जाणार, व आजपर्यंत जें काय थोडेंबहुत कमाविलें व तुम्हीं जो ऐवज मला कृपा करून

बक्षीस दिला,. त्यावर आयुष्याचे शेवटचे दिवस घालविणार.' या त्याच्या इच्छेच्या आड मला येतां येईना; सबब त्यांतल्या त्यांतच त्याचें सुख वृद्धिंगत करण्यारितां मीं त्यास आणखी कांहीं मोहरा व जवाहीर दिलें.' तेव्हां तो अतिशय खूष झाला व माझा निरोप घेऊन निघून गेला.

नंतर आम्ही त्याच दिवशीं करिझमी शहर सोडून निघालों, व ओत्रार येथें माझा लवाजमा होता त्या ठिकाणीं गेलों. मला जाऊन फार दिवस झाले नव्हते, तरी मी कधीं येईन म्हणून चातक पक्ष्याप्रमाणें माझे लोक माझी मार्गप्रतीक्षा करीत राहिले होते. मीं आल्याबरोबर त्यांस सांगितलें कीं, 'आतां तावडतोब आपण अस्त्राखान येथें जाऊं. त्यांना तेंच पाहिजे होतें. कारण, त्यांस आपल्या बायकामुलांस सोडून बरेच दिवस झाले होते, यामुळें ते त्यांच्या भेटीविषयीं फार उतावळे होऊन गेले होते. ओत्रार येथून आम्ही जलदी करून निघालों व हलक्या हलक्या मजला करीत अस्त्राखान येथें चाललों असतां, रस्त्यांत, माझ्या बापानें मुद्दाम पाठविलेला जासूद मला भेटला. त्याजपाशीं बापानें स्वदस्तुरचें पत्र दिलें होतें. त्यांतील सारांश असा होता:—'मी हल्लीं अजारी पडलों आहें. त्यांतून मी वांचेन असें दिसत नाहीं. याकरितां इकडे तूं लवकर निघून ये, व मी हें जग सोडून जाण्यापूर्वी मला एकवार तुला पोटाशीं धरून मनाचें समाधान करूं दे!'

हें पत्र वाचून मला पराकाष्ठेचें दुःख झालें, व मी दचकूच दरमजल करीत अस्त्राखान येथें जाऊन पोहोंचलों. इतकी मीं जाण्याची घाई केली, पण तिचा फारसा उपयोग झाला नाहीं; कां कीं, मी बापास जाऊन भेटलों तों त्यास फक्त धुगधुगी राहिली होती. ती त्याची स्थिति पाहून माझें काळीज अगदीं फाटून गेलें. मी त्याच्याजवळ जाऊन बसलों व त्याचा हात आपल्या हातांत घेऊन अश्रूंनीं तो सर्व भिजविला; आणि मोठ्या दुःखानें म्हटलें, 'अहो बाबा! कोणत्या स्थितींत आज मी तुम्हांस पहात आहें! ही तुमची स्थिति

माझ्या हृदयाचें विदारण करीत आहे, व या देहांतून माझे प्राण जाऊं पहात आहेत!' या माझ्या शब्दांचा केवळ त्रैलोक्यचिंतामणिमालेप्रमाणें उपयोग होऊन माझ्या बापानें डोळे उघडले, व मोठ्या कष्टानें तो पुढील शब्द बोलला. तो म्हणाला, 'मुला! तूं एकदांचा आलास ही फार चांगली गोष्ट झाली. तुजकरितांच काय तो माझा जीव घोंटाळून राहिला होता. मला आतां कशाचीही इच्छा राहिली नाहीं!' असें म्हणून त्यानें प्राण सोडला. या सर्व प्रकारावरून मला असा भास झाला कीं, माझ्या सत्वशील पित्याची, मला जिवंत भेटून माझ्याशीं दोन शब्द बोलण्याची जी शेवटची इच्छा ती तृप्त करण्याकरितांच जणूं काय येवढ्या वेळपर्यंत त्याला स्वर्गी नेण्यास देवदूत आपली खोटी करून मुद्दाम राहिले होते!

असो. मी बापाचें उत्तरकार्य त्याच्या योग्यतेप्रमाणें करून गादीवर बसलों. मी राज्यकारभार अशा रीतीनें चालवूं लागलों कीं, आपल्याविषयीं लोकांचा पूर्वीपासून झालेला जो उत्तम ग्रह तो कायम रहावा. हा माझा यत्न फार चांगला सफळ झाला; व माझी प्रजा, आजपर्यंत जे अत्युत्तम राजे जगांत होऊन गेले त्यांत माझी गणना करूं लागली. फार काय, पण माझे सर्व लोक मला देवाप्रमाणें भजूं लागले व अद्यापिही त्यांचा माझ्याविषयीं तोच पूज्यभाव कायम आहे. त्यांचें कल्याण जेणेंकरून होईल तेच यत्न मी सदोदित करीत असल्यामुळें तेही माझें मनोरंजन जेणेंकरून होईल असे उपाय नित्य शोधीत असतात. त्यांची या कामीं एकसारखी चढाओढ चालली असल्यामुळें माझें दरबार म्हणजे केवळ आनंदागारच बनून गेलें आहे. असाच प्रकार शहरांतही सारखा चालू असतो. सारांश, माझ्यासारखी प्रजा कोणत्याही राजाची नसेल असें मला वाटतें. माझ्या लोकांच्या आनंदांत विघात न यावा म्हणून मी आपलें दुःख नेहमीं त्यांजपासून छपवीत असतों. मला पक्कें ठाऊक आहे कीं, मला अंतर्यामीं मोठें

दुःख आहे असें जर त्यांना कळलें, तर त्यांना अतिशय वाईट वाटून माझ्या राजधानींत जिकडे तिकडे जो आनंदबोध चालला आहे त्याच्या ऐवजीं चोहोंकडे हाहाकार ऐकूं येईल !

मी राज्यावर बसून फार दिवस झाले नाहींत तोंच मला फिरून रझिया बेगम हिची आठवण होऊं लागली. माझा बाप मरण पावला, त्यानंतर त्याचें उत्तरकार्य मीं केलें, व पुढें राज्यभार अंगावर घेतला, इतक्या मोठमोठ्या गोष्टी मध्यंतरीं घडल्या, त्यांच्या योगानें तिजविषयीं माझ्या अंतःकरणांत जो पूर्वीं प्रेमांकुर उद्भवला होता तो वास्तविक पहातां सुकून जावा. पण तसें कांहींएक न होतां माझें चित्त जरा स्थिर झाल्याबरोबर त्यास उलटा नवा जोम आला. ही गोष्ट मीं हुसेन यास सांगितली. तेव्हां तो मला म्हणाला, 'महाराज, आतां तुम्ही येवढ्या मोठ्या राज्याचे अधिपति झालां आहां, त्या अर्थीं त्या राजकन्येस मागणी घालण्यास तुम्हांस सर्व प्रकारें अधिकार प्राप्त झाला आहे. आणखी, हें बोलणें करण्याकरितां करिझमीच्या सुलतानाकडे जो तुम्ही वकील पाठवाल त्यांच्या मार्फत त्या सुलतानास असें कळवा कीं, तुमच्या शत्रूंशीं लढण्याचे कामीं तुम्हांस साहाय्य करण्यास आम्ही तयार आहों. असें केलें म्हणजे आपणांला या कामीं यश येण्याविषयीं संशय नको.'

हुसेन याचा सल्ला मला ठीक वाटला, व त्या कामावर मीं त्याचीच योजना केली. मी त्याजबरोबर मोठा लवाजमा देऊन सुलतानास अर्पण करण्याकरितां मौल्यवान् नजराणेही पाठविले, आणि पुढील पत्र त्याला लिहिलें:—

"राजाधिराज करिझमीचे सुलतान महाराज यांचे सेवेसी अस्राखानचे राजाकडून परमादरपूर्वक विनंति करण्यांत येत आहे कीं, आपली परमरूपवती व परम थोर कन्या रझिया बेगम ही आपण कृपा करून आम्हांस देण्यास कबूल असाल तर तिला पट्टराणी करण्याची आमची इच्छा आहे. तसेंच आपलेपाशीं फार मोठें व सदा यशस्वी असें सैन्य असल्यामुळें दुसऱ्याच्या मदतीची जरी आपणांस जरूर नाहीं, तरी आपणांवर जे शत्रु हल्लीं

चालून आले आहेत त्यांची पुरती खोड मोडण्याकरितां खुद्द आमचें व आमच्या मांडलिक राजांचें सर्व सैन्य आम्ही आपल्या सेवेस पाठविण्यास तयार आहों. ज्यादा काय लिहिणें ? कृपालोभ असावा, हे विनंति."

ही वकिली करण्याकरतां हुसेन यास मीं जो पाठविला तो कितपत यश घेऊन येतो याकडे रात्रंदिवस माझें लक्ष्य लागून राहिलें होतें हें सांगावयास नकोच. शेवटीं हुसेन हा बरेच दिवसांनीं एकदांचा आला. त्यानें मला सांगितलें कीं, 'करिझमीच्या सुलतानानें माझें आदरातिथ्य चांगलें केलें. पण रझिया बेगम ही आपणांला प्राप्त होण्याची आशा नाहीं.' मीं म्हटलें, 'असें काय ? तर मग मीं तिचा नाद अजीबात सोडून देऊं म्हणतोस ?' त्यानें उत्तर केलें, 'दुसरें कांहीं नाहीं. ती गिझनीच्या राजास देण्याचें सुलतानानें वचन दिलें आहे, येवढ्याच कारणाकरितां तुम्हांस ती मिळण्याची आशा नाहीं. त्या राजानें सुलतानचें सैन्याचा शेंकडों वेळां पराभव करून त्यास त्राहि त्राहि करून सोडलें, तेव्हां आपल्या देशाचे व अब्रूचे संरक्षणार्थ त्याशीं त्याला तह करणें भाग पडून मुलगीही देण्याचें कबूल करावें लागलें. आणखी गिझनीच्या राजाचा त्या सुलतानाशीं लढाई आरंभण्याचा मुख्य हेतु हाच होता कीं, त्यानें शरण येऊन ती राजकन्या आपल्याला द्यावी. तेव्हां तो त्याचा हेतु साधल्यामुळें त्या उभयतांचा हल्लीं चांगला सलोखा झाला असून, मी करिझमीहून निघाल्यावर दोन दिवसांनीं रझिया ही गिझनी येथें जाण्यास निघावयाची होती.'

हें वर्तमान ऐकून माझें देहभान ठिकाणावर राहिलें नाहीं. मीं आपल्या कमनशिबाबद्दल स्वतःला इतकें कांहीं बोलून घेतलें कीं, माझें डोकें फिरून मी आतां वेडा तर होत नाहीं ना, असें हुसेन यास भय वाटलें. हा जो माझ्या मनाला धक्का बसला त्यामुळें मी नुसता दुःखी होऊनच राहिलों नाहीं, तर खरोखर दुखणेंही घेतलें; आणि त्या दुखण्यांतून मी कसा बरा झालों याचें माझें मलाच मोठें नवल वाटतें. कारण, माझ्या मनाची त्या प्रसंगीं अशी कांहीं स्थिति होऊन गेली होती कीं, तिच्या योगानें मी बरा होण्याचा अगदींच

संभव नव्हता. असो. पुढें माझी प्रकृति जरी बरी झाली, तरी माझ्या अंतःकरणास् समाधान वाटेना. रझिया ही सदोदित मला डोळ्यांसमोर दिसे, व तिचें लग्न झालें असून ती आपल्या पतीसमागमें सुखानें नांदत आहे असा मला भास होई. यामुळें तर माझ्या मनाला जी तळमळ लागत असे तिचें वर्णन करतां येत नाहीं. हा सर्व प्रकार हुसेन याच्या लक्ष्यांत येऊन, रझिया हिचा मला विसर पडावा म्हणन त्यानें अनेक रूपवती तरुण दासी माझ्या जनानखान्यांत आणून ठेविल्या. त्याच्या ह्या दीर्घ प्रयत्नानें माझा जनानखाना जणूं काय स्वर्गींच्या अप्सरांचें मंदिरच बनून गेलें. पण याचा उपयोग म्हणाल तर बिलकूल न होतां रझिया बेगम ही नेहमींप्रमाणें रात्रंदिवस मला डोळ्यांसमोर सारखी दिसत असे !

अशा प्रकारें हुसेन याचा इकडे उद्योग चालला असतां माझ्या मुख्य वजिरानें मला एके दिवशीं सांगितलें कीं, ' राजधानीच्या वेशीपाशीं नुकतेच कित्येक हमामखाने बांधले असून तेथील पाणी फारच स्वच्छ व शुद्ध आहे. त्या हमामखान्यांचे खांब उत्तम प्रकारच्या संगमरवरी पाषाणाचे असून तेथील हौद केवळ अप्रतिम आहेत. या हमामखान्यांची शोभा पहाण्याकरितां लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्या ठिकाणीं जात असतात; व विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, ते कोणीं बांधले हें कोणाही मनुष्यास ठाऊक नाहीं. ज्याला विचारावें तो सांगतो कीं, ते एकाएकींच येथें दिसूं लागले, यापलीकडे आपणाला त्यांजविषयीं कांहीं एक माहिती नाहीं.' हें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें, व हा अलौकिक चमत्कार काय आहे तो स्वतः पहावा म्हणून मी वेष पालटून वजिरासह त्या ठिकाणीं गेलों; तों वजिरानें त्या हमामखान्यांचें जें वर्णन केलें होतें त्याहूनही त्यांची विशेष शोभा पाहून मला अधिकच नवल वाटलें. त्यांतही आणखी विशेष अचंब्याची गोष्ट ही कीं, त्या ठिकाणीं स्नान करणाऱ्यांच्या सेवेस जे चाळीस तरणे गुलाम हजर होते ते फारच सुरेख

असून इतके हुबेहूब एकासारखे एक होते कीं, एक लपवून दुसरा पुढें आणला तर त्यांच्यांतील भेद कळण्यास मुळींच मार्ग नव्हता!

त्या हमामखान्यांच्या मालकाचें वय अजमासें पन्नाशीच्या जवळ जवळ होतें. तथापि तो दिसण्यांत मोठा उमदा होता. स्नान करण्याकरितां त्या ठिकाणीं जे लोक येत त्यांची बरदास्त उत्तम प्रकारें रहाण्याविषयीं तो फार काळजी घेत असे. त्या मंडळीचें स्नान झाल्यावर त्यांना पिण्याकरितां उत्कृष्ट प्रकारचें मद्य देण्याची तजवीज केलेली असे. तें पिऊन ते फार संतुष्ट होत्साते आपापल्या मार्गानें निघून जात. मीं ते हमामखाने पाहून परत वाड्यामध्यें आल्यावर आपल्या सर्व मंत्रिमंडळास बोलाविलें. ते हमामखाने त्या सर्वांनीं पाहिलेच होते. यांच्याविषयीं तुमचें मत काय म्हणून त्यांस मीं विचारिलें. त्यांनीं मला जें काय सांगितलें त्यांत कांहीं विशेषसा अर्थ मला दिसला नाहीं. सबब ज्यानें ते बांधले होते त्या मालकाशींच या संबंधानें आपण संभाषण करावें म्हणून त्याला मीं बोलावून आणविलें. याही कामावर मीं हुसेन याचीच योजना केली. तो त्यास ताबडतोब घेऊन आला. तो आल्याबरोबर त्यानें मजपुढें साष्टांग नमस्कार घातला. मीं त्यास स्वतः हातीं धरून उठविलें व त्याला मोठा आदर केला.

माझें हें आदरशील वर्तन पाहून तो मनुष्य फारच खूष झाला, व माझी ओतप्रोत स्तुति करूं लागला. तो मूळचाच बोलका असून खेरीज खुषींत आल्यामुळें त्याचें भाषण इतकें रसाळ झालें कीं, मीं व दरबारच्या साऱ्या लोकांनीं त्याची अतिशय तारीफ केली. त्याचें बोलणें ऐकण्यांत माझें मन इतकें गढून गेलें कीं, ज्या कामाकरितां त्यास बोलावून आणिलें होतें त्या संबंधानें त्याशीं बोलण्याचें भान मला मुळींच राहिलें नाहीं! नंतर कांहीं वेळानें मीं त्यास म्हटलें, 'अहो बाबा, तुमच्याशीं थोडा वेळ संभाषण झालें तेवढ्यावरूनच तुम्ही मोठे तत्वज्ञानी आहां अशी माझी खात्री झाली. असो; मला तुम्हांस एक विनंति करावयाची आहे. ती ही कीं, या अत्राखान

शहराच्या वेशीपाशीं जे इतके सुंदर हमामखाने तुम्हीं बांधले आहेत, ते केव्हां व कसे बांधले हें कोणासही माहीत नाहीं. तर या गोष्टींचा खुलासा, मजपाशीं कांहीं एक चोरून न ठेवतां तुम्ही कराल अशी मला उमेद आहे.' त्यानें सांगितलें कीं, 'माझ्या पदरीं चाळीस कारागीर आहेत. ते सर्व मोठे हुशार व अनुभवी असून आपापल्या कसबांत प्रत्येकजण नेहमीं दुसऱ्यावर कडी करूं पाहतो, अशी स्थिति आहे. तेव्हां त्यांच्या साहाय्यानें हेंचसें काय, पण याहूनही जास्त सुंदर व मोठें काम मी एका दिवसाचे आंत उठवूं शकेन. हे सर्व कारागीर मुके आहेत, पण त्यांची बुद्धि इतकी तीव्र आहे कीं, आपल्या मनांत जें काय आहे तें करण्यासंबंधानें यत्किंचित् खूण किंवा हावभाव केल्याबरोबर त्यांची चट्कन् समजूत पडते. आपण मनांत कांहीं उद्देश योजून त्यांजकडे जरा पाहिलें कीं लागलीच आपला उद्देश त्यांना कळून येईल. आपली इच्छा असेल तर मी त्यांस येथें आणवितों, म्हणजे आपण वाटेल तो हुकूम केला असतां तो ते कसा तावडतोब बजावितात हें आपणाला दिसून येईल.'

त्या मनुष्यानें जें काय सांगितलें त्याच्या खरेपणाची प्रतीति पहाण्याची मला फार इच्छा झाल्यावरून मीं लागलीच त्या गुलामांस बोलावून आणविलें. ते आल्यावर, ज्यांना आपण हमामखान्यांत पाहिलें होतें तेच हे अशी त्यांच्या सारखेपणावरून माझी तेव्हांच खात्री झाली. हे अगदीं एकासारखे एक आहेत, यावरून हे सारे भाऊभाऊ आहेत कीं काय म्हणून मीं त्या गृहस्थास विचारिलें. तो म्हणाला, 'होय, हे सारे सख्खे भाऊ आहेत. आपण यांना वाटेल तो हुकूम करा, तो हे तावडतोब बजावतील. पण माझी या चरणांपाशीं येवढीच विनंति आहे कीं, आपण आपले सर्व लोक अगोदर येथून घालवून द्या; कां कीं, मीं जें काय यांच्याकडून करविणार तें आपल्याखेरीज दुसऱ्या कोणाच्याही दृष्टीस पाडण्याची माझी इच्छा नाहीं.' हें ऐकतांच माझ्या सभोंवतीं बसलेले सर्व लोक माझ्या सांगण्याची वाट न पाहतां तेथून उठून

चालते झाले, व मी आणि तो गृहस्थ व त्याचे चाळीस गुलाम येवढेच काय ते तेथें राहिलों.

नंतर यांना काय काम सांगावें याचा मीं थोडा वेळ विचार करून म्हटलें कीं, 'यांजकडून, आपण बसलों आहों याच ठिकाणीं हमामखाना तयार करवावा.' मीं असें म्हणतांच ते सर्व गुलाम अदृश्य झाले, व दहापांच पळांतच नानाप्रकारच्या रंगांचे सगमरवरी पाषाण व इतर सामान घेऊन आले. त्यांनीं तत्काळ हमामखाना बांधण्यास सुरुवात केली, व थोडक्याच तासांत तो उत्तम प्रकारचा बनविला. त्याला हिरव्या संगमरवरी पाषाणाचे आरशांसारखे घोटींव बारा खांब होते; आंत उत्तम प्रकारचीं कारंजीं बनविलेलीं होतीं; व त्यांतील पाणी पांढऱ्या संगमरवरी दगडांच्या सुरेख अशा लहान लहान हौदांत पडत होतें.

त्या गृहस्थाचें असें अगाध ज्ञान व अद्भुत शक्ति पाहून मी अगदीं आश्चर्यचकित होऊन गेलों, व त्यास म्हटलें, 'अशा अलौकिक कृति तुम्हांस कशा करितां येतात तें कृपा करून सांगा.' तो म्हणाला, 'महाराज, तें मी सर्व सांगायाला लागलों तर फार वेळ लागेल. याकरितां थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं, मी थोड्या थोडक्या नव्हे, तर एकंदर एकुणचाळीस शास्त्रांत पारंगत असल्यामुळें मला असे हवे तितके विलक्षण चमत्कार करितां येतात.' हें त्याचें भाषण ऐकून मी अधिकच आश्चर्यचकित झालों, व असा मनुष्य आपल्या पदरीं असावा असें मला वाटलें. मीं त्याची अतिशय प्रशंसा केली, व तुमचा देश कोणता, तुमचें नांव काय वगैरे त्यास विचारिलें. तो म्हणाला, 'मी बुखारा प्रांतांतील रहाणारा असून माझें नांव अविसेन असें आहे. माझी हकीकत ऐकण्याची आपली इच्छा असल्यास मी ती सांगण्यास तयार आहें.' मीं म्हटलें, 'वाहवा! फारच चांगली गोष्ट! त्यापासून मला अतिशय आनंद होणार आहे.' त्यावरून पुढीलप्रमाणें त्यानें आपली हकीकत सांगण्यास आरंभ केला.

## अविसेन यांची हकीकत.

अविसेन सांगतो,—अफाना नामक शहरांत माझा जन्म झाला. मला समजूं लागल्यावरोबर माझ्या आईबापांनीं मला बुखारा येथील विश्वविद्यालयांत अभ्यासाकरितां ठेविलें. प्रथम मीं अल्कुराण हा धर्मग्रंथ शिकण्यास आरंभ केला. त्यांत माझी गति इतकी जलद होत चालली कीं, मला दहावें वर्ष लागलें न लागलें तोंच माझी जिकडे तिकडे वाखाणणी होऊं लागली. पुढें मीं अंकगणित, भूमिति वगैरे विषय शिकलों, व नंतर तत्त्वशास्त्र, वैद्यक व अध्यात्मशास्त्र या विषयांचा अभ्यास चालविला. या शास्त्रांतही माझी इतकी लवकर गति होत गेली कीं, थोडक्याच काळांत मोठमोठ्या पंडितांत माझी गणना होऊं लागली. मीं जादुविद्याही शिकायाची ठेविली नाहीं. फार काय सांगूं, पण माझ्या वयाला विशी होण्याच्या आंतच जिहून नदीपासून सिंधु नदीपर्यंत जिकडे तिकडे माझी प्रसिद्धि झाली.

एके दिवशीं माझ्या बापास समरकंद येथें जाण्याचें कांहीं काम पडलें असतां मीही त्याजबरोबर त्या शहरीं गेलों. मी तेथील राजदरबारीं गेलों असतां तेथें माझ्या ओळखीचे कित्येक लोक मला भेटले, व त्यांनीं माझी तेथें फारच प्रशंसा केली. त्याचें बोलणें अगदीं उघडपणें चाललें असल्यामुळें तें अर्थात् मुख्य वजिराच्याही कानीं गेलें. त्यावरून त्यानें मला जवळ बोलावून घेतलें. त्याचें माझें थोडाच वेळ जें संभाषण झालें, तेवढ्यावरून मजविषयीं त्याचा ग्रह इतका उत्तम झाला कीं, त्यानें मला आपल्या घरीं ठेवून घेण्याविषयीं इच्छा प्रकट केली. मीं ती गोष्ट कबूल केली, व त्याच्या घरीं राहिल्यावर त्याची मर्जी इतकी संपादन केली कीं, माझ्या सल्लयावांचून तो कोणतीही गोष्ट करीनासा झाला.

हा वजीर थोडक्याच काळानें वारला. त्या योगानें त्याचा माझा सहवास तुटला, या पलीकडे माझें कांहीं एक नुकसान झालें नाहीं; इतकेंच नव्हे, तर माझी दिवसेंदिवस आणखी बढतीच होत गेली; कशी तर, वजीर जसें मजवर प्रेम करीत होता तसेंच खुद्द राजाही

करूं लागला. तो राज्यकारभारांत सर्व प्रकरणीं माझी सल्लामसलत घेऊं लागला, व पुढें कांहीं दिवसांनीं, पुनः मुख्य वजिराची जागा खालीं झाली असतां त्यानें एकदम तेथें माझी नेमणूक केली.

हें येवढें मोठें जबाबदारीचें व दगदगीचें काम मजकडे असतांही तें मी बरोबर रीतीनें करून त्यांतल्या त्यांत आणखी ग्रंथावलोकन करीत असें. तथापि सर्व गोष्टींत मुख्यतः विद्याव्यासंग हाच विषय माझ्या फार आवडीचा असल्यामुळें, त्याकडे अगदीं नियमित व थोडका वेळ लावून माझें समाधान होईना. यास्तव राज्यकारभार-रूपीं रुपेरी बिडी जी माझ्या पायांत पडलेली होती ती तोडून टाकून सारा वेळ मोकळेपणीं विद्यानंदांत घालविण्याचा मीं निश्चय केला. मीं राज्यकारभार इतक्या उत्तम रीतीनें चालविला होता कीं, मला रजा देतांना राजास फार वाईट वाटलें. तथापि माझा स्तुत्य उद्देश लक्ष्यांत आणून त्याला एके प्रकारें आनंदही झाला, व ह्यानें माझा राजीनामा मंजूर केला. मात्र, तुम्हीं नेहमीं माझ्याजवळच असावें येवढी त्यानें अट घातली ही त्याची अट कबूल करण्याची माझी इच्छा नव्हती. तथापि त्याजवर माझें पराकाष्ठेचें प्रेम होतें व त्याचा आश्रय सोडून एकान्तांत रहावयास जाण्याचें खरोखर माझ्या जिवावर आलें होतें, यास्तव विद्यामृतपानाविषयीं मी जरी अत्यंत तृष्णातुर झालों होतों, तरी आपला सर्वच हेका चालविणें मला बरें न दिसल्यावरून, राजवाड्यांतच अगदीं एकीकडच्या निवांत जागेंत मी जाऊन राहिलों. मी आपल्या वेळापैकीं कांहीं वेळ राजाच्या सह-वासांत घालवून बाकीचा आपल्या व्यासंगांत घालवीत असें. मी नुसतें ग्रंथावलोकनच करीत असें असें नाहीं. तर नवीन ग्रंथही लिहीत असें. ते गद्य व पद्य असे दोन्ही प्रकारचे असत. बहुतेक विद्वान् लोकांचें असें असतें कीं, अनेक प्रकारचा जिवापाड व्यासंग करून जें अपार ज्ञान संपादावयाचें त्याचा आस्वाद फक्त स्वतःच घ्यावयाचा व त्याच्या भांडाराच्या किल्ल्या आपल्या हयातींत दुसऱ्याच्या हातीं कधींही लागूं द्यावयाच्या नाहींत. पण माझा प्रकार

याहून अगदीं भिन्न होता. मीं कोणत्याही प्रकारचें ज्ञान प्राप्त करून घेतलें असतां, त्या संबंधाचा ग्रंथ आपल्या हातून तयार झाल्याबरोबर सगळ्या जगास त्याचा उपयोग होण्याची तजवीज करीत असें. असे निरनिराळ्या विषयांवर मीं सुमारें शंभर ग्रंथ लिहिले. माझ्या ग्रंथांच्या सारस्यावरून माझ्या एकंदर ग्रंथसमूहास 'प्रबंधरत्नाकर' असें नांव पडलें आहे.

सृष्टीची अंतर्बाह्य रचना कशी आहे व तिचे व्यापार कशा रीतीनें चालले आहेत हें ज्याच्या योगानें समजतें तें अत्यंत गूढ सृष्टिशास्त्र व रसायनशास्त्र हींही मला अवगत होतीं. असो; एकदां असें झालें कीं, काशगरचा राजा कुतुबुद्दीन याजकडून समरकंदच्या राजाकडे एक वकील आला. हा कोणत्या कामाकरितां आला असावा याविषयीं अनेकांनीं अनेक तर्क केले. कांहीं म्हणाले, त्या राजाचा आपल्या राजाशीं युद्ध करण्याचा बेत असावा; कांहीं म्हणाले, इतर राजांविरुद्ध उभयतांचा सल्ला व्हावा अशाविषयीं त्याची ही खटपट असावी. अशा निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या कल्पना काढल्या. पण वास्तविक प्रकार कोणाच्याही लक्ष्यांत आला नाहीं. त्या वकिलानें दरबारांत येऊन आपल्या धन्याचीं पत्रें राजास सादर केल्यावर जें भाषण केलें तेणेंकरून सर्व मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, 'महाराज, माझे धनी, समरकंदचे राजेसाहेब, हे एके दिवशीं आपल्या पदरच्या मंडळीसह भोजनास बसले असतां, प्राचीन काळच्या तत्त्ववेत्त्यांच्या संबंधानें बोलणें निघालें. तेव्हां मीं म्हटलें, सांप्रत हिपाक्रेतीस व साक्रेतीस ह्यांसारखे कोणी विद्वान् पृथ्वीच्या पाठीवर असतील तर त्यांचीं नांवें समजण्याची मला फार इच्छा आहे. त्यावरून एक गृहस्थ म्हणाला, आज ह्या शहरीं दूरचे कांहीं व्यापारी आले आहेत, ते पुष्कळ देश फिरलेले असल्यामुळें मोठमोठे विद्वान् लोक कोठें आहेत याविषयीं कदाचित् त्यांना माहिती असण्याचा संभव आहे. त्यावरून त्या व्यापाऱ्यांस बोलावून आणविलें; तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं, समरकंदच्या

दरबारांत दोन महाप्रख्यात तत्त्ववेत्ते आहेत. त्यांच्या विद्वत्तेचें वर्णन करावें तितकें थोडें आहे. त्यांपैकीं एकाचें नांव अविसेन व दुसऱ्याचें फाजल इस्पाहनी. या दोघांस सृष्टिशास्त्रांतील अत्यंत गूढ गोष्टींचें पूर्ण ज्ञान असून त्यांनीं अनेक अद्भुत चमत्कार केलेले आम्हीं प्रत्यक्ष पाहिले आहेत. याप्रमाणें त्यांनीं अविसेनजी व फाजलसाहेब यांची अतिशय प्रशंसा केल्यावरून, कांहीं वेळ त्यांच्या समागमाचा लाभ आपण आम्हांस द्यावा अशी माझ्या धन्याचे तर्फेनें मी या चरणांपाशीं विनंति करण्याकरितां आलों आहें. त्यांना पाहण्याची फारच उतावळी आमच्या महाराजांस झाली असल्यामुळें आपण त्यांस सत्वर पाठविण्याविषयीं अनमान करणार नाहीं अशी आशा आहे. ते त्यांच्याशीं संभाषण करून त्यांच्या गुणांची पारख व चीज करतील; कां कीं, ते मोठे चतुर असून त्यांना सर्व शास्त्रांचें थोडेंबहुत ज्ञानही आहे.'

हें त्या वकिलाचें बोलणें ऐकून समरकंदच्या राजानें मला व फाजल याला समक्ष बोलावून नेलें, आणि म्हटलें, 'काशगरच्या राजेसाहेबांना, तुम्हां दोघांस भेटून तुमच्याशीं संभाषण करण्याविषयीं फार इच्छा झाली आहे, तर त्यांच्या म्हणण्याचा आपण आदर करावा हे योग्य आहे.' त्यावरून फाजल म्हणाला, 'महाराज, आम्हांला काय? आपला हुकूम होईल तो शिरसावंद्य करणें हें आमचें काम आहे. आपल्या मर्जीच्या बाहेर आम्ही नाहीं.' याप्रमाणें फाजल बोलला; पण मी कांहींच न बोलतां स्तब्ध राहिलों. त्यावरून मला काशगर येथें जाणें पसंत वाटलें नाहीं असें राजानें ताडलें. तो म्हणाला, 'कां, अविसेनजी! तुम्ही कांहींच बोलत नाहीं! मला वाटतें, ही गोष्ट तुमच्या मनास आली नाहीं.' मीं राजास स्पष्ट सांगितलें कीं, 'वास्तविकच मला अशा गोष्टींचा कंटाळा आहे.' तेव्हां फाजल मला उद्देशून म्हणतो, 'तुम्ही हें बोललां खरें. पण या प्रकरणाचा तुम्हीं दूरवर विचार केला नाहींसें दिसतें. समजा कीं, आपण कुतुबुद्दीन राजाची इच्छा तृप्त करण्याचें

नाकारिलें तर कदाचित् असें होण्याचा संभव आहे कीं, त्याचें आपणांविषयीं वाईट मत होईल; अथवा आपणांविषयीं लोकांत जी प्रसिद्धि आहे तिच्यांत कांहीं अर्थ नसून तें निवळ थोतांड आहे असाही त्याचा ग्रह होईल. खेरीज आपल्यासारख्या लोकांच्या कीर्तीचा प्रसार किंवा विध्वंस करणें हें बऱ्याच अंशीं राजे लोकांच्या हातांत असल्यामुळें, न जाणों, त्या राजाच्या मनांत आपला नाश करावा असें आलें तर तो देशोदेशींच्या राजांस आपल्या नालस्त्या कळवील. म्हणून आपला बोज कायम राखण्याकरितां काशगरच्या राजाच्या इच्छेप्रमाणें आपण त्याच्या भेटीस जावें हाच या प्रसंगीं श्रेयस्कर मार्ग आहे.'

फाजल याच्या या बुद्धिवादाचा माझ्या मनावर काय परिणाम झाला म्हणाल तर, माझें पित्त मात्र खवळून गेलें, दुसरें कांहीं नाहीं! मीं त्यास म्हटलें, 'तुम्हांसारख्या येवढ्या तत्त्ववेत्त्यास असले हास्यास्पद विचार अगदींच शोभत नाहींत! आतां तुमचें मत कसेंही असो, पण खुद्द माझ्याविषयीं म्हणाल तर, मी खचीत सांगतों कीं, मजसारख्या सर्व शास्त्रांत निष्णात अशा मनुष्याच्या कीर्तीस काळिमा आणण्याचें एकाच काय पण पृथ्वीवरील सर्व राजांनींही मनांत आणलें तरी त्यापासून माझें कांहींएक वांकडें होण्याची मला भीति वाटत नाहीं! वास्तविक पुसाल तर या दरबारांत जो मी राहिलों आहें तो केवळ या राजेसाहेबांस मी मनापासून चाहतों म्हणून राहिलों आहें. माझें त्यांजवरील प्रेम तेही पूर्णपणें जाणत असून त्याच्या शेंकडोंपटीनें ते त्याची फेड करितात. असें आहे म्हणूनच मी येथें राहिलों आहें. नाहींपेक्षां यापूर्वी मी कधींच येथून निघून जाऊन अगदीं एकांतवासांत स्वतंत्रपणें राहिलों असतों. तुमच्याविषयीं मी असें म्हणतों कीं, ज्या अर्थी अद्यापि तुम्ही क्षुल्लक अशा ह्या जगिक वैभवास मान देतां व राजांच्या कृपेची अपेक्षा करतां, त्या अर्थी कुतुबुद्दीन राजाचे भेटीस तुम्हीं जावें हें अगदीं बरोबर आहे. तुमचें अगाध ज्ञान अथवा

निदान तुमचा गुळचट स्वभाव पाहून तो फार संतुष्ट होईल; व तुम्हां-विरुद्ध देशोदेशींच्या राजांस लिहून तुमचें नुकसान करणार नाहीं!'

हें माझें छद्मी भाषण फाजल याच्या हृदयास अगदीं झोंबून गेलें. त्याचे नेत्र आरक्त झाले, व संताप त्याच्या पोटांत माईनासा झाला. ती गोष्ट राजाच्या लक्ष्यांत येऊन, हें प्रकरण ज्यास्त न चेतावें म्हणून तो मला म्हणाला, 'अविसेनजी! तुम्हीं आपला हेका सोडावा अशी तुम्हांस माझी विनंति आहे. काश्गरचे राजेसाहेब हे तुमच्या भेटीची इच्छा करतात यांत तुमचा गौरवच ते करतात. ते स्वतः मोठे गुणी असून विद्येची व विद्वानांची त्यांना मोठी चहा आहे. तर त्यांनीं तुमच्या भेटीविषयीं व तुम्हांशीं संभाषण करण्याविषयीं इच्छा प्रदर्शित केली असतां त्यांच्या निमंत्रणास नकार करणें हें तुम्हांस उचित आहे काय? सारांश काय कीं, निदान माझ्या शब्दाला मान देऊन तरी तुम्हीं काश्गरच्या दरबारीं जा. मग तेथें कांहीं वेळ राहिल्यावर मजविषयीं तुमच्या मनांत आज मितीस असलेला ग्रह जर तसाच कायम राहिला, तर तुम्हीं खुशाल येथें निघून या. हें घर तुमचेंच आहे.'

मीं राजास म्हटलें, 'राजाधिराज! मीं काश्गरास जावें अशी आपली जर इच्छा आहे तर तिच्या आड मी येत नाहीं. मी जाण्यास एका पायावर उभा आहें. फार काय सांगूं, पण हा दास सर्वस्वी आपला अंकित असून आपल्याकरितां प्रसंगीं स्वतःचा जीव खर्ची घालण्यासही मागेंपुढें पहाणार नाहीं.' ही मीं जी राजाविषयीं पूज्यबुद्धि प्रकट केली तिजबद्दल त्याला मोठा आनंद वाटला. नंतर त्यानें त्या आलेल्या वकिलास भरजरी पोषाख देऊन सांगितलें कीं, 'तुम्ही परत जा आणि आपल्या महाराजांस कळवा कीं, फाजल व अविसेन या उभयतांस आम्ही आपलेकडे होईल तितकी जलदी करून पाठवून देतों.'

फाजल याचें वय माझ्याइतकेंच होतें. तो चांगला विद्वान् होता खरा, पण पूर्वी सांगितलेल्या त्या व्यापाऱ्यांनीं त्याची वाजवी-

पेक्षां फाजील स्तुति करून त्याचें फारच स्तोम माजविलें होतें. असो. आम्ही काश्गरास जाण्याकरितां निघण्यापूर्वी एके दिवशीं त्यानें मला एकांतीं गांठून म्हटलें, ' अहा अविसेनजी ! ज्या अर्थी सर्व कलाभिज्ञ व सकलशास्त्रज्ञ म्हणून चोहोंकडे आपली प्रख्याति झालेली आहे, त्या अर्थी काश्गर येथें जावयाचें तें आपण साधारण मनुष्याप्रमाणें जातां उपयोगीं नाहीं. आपल्या जाण्यांत सुद्धां कांहीं एखादा अलौकिक प्रकार असला पाहिजे. आपणांला वाटेंत कांहीं एक खाल्ल्याप्याल्याखेरीज तेथें जातां येईल कीं नाहीं ? आतां इतकें खरें कीं, हा प्रवास बराच दूरचा आहे, तथापि तो अशा प्रकारें कंठून जातां येण्याची कांहीं कल्पना काढणें तुम्हांसारख्या तत्त्वज्ञास मुळींच अवघड नाहीं. आपल्याबरोबर जे गुलाम आपण घेऊं, त्यांच्यापुरती मात्र वाटेची खाण्यापिण्याची तरतूद आपण करून घ्यावी; आपल्या स्वतःकरितां कांहींच घेऊं नये. असें केलें म्हणजे, आपण येवढा मोठा प्रवास कांहींएक न खातांपितां केला ही गोष्ट ते काश्गर येथील लोकांपाशीं बोलल्यावांचून राहणार नाहींत. अशा प्रकारें अगोदरच आपला लौकिक तेथें पसरला म्हणजे एका प्रकारें मोठी बहार होणार आहे ! '

ही गोष्ट मजपाशीं काढण्यामध्यें फाजल याचा कांहीं कावा होता. त्याला कांहीं विशेष प्रकारच्या गोळ्या तयार करण्याची युक्ति माहीत होती. त्या गोळ्यांचा असा गुण होता कीं, मनुष्यानें त्यांपैकीं एक जर खाल्ली तर सारा दिवस त्याला भुकेची व्यथा होऊं नये. तेव्हां काश्गरास जाण्यास जितके दिवस लागणार होते तितक्या गोळ्या त्यानें बरोबर घेतल्या असतां त्याला उपाशीं मरण्याची पाळी येण्याचें कारण नव्हतें. त्याला वाटलें कीं, अविसेन याला ही युक्ति माहीत असण्याचा संभव नसून ती गोष्ट आपल्यापाशीं कबूल करणेंही अर्थात् त्यास लाजिरवाणें वाटेल. यास्तव आपलें म्हणणें निमूटपणें ऐकणें त्यास भाग पडेल; आणि असें झालें म्हणजे वाटेंत त्याचा उपासमार होऊन चार पांच दिवसांनीं याची गठडी वळेल.

पण वास्तविक गोष्ट अशी होती कीं, त्याला वाटत होतें त्याप्रमाणें माझी स्थिति नसून मलाही एके प्रकारचा असा कांहीं दवा माहीत होता कीं, त्याचा प्रभाव हुबेहूब फाजल याच्या गोळ्यांप्रमाणेंच असून त्याजप्रमाणें मलाही उपाशीं मरण्याची पाळी येण्याचें कारण नव्हतें. सबब मी मोठ्या दिलदारीनें त्याला ठीक आहे म्हणून म्हटलें. अशा प्रकारें एकमेकांस आपापल्या युक्तीचें यत्किंचित्‌ही दिग्दर्शन न करतां आम्ही उभयतां समरकंद येथून काशगर येथें जाण्यास निघालों.

पहिले तीन चार दिवस आम्हीं मजेनें प्रवास केला. कारण त्याच्या गोळ्यांच्या ठायीं जसा अद्भुत गुण होता तसाच माझ्या दव्याच्या ठिकाणींही होता. तेव्हां आम्ही दोघेही आपापल्या युक्तीं-वर मदार ठेवून निष्काळजी राहिलों. तरी पण फाजल याच्यांत कांहीं फरक होतो कीं काय हें मी लक्ष्यपूर्वक पहात असें, व तोही त्याचप्रमाणें माझी चर्या सूक्ष्म रीतीनें अवलोकन करीत असे. पण माझें असें झालें कीं, मी दिवसेंदिवस कृश व निःशक्त होण्याच्या ऐवजीं उलटा फुगत व तरतरीत होत चाललों. फाजल याची स्थिति मात्र याच्या अगदीं उलट होत चालली; कां कीं, चार एक दिवस गेल्यावर त्याच्या जवळच्या गोळ्या कोठें पडून गेल्या; आणि नवीन तयार करण्याचें साधन तर त्या वेळीं त्याजपाशीं नव्हतें. तेव्हां तो चिंतातुर व उदास होऊन गेला व त्याचा चेहरा फिका पडला. त्यावरून मीं ताडलें कीं, या स्वारीच्या युक्तीचा कांहीं तरी बिघाड झाला असावा. तथापि ती गोष्ट त्यानें मजपासून छपविली, व दुर्दै-वानें प्राप्त झालेला क्षुधेचा ताप तो मोठ्या धिरानें सोशीत चालला. पण अर्थात् याचा परिणाम असा झाला कीं, तो दिवसेंदिवस अधि-काधिक क्षीण होत जाऊन मरण्याच्या पंथास लागला. ही त्याची स्थिति पाहून मला फार वाईट वाटलें, व मी त्यास आपल्या जवळचा थोडा दवा देऊं लागलों. पण त्या मानी गृहस्थास, माझें साहाय्य घेण्यापेक्षां मरण आलेलें बेहत्तर आहे, असें वाटलें. फाजल हा अशा आततार्इपणानें थोडक्याच दिवसांत प्राणास मुकला. त्याच्या मरणा-

मुळें मला परमावधीचें दुःख झालें. मीं अश्रूंनीं त्याचें शरीर न्हाणिलें, व त्याच्या व माझ्या गुलामांच्या साहाय्यानें **बाटूम** येथें नेऊन त्याला मूठमाँती दिली.

याप्रमाणें **फाजल** याचा अंत्यविधि तशा स्थितींत जितक्या चांगल्या रीतीनें आम्हांस करतां आला तितका केल्यानंतर मीं असें केलें कीं, **समरकंदच्या** राजानें आम्हां उभयतांना खर्चाकरितां जें द्रव्य दिलें होतें तें मीं बरोबरच्या सर्व गुलामांना वांटून दिलें, आणि त्यांना बंधमुक्त केलें. मीं त्यांस म्हटलें, ' मी आतां एकांतांत अरण्यामध्यें रहाणार. सबब मला तुमची कांहीं एक गरज नाहीं. तुमच्या इच्छेस येईल तिकडे तुम्ही जा. ' याप्रमाणें ते लोक निघून गेल्यावर मी कांहीं वेळपर्यंत तसाच **फाजल** याच्या मृत्यूबद्दल शोक करीत राहिलों. मीं मनांत म्हटलें, ' या गृहस्थानें व्यर्थ अहंपणानें व अविचारानें आपल्या जिवाचा नाश करून घेतला ! ' असो. नंतर पुढें आतां आपण काय करावें याचा मी विचार करूं लागलों. मला आतां **काशगर** येथें जाणें अथवा परत **समरकंदचा** रस्ता धरणें या दोन्ही गोष्टी बऱ्या वाटेनात. तेव्हां मीं एकटाच पृथ्वीवर वाट फुटेल तिकडे जाण्याचा बेत केला. प्रथम मी **खोजंद** येथें गेलों. नंतर तेथून अमुक ठिकाणींच जाण्याच्या उद्देशानें नव्हे, तर कोठें तरी जावें म्हणून जो निघालों तो बहुत दिवस फिरतां फिरतां शेवटीं **करिझमी** शहरास येऊन पोहोंचलों.

या सुंदर व विस्तीर्ण नगरांत मी एके दिवशीं फिरत असतां मला एकदम कांहीं गडबड ऐकायाला आली. हें काय असावें म्हणून मी पहातों तों सर्व लोकांची एकच धांदल उडून गेलेली माझ्या दृष्टीस पडली. व्यापाऱ्यांनीं आपलीं दुकानें टाकिलीं, व ते रस्त्यांतल्या घोळक्यांत मिसळले. सारांश, एकाएकीं त्या ठिकाणीं येवढा गोंधळ होऊन गेला कीं, जणूं काय येथें एखादी विलक्षण गोष्ट घडली आहे किंवा घडत आहे असें एकाद्यास वाटावें. पण वास्तविक तसा प्रकार कांहीं एक नसून, एक दवंडीवाला पुढीलप्रमाणें

दवंडी पिटीत होता. ती दवंडी अशीः—'जे कोणी विद्येचे चाहते असतील त्या तमाम लोकांस कळावें कीं, उदईक गुहेचे दरवाजे उघडण्यांत येतील.' ही दवंडी ऐकिल्यावर साहजिकच 'माझ्या मनांत आलें कीं, हें गुहा उघडण्याचें प्रकरण काय आहे तें आपल्याला समजलें पाहिजे. मग सारा दिवस मी त्या दवंडीवाल्याच्या मागोमाग फिरत राहिलों, आणि तो सायंकाळीं आपलें काम संपवून घरीं जाऊं लागला असतां त्यास मीं हटकून म्हटलें, 'अरे बाबा, उद्यां गुहेचे दरवाजे उघडणार आहेत ही गोष्ट विद्येच्या चाहते लोकांस कळावी म्हणून जी तूं दवंडी पिटलीस तिचा अर्थ काय?' मी कोणी फिरस्ता फकीर असावा असें त्या दवंडीवाल्यास वाटून तो मला म्हणाला, 'फकीरबावा, या शहरच्या वेशीजवळ कास्पियन समुद्राच्या बाजूस एक डोंगर आहे. त्याला 'तांबडा डोंगर' असें नांव पडलेलें आहे; कां कीं, त्या डोंगरावर बारा महिने अठराकाळ जिकडे तिकडे गुलाब फुललेले असतात. त्या डोंगराच्या पायथ्याशीं एक विस्तीर्ण गुहा आहे. तिला चार दरवाजे असून ते एका यंत्राच्या प्रभावानें नियमित काळपर्यंत उघडून पुढे बंद होतात. त्या वेळीं सर्व विद्वान् व शोधक लोक अरुणोदयापूर्वी त्या गुहेंत जातात. तेव्हां त्यांना शेंकडों प्रकारचे ग्रंथ तेथें आढळतात. त्यांपैकीं ज्यांना जे पसंत पडतात ते घेऊन ते चट्कन् बाहेर येतात; कां कीं, गुहेचे दरवाजे उघडल्यापासून बरोबर दोन घटकांनीं बंद होतात, आणि जर दुर्दैवानें एकादा गृहस्थ नियमित वेळेंत बाहेर आला नाहीं, तर तो गुहेंत कोंडला जाऊन उपासमार होऊन मरतो; कारण, पुढें एक वर्ष होई तोंपर्यंत ती गुहा उघडत नाहीं. असे अपघात अनेक वेळां झालेले आहेत. असें म्हणतात कीं, शेख शहाबुद्दीन या नांवाचा जो महान् तत्त्ववेत्ता होऊन गेला, त्यानें स्वतः रचलेले व दुसरीकडून संपादन केलेले सर्व ग्रंथ ठेवण्यासाठीं ही गुहा निर्माण केली. त्यानें आपला सारा जन्म किंवा निदान उत्तरवयांतील सर्व काळ अशा प्रकारचे

उत्तम उत्तम व चमत्कारिक ग्रंथ एकत्र जमविण्यांत घालविला. त्याच्या श्रमाचें फळही त्यास चांगलें मिळालें; कां कीं, तो एकंदर ग्रंथसंग्रह पंचवीस हजारांवर होऊन गेला. हे सर्व ग्रंथ—त्यांत मुख्यत्वेंकरून शेख शहाबुद्दीन यानें स्वतः रचलेले जे आहेत ते—केवळ अमोलिक आहेत. यांत नानाप्रकारचे चमत्कार करण्याच्या युक्त्या, म्हणजे मनुष्याचें रूपांतर करून त्यास पशु बनविणें, वनस्पतींच्या ठायीं हालचाल करण्याची शक्ति आणणें, तसेंच जमिनींतील द्रव्य शोधून काढणें, अशा प्रकारच्या हजारों अद्भुत गोष्टींची माहिती विपुल दिलेली आहे. फार काय, पण परिसाविषयींही माहिती त्यांत सांपडते. अशीं हीं अमोलिक ग्रंथरूपी रत्नें शेख शहाबुद्दीन यानें त्या गुहेंत सांठवून ठेविलीं असून त्यांचा बंदोबस्तही तशाच योग्यतेचा त्यानें करून ठेविला आहे. तो असा कीं, त्या गुहेचे दरवाजे जरी साध्या चंदनी लांकडाचे त्यानें केले, तरी ते नुसत्या शक्तीनें उघडतां न येतां एके प्रकारच्या यंत्रानेंच फक्त उघडतां यावे अशी त्यानें तजवीज करून ठेविली आहे.' मीं त्या दवंडीवाल्यास म्हटलें, 'हा येवढा बंदोबस्त जरी त्या शेखानें करून ठेविला आहे, तरी त्याचा कांहीं विशेष उपयोग नाहीं असें मला वाटतें, कारण, जगांतल्या कोणत्याही मनुष्यास वर्षांतून एकवार जर गुहेंत जाऊन वाटेल तो ग्रंथ नेण्यास मोकळीक आहे, तर ते सर्व ग्रंथ कालेंकरून नाहींतसे झालेच पाहिजेत; आणि मी म्हणतों, आजपावेतोंच ते कसे संपले नाहींत कोण जाणे!' तो म्हणाला, 'तुम्ही म्हणतां तें खरें, पण या संबंधानें एक गोष्ट तुम्हांला सांगण्यास मी विसरलों. ती ही कीं, जे कोणी अशा प्रकारें तेथून ग्रंथ घेऊन जातात, त्यांना ते फक्त एक वर्षभरच आपल्याजवळ ठेवण्यास मुभा आहे. वर्ष झालें कीं, फिरून गुहा उघडतांच ते सर्व जेथल्या तेथें पुनः आणून ठेविले पाहिजेत, असें त्या शेखानें ठरवून ठेविलें आहे. याप्रमाणें करण्यास जो कोणी चुकेल त्याला आपल्या चुकीबद्दल मोठें प्रायश्चित्त भोगावें लागतें. कसें तें ऐका.

या ग्रंथांवर पिशाचांचा पहारा शेखानें ठेविला असून, जो कोणी, नेलेला ग्रंथ अभिलाषबुद्धीनें तसाच मुदतीबाहेर आपल्याजवळ ठेवील, त्याचे तीं पिशाचें हालहाल करितात व समयविशेषीं त्याचा प्राणही हरण करण्यास चुकत नाहींत ! '

याप्रमाणें त्या दवंडीवाल्यानें मीं विचारलेली सर्व माहिती सांगितल्यावर त्याचे मीं आभार मानिले, व तेथून निघून पुढें चालता झालों. ही माहिती मिळाल्यापासून मला किती आनंद झाला याची कल्पना देखील करणें अशक्य आहे ! मीं लागलाच दुसरे दिवशीं इतर लोकांबरोबर गुहेंत जाण्याचा बेत केला; इतकेंच नाहीं, तर आपलें कांहीं झालें तरी चिंता नाहीं, पण त्यांजबरोबर परत न येतां तसेंच तेथें राहण्याचाही निश्चय केला. मी जादूविद्येंत प्रवीण असल्यामुळें पिशाचादिकांची भीति माझ्या मनांत मुळींच आली नाहीं. मी लागलाच शहर सोडून निघालों, व त्या दवंडीवाल्यानें कास्पियन समुद्राच्या बाजूस तांबड्या डोंगराची जी खूण सांगितली होती तिकडे चाललों. तो डोंगर व त्याच्या पायथ्याशीं असलेली गुहा हीं लवकरच मला सांपडलीं. त्या गुहेचे दरवाजे दवंडीवाल्यानें सांगितल्याप्रमाणें चंदनी लांकडाचे असून त्यांवर कित्येक प्राण्यांच्या आकृति होत्या, व हेंच ते दरवाजे उघडण्याचें व लावण्याचें काय तें साधन होतें.

मी त्या डोंगराच्या माथ्यावर गेलों, व जे गुलाब त्यावर चोहोंकडे लागलेले असून अगदीं फुलून गेले होते, व ज्यांच्या योगानें तेथली सर्व हवा सुगंधयुक्त व आनंददायक झालेली होती, त्या गुलाबांची शोभा पहात कांहीं वेळ हलके हलके इकडे तिकडे हिंडलों. पण मला चैन म्हणून पडेना; कां कीं, गुहेंत केव्हां जाईनसें मला झालें होतें. असो; अरुणोदयाच्यापूर्वी लोकांच्या झुंडींच्या झुंडी डोंगराकडे येऊं लागल्या. तेव्हां गुहा उघडतांच सर्वांच्या आधीं आपणास तींत जाण्यास सांपडावें म्हणून मी लवकर खालीं उतरून गेलों. इतक्यांत मोठा भयंकर आवाज होऊन गुहेचे

दरवाजे खडाखड उघडले. तों लागलीच सर्व लोक आंत शिरले व ग्रंथ पहाण्याच्या उद्योगास लागले. ते सर्व ग्रंथ मोठ्या व्यवस्थेनें फळ्यांवर लावून ठेविलेले असून त्या प्रत्येकावर चिठी मारलेली होती. तीवरून अमुक ग्रंथांत अमुक विषय आहे हें समजण्यास फार सोईचें झालेलें होतें. मधून मधून रिकाम्या जागा दिसत होत्या, तेथले ग्रंथ ज्या लोकांनीं आदले वर्षीं नेलेले होते त्यांनीं ते आणून भराभर त्या त्या ठिकाणीं ठेवून दिले. तेथें राहण्याचा नियमित वेळ भरत येण्याचें पूर्वी सर्व लोक बाहेर पडले, व क्षणाभरानें पहिल्या-सारखा मोठा आवाज होऊन दरवाजे पटापट लागले; आणि मी गुडुप अंधारांत एकटाच राहिलों.

अशा स्थितींत मजखेरीज दुसरा कोणी जर तेथें असता तर त्याची पांचावर धारणच बसून गेली असती ! पण मी जादूविद्येंत निष्णात असल्यामुळें त्या संकटाचें निवारण करणें मला मुळींच अवघड नव्हतें. त्या अफाट ग्रंथसंग्रहाचें संरक्षण करणारीं जीं पिशाचें होतीं त्यांस मीं ताबडतोब आपल्या ताब्यांत आणिलें; आणि त्यांजकडून तेथें त्याच वेळेस उजेड करविला; इतकेंच नाहीं, तर अहोरात्र त्या गुहेंत प्रकाश ठेवण्याविषयीं त्यांस मीं ताकीद केली. या पिशाचजातीचें असें आहे कीं, कोणाही मनुष्याच्या ताब्यांत एकवार तीं आलीं म्हणजे त्याला तीं थरथरां कांपतात, व तो कोणताही हुकूम करो, तीं ताबडतोब तो अमलांत आणितात. असो. माझ्या हुकुमाप्रमाणें त्या पिशाचांनीं लागलाच तेथें येवढा उजेड केला कीं, अशा दहा गुहांना तो पुरला असता. मला वाटलें कीं, या कामाकरितां त्यांनीं करिझमी शहरांतले सर्व दिवे चोरून आणले कीं काय कोण जाणे ! त्यांनीं जिकडे तिकडे इतका कांहीं चकचकाट करून सोडला कीं, अशी मौज मीं जन्मांत कधीं पाहिली नव्हती ! सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, माझ्या इच्छेहून दसपट त्यांनीं माझी चाकरी वजावली.

नंतर मीं त्या ग्रंथसंग्रहांतील ज्ञानामृताचें प्राशन करण्यास आरंभ

केला. रसायनशास्त्र व दुसरीं गहनशास्त्रें यांवर तेथें मोठमोठे ग्रंथ मला आढळले. त्यांची भाषा इतकी बिकट व अलंकारिक होती कीं, मोठमोठ्या विद्वानांस देखील त्यांतलें तात्पर्य समजण्याची मारामार होती. फार काय, पण मला देखील त्या ग्रंथांतला अर्थ काढण्यासाठीं आपली सर्व अक्कल खर्च करावी लागली. या ग्रंथांपैकीं एखाद्यांतून एखादा उतारा घ्यावा असें मला वाटल्यास मीं तशी आपली इच्छा प्रकट केल्याबरोबर माझे आज्ञाधारक सेवक, म्हणजे तीं पिशाचें, लिहिण्याचें सर्व साहित्य मला आणून देत. तसेंच, पुढें माझ्याजवळचा भूक न लागण्याचा दवा संपून गेल्यावर तीं मला दररोज पंचपक्वानांचें ताट व उत्तम मद्य आणून देऊं लागलीं. अशा प्रकारें एकंदरीनें कोणत्याही वस्तूची गरज मला लागली असतां, माझ्या तोंडांतून शब्द निघण्याचा मात्र अवकाश, मला तीं तत्काळ तीं आणून देत असत.

याप्रमाणें त्या गुहेमध्यें विद्यानंदांत मी काळ घालवूं लागलों. एखाद्या ग्रंथांत जर मला कांहीं नवें आढळलें नाहीं, तर मी ताबडतोब दुसरा हातीं घेत असें. अशा प्रकारें सतत वर्षभर, यत्किंचित्ही कंटाळा न येतां, मी सृष्टिशास्त्रांतील अत्यंत गहन व मनोरंजक विषयांचा अभ्यास करीत राहिलों. दुसऱ्या वर्षी नियमित वेळीं गुहेचे दरवाजे जेव्हां उघडले, तेव्हां दरवर्षाप्रमाणें शोधक व विद्वान् लोक त्या ठिकाणीं आले असतां, तेथें कधीं न दिसणारा उजेड पाहून ते अत्यंत भयचकित झाले. त्यांनीं परत ठेवून देण्याकरितां बरोबर आणलेले ग्रंथ पटापट तेथें टाकून दिले, व ते जीव घेऊन पळून गेले. माझ्याही मनांत, त्याच वेळीं तेथून निघून निमूटपणीं इच्छेस येईल तिकडे जावें असें आलें. पण त्यामुळें असें झालें कीं, आज वर्षभर माझी हजामत, नखें वगैरे जीं वाढलेलीं होतीं त्यांच्या योगानें मी विद्रूप व भयंकर दिसूं लागल्यामुळें, मला पाहून त्या लोकांचें भय आणखी दुणावलें; आणि, 'हा पहा तो चेटक्या फकीर ! हाच रे हाच !' असें ते मजकडे दुरून बोट दाखवून म्हणूं लागले.

हा वास्तविक चेटक्या फकीर कोण होता याविषयीं अगोदर थोडेंसें सांगितलें पाहिजे. हा त्या शहरांत एक महानीच मनुष्य असून तो आपल्या दुष्ट विद्येच्या बळानें आसमंतात् भागच्या लोकांस पराकाष्ठेचा त्रास देत असे. सर्व लोक त्याला पाण्यांत पहात असत, व सुलतानाकडे त्याच्या कागाळ्या अनेक वेळां गेलेल्या असल्यामुळें त्यानें त्याला पकडून आणण्यासाठीं चोहोंकडे आपले लोक पाठविले होते. पण तो पक्का बिलंदर असल्यामुळें सर्वांच्या हातांवर तुरी देऊन त्यानें ही बंडाळी सारखी चालविली होती. तर हाच तो चेटक्या फकीर असें समजून ते लोक मला धरायाला आले असतां मी भोळेपणानें त्यांस, ‘ही तुमची भ्रांति आहे, मी तो मनुष्य नव्हे,’ असें सांगण्याचा प्रयत्न केला. मीं म्हटलें, ‘बांधवहो! तुम्ही कोणत्या भ्रमांत आहां? तुम्ही जो फकीर म्हणतां तो खास मी नसून तुम्हांस लेशमात्र अपकार करण्याचा माझा हेतु नाहीं.’ हें माझें बोलणें ऐकून ते लोक जरा स्तब्ध राहिले. पण तें त्यांना खोटें वाटलें; आणि त्यांत जे कित्येक धीट होते ते लागलेच पुढें सरसावले, व बाकीच्यांनाही तसें करण्याविषयीं त्यांनीं चिथावून दिलें. नंतर सर्वांनीं मजभोंवतीं गराडा घातला, व माझ्याशीं धिंगामस्ती करून कोणी माझे हात, कोणी पाय, कोणी कंबर वगैरे धरून मला अगदीं जखडून टाकिलें!

नंतर त्यांनीं माझ्या मुसक्या बांधल्या व अशा कडेकोट बंदोबस्तानें मला नेऊन शहरच्या काजीपुढें उभें केलें. आतां येथें इतकें सांगणें इष्ट आहे कीं, माझ्या मनांत आलें असतें तर मीं एका मंत्राच्या उच्चाराबरोबर त्या सर्वांना जमिनीवर लोळविलें असतें. पण घटकाभर काय चमत्कार होतो तो पहावा, असें मनांत आणून मीं त्यांना बिलकूल अडथळा केला नाहीं, व मला मारणें किंवा तारणें हें सर्वस्वी तुमच्या हातांत आहे असें त्यांस भासविलें. तेव्हां अर्थातच ते अतिशय शेफारले. असो, मी काजीसमोर जातांच तो मला म्हणाला, ‘ओ हो! बडे दोस्त! तुम्ही शेवटीं

एकदांचे सांपडलां आँ ? ठीक आहे ! अरे मात्रागमनी मनुष्या ! तूं आपल्या अत्यंत दुष्ट व नीच कृत्यांनीं आपणास फार मोठ्या दंडास पात्र करून घेतलें आहेस; तर तो दंड तुळा झाल्यावांचून रहाणार नाहीं. तूं लोकांचा आजपर्यंत जो छळ केलास त्याचें प्रायश्चित्त थोडक्याच अवधींत तुला मिळेल.' मग दुय्यम काजीस उद्देशून तो म्हणतो, 'न्या हो याला आतां येथून, आणि महान् अपराध्यांस ज्या मोठ्या पटांगणांत देहदंडाची शिक्षा देण्यांत येते तेथें उभा करा.' हा त्याचा हुकूम ऐकून दुय्यम काजीनें मला पहाऱ्यांत देऊन त्या ठिकाणाकडे चालविलें. इकडे मुख्य काजी हा, येथपर्यंत झालेला सर्व वृत्तांत सुलतानास सांगण्याकरितां, व मला कशा प्रकारें ठार मारावयाचें तें विचारण्याकरितां निघून गेला.

तो चेटक्या फकीर सांपडला असून त्यास वधस्थळीं नेलें आहे, हें वर्तमान सुलतानास कळतांच तो मेण्यांत बसून त्या ठिकाणीं आला. त्यानें मला पाहतांच काहीं एक विचार न करतां केवळ माझ्या बाह्य स्वरूपावरूनच मी महद्दोषी आहें असें ठरविलें, आणि मला जिवंत जाळण्याविषयीं हुकूम केला. हुकूम होतांच मला जाळण्याकरितां भली मोठी चिता तावडतोब तयार करण्यांत आली. ती इतकी लवकर तयार होण्याचें कारण असें कीं, सर्व लोक मला जळतांना पहाण्याविषयीं पराकाष्ठेचे उत्कंठित असल्यामुळें, त्यांनीं हां हां म्हणतां लांकूडफांट्याच्या राशींच्या राशी त्या ठिकाणीं आणून टाकल्या !

मला चितेवर बांधलें तरी मीं हूं का चूं केलें नाहीं. पण चितेला अग्नि लागल्याबरोबर मीं कांहीं मंत्राचा उच्चार केला, त्या योगानें, ज्या दोऱ्यांनीं मला बांधलें होतें त्या तटातट तुटून गेल्या. नंतर चितेंतील फांट्यांतून मी एक फांटें घेऊन मंत्रसामर्थ्यानें त्याचा एक रथ बनविला, व त्यांत जाऊन बसलों. तो रथ मीं सर्व लोकांच्या दृष्टीस पडेल अशा रीतीनें कांहीं वेळ अधांतरीं चालविला. मी एव्हां जळून खाक व्हावयाचा, तो अशा अलौकिक रीतीनें मजा

मारील रथांत बसून फिरत आहे हें पांहून, पाण्यामध्यें ढेंकूळ टाकलें असतां तें जसें विरघळतें तशी त्या सर्व लोकांची स्थिति झाली ! नंतर मीं मोठ्या गंभीरवाणीनें सुलतानास उद्देशून म्हटलें, 'अरे अन्यायी राजा ! तूं मला महःपातकी, दुष्ट व नीच मनुष्य समजून जिवंत जाळून टाकणार होतास, पण तूं हें पक्कें लक्ष्यांत ठेव कीं, तुला वाटलें होतें तो चेटक्या फकीर मी कांहीं नव्हे; तर मी महान् विद्वान् व निरुपद्रवी मनुष्य असून, आपल्या विद्येच्या बळानें कसकशीं अद्भुत कृत्यें करूं शकेन याचा प्रत्यय इतक्यांत तुला आलाच आहे.' इतकें बोलून मी अदृश्य झालों. तें पाहून सुलतान व इतर लोक पराकाष्ठेचे आश्चर्यचकित होत्साते जागच्या जागीं चित्रासारखे स्तब्ध राहिले.

यःप्रमाणें चमत्कार करीत मी दहा वर्षेपर्यंत हिंडलों. मी केरो, बगदाद वगैरे नामांकित शहरीं राहिलों असतां ज्यांशीं ज्यांशीं माझा स्नेह जडला त्या सर्व लोकांच्या नानाप्रकारच्या हौशी मीं पुरविल्या, शेवटीं मी या अस्त्राखान शहरीं आलों, व या ठिकाणीं आपली प्रसिद्धि व्हावी अशी माझी लहर लागली. त्याकरितां मीं असें केलें कीं, शहराबाहेरील झाडींत जाऊन निरनिराळ्या झाडांच्या चाळीस खांद्या तोडून मंत्रसामर्थ्यानें त्यांच्यांत जीव घातला. नंतर त्यांस मनुष्यरूप देऊन, येथें जे हे हमामखाने दिसत आहेत ते बांधण्याविषयीं त्यांस आज्ञा केली. सारांश, असा या हमामखान्यांचा व त्यांवरील चाळीस नोकरांचा इतिहास आहे. हे चाळीस नोकर एका आईचींच लेंकरें आहेत; कां कीं, ते सर्व पृथ्वीच्या उदरांतून उत्पन्न झालेले आहेत.

## अस्त्राखानचा सदा आनंदी राजा होर्मझ याची गोष्ट ( पुढें चालू ).

होर्मझ राजा म्हणतो,—अविसेन याची ही हकीकत ऐकून मला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्यास मीं म्हटलें, 'अहो पंडितजी! तुमची माझी भेट झाली हा केवढा तरी लाभ मला झाला! तुम्हीं जें काय सांगितलें त्यावरून तुम्हांस कोणतीही गोष्ट करणें अशक्य नसून, तुमचे हे चाळीस नोकर सांगितलें काम ताबडतोब करितात याचें मला आतां मुळींच आश्चर्य वाटत नाहीं; कां कीं, ते जें काय करितात त्यास अर्थात् कारण तुम्हीच आहां. फार काय पण, मला वाटतें, करिझमीच्या सुलतानाची परमरूपवती कन्या रझिया बेगम हिला आतांच्या आतां येथें घेऊन येण्याविषयीं जर त्यांस सांगितलें तर तसलें बिकट कामही ते केव्हांच करून टाकतील अशी माझी खात्री आहे.' अविसेन म्हणतो, 'यांत काय संशय? त्यांना हुकूम झाला कीं पुरे, ते तत्काळ अदृश्य होऊन तिच्या महालांत प्रवेश करतील, व तिच्या दासींमधून तिला एकदम उचलून येथें घेऊन येतील!' हें ऐकून मीं मोठ्या उत्सुकतेनें म्हटलें, 'तर मग मी वास्तविक सांगतों कीं, तसें व्हावें अशी माझी फारच इच्छा असून ही गोष्ट जर तुम्हीं केली, तर तीपासून मला अपूर्व आनंद होणार आहे.' अविसेन म्हणतो, 'अशी तुमची इच्छा आहे काय? ठीक आहे. मी ती खुषीनें पुरी करितों. त्यांतून आणखी असें केल्यानें, करिझमीच्या सुलतानानें मला जो विनाकारण त्रास दिला त्याबद्दल त्याचा सूडही घेतल्यासारखें होणार आहे. ह्यामुळें तर मला या गोष्टीपासून विशेषच आनंद होणार आहे.'

अविसेन यानें इतकें म्हणून त्या चाळीस गुलामांपैकीं एकाकडे पाहिलें, व त्यास जाण्यास आज्ञा केली. तो तत्काळ अदृश्य झाला, व मोठी गर्जना करून थोडक्याच वेळांत करिझमीच्या राजकन्येस

घेऊन आला. रझिया हीस मीं पूर्वी पाहिलें असल्यामुळें तिला मीं तत्काळ ओळखिलें. तिजवर मी अतिशय लंपट झालों होतों, या कारणानें तिच्या दर्शनापासून मला केवळ अनिर्वाच्य आनंद झाला. तथापि ती कशा रीतीनें येथें प्राप्त झाली याचा विचार करून मीं आपला आनंद बाहेर प्रकट न करितां तसाच आंतल्या आंत दाबून ठेविला. खेरीज मला अशीही आणखी शंका आल्यावांचून राहिली नाहीं कीं, न जाणों, हा सर्व कदाचित् नजरबंदीचा प्रकार असून राजकन्येच्या ऐवजीं हें कोणी पिशाचही यानें येथें आणिलें असेल ! म्हणून मीं अविसेन यास म्हटलें, ‘ पंडितजी ! माझी तुम्हांस एक विनंति आहे. ती ही कीं, माझ्याशीं तुम्हीं कोणतीही प्रतारणा करूं नका. तुम्हांला देवाची शपथ आहे, तुम्हीं खरेंच सांगा, ही वास्तविक राजकन्याच आहे का उगीच कांहीं तरी हें गौडबंगाल आहे ? ’ अविसेन उत्तर करतो, ‘ महाराज, याबद्दल आपण कांहींएक शंका मनांत आणूं नका. ही खरोखर रझिया बेगम आहे. हिचें सौंदर्य पाहून हिजविषयीं तुमच्या अंतःकरणांत जो आनंदाचा समुद्र उचंबळला आहे त्यास तुम्ही बिलकूल अवरोध करूं नका ! ’

अशा प्रकारें अविसेन यानें माझी खातरजमा केल्यावरून मीं रझिया हिजपुढें गुडघे टेंकले, व तिला मोठ्या प्रेमानें म्हटलें, ‘ हे सौंदर्यवल्ली ! करिझमीचे राजकन्ये ! तूंच का ही माझ्यापुढें उभी आहेस ? अहाहा ! फिरून तूं माझ्या दृष्टीस पडून माझ्या नेत्रांचें पारणें फेडशील हें माझ्या स्वप्नींही नव्हतें ! पण सुदैवेंकरून तुझ्या दर्शनाचें अनुपम सौख्य अकल्पित मला प्राप्त झालें याबद्दल मी आपल्याला परम धन्य समजतों. तथापि या गोष्टीस कारण सर्वतोपरी हे माझे मित्र पंडितजी आहेत हेंही मला सांगितल्यावांचून राहवत नाहीं. यांनींच मजकरितां आपली अचाट मंत्रशक्ति खर्चून तुला येथें आणण्याचें श्रेय घेतलें. करिझमी येथें बागवानाच्या नोकराच्या वेषानें मी अनेक वेळां तुजपुढें आलों होतों या गोष्टीचें

स्मरण तुला आहे काय ? तुजवर मी पराकाष्ठेचा आसक्त झालों असतां, मीं वेष पालटून तुला फसविलें असें तुझ्या नजरेस येतांच तूं आपल्या बापास ती गोष्ट कळविलीस, व तो माझा शिरच्छेद करण्यास तयार झाला असतां सुदैवानें माझी कशी सुटका झाली हीही गोष्ट तुझ्या लक्ष्यांत असेलच. तूं मजविषयीं जरी असा निर्दयपणा केलास, तरी तुजवरचें माझें प्रेम मुळींच कमी झालें नाहीं हें खचीत समज. प्रिये ! अशा स्थितींत बलात्कारानें तुला मीं येथें आणविलें याबद्दल तूं कृपा करून मजवर रागावूं नको. खेरीज ही गोष्ट तूं लक्ष्यांत आण कीं, हा धाडशी मनुष्य खुद्द येथला राजा असून यानें वकिलामार्फत तुझे बापापाशीं तुला मागणीही घातली होती !'

अस्त्राखानचा राजा डमास्कसच्या राजास सांगतो,—महाराज ! राजकन्या रझिया बेगम ही अशा अद्भुत रीतीनें एकाएकीं येथें आलेली पाहून मला जसें परम आश्चर्य वाटलें, तसेंच तिलाही या परक्या ठिकाणीं अकल्पित रीतीनें एकदम येऊन पडल्याबद्दल अतिशय नवल वाटलें असलें पाहिजे असें आपल्या सहज ध्यानांत येईल. ती देहभानावर आल्यावर आपणावर शिव्यांचा वर्षाव करील असा मला संभव वाटत होता, व त्याचप्रमाणें झालेंही असतें. पण कांहीं विचित्र कर्मधर्मसंयोगानें तसा प्रकार घडून आला नाहीं हें माझें सुदैवच होय. ती शुद्धीवर आल्यावर मला म्हणाली, 'तुमच्या ह्या अन्यायाच्या व उद्दामपणाच्या कृत्याबद्दल मला खचीत पराकाष्ठेचा संताप आला असता. पण सांप्रतच्या प्रसंगीं तसें न होतां, तुम्हीं केलें हें एकपरी बरेंच केलें, असें मी म्हणतें; कां कीं, याच संधीस, ज्याच्याविषयीं माझ्या मनांत अत्यंत तिरस्कार आहे अशा एका राजाशीं माझें लग्न होण्याचें ठरलें होतें. तेव्हां तें टाळण्यासाठीं कसलाही प्रसंग आला असतां त्याशीं टक्कर देण्याचे संबंधानें मी जिवावर उदार झालें होतें !'

मीं मध्येंच तीस म्हटलें, 'तर मग काय गिझनीच्या राजानें अद्यापि तुझें पाणिग्रहण केलें नाहीं म्हणतेस ?' ती उत्तर करी,

'नाहीं महाराज,' आपल्याकडून करिझमी येथें मला मागणी करण्यासाठीं जे वकील आले होते ते परत गेल्यापासून आजपर्यंत अनेक महत्वाच्या गोष्टी घडल्या. त्या अर्थातच आपल्याला ठाऊक नसतील, म्हणून मी सांगतें. गिझनी व कंदाहार येथील राजांच्या सैन्यानें माझ्या बापाचा युद्धांत पराभव केल्यावर ते दोघेजण करिझमी शहरास वेढा घालण्याकरितां चाल करून आले. तेव्हां माझ्या बापानें आपल्या एका मंत्र्यास त्यांजकडे पाठवून त्यांशीं तह करविला. त्यांतील मुख्य कलम हें होतें कीं, मला एकदम गिझनीच्या राजाच्या ताब्यांत द्यावी. याप्रमाणें त्याच दिवशीं मी करिझमी येथून निघावयाची; पण तितक्यांत असें झालें कीं, माझ्या सौंदर्याची वार्ता ऐकून कंदाहारच्या राजास मजविषयीं लोभ उत्पन्न झाला, व करिझमीची राजकन्या मला मिळाली पाहिजे असें त्यानें गिझनीच्या राजास स्पष्टपणें सांगून मला नेण्याची तयारी चालविली. तेव्हां अर्थातच त्या उभयतांचें बिनसून जाऊन दोघेही हातघाईवर आले. त्यांत कंदाहारच्या राजाची सरशी झाली, व गिझनीचा राजा पडला. मग कंदाहारच्या राजाकडून माझ्या बापाकडे कोणी एक कामगार आला. त्यानें माझ्या बापास सांगितलें कीं, आमच्या महाराजांचें व गिझनीच्या राजाचें द्वंद्वयुद्ध होऊन गिझनीचा राजा ठार झाला. यामुळें त्याच्या सैन्याची वाताहत झाली आहे. तर आतां त्याचा सारा मुलूख काबीज करण्याचा आमचा विचार आहे. त्यांत आपण आम्हांस सामील व्हावें अशी आमच्या महाराजांची इच्छा आहे. शिवाय त्यांचा असाही हेतु आहे कीं, आपली कन्या रझिया बेगम, जी गिझनीच्या राजास आपण देण्याचें कबूल केलें होतें, ती आम्हांस द्यावी. माझ्या बापास, अशा प्रकारें एकाएकीं बलाढ्य झालेल्या राजाचें म्हणणें नाकबूल करवेना; सबब त्यानें त्या कामगारास आपला रुकार दिला. त्या कामगारानें आपल्या धन्याचें जें वर्णन केलें, त्यांत त्याचें वास्तविक जितकें वाईट स्वरूप होतें त्याहून अर्थातच तें कमी भासविण्याचा

जरी आपणाकडून त्यानें यत्न केला होता, तरी मला त्याची कल्पना होऊन त्याजविषयीं पराकाष्ठेचा तिटकारा उत्पन्न झा ही गोष्ट पूर्णपणें माझ्या बापानें जाणली. तरी निरुपायास्तव त्य त्या कामगारास नकार सांगवेना. शेवटीं आज रोजीं मी सायंक करिझमी येथून कंदाहारास जाण्याकरितां निघण्याचें ठरलें हे तेव्हां मी आपल्या दुर्दैवाची रडकथा आपल्या दासींस सांगत ब असतां एकाएकीं एक मनुष्य माझ्या महालांत प्राप्त झाला, व ह निमिषार्धांत मला येथें आणिलें!'

या हकीकतीवरून रझिया इचें अद्यापि लग्न झालें नाहीं समजून मला इतका आनंद झाला कीं, मध्येंच मला बोलल्यावां रहावेना. मीं म्हटलें, 'सुंदरी! तर मग हा चमत्कारिक योग घ आला नसता तर, ज्याविषयीं तुझ्या मनांत अत्यंत अप्रीति उ झाली होती अशाच्या हातीं तूं पडली असतीसना? आणि म्हणातों कीं, हा तुजवरचा प्रसंग ज्या अर्थीं मजकडून टळला अर्थीं माझ्या अपराधाचें स्वरूप तुझ्या मतें फार सौम्य होत न काय?' ती म्हणते, 'छे छे!' तें सौम्य तर मुळींच होत नाहीं. आणखी त्यांत वाईट गोष्ट अशी आहे कीं, या गोष्टीबद्दल तुमच्या मला आपला रागही काढतां येत नाहीं!' मीं म्हटलें, 'बरें, झा गोष्ट ती झाली. पण आतां मजविषयीं तूं मनांत कांहीं एक नको, व मी आपल्या पट्टराणीचें पद जें तुला अंतःकरणापार अर्पण करतों त्याचा कृपा करून स्वीकार कर.' अशा अ प्रकारांनीं, तिजवर माझें किती अनिवार प्रेम बसलें होतें, तें तिला बोलून दाखविलें. याचा उपयोग बराच झाला; कारण, माझ बोलण्यावर तिनें उत्तर केलें कीं, 'जर तुम्ही माझ्या बापाचा रुक मिळवाल, तर तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें तुम्हांस सुखी करण्याचें वचन देतें.'

या गोष्टीबद्दल मीं अविसेन यास अभिप्राय विचारिला. तेव्हां तो म्हणाला, 'तुम्ही आतां इतकेंच करा कीं, तिच्या बापाकडे एक

वकील पाठवून त्याला त्याच्या कन्येची सर्व हकीकत व तिचें म्हणणें हीं कळवा, व तिला मागणी घाला. बाकी कोणत्याही गोष्टीची तुम्हांस काळजी नको. तें सर्व तुम्ही मजवर सोंपवा.' अविसेन याच्या सल्ल्याप्रमाणें मीं फिरून हुसेन यास कारिझमी येथें वकील म्हणून पाठविलें. त्याजबरोबर, सुलतानास देण्याकरितां मीं फिरून मोठमोठाले नजराणे पाठविले. मीं इकडे राज्यकन्येस आपल्या जनानखान्यापैकीं अत्युत्तम असा स्वतंत्र महाल रहाण्यास देऊन तिची केवळ पट्टराणीप्रमाणें सर्व प्रकारें उत्तम बरदास्त ठेविली. अविसेन याची थोर विद्वत्ता जाणून, व त्याचे मजवर जे येवढे मोठे उपकार झाले होते त्यांबद्दल उतराई होण्यासाठीं म्हणून मीं त्याला आपल्या येथें इच्छेस वाटेल त्याप्रमाणें रहाण्याविषयीं विनंति केली. मीं त्यास म्हटलें, 'पंडितजी! मीं आपल्या मुख्य वजिराची जागा जरी तुम्हांस दिली, तरी तुमचा योग्य मान केला असें होणार नाहीं. याकरितां तुम्हीं माझे मित्र म्हणून माझ्या बरोबरीच्या नात्यानें येथें रहावें असा माझा अंतःकरणापासून हेतु आहे.' अविसेन मोठा ज्ञाताच होता. तेव्हां या माझ्या बोलण्यावरून मीं त्याच्या गुणांची चहा किती केली व त्याच्या उपकारांबद्दल किती कृतज्ञता दर्शविली, हें त्यानें पूर्णपणें जाणलें, हें सांगावयास नकोच. तो मला म्हणाला, 'महाराज! आपण माझा जो सन्मान केला त्यापासून मला अतिशय संतोष झाला. आपल्या देणगीचा मी परमादरानें स्वीकार करतों; येवढेंच नाहीं, तर याहून अधिक कोणतीही देणगी नसून, ही जी मला आपण दिली ती माझ्या योग्यतेच्या व कामगिरीच्यापेक्षां दसपट अधिक आहे!'

आतां हुसेन हा कारिझमी येथें गेला होता, त्या संबंधाची हकीकत सांगतों. तेथील सुलतानास आपली कन्या एकाएकीं नाहींशी झाली हें कळल्यावर, अशा चमत्कारिक प्रसंगीं आपण कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबद्दल सल्ला घेण्याकरितां त्यानें आपल्या दरबारचे सर्व मंत्री व अमीरउमराव बोलाविले. त्यांनीं त्यास अशी मसलत

दिली कीं, ' शेहरीस्तान येथें जो महाविद्वान् ज्योतिषी राहतो त्यास राजकन्येचें काय झालें हें विचारावें. ' त्या ज्योतिष्यानें गणित करून पाहिलें तों ती अस्त्राखानच्या राजाच्या जनानखान्यांत आहे असें त्यास दिसून आलें. त्या योगानें सुलतानाचें पित्त अतिशय खवळून जाऊन, कन्येवर झालेल्या जुलमाबद्दल सूड घेण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें सर्व कच्च्या हकीकतीचें पत्र कंदाहारच्या राजास पाठविलें, व या कामीं त्याचें साहाय्य मागितलें. त्यालाही हें वर्तमान कळतांच अर्थात् मोठी चीड आली, व तो तावडतोब सैन्य घेऊन करिझमीच्या सुलतानास येऊन मिळण्याकरितां निघाला. तो करिझमीपासून एक मैलाच्या अंतरावर असतां हुसेन हा मज-कडून वकील म्हणून आल्याची बातमी तेथील सुलतानास कळली.

करिझमीचा सुलतान स्वभावतःच मोठा तापट व निर्दय अस-ल्यामुळें त्यानें हुसेन याच्या मुसक्या बांधून त्यास आपल्या समोर आणण्याविषयीं हुकूम केला. तो त्यास मोठ्या उद्दामपणानें म्हणाला, ' तूं कोणती वकिली येथें करण्याकरितां आला आहेस, तें माझ्या लक्ष्यांत आलें. अतिशय पाजी माणूस जो तुझा धनी त्यानें सभ्य-पणाच्या रीतीस सोडून नाहक माझ्या कन्येस पळवून नेऊन आपल्या जनानखान्यांत ठेविलें आहे, हें मला कळविण्याकरितां तूं येथें आला आहेस ऑं ? बरें, कांहीं चिंता नाहीं ! हा जो त्यानें मला त्रास दिला व माझा अपमान केला त्याबद्दल त्याला लवकरच पश्चात्ताप करण्याची पाळी येईल ! मीं अस्त्राखानचें राज्य काबीज करून तें शहर जाळून टाकण्याचा निश्चय केला आहे. त्या गोष्टीस थोडा अवधि आहे, याकरितां माझ्या रागास पहिला बळी मी तुला देतों. तुझा शिरच्छेद करून तुझ्या डोक्याची सलामी अगोदर त्यास मी पाठवितों. अरेरे ! तो महामात्रागमनी, ज्यानें कोणा दुष्ट जादूगाराच्या साहाय्यानें माझ्या कन्येचें हरण करून माझ्या घराण्याची अब्रू कमी केली, तो स्वतः जर या वेळीं येथें असता, तर त्याच्या नरडीचा मीं या क्षणीं घोटच घेतला असता ! ' असें

म्हणून त्यानें राजवाड्यासमोर एक वधस्तंभ लागलाच तयार करविला, व करिझमीच्या सर्व लोकांसमक्ष हुसेन याचा शिरच्छेद करण्यासाठीं त्यास तेथें नेववून त्या स्तंभावर चढविलें. पण हुसेन याच्या मानेवर मांगाच्या हातच्या तरवारीचा घाव जों पडणार तों चमत्कार असा झाला कीं, तो आपोआप आकाशांत उडाला व अदृश्य झाला ! हें पाहून सुलतानास व तेथें जमलेल्या इतर लोकांस किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे ! सुलतानानें असा तर्क केला—आणि तो वास्तविकच होता—कीं, आपल्या कन्येस ज्या मांत्रिकानें आपल्या दुष्ट विद्येचा उपयोग करून येथून पळविलें, त्यानेंच हुसेन यास सोडवून नेलें असावें यांत संशय नाहीं. या गोष्टीमुळें तो अधिकच संतापला, आणि या वकिलाबरोबर जे कोणी अस्त्राखानचे लोक आले असतील त्या सर्वांस धरून एकदम ठार मारा असा त्यानें हुकूम केला. तों लागलीच, हुसेन हा जेथें उतरला होता त्या ठिकाणीं शिपाई लोक गेले. पण हुसेन याजबरोबर आलेला एकही मनुष्य त्यांना तेथें आढळला नाहीं ! त्यांना हुसेन याजबरोबरच अविसेन याच्या नोकरांनीं पळवून नेलें होतें.

हा सर्व प्रकार ज्या वेळेस घडला, त्याच वेळेस अर्थात् तो सर्व मला कळला. हुसेन हा एकाएकीं मजपुढें प्राप्त झाला, व त्यानेंच ही हकीकत मला कळवून खेरीज सांगितलें कीं, 'कंदाहारचा राजा व करिझमीचा सुलतान या उभयतांनीं आपलें सैन्य एकत्र केलें असून ते आपणांवर चालून येत आहेत, व आपलें राज्य घेऊन अस्त्राखान शहर धुळीस मिळवून टाकण्याचा त्यांचा विचार आहे.' हें तो मला सांगत आहे इतक्यांत अविसेन तेथें आला, व आमच्यामध्यें बोलूं लागला. बोलतां बोलतां त्यानें, करिझमी येथून हुसेन व त्याचे लोक यांस आणीबाणीच्या प्रसंगीं मोठ्या शिताफीनें शत्रूच्या हातांवर तुरी देऊन आपण कसें पळविलें, व त्यांच्या शत्रूंचा हिरमोड व फटफजिती कशी केली, याबद्दलची जी हकीकत सांगितली, ती ऐकून आम्हां तिघांसही बेंबीच्या देंठापासून हंसूं आलें ! यानंतर, ते दोघे राजे

एकत्र होऊन माझे राज्यावर चाल करून येतात या गोष्टीच्या संबंधानें माझ्या मनांत चिंता उत्पन्न झाली असें पाहून त्याबद्दल अविसेन यानें माझा निषेध केला. तो म्हणाला, ' महाराज ! मी एवढा आपला पाठीराखा असतांना आपणांस त्या पामरांची भीति कशाला पाहिजे ? मी आपणांला सांगतों कीं, माझें साहाय्य आपणांस आहे तोंपर्यंत आपल्या केंसासही धका लावण्याची त्यांची मगदूर नाहीं. फार काय, पण येवढा हिंदुस्थान देश, चीन देश, व मोंगोलिया देश, येथले राजे आपल्या सर्व लोकांसह जरी आणखी जाऊन त्यांना मिळाले, तरी मी त्यांची दाणादाण करून तुम्हांस विजयी करीन !' असो, सध्या करिझमीचा सुलतान व कंदाहारचा राजा हे तुमच्या राज्यांत शिरून धमाळी मांडण्याचा आव घालीत आहेतना ? ठीक आहे ! करूं द्या त्यांना वाटेल तितकी धडपड ! मी त्यांचें पाऊल सरहद्दीच्या आंत पडूंच देत नाहीं म्हणजे झालें ! तुम्ही खुशाल ही कामगिरी माझ्यावर सोंपवून बेफिकीर रहा ! '

अविसेन यानें अशा प्रकारें या बिकट प्रसंगीं मला साहाय्य करण्याचें वचन दिलें याबद्दल मीं त्याचे फार आभार मानिले, व अशा महासामर्थ्यवान् पुरुष्याच्या हातीं ह्या आपल्या कार्याचीं सूत्रें आहेत हें पाहून मला अत्यानंद झाला. त्या दोघां राजांकडून आपणास कांहीं अपकार होईल ही गोष्ट माझ्या स्वप्नांतही येईनाशी झाली, इतकेंच नव्हे, तर ते एकदांचे लवकर वोल्गा नदी उतरून अलीकडे केव्हां येतील व फजीत होतील असें मला होऊन गेलें ! ही गोष्ट थोडक्याच वेळांत घडली; कां कीं, ते राजे मोटमोठ्या मजला करीत माझ्या राज्याच्या सरहद्दीकडे येऊं लागले, ते लवकरच जिहून नदीचें मुख टाकून पुढें जैक नदीपर्यंत येऊन थडकले. तें ऐकून अस्त्राखान शहरांत मोठा हाहाकार झाला. मी सर्वस्वी अविसेन याजवर भार टाकून बसलों असल्यामुळें माझ्या सैन्याची तयारी बहुतेक नव्हतीच असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण माझ्या लोकांचें धाबें अर्थातच अतिशय दणाणून गेलें. ते म्हणूं लागले

कीं, " येवढ्या जबरदस्त शत्रूंच्या पुढें आम्ही चिलटांप्रमाणें कोणी-कडच्यां कोणीकडे नाहींसे होऊन जाऊं, व एका क्षणांत शत्रु अस्त्राखान शहराची राखरांगोळी करून टाकतील !'

माझें सैन्य थोडें व तेंही तयारींत नाहीं, अशी बातमी हेरांकडून माझ्या शत्रूंना कळली असल्यामुळें मजकडून त्यांना अडथळा होईल हें त्यांच्या गांवींही नव्हतें: तेव्हां आपणाला लढाई देण्याचें कारण न पडतां अस्त्राखान शहरापर्यंत बिनधोक चाल करितां येईल असें साहजिकच त्यांना वाटलें; इतकेंच नव्हे, तर अस्त्राखानचें राज्य काबीज करून अपार संपत्तीसह आपण थोडक्याच दिवसांत जयघोष करीत परत आपल्या राज्यांत जाऊं म्हणून ते मनांत मांडे खाऊं लागले ! पण अविसेन यानें आपल्या सामर्थ्यानें त्यांची सर्व आशा रसातळास नेली व त्यांची फटफजिती केली. ती अशी. त्यानें मला बरोबर घेतलें व आम्ही दोघे माझ्या लहानशा सैन्यावर मुख्य झालों. हें सैन्य घेऊन आम्ही वोल्गा नदी उतरून गेलों, व नंतर शत्रु हे जेथून सुमारें तीन कोसांच्या अंतरावर होते अशा ठिकाणीं आम्हीं मुक्काम केला. तेथून अविसेन यानें आपल्या अद्भुत मंत्रसामर्थ्याचा उपयोग करून त्या दोघां राजांत वैमनस्य आणिलें. ती गोष्ट इतक्या थरास आली कीं, ते उभयतां आपापलीं सैन्यें घेऊन एकमेकांवर चालून गेले. त्यांची निकराची लढाई होऊन कंदाहारचा राजा पडला, व करिझमीच्या सुलतानास जय प्राप्त झाला. पण त्याला ह्या जयाचा कांहीं एक उपयोग नव्हता; कां कीं, त्याचे बहुतेक लोक रणांगणीं पतन पावल्यामुळें आमच्याशीं सामना करण्याचें सामर्थ्य त्यांना राहिलें नव्हतें. मग आमचे त्यांचे दोन हात होण्याची वेळ आली, तेव्हां त्यांची अगदीं फें फें उडाली, व आम्हीं त्यांच्या सभोंवतीं वेढा घालून त्यांना कोंडून टाकिलें. याप्रमाणें आपण पराजित झालों असें पाहून करिझमीचा सुलतान मुकाट्यानें आम्हांस शरण आला. तेव्हां त्यास त्याच्या लोकांसह आम्हीं अस्त्राखान येथें आणून प्रतिबंधांत ठेविलें.

करिझमीचा सुलतान माझे हातीं सांपडल्यावर मीं त्याचा इतका मानमरातब ठेविला कीं, त्यामुळें तो मजवर फारच खूष झाला. त्याची कन्या मीं बलात्कारानें आणिली म्हणून जो क्रोधाग्नि त्याच्या हृदयांत धुमसत होता तो साफ विझावा म्हणून मी फार झटलों, व तो माझा यत्न उत्तम प्रकारें सिद्धीस गेला; आणि याहीपेक्षां, राजकन्येनें माझ्या चांगुलपणाबद्दल जी त्याजपाशीं माझी प्रशंसा केली तिचा तर त्याच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. ती माझे येथें आल्यापासून तिचा मान व बरदास्त मीं कशी ठेविली, व मुख्यत: तिच्याशीं वागण्यांत मीं सभ्य रीतीचें यत्किंचित्‌ही उल्लंघन केलें नाहीं, या गोष्टी ऐकून त्याची मर्जी मजवर फारच प्रसन्न झाली. सारांश, शेवटीं त्यानें कन्या मला अर्पण करण्याचा निश्चय केला.

मग काय विचारतां ? जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन गेला. आमच्या विवाहाच्या संबंधानें सर्व शहरांत महोत्सव जे सुरू झाले ते एकसारखे वर्षभर चालले होते; अथवा अजूनही ते तसेच चालले आहेत असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. लग्नसमारंभ उरकल्यानंतर माझा सासरा म्हणजे करिझमीचा सुलतान परत आपल्या राज्यांत निघून गेला. त्याचा पराभव झाल्यामुळें त्यास वाईट वाटलें होतें. पण त्याचा माझ्याशीं जो हा नवीन संबंध जडला त्यामुळें त्याचें सांत्वन होऊन त्या गोष्टीचा त्याला विसर पडला. तो माझ्या येथून जाण्यापूर्वी त्याचें व अविसेन याचें अनेक वेळां संभाषण झालें. त्यांत अविसेन हा मोठा विद्वान् व बलाढ्य मांत्रिक असून त्याच्या अंगीं 'कर्तुमकर्तुमअन्यथाकर्तु' शक्ति आहे अशी त्याची पक्की खात्री झाली. त्यानें अविसेन यास आपली कन्या नेण्याचे बाबतींत क्षमा केली इतकेंच नाहीं, तर त्यास आपला मित्रही मानिलें. तात्पर्य इतकेंच कीं, अविसेन व मी या उभयतांवरही त्याची येवढी मर्जी बसली कीं, अविसेन याशीं त्याचें मित्रत्व जडलें, व त्याची कन्या रझिया इजला माझ्यासारखा पति मिळाला,

या दोहोंपैकीं अधिक अभिनंदनीय कोणती गोष्ट त्यास वाटली, का दोन्ही सारख्याच वाटल्या, हें मला कांहींच सांगतां येत नाहीं !

रझिया इजशीं माझें लग्न झाल्या दिवसापासून तिनें आपल्या स्वभावाची तीव्रता अगदीं टाकून दिली, व ती मजवर अत्यंत प्रीति करूं लागली. ही प्रीति शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन आम्ही परस्परांच्या समागमांत अत्यंत सौख्य पावलों. पण हाय हाय ! अशा प्रकारें पूर्ण सुख व समाधान अनुभवण्यांत आमचे कांहीं दिवस लोटल्यावर, जो अविसेन या आमच्या सुखास कारणीभूत झाला होता त्यानेंच शेवटीं एकाएकीं त्यांत विघात आणून आमची स्थिति अत्यंत शोचनीय करून टाकिली !

अविसेन हा अद्वितीय विद्वान् व ज्ञानी खरा; पण रशिया हिचें अनुपम् सौंदर्य पाहून आषकानें त्याची अगदीं गाळण होऊन गेली, व याच गोष्टीमुळें आजमितीस माझ्या सर्व सुखाचा नाश होऊन माझ्या काळजास घरे पडून गेले आहेत. अविसेन याच्या योगानेंच मला रझिया ही प्राप्त झाली ही गोष्ट स्मरून व त्याच्या पोक्तपणास आणिं विद्वत्तेस मान देऊन, मीं त्याला रझिया ईस वाटेल तेव्हां भेटण्याची व तिच्याशीं बोलण्याचालण्याची सदर परवानगी दिली. पण महाराज ! कांता आणि कांचन यांच्या संबंधानें होईल तोंपर्यंत कधींही कोणावर विश्वास ठेवूं नये; कां कीं, दोहोंच्या लालचीनें आजपर्यंत जगांत अत्यंत थोर पदवीच्या माणसांकडूनही महत्पापें व विलक्षण अनर्थ घडले आहेत ! असो, तर सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, अविसेन याचें रझिया हिजशीं बसण्याउठण्यांत व बोलण्याचालण्यांत जसजसें रहस्य वाढत गेलें तसतसा त्याचा आषक अनावर होत गेला, व आपण कोण आणि हिजशीं आपलें नातें काय आहे, याचें त्याला भान राहिलें नाहीं ! त्यानें राणीस थोडक्याच दिवसांत आपलें मनोगत कळविलें. त्याचें पाचकळ भाषण ऐकून तिच्या मनाला अतिशय किळस आला, व मोठा धक्का बसला; आणि त्या दुःखानें तिच्या हृदयाचें विदारण केलें ! तथापि अविसेन याला

आपण टाकून बोलल्यास, त्याचे अंगीं राक्षसी सामर्थ्य असल्यामुळें -तो आपणाला गोत्यांत घातल्यावांचून सोडणार नाहीं, असें जाणून ती अत्यंत सौम्यपणानें व दीनवाणीनें त्यास म्हणाली, ' अविसेनजी ! तुम्हीं व्यावहारिक नीति व परमेश्वराचें भय यांचा विचार करून, माझ्या उभयकुळांच्या व तुमच्या निष्कलंक कीर्तीस काळिमा आणणारी ही जी गोष्ट मनांत आणली आहे ती काढून टाका. तुमचें अगाध ज्ञान पाहून मला वाटतें कीं, अशा दुष्ट मनोविकारांचें आकलन करणें दुसऱ्या कोणाही मनुष्यापेक्षां तुम्हांस फार सोपें आहे. महाराजांचा व तुमचा स्नेह असून तुमच्याविषयीं त्यांच्या मनांत अत्यंत पूज्य भाव वसत आहे, तसेंच त्यांची माझ्याठायीं व माझी त्यांच्याठायीं अलौकिक प्रीति आहे, व या जन्मीं त्यांच्याखेरीज जगांतले इतर सर्व पुरुष मला बापाभावांप्रमाणें आहेत; म्हणून, अविसेनजी ! मी तुम्हांस कोंपरापासून हात जोडून विनंति करतें कीं, तुम्हीं आपण होऊन जें हें आम्हां उभयतांच्या अत्यंत निष्कलंक व निस्सीम प्रीतीचें झाड लाविलें आहे, तें तोडून टाकण्याचें अपयश घेऊं नका ! '

पण हाय हाय ! बिचाऱ्या माझ्या राणीनें अशा प्रकारें अविसेन यास परोपरी आळविलें असतांही, त्या आपकानें धुंद झालेल्या पाषाणहृदयास द्रव आला नाहीं ! त्यानें आपलें घाणेरडें बोलणें तसेंच पुढें चालविलें, व शेवटीं तो इतका निर्लज्ज झाला कीं, राणीची सहनशीलता नाहींशी होऊन त्याला टाकून बोलल्यावांचून तिला रहावेना; त्याचा कोडगेपणा पाहून ती परम क्रोधायमान झाली—तिचे नेत्र आरक्त झाले व सतीत्वाचें तेज विजेप्रमाणें तिच्या ठायीं चमकूं लागलें ! तिनें त्यास अशा तीक्ष्ण शब्दांनीं ताडण केलें कीं, त्या योगें संताप त्याच्या पोटांत माईनासा झाला. त्याचा स्वभाव मूळचाच तापट, आणि त्यांतून अशा मर्मच्छेद करणाऱ्या वाग्बाणांचा त्याजवर वर्षाव झाला; मग काय विचारतां ? तो जो येवढा वेळ श्वानवृत्ति धरून राणीपासून प्रीतिरूपी भाक-

रीचा तुकडा मिळण्यासाठीं लाळ घोटीत होता, तें त्याचें स्वरूप एकदम बदलून जाऊन, जखमी झालेल्या वाघाप्रमाणें तो चवताळून गेला, आणि तिला म्हणाला, 'अगे निमकहराम स्त्रिये ! तूं मजसारख्या तेजस्वी पुरुषाचा अपमान करून माझी निराशा केलीस याचें प्रायश्चित्त तुला जन्मभर भोगावें लागेल, समजलीस ? तुझें नवऱ्याच्या ठिकाणीं जिवापरीस प्रेम आहे म्हणून म्हणतेस ना ? ठीक आहे ! त्याचाच मी लचका तोडून घेतों, आणि ती जखम कधींही बरी होणार नाहीं असें करून टाकतों म्हणजे झालें !' असें म्हणून त्यानें कांहीं मंत्राचा उच्चार करून राणीच्या अंगावर फुंकर घातला, व तत्काळ तो अदृश्य झाला.

अविसेन याच्या ह्या कृत्यामुळें राणीस मोठें भय वाटलें, व तिच्या अंगाला कांपरें सुटलें. पण याहून ज्यास्त त्यापासून कांहीं परिणाम होईल असें तिला वाटलें नाहीं. तिनें मनांत म्हटलें, 'यानें मला भिवविण्याकरितांच हें केलें असून येवढ्यावरच त्याचा राग शांत झाला असावा. पुढें दोन तीन वेळां मी तिजपाशीं गेलों असतां;-तुम्हीं जो तिचा मूर्छित होण्याचा प्रकार पाहिला त्याचा जेव्हां तिला अनुभव आला, तेव्हां अविसेन यानें किती निर्दयतेनें आपला सूड उगवला हें तिच्या लक्ष्यांत पूर्णपणें आलें. शेवटीं, महाराज ! सांगायाचें इतकेंच कीं, माझ्या या स्थितींत मला वास्तविक समाधान बिलकूल नसून हें प्रेमभंगाचें दुःख माझ्या काळजाला रात्रंदिवस झोंबून राहिलें आहे ! पण शेवटीं आपणास हेंही सांगणें इष्ट आहे कीं, माझ्या अशाही दुःखदायक स्थितींत, अविसेन यानें माझी प्रियतमा मजपासून हरण करून नेली नाहीं, व अशा प्रकारें नुसत्या तिच्या दर्शनाचा तरी निदान लाभ मला मिळूं दिला, याबद्दल मी परमेश्वराचे मोठे उपकार मानितों !

## बद्रुद्दीन लोलो राजा, त्याचा वजीर, व मित्र यांची गोष्ट ( पुढें चालू ).

अस्त्राखानच्या राजानें आपली गोष्ट संपविल्यावर बद्रुद्दीन राजा त्यास म्हणाला, ' महाराज, आपण कृपा करून माझी जिज्ञासा तृप्त केली याबद्दल मी आपला परम आभारी आहें. तसेंच आपली हकीकत ऐकून जितकें मला दुःख वाटलें तितकें दुसऱ्या कशानेंही आजपर्यंत वाटलें नाहीं, हें ही मी खचीत आपणांला सांगतों.' इतकें झाल्यावर अस्त्राखानचा राजा हा, बद्रुद्दीन, त्याचा वजीर, व मित्र यांचा निरोप घेऊन दरबारचें कामकाज पहाण्याकरितां निघून गेला. नंतर थोडक्याच दिवसांनीं हे तिघेजण डमास्कस येथें जाण्यास निघाले.

या तिघांनीं अस्त्राखानच्या राणीची जी दुःखकारक स्थिति पाहिली होती तिच्या संबंधानें, मार्ग क्रमीत असतां त्यांचा पुष्कळ वेळां संवाद झाला. त्यांत एके दिवशीं सैफउल्मुल्क हा बद्रुद्दीन राजास म्हणाला, ' महाराज, रझिया बेगम हिजपेक्षां अधिक सुंदर व प्रीतीस योग्य अशी स्त्री आजपर्यंत जगांत होऊन गेली असेल असें मला वाटत नाहीं. तरी पण काय असेल तें असो, तिला आपण इतकी निरखून पाहिली तथापि तिच्या रूपाला भुलून आपणांपैकीं कोणीही वेडावून गेला असें मला वाटत नाहीं. निदान मी आपल्या स्वतःविषयीं तरी असें म्हणतों कीं, बेदी-अल्-जमाल हिची तसबीर सदोदित माझ्याजवळ असल्यानें मी त्या प्रसंगांतून साफ वचावलों यांत संशय नाहीं. ' हें ऐकून अतल्मुल्क वजीर म्हणतो, ' खरेंच, माझीही पण गोष्ट तशीच आहे. झलिका हिची मूर्ति रात्रंदिवस माझ्या डोळ्यांसमोर उभी असल्यामुळें जगांतली दुसरी कोणतीही सुंदर स्त्री मीं पाहिली तरी माझ्या प्रियतमेपुढें तिचें मला कांहींच वाटत नाहीं ! ' सैफउल्मुल्क म्हणतो, ' हें आपणां दोघांचें ठीकच झालें. पण महाराजांची गोष्ट अगदीं

निराळी आहे. आपणां दोघांप्रमाणें त्यांचें मन कोणा एखाद्या राजकन्येनें यापूर्वीं मोहून टाकिलें नसल्यामुळें, रझिया बेगम हिजविषयीं आपणांप्रमाणेंच त्यांचेंही औदासीन्य असावें हा मोठा चमत्कार आहे !'

बद्रुद्दीन राजा किंचित् हंसून म्हणतो, 'माझी कोणी प्रियकरीण असलेली तुम्हांला ठाऊक नाहीं म्हणून माझ्या वृत्तीविषयीं तुम्हांस येवढा चमत्कार वाटतो ! पण वास्तविक पुसाल तर मीही तुम्हांप्रमाणेंच प्रेमपाशांत गुंतून गेलेलों आहें, आणि याच कारणामुळें माझ्याही सुखास व्यत्यय आलेला आहे. तुमच्याप्रमाणें माझ्या प्रीतीचें पात्र कोणी एखादी राजकन्या आहे असें नाहीं. तर ती अगदीं सामान्य स्थितींतली स्त्री आहे. ही माझ्या प्रेमसंबंधाची गोष्ट मी तुम्हांस सांगणार नव्हतों; पण ज्या अर्थी तसा योग तुम्हीं आणलाच, त्या अर्थी मला ती सांगितल्यावांचून राहवत नाहीं !'—

---

## अरूया नामक सुंदर, चतुर व सत्वशील स्त्रीची गोष्ट.

बद्रुद्दीन राजा म्हणतो,—कांहीं वर्षांपूर्वीं डमास्कस येथें वन्नू या नांवाचा एक वृद्ध व्यापारी रहात असे. शहरानजीकच त्याची एक मोठी वाडी असून तींत त्याच्या दोन वखारी होत्या. त्यांत सर्व प्रकारचें छीट व हिंदुस्थानांतील भारी किमतीचें रेशमी कापड भरलेलें होतें. त्या व्यापाऱ्याची अरूया या नांवाची बायको होती. ती तरुण असून, रूपानें अस्त्राखानच्या राणीपेक्षां सरस जरी नसली, तरी तिच्याहून यत्किंचित्ही कमी खास नव्हती.

वन्नू हा मोठा चैनी माणूस होता. खर्च करण्यांत त्याचा हात फार सढळ असे. तथापि तो स्वतःच्या ऐषआरामांतच पैसे उडवीत असे असें नाहीं. तर लोकोपयोगी कामांत व अनाथांस साहाय्य करण्यांतही त्याचा नेहमीं पुष्कळ खर्च होत असे. फार काय, पण एखादे दिवशीं जर त्याचे हातून अशा प्रकारचें कांहीं सत्कृत्य घडलें नाहीं, तर त्याच्या मनाला मोठी हुरहुर लागत असे. अशा रीतीनें त्याचा अवाढव्य खर्च चालत असतां त्याला स्पष्ट दिसून आलें

कीं, आपण आपल्या हातानें आपल्या पायावर हा धोंडा पाडून घेत आहों. तथापि त्याला आपला नेहमींचा क्रम बदलण्याची वासना होईना. असें होतां होतां शेवटीं त्याचा सर्व व्यापार बसून त्याचें दिवाळें निघण्याची वेळ आली. तेव्हां त्याला आपलें घरदार सर्व विकून टाकावें लागलें. याप्रमाणें **बन्नू** हा कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून ' रावाचा रंक ' बनून गेला.

**बन्नू**सारख्या गृहस्थास मित्रांची कधींही वाण नसावयाचीच. त्यानें आपल्या चालत्या काळांत त्यांस शेंकडों वेळां मेजवान्या वगैरे देऊन संतुष्ट केलें होतें. इतकेंच नाहीं, तर त्यांच्यापैकीं पुष्कळांस त्यानें मोठमोठ्या रकमा उसनवारही दिल्या होत्या. तसेंच त्याचें इतर अनेक लोकांकडे सावकारीसंबंधानें पुष्कळ येणें होतें. पण काळ फिरला म्हणजे सर्वच फिरतें, या न्यायानें त्याच्या कृतघ्न मित्रांनीं प्रसंगीं उपयोगीं पडण्याविषयींच्या त्याच्या विनंतीकडे बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं ! त्याचप्रमाणें त्याचीं जीं कुळें होतीं त्यांपैकीं कांहींनीं आपणांकडे त्यांचें असलेलें कर्ज साफ नाकबूल केलें, व कांहींना तें देण्याची मुळीं ऐपतच नव्हती. तात्पर्य, त्या कठिण प्रसंगीं **बन्नू**चे सर्व ग्रह प्रतिकूल होऊन जगांत त्याला कोणी साहाय्य करणारें नाहींसें झालें, व त्यामुळें त्याला पराकाष्ठेची काळजी लागून तो दुखण्यास पडला.

**बन्नू** दुखण्यास पडला असतां, त्याच्या एका साधारण ओळखीच्या हकिमास त्यानें एक हजार मोहरा उसनवार दिलेल्या होत्या, त्या गोष्टीची त्याला सहज आठवण झाली. तेव्हां त्यानें आपल्या बायकोस बोलावून म्हटलें, ' प्रिये ! आपणांवर मोठें संकट तर आलें आहे खरेंच. पण आपणांला निराश होण्याचें कारण नाहीं. **दा**नीष हकीम याजकडे माझ्या एक हजार मोहरा येणें आहेत. इतर सर्व लोक जरी ह्या प्रसंगीं मजवर फिरून पडले आहेत, तरी त्याच्या हातून तशी गोष्ट होणार नाहीं. तो मोठा सज्जन आहे. याकरितां तूं त्याजकडे जा, व माझी सर्व स्थिति त्यास कळवून,

माझ्या हजार मोहरा तेवढ्या या वेळेस मला द्याल तर मोठी मेहेरबानी होईल, असें त्यास सांग.'

अरूया हिनें लागलाच बुरखा घेतला आणि ती दानीष याचे घरीं गेली. त्यानें तीस येण्याचें कारण विचारल्यावरून ती आपल्या तोंडावरचा बुरखा काढून त्याशीं बोलूं लागली. ती म्हणते, 'मला आपण ओळखली नसेल; कां कीं, मी कधींही यापूर्वी आपल्या दृष्टीस पडलें नाहीं. मी बन्नूशेट कापडवाले यांची बायको आहें. माझ्या यजमानांनीं आपणांस फार फार सलाम सांगितले आहेत, व त्यांची अतिशय नड असल्यामुळें, आपणांकडे ज्या त्यांच्या हजार मोहरा येणें आहेत त्या त्यांनीं जरूर मागितल्या आहेत.'

अरूया ही तरुण व सुंदर असून तिचा स्वर फार मधुर होता, आणि तिची बोलण्याचालण्याची ढबही फारच मनोहर होती. तिचें बोलणें ऐकून दानीष हा तिजवर अतिशय फिदा झाला, व आषकानें तो इतका वेडावून गेला कीं, कांहीं एक विचार न करितां तो तिच्याशीं एकदम प्रेमाच्या गोडगोड गोष्टी बोलूं लागला! तो म्हणाला, 'अगे मनमोहिनी! तूं माझ्या येथें येऊन आपली पायधूळ झाडलीस व मज दीनाशीं दोन गोड शब्द बोलून माझें अंतःकरण गार करून टाकिलेंस, या योगानें मी तुला इतका प्रसन्न झालों आहें कीं, तुझ्या नवऱ्याचें देणें म्हणून नव्हे, तर तुला स्वतःला जें हवें असेल तें देण्यास मी एका पायावर तयार आहें! तुला पाहिल्यापासून माझ्या अंतःकरणानें ठाव सोडला आहे; यास्तव तूं मजवर कृपा न केलीस तर मी जिवंत राहण्याची मुष्कील आहे! खेरीज तूं ही गोष्ट लक्ष्यांत आण कीं, तुझा नवरा म्हातारा असल्यामुळें तुझ्या प्रीतीस तो योग्य नाहीं. सारांश, माझी इच्छा जर तूं तृप्त केलीस, तर तूं हजार मोहरा मागायाला आली आहेस त्या ठिकाणीं दोन हजार मी तुला देईन; इतकेंच नव्हे, तर मी पैगंबराची शपथ वाहून सांगतों कीं, जन्मभर मी तुझ्या अर्ध्या वचनांत राहीन.'

असा वाष्कळपणा करून तो हकीम, बोलल्याप्रमाणें खरोखरच

आपण त्या तरुण स्त्रीवर लंपट झालों आहों असें दाखविण्याकरितां तिच्या अगदीं जवळ गेला, आणि तिला आलिंगन देण्यास पुढें सरसावला! पण ती चटकन् मागें सरून धिक्कारयुक्त मुद्रेनें व स्वरानें त्यास म्हणाली, 'अरे उद्धट व निर्लज्ज मनुष्या! तुझ्या इच्छेप्रमाणें करण्यास मी राजी होईन असे तूं उगीच मनांत मांडे खाऊं नको! तूं पक्कें ध्यानांत ठेव कीं, तुझी अथवा साऱ्या मिसर देशाची—किंबहुना साऱ्या जगाची—संपत्ति जरी तूं मला देऊं लागलास, तरी हा देह अपवित्र करण्याचें काम कदापि माझ्या हातून होणार नाहीं! तुजकडे येणें आहे तेवढें आपलें मुकाट्यानें दे, व मला जाऊं दे; आणि जी कधीं मजकडून तृप्त होण्याचा संभव नाहीं अशी ही तुझी अमंगळ इच्छा पुरी करण्याच्या नादांत फुकट वेळ घालवूं नको!'

दानीष हा एरवीं चांगला शहाणासुर्ता माणूस होता. अरूया हिच्या तोंडचे शब्द ऐकिल्यावर, ती आपणास साध्य होत नाहीं हें त्याच्या सहज लक्ष्यांत आलें. मग लागलाच त्यानें आपला मोहरा बदलला, व वाघासारखा चवताळून जाऊन अत्यंत कठोरपणानें तिला म्हणाला, 'अगे निर्लज्ज, बाजारबसवे स्त्रिये! तूं मजकडे पैसे मागावयास आलीस याची तुला शरम कशी वाटली नाहीं? तुझा थेर्डा दादला केवळ आपल्या उधळेपणानें अन्नास मोताद झाला आहे. तर अशा महामूर्खाची मला कींव येईल व मी त्यास मदत करीन असें कधींही होणार नाहीं; आणि त्याच्या बापाचें देणें तर मी कांहीं एक लागत नाहीं!' असें बोलून तो त्या गरीब साध्वी स्त्रीस ताडणही करण्याच्या बेतांत आला होता. पण त्याला काय वाटलें असेल तें असो, तसें न करतां तो लागलाच उठून घराबाहेर चालता झाला.

अरूया ही रडत रडतच घरीं आली. पण दानीष यानें जो पाजीपणाचा प्रकार केला तो अशा स्थितींत नवऱ्यास सांगितला असतां त्याची प्रकृति बेताल होऊन न जाणों भलतेंच एखादें कांहीं

होईल असें समजून ती त्यास इतकेंच म्हणाली कीं, 'महाराज, दानीष हा तुमच्या इतर कुळांसारखाच बेइमानी आहे. तो म्हणतो कीं, "तुझ्या दादल्याचा एक छदामही मी लागत नाहीं !' हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून बनूस अत्यंत गहिंवर व संताप येऊन तो म्हणतो, 'काय ? दानीष यानेंही अशा विकट प्रसंगीं माझी उपेक्षा करावी इतका का तो नीच आहे ? तो काय म्हणतो कीं तुझ्या दादल्याचा मी एक छदामही लागत नाहीं ? किती तरी मात्रागमनी माणूस ! मीं त्याशीं व्यवहार केला त्या वेळेस तो मला इतका सच्चा माणूस दिसला कीं, मीं कारणपरत्वें आपलें सारें घरदार त्याच्या हवालीं करण्यास मागेंपुढें पाहिलें नसतें ! या अल्ला ! आतां दुनयेंत विश्वास तरीं कोणावर ठेवावा बरें ! या प्रसंगीं मी त्याचें पारिपत्य करूं काय ? हो, तें करणें मला अगदीं उचित दिसतें.' मग बायकोस म्हणतो, 'जा ग तूं आतांच्या आतां काजीकडे. तो दुष्टांस यमासारखा व अनाथांस बापासारखा आहे. त्याला या मादरचोदाची सर्व लबाडी समजावून सांग; म्हणजे माझी खात्री आहे कीं, तो न्याय करून माझे पैसे सव्याज त्या गुलामाकडून मला देववील !'

हें नवऱ्याचें बोलणें ऐकून अरूया ही काजीकडे गेली. तो त्या वेळीं कचेरींत कामकाज करीत बसलेला होता. कचेरीच्या जागेंत लोकांची गर्दी झालेली होती, सबब अरूया ही जरा दूर उभी राहिली. परंतु तिच्या स्वाभाविक मोहक गुणांच्या योगानें तिजकडे सहजच लोकांचें लक्ष्य गेलें. त्यांतून काजी हा स्वभावतःच विशेष स्त्रीलंपट असल्यामुळें अरूया हिला पाहतांच त्याच्या मनाची अगदीं चलबिचल होऊन गेली. त्यानें तिला आपल्याजवळ येण्याविषयीं खूण केली, व कचेरीच्या आंतल्या खोलींत तो तिला घेऊन गेला. तेथें त्यानें तिला एका कोचावर बसवून आपला बुरखा काढण्यास सांगितलें. तो तिनें काढतांच तिचें अनुपम स्वरूप पाहून एकदम तो दानीष याजप्रमाणेंच दिवाणा झाला ! तो प्रेमानें तिला

म्हणतो, ‘ अगे अमृतवल्ली ! स्वर्गींचे अप्सरे ! तूं कोणत्या कामाकरितां येथें आली आहेस तें कृपा करून मला सांग, व तुझी अशी खातरजमा असूं दे कीं, तुझें काम कसलेंही असलें तरी तें मी केल्यावांचून राहणार नाहीं ! ’

हें ऐकून **अरूया** हिनें, **दानीष** याजकडील आपल्या नवऱ्याच्या कर्जाची व त्यानें तिजशीं जो फाजीलपणा केला त्याची हकीकत सांगून त्यास विनंति केली कीं, तो आतां घेतलेली रक्कम अजीबात नाकबूल करतो. तर आपण न्याय करून ती त्यास देण्यास लावावें. **अरूया** हिच्या रूपास काजी अगोदरच भुलून गेलेला होता, व तिच्या तोंडचें मधुर व मर्यादशील भाषण ऐकून तर त्याची अगदीं गाळणच होऊन गेली ! तिला तो म्हणतो, ‘ अंः, यांत विशेष कांहींच नाहीं ! त्यानें तुमचें वाजवी देणें आहे तें दिलेंच पाहिजे; न देईल तर मी एकाचे दोन **दानीष** करून टाकीन ! ’ येवढ्या अवधींत काजी हा पराकाष्ठेचाच उल्लू झाला, व तो **अरूया** हीस अत्यंत उत्सुकतेनें म्हणतो, ‘ हे त्रिभुवनसुंदरी ! तुझ्याशीं मला आतां ज्यास्त बोलण्यास शक्ति नाहीं. तुझ्या पायांजवळ माझी येवढीच प्रार्थना आहे कीं, **दानीष** यास ज्या गोष्टीसंबंधानें तूं नकार केलास त्या गोष्टीची भिक्षा या दासास घाल; म्हणजे हा मी पहा आतांच उठून त्याजकडे जातों, व त्याजकडून चार हजार मोहरा आणून तुझ्या स्वाधीन करतों ! ’

काजीचाही **दानीष** याच्यासारखाच प्रकार पाहून **अरूया** हिला रडें कोसळलें. ती स्फुंदत स्फुंदत म्हणते, ‘ हाय हाय ! भगवंता ! जगांत सत्व कोठेंच का राहिलें नाहीं ? अपराध्यांस दंड व निरपराध्यांस शिक्षा करण्याचें काम ज्यांकडे तुझ्या सत्तेनें आलें आहे, त्यांनीं स्वतःच अशीं अघोर कृत्यें करण्यास प्रवृत्त व्हावें ना ? ’ काजीनें पुष्कळ प्रकारें तिची समजूत करून तिला रडें आवरण्यास सांगितलें. पण माझी इच्छा तृप्त झाल्यावांचून तुझें काम मजकडून

होणार नाहीं, अशी त्याची शेवटची अट ऐकून ती मोठ्या दुःखानें उठून आपल्या घराकडे चालती झाली.

अरूया ही परत घरीं गेली. तेव्हां बन्नू यानें तिच्या मुद्रेवरून ताडलें कीं, ही कांहीं सुवार्ता घेऊन आली नाहीं. तो तीस म्हणतो, 'प्रिये! माझ्या लक्ष्यांत आलें कीं, काजीनें तुझा अर्ज कबूल केला नाहीं. यावरून मला स्पष्ट दिसतें कीं, तो दानीश याचा स्नेही असावा.' ती म्हणते, 'हो, तुम्ही म्हणतां तेंच खरें. माझे सारे श्रम फुकट गेले. त्यानें माझ्या अर्जाकडे बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं. आतां आपला पैसा उगवण्याची मुळींच आशा नको! परमेश्वर काय आपली अवस्था करणार कोण जाणे?' बन्नू तिला म्हणतो, 'बरें, कांहीं चिंता नाहीं. तूं धीर सोडूं नको. आपण सुभेदाराकडे फिर्याद करूं. मीं त्यास आजपर्यंत पुष्कळ वेळां उधार माल दिलेला आहे. तेव्हां तें स्मरून तो तरी आपली दाद खचीत घेईल असें मला वाटतें.'

त्यावरून दुसरे दिवशीं अरूया ही सुभेदाराकडे गेली. आपल्याशीं मला कांहीं बोलावयाचें आहे असें तिनें त्यास म्हटल्यावरून तो तीस एकांतीं घेऊन गेला. त्यानें तिचें चांगल्या प्रकारें स्वागत केलें, व तिला तोंडावरचा बुरखा काढण्यास सांगितलें. असें केल्यापासून आपल्याला दोन वेळां काय अद्दल घडली हें अरूया हिच्या लक्ष्यांत येऊन तिनें, येवढ्या गोष्टीची माफी करा, असें त्यास म्हटलें. पण तो कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं त्यानें तीस इतकी कांहीं गळ घातली कीं, तिला बुरखा काढल्यावांचून गत्यंतरच राहिलें नाहीं!'

सुभेदार हा चांगला पोक्त व हुशार मनुष्य होता. पण स्त्री पाहिली कीं ज्यांचे डोळे फुटल्यावांचून रहावयाचेच नाहींत, अशापैकीं तो असल्यामुळें, अरूया हिचें स्वरूप पाहिल्याबरोबर हकीम व काजी यांच्यासारखीच त्याची स्थिति झाली हें सांगावयास नकोच! तो प्रेमाच्या आवेशांत येऊन म्हणतो, 'अहाहा! ही तारुण्यानें

कशी रसरसली आहे ! आणि सौंदर्याची तर खरोखर ही पुतळीच आहे ! अगे कमलनयने ! तूं कोण व येथें कशाकरितां आलीस तें मला लवकर सांग. ' ती उत्तर करते, ' महाराज; बन्नूशेट या नांवाच्या व्यापाऱ्याची मी बायको आहें. त्यांचा आपला अनेक वेळां व्यवहार झालेला आहे. तेव्हां त्यांस आपण ओळखीत असालच. ' सुभेदार म्हणतो, ' हो हो, त्याचा माझा फारच ऋणानुबंध आहे, व त्याच्या इतका मी जगांत कोणासही चहात नाहीं. तुजसारखी गुणवती व रूपवती स्त्री त्यास मिळाली आहे हें त्याचें फारच मोठें भाग्य होय ! असें भाग्य लाखांत एखाद्याचेंच आढळतें. ' अरूया म्हणते, ' त्यांना सांप्रत भाग्यवान् म्हणण्यापेक्षां दया करण्यास योग्य असें म्हटलें असतां विशेष शोभेल; कां कीं, आज मितीस परा-काष्ठेच्या संकटावस्थेंत ते आहेत. ' असें म्हणून तिनें नवऱ्याच्या स्थितीची सर्व कच्ची हकीकत सुभेदारास सांगून त्याजकडे येण्याच्या कारणाचाही खुलासा केला.

सुभेदारानें तिचा सर्व वांका ऐकून घेतल्यावर, दानीष याज-कडून तिच्या नवऱ्याचे पैसे काढून देण्याचें मोठ्या खुषीनें त्यानें वचन दिलें. पण दानीष व काजी यांच्याप्रमाणेंच त्याचीही तिज-विषयीं दुष्ट वासना होती हें मागें सांगितल्यावरून लक्ष्यांत येईलच. तो तिला म्हणाला, ' मी दानीष यास बोलावणें पाठवितों, व तो बऱ्या बोलानें तुझ्या नवऱ्याचे पैसे देईल तर ठीकच आहे, नाहीं-पेक्षां त्याचा समाचार घेणें मला कांहींच कठिण नाहीं ! पण मला हेंही तुला सांगितलें पाहिजे कीं, आमच्यासारखे लोक हे पारि-तोषिकावांचून कोणतेंही काम हातीं घ्यावयाचे नाहींत. म्हणून तुजकरितां मी जें काय करणार त्याचा मोबदला तूं मला अगोदर दिला पाहिजे. '

अरूया हिनें सुभेदाराच्या मनांतला आशय जाणून निराशेनें चटकन् आपल्या घराचा रस्ता धरिला; कां कीं, कसाही प्रसंग आला व कोणी कांहींही देऊं केलें तरी आपलें सत्त्व तिळमात्रही

ढळूं घावयाचें नाहीं, हा तिचा निश्चय केवळ वज्रलेप होऊन गेला होता. ती घरीं येऊन मोठ्या खेदानें नवऱ्यास म्हणते, 'अहो, जगांत आपला कोणीच काही वाली नाहीं ! आपली कोणालाही कींव येत नाहीं व आपल्याला हस्तें परहस्तेंही साहाय्य करण्यास कोणाला बुद्धि होत नाहीं !' हे बायकोच्या तोंडचे शब्द ऐकून मात्र वन्नूचा धीर अगदीं सुटला. त्यानें वैतागानें त्या लोकांस पुष्कळ शिव्या व शाप दिले, व मनुष्यजातीच्या दुष्टपणाची केवळ ही कमाल झाली, असें त्यास वाटून तो अत्यंत दुःखी झाला. हें पाहून अरूया त्यास म्हणते, 'अहो, हें काय ? अशानें आपल्या संकटाचा परिहार कधीं तरी होईल ? जगांत सुख व दुःख यांचें रहाटगाडगें सदोदित चालावयाचेंच आहे. तर त्याबद्दल व्यर्थ खेद करीत न बसतां मनाची शांतता ठेवून, आपले पैसे कोणत्या तऱ्हेनें उगवतील याबद्दलचा एखादा मार्ग शोधून काढणें हेंच सांप्रत आपल्याला उचित आहे. असा एक मार्ग माझ्या लक्ष्यांत आला आहे, व मला वाटतें, पैगंबरास आपली दया येऊन त्यानें स्वतःच माझ्या मनांत तो भरवून दिला आहे. तो कोणता हें तुम्ही मला विचारूं नका, सध्या तो तुम्हांस कळविणें मला वाजवी दिसत नाहीं. तथापि इतकें सांगण्यास हरकत नाहीं कीं, त्या मार्गाचें अवलंबन करण्याविषयीं तुम्हीं मला परवानगी दिल्यास त्या योगानें दानीप, काजी व सुभेदार या तिघांच्या दुर्वर्तनाबद्दल लोकांत चोहोंकडे गवगवा होऊन त्यांची अगदीं फटफजिती होईल व शेवटीं आपला मुख्य हेतुही साध्य होईल.' वन्नू म्हणतो, 'जा, तुला वाटेल तें कर. मजकडून तुला सदर परवानगी आहे.'

याप्रमाणें नवऱ्याची परवानगी होतांच अरूया ही घरून निघाली, व पेट्या, कपाटें वगैरे तयार करून विकणाऱ्या एका मनुष्याच्या दुकानीं गेली. त्या मनुष्यानें तिला सलाम करून म्हटलें, 'बाईसाहेब ! आपणांला काय पाहिजे ?' ती उत्तर करते, 'अरे बाबा, मला कांहीं जरूरीच्या कामाकरितां तीन मोठमोठ्या व बळकट अशा

पेट्या पाहिजेत.' त्यावरून त्यानें तिला तसल्या कित्येक पेट्या दाखविल्या. त्यांपैकीं तीन तिनें पसंत केल्या, व हमालांच्या डोक्यांवर त्या देऊन घरीं नेल्या. या प्रत्येक पेटींत एक एक मोठा माणूस बसेल इतक्या त्या चांगल्या अघळपघळ होत्या. नंतर अरूया हिनें चांगला पोषाख केला, व जो काय थोडाबहुत दागदागिना तिच्या जवळ होता तो सर्व तिनें अंगावर घातला; आणखी सुगंधी तेलें वगैरे अंगास लावून आपला मोहकपणा होईल तितका जास्त तिनें वाढविला.

अशा प्रकारें अरूया ही घरून निघाली. ती प्रथम दानीष याच्या घरीं गेली. तिनें त्याच्या सांगण्याची वाट न पहातां तोंड-वरचा बुरखा काढला, व बिजलीसारखी चमकत त्याजकडे पहात उभी राहिली;—सारांश, तो आपल्यावर अत्यंत मोहित होऊन जाईल अशी आपली बाह्यात्कारी कृति त्यास दाखविण्यांत तिनें कमाल केली ! ती हास्यवदन करून व किंचित् लाजल्यासारखें दाख-वून त्यास म्हणते, ' महाराज ! मी पूर्वी एकवार आपणांकडे आलें होतें; पण तशीच परत गेलें. आतां सर्व गोष्टींचा पोक्त विचार करून फिरून मी आपणांकडे आलें आहें. सांप्रत माझें असें म्हणणें आहे कीं, माझ्या यजमानांची तुमच्याकडे जी रकम येणें आहे ती जर तुम्ही देत असाल तर तुमच्या इच्छेप्रमाणें वर्तन करण्यास माझी कबुली आहे.' हे तिच्या तोंडचे शब्द ऐकून दानीष हा लाळ घोटूं लागला. तो तिला म्हणतो, ' सुंदरी ! तूं जरी पूर्वी माझ्या शब्दाचा अव्हेर केला आहेस, तरी मी एकवार जें तुला बोलून चुकलों आहें तें परत घेत नाहीं. तुजविषयीं माझ्या मनांत पहिल्या-प्रमाणेंच आदरबुद्धि व प्रेम आहे, व माझी अट तुला कबूल अस-ल्यास पूर्ववत् एकाच ठिकाणीं दोन हजार मोहरा तुला देण्यास मज-कडून तयारी आहे.' अरूया म्हणाली, ' फार चांगली गोष्ट. तुम्ही आज रात्रीं दहा वाजतां ऐवज बरोबर घेऊन माझ्या घरीं या. तुम्हीं दरवाजा ठोठावला कीं, माझी एक विश्वासू दासी आहे ती

तुम्हांस आंत घेईल, व माझ्या महालांत आणून सोडील. मग त्या ठिकाणीं आपण सारी रात्र एकमेकांच्या समागमांत आनंदानें घालवूं. वेळेवर येण्यास मात्र चुकूं नका हो! मी तुमची वाट पहात बसतें.'

अरूया हिचे हे शब्द ऐकून दानीष हा केवळ आनंदसागरांत पोहूं लागला; तो इतका कीं, आपण आहों कोठें व काय करीत आहों याचें त्याला भान राहिलें नाहीं! तो त्या हर्षातिशयांत तिला आलिंगन देण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें तिच्याजवळ गेला. पण तिनें त्याची मर्जी न जाऊं देतां मोठ्या चातुर्यानें ह्याही वेळेस तो प्रसंग टाळला. नंतर ती तेथून निघून, अशाच प्रकारें काजी-चाही समाचार घेण्याची तजवीज करण्याकरितां चालती झाली.

अरूया ही काजीकडे जाऊन त्यास म्हणाली, 'महाराज! मी पूर्वी आपल्याला भेटून तशीच निघून गेलें. त्या वेळेपासून माझ्या मनाला मोठी हुरहुर लागून राहिली आहे. आपण ज्या गोष्टीबद्दल मला म्हटलें, तिजविषयीं मीं फिरून फिरून आपल्या मनाशीं विचार केला. तेव्हां शेवटीं माझा असा निश्चय ठरला कीं, आपल्यासारख्या थोरांचा शब्द खालीं पाडून आपल्या कृपेस आंच-वावें हें कांहीं माझ्या स्थितीस योग्य नाहीं. तेव्हांपासून किती वेळां तरी माझ्या मनांत आलें कीं, आपणांसारख्या श्रीमान्, थोर व तरुण अशा राजबिंड्या पुरुषाच्या पायांची दासी मीं त्याच वेळेस होण्याचें कबूल केलें असतें तर आज अनुपम सुखांत मी असतें! सारांश, गत गोष्टीबद्दल मला पश्चाताप झाला आहे, व आपणां-सारख्याच्या कृपाछायेचा अव्हेर करण्याइतकी कांहीं सात्विकवृत्ति माझ्या ठायीं नाहीं हें प्रांजलपणें आपणांशीं कबूल करण्यासाठीं मी आलें आहें.'

अरूया हिचें हें मानभावी भाषण ऐकून हकिमाप्रमाणें काजीही जिभल्या चाटूं लागला. तो म्हणतो, 'हे सौंदर्यवल्ली! फार काय सांगूं? पण तुझी इच्छा असल्यास याच वेळेस तूं माझ्या जनानखान्यांतील सर्व स्त्रियांत मुख्यपद पावशील, व माझ्या सर्व-

त्याची धणीन होशील. आतां तुझ्याशीं ज्यास्त काय बोलावें हें मला सुचत नाहीं. म्हणून इतकेंच सांगतों कीं,. तूं मज़विषयीं कांहीं एक शंका मनांत न आणतां बेलाशक आपल्या त्या खोकड झालेल्या नवऱ्यास सोडून दे व मजपाशीं सुखानें रहा.' अरूया म्हणते, 'छे छे! महाराज! तसें कसें करतां येईल? त्यापासून माझ्या अब्रूस धक्का बसेल! मीं असें करण्याचें योजिलें आहे कीं, नवऱ्याचें घर न सोडतां आपल्याशीं गुप्त रीतीनें व्यवहार ठेवावा म्हणजे झालें.' काजी म्हणतो, 'तर मग तुझा माझा एकांत व्हावयाचा तो कोणत्या ठिकाणीं?' अरूया उत्तर करते, 'खुद्द माझ्याच येथें—आणि तीच जागा फार सोईची व निर्भय आहे. माझा दादला हा एकटाच अगदीं एकीकडच्या खोलींत पडतो. तो वृद्ध झाला असून त्याच्या शरीरधर्मांनींही त्यास सोडिलें आहे. यामुळें त्याच्यापासून आपल्याला काडीचाही उपद्रव होण्याची भीति नाहीं. मला वाटतें, आपण आज रात्रींच माझे येथें येण्याची कृपा कराल तर बरें होईल. आपण अकरा वाजतां माझ्या दरवाज्याशीं यावें. त्या वेळेस आपणांस आंत घेऊन येण्याची सर्व तजवीज मी ठेवितें. आपण नोकरचाकर कोणीही बरोबर आणूं नये; कां कीं, आपला माझा व्यवहार तिसऱ्यास कळला असतां त्यापासून माझी मोठी हानि होईल, हें आपल्याही सहज लक्ष्यांत येईल.'

अशा प्रकारें अरूया हिनें काजीस आपल्या घरीं अगदीं गुप्त रीतीनें येण्याच्या संबंधानें ज्या सूचना केल्या त्यांच्या योगानें असें झालें कीं, तिचें कपट तर त्याच्या लक्ष्यांत मुळींच आलें नाहीं; पण उलट, आपलें हें केवढें तरी भाग्य! असा त्याचा अधिकाधिक दृढ समज होत गेला; व शेवटीं आपल्या इच्छेस अरूया ही अनुकूल झाली असें समजून त्याबद्दल आपल्याला किती आनंद झाला हें त्यानें तिला परोपरी बोलून दाखविलें. नंतर, नेमल्या वेळेस मी तुझे घरीं खास येतों असें त्यानें तीस सांगितल्यावर त्याचा निरोप घेऊन ती निघून गेली.

याप्रमाणें आपल्यावर पापी नजर ठेवणाऱ्या त्या दोघां लुच्चांस अरूया हिनें जाळ्यांत अडकविण्याची व्यवस्था केली. आतां तिसरा सुभेदार राहिला. त्यालाही ठकविण्याचें तिला फारसें कठिण पडलें नाहीं. पहिल्या दोघांप्रमाणेंच त्याजपुढेंही तिनें अशा शिताफीनें साखर पसरली कीं, तिचा प्रत्येक शब्द त्यास खरा वाटून रात्रीं बारा वाजतां तिच्या घरीं एकटें येण्याचें त्यानें कबूल केलें.

इतका घाट जमून येऊन अरूया ही सुभेदाराच्या घरांतून बाहेर पडल्यावर अत्यंत प्रेमळ व निर्मळ भावानें मनांत म्हणाली, ‘ हे सर्व-साक्षी परमेश्वरा ! ज्या तुझ्या इच्छेवांचून झाडाचें पान देखील हालत नाहीं तो तूं, ज्या गोष्टीचा मीं उपक्रम केला आहे, तिचें मुख्य बीज जाणतच आहेस. तर हे सर्वशक्तिमान् प्रभो ! मज दीनावर दया करून व माझ्या सत्वावर नजर देऊन, मीं जें हें अचाट काम अंगावर घेतलें आहे तें निर्विघ्नपणें पार पाड. तसें न केलेंस तर माझी गति कशी होईल हें तुझें तूंच जाणत आहेस ! ’

याप्रमाणें परमेश्वराची प्रार्थना करून त्याचें साहाय्य मागितल्या-वर, अरूया हीस आपण योजिलेला बेत तडीस नेण्याविषयीं इतका हुरूप आला कीं, जणूं काय आपण करीत आहों तें त्या जगदा-त्म्याच्या गुप्त सल्लयानें व मसलतीनें करीत आहों, अशी तिला खात्री वाटूं लागली. मग तिनें बाजारांतून सर्व प्रकारची मेवा-मिठाई व फळफळावळ विकत आणिली. तिच्या घरीं एक म्हातारी दासी होती. ती अत्यंत प्रामाणिक असून तिजवर तिचा पूर्ण विश्वास होता. तिनें तीस आपला सर्व बेत कळविला, व तो शेवटास नेण्याच्या कामीं तिची मदत घेतली. त्या उभयतांनीं घरांतली एक चांगली प्रशस्त अशी खोली झाडून लोटून स्वच्छ केली, व तेथें एका मेजावर चिनी तबकांत ती मिठाई व फळफ-ळावळ सुरेख रीतीनें मांडून ठेविली. तसेंच दोन तीन कोचेंही त्यांनीं तेथें आणून ठेविलीं. सारांश, त्या तिघां सोद्यांची खोड मोड-ण्याविषयीं अरूया हीस इतका कांहीं चेव येऊन गेला होता कीं,

खरोखरच त्यांच्या इच्छेप्रमाणें करण्याचें तिच्या मनांत असतें तर त्या प्रसंगीं जितकी खटपट तिनें केली असती, त्याहीपेक्षां ज्यास्त खटपट या वेळीं या सोंगाचे बतावणीसाठीं तिनें केली !

सर्व तयारी झाल्यावर अरूया ही त्या तिघांची वाट पहात बसली. केव्हां केव्हां तिला वाटे कीं, त्यांच्या मनांत कांहीं अंदेशा येऊन ते कदाचित् येणार नाहींत. पण असल्या शंकेंत कांहीं अर्थ नाहीं अशी शेवटीं तिची खात्री झाली; कां कीं, ते तिघेही अतिशय उल्लू झालेले होते हें ती विसरली नव्हती. अखेरीस तिच्या इच्छेप्रमाणें घडून, दानीष हा ठरल्याप्रमाणें दहांच्या ठोक्याबरोबर तिच्या दरवाज्याशीं आला. त्यानें दरवाजा ठोंठावतांच पूर्वीं सांगितलेल्या त्या म्हाताऱ्या दासीनें तो उघडून दानीष याला संकेताच्या ठिकाणीं नेलें. तेथें अरूया ही त्याचें स्वागत करण्यास तयारच होती. तिनें किंचित् हास्यवदन करून त्यास म्हटलें; 'जरी हळू बोला हो, नाहीं तर माझा दादला नुकताच निजला आहे तो कदाचित् जागा होईल !'

अरूया हिचें तारुण्य, सौंदर्य व तेजस्विता हीं पाहून दानीष अगदीं वेडावून गेला. तो तिला म्हणतो, 'प्रिये ! सांप्रत मी इतका भांबावून गेलों आहें कीं, तुझें लावण्य व माझें भाग्य या दोहोंपैकीं मी कशाचें अधिक वर्णन करूं हें मला समजत नाहीं !' नंतर हजार हजार मोहरांचे दोन तोडे त्या मेजावर ठेवून तो तिला म्हणतो, 'तुला कबूल केल्याप्रमाणें हे पैसे मीं आणिले आहेत. पण वास्तविक सांगतों कीं, तुजपासून मला जें स्वर्गाचें सुख प्राप्त होणार आहे त्याच्या पासंगासही हे पुरावयाचे नाहींत !' अरूया हिनें किंचित् हास्यवदन करून त्याला कोचावर बसविलें. नंतर ती त्यास म्हणते, 'हकीमसाहेब, आतां आपण आपलें पागोटें व हा जामानिमा काढून ठेवा परता. येथें आपण कांहीं परक्याच्या घरीं आलां आहां असें समजूं नका. हा सारा बोजा काढून जरा स्वस्थ व्हा, म्हणजे आपल्याला बोलायालाचालायाला ठीक पडेल.' मग ती

आपल्या दासीस उद्देशून म्हणते, 'अगे, मला यांचे कपडे काढायाला मदत कर.' याप्रमाणें त्या दोघींनीं कमरेपासून डोक्यापर्यंत—म्हणजे पागोट्यासुद्धां—त्याच्या अंगावरील सारे कपडे काढून त्याला अर्धा दिगंबर केला! ते कपडे त्या म्हाताऱ्या दासीनें दुसरीकडे नेऊन ठेवल्यावर अरूया व दानीष हीं उपाहारास बसलीं. त्यांचा उपाहार चालला असतां अरूया हिच्या अत्यंत मोहक भाषणानें व मधून मधून मद्यपान चाललें होतें त्याच्या योगानें दानीष हा पक्का दिवाणा होऊन गेला. अशा स्थितींत कांहीं आवाज त्यांस ऐकायाला आला. तो ऐकतांच अरूया हिनें अतिशय घाबरून गेल्याचें मिष करून दासीस म्हटलें, 'कायगे! अशा अपरात्रीं ही गडबड कसली ऐकायाला येत आहे?' तेव्हां दासी ही दरवाज्यापर्यंत जाऊन परत आली व म्हणते, 'हाय हाय! बाईसाहेब! मोठा घात झाला! तुमचे बंधु केरो येथून आले असून तुमचे यजमानांनीं त्यांस अगोदरच दरवाजा उघडला, व ते दोघे इतक्यांत येथें येतील.' हें ऐकून अरूया ही आपल्याला पराकाष्ठेचें दुःख झाल्याचा बहाणा करून म्हणते, 'अरेरे! पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट पुढें आलें असतांही मनुष्यास त्याचा उपभोग मिळेपर्यंत मध्यंतरीं अनेक प्रकारचीं विघ्नें येतात असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं! शिवाय 'कधीं न घडे तें अवसेपुनवे घडे' अशी जी वडिलोपार्जित म्हण आहे तिचाही या वेळेस मला चांगला प्रत्यय आला. कसा तो पहा. पापकर्म करण्याचें साऱ्या जन्मांत हें पहिल्यांदांच माझ्या मनांत आलें. बरें, तसें होऊं नये, झालें. पण आणखी त्यांत हे माझे दोस्त येथें आले असतां त्यांची व माझी, उभयतांचीही देखतांदेखत फजिती होण्याची पाळी आली, ही आम्हां दोघांसही केवढी शरमेची गोष्ट आहे! अग बाई! आतां मी करूं तरी कसें? या प्रसंगीं माझे अब्रूचें संरक्षण होणें कठिण दिसतें!' हें ऐकून दासी मध्येंच बोलते, 'बाईसाहेब! तुम्ही या गोष्टीची येवढी चिंता करूं नका. मला इतक्यांत एक युक्ति सुचली

आहे. हें पहा, कालच तुमच्या यजमानांनीं बगदादेस कांहीं कापडाचे बस्ते भरून पाठविण्याकरितां तीन मोठमोठ्या पेटया आणून पलीकडच्या खोलींत ठेविल्या आहेत. त्या खोलीची किल्ली मजपाशीं आहे. तर आपण असें करूं कीं, दानीष साहेब यांस त्यांपैकीं एका पेटींत तूर्त लपवून ठेवूं म्हणजे झालें !'

दासीची ही युक्ति अरूया हिनें पसंत केली. तेव्हां बिचारा दानीष निरुपायास्तव त्यांपैकीं एका पेटींत शिरला. अरूया हिनें त्या पेटीस व आणखी खोलीच्या दारासही कुलूप लावून मोठ्यानें दानीष यास म्हटलें, 'प्रियकरा ! तुम्ही कांहीं घाबरूं नका. माझे यजमान व बंधु यांच्याशीं दोन शब्द बोलून मी लवकरच त्यांना दवडतें, व नंतर सारी रात्र आपण बेफिकीर आनंदांत घालवूं; व सांप्रत आलेल्या विघाताचा वचपा पुढील सुखांत काढून घेऊं !'

दानीष यास अरूया हिनें मोठ्या शिताफीनें जी ही गुळचट थाप दिली तिच्या योगानें त्याचें तोंड बंद होऊन भावी सुखाची आशा करीत तो स्वस्थ पेटीमध्यें बसून राहिला. अरूया हिचा कावा बिलकूल त्याच्या लक्ष्यांत न आल्यामुळें, आपण फाशांत पडलों असा संशयही त्यास आला नाहीं; आणि आपकाच्या नादीं लागून जे लोक मनोराज्यांत गर्क होऊन जातात त्यांच्याप्रमाणें हाही मनांतल्या मनांत पुढील सुखाची कोरडी इच्छा धरून मिटक्या मारीत बसला ! अरूया हिनें याप्रमाणें त्यास अडकवून टाकिल्यावर ती आपल्या खोलींत येऊन दासीस म्हणते, 'त्या तिघां लांडग्यांपैकीं एकास तर आपण जखडून टाकला. आतां बाकीच्या दोघांचें कसें काय होतें तें पाहूं या.' दासी म्हणते, 'त्याला कांहीं फारसा अवकाश नको. आतां घोडामैदान जवळच आहे. इतक्यांत अकरा वाजतील असें मला वाटतें. तेव्हां काजीसाहेबांची स्वारी बहुधा अर्ध्या अधिक वाटेवर आलीच असेल.' दासीचा तर्क अगदीं बरोबर ठरला. कारण थोडक्याच वेळानें काजीनें दरवाजा ठोठावला. दासीनें लागलीच जाऊन दरवाजा उघडला, व तुम्ही

कोण म्हणून त्यास विचारिलें. त्यानें, मी काजी आहें, असें हळूच उत्तर दिलें. तेव्हां दासी म्हणते, ‘ चला तर आंत, माझी धनीण तुमचीच मार्गप्रतीक्षा करीत बसली आहे. ’ हें ऐकून काजीस परम संतोष वाटला, व अरूया हिच्या दर्शनाची त्याला इतकी उतावळी झाली कीं, पायांखालीं त्याला वाट सुद्धां दिसेना !

अरूया हिच्या खोलींत आल्यावर काजी तिला म्हणतो, ‘ प्रियतमे ! शेवटीं तूं मला एकदांची भेटलीस ऑं ? अहाहा ! तूं मला वचन देऊन आलीस तेव्हांपासून या वेळेपर्यंत जो माझा काळ गेला तो मला केवळ दुस्मानाप्रमाणें भासला ! असो, पण शेवटीं माझ्या इच्छेप्रमाणें गोष्ट घडून येण्याचा योग आला हें पाहून, आतांपर्यंत झालेल्या भासाचा मला विसर पडला असून, मजप्रमाणें सुखी प्राणी साऱ्या दुनयेंत नसेल असें मला सांप्रत वाटत आहे ! ’ अरूया हिनें स्मितवदन करून त्यास कोचावर बसविलें; आणि म्हणते, ‘ महाराज ! आपण या ठिकाणीं येण्याची तसदी घेतली यावरून मज दीनावर आपली कृपा आहे हें सिद्ध झालें, व यामुळें मला जो कांहीं आनंद झाला आहे त्याचें मला शब्दांनीं वर्णन करितां येत नाहीं; कारण, खरें पुसाल तर या जन्मांत ज्यावर माझी अंतःकरणापासून प्रीति वसली असे पुरुष काय ते आपणच असून, आपलें माझें आज संभाषण झाल्या वेळेपासून या घटकेपर्यंत आपला मुखचंद्रमा केव्हां दृष्टीस पडेल म्हणून मी एकसारखी झुरत बसलें आहें, व या माझ्या विश्वासू दासीबरोबर सारा वेळ आपल्या संबंधाच्याच माझ्या गोष्टी चालल्या आहेत ! ’

अरूया हिचें हें भाषण ऐकून काजीचा आनंद त्रिभुवनांत माईना. तो अत्यंत प्रेमभरांत येऊन तिला म्हणतो, ‘ अगे त्रिभुवनसुंदरी ! तुझ्या या अतिशय मधुर व प्रीतियुक्त भाषणानें मला इतकें मोहित करून टाकिलें आहे कीं, आतां तुझ्याशीं काय बोलावें आणि काय नाहीं, हें मला सुचतच नाहीं ! ज्यास्त काय सांगूं ? पण मी पृथ्वीवर आहें कीं स्वर्गांत आहे याचें सुद्धां मला भान

नाहीं ! आतां तुझ्या चरणकमलांवर मस्तक ठेवून इतकेंच तुज-पाशीं मागतों कीं, यापुढें यत्किंचितूही विलंब न लावतां माझ्या मनकामना पूर्ण कर, म्हणजे माझ्या साऱ्या जन्माचें सार्थक्य झालें असें मी समजेन.' अरूया त्यास म्हणते, 'महाराज़! मजवर आपलें येवढें प्रेम बसलेलें पाहून माझा अंतरात्मा आनंदसागरांत पोहूं लागला आहे, व आपल्या उपकारांचा मोबदला आपणांस मिळून आपली मी केव्हां उतराई होईन असें मला झालें आहे ! खरें पुसाल तर मीं उपाहाराची तयारी केलेली होती, व उभयतांनीं फराळ करून मद्याचे दोन दोन प्याले झोंकावे व नंतर त्या रंगांत यथेच्छ मजा मारावी असें माझ्या मनांत होतें; परंतु आपली उतावळी पाहून मीं तो आपला सगळाच बेत बाजूस ठेविला आहे. हँ, जा तर आपण त्या पलीकडच्या थोरल्या कोचावर पोषाख उतरून ठेवा. तोंपर्यंत मी आपल्या दादल्याच्या खोलींत जाऊन त्याला चांगली झोंप लागली आहे कीं नाहीं तें पाहून येतें.'

आपला मनोरथ आतां पूर्ण होण्यास बिलकूल अडथळा किंवा अवधि राहिला नाहीं असें समजून अरूया हिच्या सांगण्याप्रमाणें काजीनें पोषाख उतरला, व तो मोठ्या उत्सुकतेनें तिची वाट पहात कोचावर पडून राहिला. इतक्यांत कांहीं खडबड त्याला ऐकायाला आली. त्याच क्षणीं अरूयाही परत त्याजकडे येऊन त्यास घाबऱ्या घाबऱ्या म्हणते, 'अहो महाराज ! केवढा अनर्थ झाला पहा ! आमच्या येथें एक दासी आहे, तिचें माझ्या नवऱ्याच्या हिताकडे फार लक्ष्य असल्यामुळें माझ्याशीं तिचा अर्थातूच मोठा बेबनाव आहे. तेव्हां त्या रंडकीनें, तुम्ही येथें आलां हें पाहून अदावतीनें ती गोष्ट त्याच्या कानावर घातली. हें प्रकरण येवढ्या-वरच राहिलें नाहीं. तर त्या म्हातारीनें माझी लबाडी माझ्या आई-बापांच्या समक्ष माझ्या पदरांत घालण्याकरितां इतक्याच्या इतक्यांत त्यांसही येथें बोलावून आणिलें आहे !' हें आपलें बोलणें काजीस खरें भासविण्याकरितां तिनें कंठ दाटून आल्याचें सोंग करून रडून

रडून इतकें घर घेतलें कीं, हा सर्व प्रकार खराखुराच घडला असावा, असें त्यास वाटलें !

काजी अरूया हीस म्हणतो, ' सुंदरी ! कांहीं चिंता नाहीं. तूं घाबरून आपल्या अंतःकरणास उगीच शीण करून घेऊं नको. मी येथला न्यायाधीश आहें हें तूं जाणतच आहेस. तर मी आपल्या अधिकाराच्या जोरावर तुझा दादला किंवा तुझे आईबाप यांस तुजविरुद्ध एक चकारशब्दही काढूं देणार नाहीं. मी त्यांस तंबी देऊन सांगेन कीं, गुलामांनो, या गोष्टीबद्दल कोठें हूं का चूं केलेंत तर तुमच्या जिव्हा कापून टाकीन. या माझ्या तंबीला तीं सर्व माणसें भिऊन या प्रकरणाचा बोभाटा बिलकूल करणार नाहींत, याविषयीं तूं खात्री ठेव. ' अरूया बोलते, ' तें सगळें खरें; माझा नवरा किंवा माझे आईबाप यांच्या इतराजीला मी फारशी भीत नाहीं; कां कीं, त्यांच्यापासून माझें संरक्षण करण्यास आपण समर्थ आहां. परंतु मी बदफैली बायको आहें ही गोष्ट त्या माणसांस कळली असतां तीं माझा अत्यंत तिरस्कार करतील; आणि महाराज, आपणच सांगा बरें, कीं जिच्या अब्रूस आजपर्यंत यत्किंचितूही कलंक लागला नाहीं, तिचा असा फजितवाडा झाला म्हणजे तिच्या दुःखास पारावार तरी राहील काय ? फार काय सांगूं ? पण महाराज, माझी अब्रू आजपर्यंत मलिन झाली नाहीं येवढेंच नव्हे, तर तशा संबंधानें मजबद्दल संशयही कोणीं घेतला नाहीं—किंबहुना मी म्हणजे केवळ सद्गुणाची पुतळीच आहें असें सर्व लोक मला मानतात. तर येवढा लौकिक एका क्षणांत घालविणें म्हणजे एकदम स्वर्गाहून नरकांत पडल्यासारखें होणार आहे ! ' असें म्हणून अरूया ही फिरून इतकी रडूं व दुःख करूं लागली कीं, तें पाहून काजीला मोठा गहिंवर आला. तो तिला म्हणतो, ' अगे परम थोर, चतुर, व सुंदर स्त्रिये ! तुझें हें दुःख पाहून माझ्या अंतःकरणास अतिशय वाईट वाटतें. पण तुला आतां दुःख करून तरी काय उपयोग ? दुर्दैवानें जें तुझ्या कपाळीं आलें आहे तें भोगल्या-

वांचून तर तुला गत्यंतर नाहीं. यासाठीं विवेकानें तूं आपल्या मनाचें सांत्वन करावेंस व आल्या प्रसंगास सादर व्हावेंस हेंच तुला योग्य आहे.'

तीं म्हातारी दासी त्या ठिकाणीं होतीच. ती, इतक्यांत आपल्याला कांहीं सुचल्यासारखें दाखवून मध्येंच बोलूं लागली. ती म्हणते, 'काजीसाहेब व बाईसाहेब, आपण उभयतांही या प्रसंगीं माझे वेडीचे दोन शब्द ऐका. हें पहा, मी जरी हलक्या दर्ज्याची आहें, तरी तुम्हांपेक्षां जगाचा अनुभव मला पुष्कळच अधिक असून, आजपर्यंत तुम्हांसारख्या अनेक अपकमाशुकांना संकटांतून सोडवून मीं सुखी केलें आहे. तुम्हांवर सांप्रत जो प्रसंग आला आहे त्यानें तुम्ही अगदीं गोंधळून गेलां असून त्यांतून कसें पार पडावें याबद्दल तुम्हांला कांहींच कल्पना सुचत नाहीं. पण मीं या सर्व प्रकरणाचा विचार करून, याचा शेवट गोड होईल अशी एक नामी युक्ति योजिली आहे. काजीसाहेब, आपण सांगाल तर आमचे शेटजी व बाईसाहेबांचे आईबाप या तिघांनाही मी बेमालूम रीतीनें फसवून वाटेस लावितें!' काजी मोठ्या उतावळीनें म्हणतो, 'तें कसें तें लवकर सांग पाहूं?' दासी म्हणते, 'पलीकडच्या खोलींत एक मोठी पेटी रिकामी आहे, तिच्यांत तुम्ही जाऊन बसा व तिला मीं बाहेरून कुलूप लावून टाकतें म्हणजे झालें! मग तीं माणसें येथें येऊन सारें घर त्यांनीं धुंडाळिलें तरी पेटींत कोणी आहे अशी शंका त्यांस येण्याचें कारण नाहीं!' काजी म्हणतो, 'वाहवा! युक्ति तर खरोखरच फार नामी आहे. मी मोठ्या खुषीनें पेटींत जाऊन बसतों.' हें ऐकून अरूया हिनेंही आपणास ही गोष्ट पसंत पडलीसें दर्शवून काजीस म्हटलें, 'महाराज, आतां निरुपायास्तव आपणांस थोडा वेळ हा त्रास सोसावा लागत आहे खरा; पण आपण कांहीं काळजी करूं नये. माझा दादला व आईबाप हीं येथें आल्यावर या ठिकाणीं कोणी नाहीं अशी त्यांची खात्री झाली म्हणजे तीं चालतीं होतील. मग एका क्षणाचाही विलंब न करतां

मी आपणांस पेटींतून बाहेर काढीन, व नंतर आपल्याला कलिकालाचीही भीति नाहीं !'

अशा प्रकारें काजीसाहेबांची स्वारी पेटींत अडकून पडल्यावर तिसरे सुभेदारसाहेब काय ते राहिले. त्यांची ही स्वारी संकेताप्रमाणें मध्यरात्रीस दरवाज्याशीं प्राप्त झाली. त्यानें दरवाज्यास थाप दिल्याबरोबर दासीनें लागलीच त्यास आंत घेतलें, व अरूया हिच्या खोलींत आणून सोडलें. अरूया हिनें त्याचा मोठा सत्कार केला. तेव्हां अर्थातूच त्याच्या तोंडाला पाणी सुटून तो तिच्याशीं पाचकळपणा करायाला लागला. शेवटीं होतां होतां तो तिच्याशीं अगदीं लगट करण्याच्या बेतांत आला असतां दासीस तिनें बाहेर जाण्याविषयीं खूण केली. तों क्षणाभरानें घराच्या दरवाज्यास कोणी मोठमोठे धक्के देत आहे असें त्यांस ऐकूं आलें. इतक्यांत ती दासी लागलीच परत खोलींत येऊन घाबऱ्या घाबऱ्या म्हणते, 'अहो बाईसाहेब ! हें काय अरिष्ट उद्भवलें पहा ! काजीसाहेब येथें आले असून तुमचे नोकर त्यांस तुमच्या यजमानांच्या खोलींत घेऊन जात आहेत!' हें ऐकून अरूया हिनें अत्यंत चिंताग्रस्त झाल्याचें मिष करून म्हटलें, 'अग बाई, तूं हळूच जा, आणि काजीसाहेब शेटजींशीं काय बोलतात तें मला येऊन सांग. ती म्हातारी फिरून बाहेर गेली असतां इकडे सुभेदार अरूया हीस म्हणतो, 'काय गे, अशा अपरात्रीस येथें काजीला येण्याचें कारण तरी काय असावें? मला वाटतें, तुझ्या दादल्यावर कांहीं कड्याळ तर आलें नाहीं ना?' अरूया म्हणते, 'तें काय असेल तें भगवान् जाणे. पण कांहीं असलें तरी काजीसाहेब अशा वेळेस येथें यावे ही गोष्ट खरोखरच मोठी चमत्कारिक दिसते!'

दासी बाहेर गेली होती, ती थोड्या वेळानें परत येऊन आपल्या धनिणीस म्हणते, 'बाईसाहेब, शेटजींच्या खोलींत काजीसाहेबांचें व त्यांचें संभाषण चाललेलें जें काय मीं ऐकिलें त्यावरून त्याचा मुद्दा माझ्या लक्ष्यांत आला. काजीसाहेब हे दानीष हकीम यास

बरोबर घेऊन आले असून त्याचे समक्ष तुम्हांस ते कांहीं सवाल करणार आहेत. दानीष हा शपथेवर असें सांगण्यास तयार आहे कीं, आपण शेटजींपासून ज्या हजार मोहरा उसनवार घेतल्या होत्या त्या त्यांच्या त्यांस कधींच देऊन टाकिल्या. हें सर्व प्रकरण वजीर-साहेब यांचे कानापर्यंत गेलें असून त्याचा आज रातीच्या रात्रीं पुरता छडा लावून उद्यां सकाळीं सर्व हकीकत खुलासेवार आपणास कळवावी म्हणून त्यांनीं काजीसाहेबांस हुकूम फर्माविला आहे.'

हें ऐकून अरूया हिनें डोळ्यांत आंसवें आणून सुभेदाराची प्रार्थना केली कीं, 'महाराज, आतां आपण मजवर दया करा. माझा दादला, काजी, व दानीष हे इतक्यांत येथें येतील, तर त्यांच्यी समक्ष मी गैरचालीची बायको आहें असें सिद्ध झालें असतां माझ्या साऱ्या जन्माचें मातेरें होणार आहे. निदान माझ्या दुष्कृत्यांत आपला संबंध आहे येवढें तरी लक्ष्यांत आणून माझी विनंति आपण मान्य करावी. आपणांस मी दुसरें तिसरें कांहीं सांगत नाहीं. सुमारें पाव घटकापर्यंत, पलीकडच्या खोलींत एक पेटी आहे तिच्यांत आपण बसावें, व मी तिला बाहेरून कुलूप लावून घेतें; म्हणजे या प्रकरणाचा बिलकूल बोभाटा होण्याचा संभव नाहीं.' सुभेदाराची या गोष्टीस जराशी नाखुषी दिसल्यावरून अरूया हिनें त्याचे पाय घट्ट धरून अशी कांहीं त्यास गळ घातली कीं, त्याला शेवटीं तिच्या म्हणण्याप्रमाणें करणें भाग पडलें.

अशा प्रकारें सुभेदारसाहेबही जखडून पडले, व अरूया हिनें ज्या इमारतीचा पाया रचला तिची चांगली उभारणी झाली. मग अरूया हिनें जाऊन आपल्या नवऱ्यास उठविलें, व येथपर्यंत झालेला सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. त्या तिघां लुच्चांना अशा प्रकारें पेचांत घातल्याबद्दल या उभयतांना साहजिकच परमानंद झाला. मग बनू हा आपल्या बायकोस म्हणतो, 'बरें, पण आतां या प्रकरणाचा शेवट कोणत्या तऱ्हेनें करण्याचें तूं योजिलें आहेस?' ती उत्तर करते, 'तें सर्व तुम्हांला उद्यां सकाळीं कळेल, पण येवढी

तुम्हांला खात्री असूं द्या कीं, त्या तिघांच्या सोदेगिरीबद्दल त्यांचा सूड घेईन म्हणून जें मीं म्हटलें होतें तो आपला शब्द खरा करून दाखविल्यावांचून मी राहणार नाहीं !'

डमास्कसचा राजा म्हणतो, 'नंतर अरूया ही प्रातःकाळीं, मी दरबारांत बसलों असतां तेथें आली. ती माझ्या दृष्टीस पडतांच तिचें तारुण्य व तेजस्विता यांच्या योगानें माझें तिजकडे सहजच लक्ष्य गेलें, व मीं आपल्या त्या वेळच्या मुख्य वजिरास म्हटलें, 'ती सुंदर स्त्री पाहिलीत कां ? तिला अलीकडे बोलवा. वजिरानें तिला खूण करतांच, मध्यें लोकांची दाटी होती तरी मोठ्या हुशारीनें ती माझ्या सिंहासनाजवळ आली, व मजपुढें तिनें साष्टांग नमस्कार घातला. मीं तिला म्हटलें, 'बाई, ऊठ, तुझा काय अर्ज असेल तो मला कळूं दे.' ती उठून उभी राहून म्हणते, 'महाराजाधिराज ! परमेश्वर आपणांस चिरायु करो ! आपला हुकूम होईल तर या चरणांपाशीं मी अशी कांहीं हकीकत सांगणार आहे कीं, ती ऐकून आपणांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटल.' मीं तिला म्हटलें, 'माझी परवानगी आहे. काय तुला बोलायाचें असेल तें बोल.'

त्यावरून अरूया हिनें पुढीलप्रमाणें आपला वांका मला सांगितला. ती बोलली, 'बन्नू या नांवाच्या व्यापाऱ्याची मी बायको आहें. तो आपल्याच प्रजेपैकीं एकजण असून आपल्या या राजधानींतच आमचें घर आहे. माझ्या नवऱ्यानें कांहीं वर्षांपूर्वी दानीष नांवाच्या हकिमास एक हजार मोहरा हातउसन्या दिल्या असून तो, त्या मीं घेतल्याच नाहींत असें आतां म्हणतो. त्या मोहरा मागण्याकरितां मी त्याजकडे गेलें असतां तो मला म्हणाला, 'तुझ्या नवऱ्याचें मी कांहींएक लागत नाहीं. पण तूं जर मला वश होशील तर तुला म्हणून मी दोन हजार मोहरा देईन. त्यावरून मी आपली दाद मागण्याकरितां काजीसाहेबांकडे गेलें. पण त्यांनींही दानीष याजप्रमाणेंच, माझें म्हणणें कबूल करशील तर तुझा न्याय मी करीन, नाहींपेक्षां चालती हो, म्हणून मला म्हटलें. काजी साहेबांचें

हें वर्तन पाहून तर मला फारच आश्चर्य वाटलें व मी संतापानें त्यांच्या येथून निघून सुभेदारसाहेबांकडे गेलें; कां कीं, माझ्या नवऱ्याची त्यांची ओळख आहे. सुभेदार साहेबांना मीं दीनवाणीनें ह्मटलें, 'महाराज, आपण तरी मध्यस्थी करून आमचे येवढे पैसे उगवून द्या.' पण त्यांचीही बुद्धि काजीसाहेबांप्रमाणेंच फिरून माझ्या पातिव्रत्याचा भंग करण्याविषयीं त्यांनीं आपली पराकाष्ठा केली.'

अरूया हिचें हें बोलणें मला खरें वाटलें नाहीं. मीं मनांत म्हटलें, दानीष, काजी व सुभेदार यांच्याशीं हिची कांहीं तरी कारणानें अदावत असावी व त्यामुळें तिनें हें त्याजवर निव्वळ बालंट रचलें असावें. तेव्हां मीं तिला म्हटलें, 'छे छे, मला वाटतें तूं हें त्या लोकांवर कांहीं तरी कुभांड रचून मजकडे आली आहेस. हाकिमासारखा माणूस पैसे उसनवार घेऊन नाकबूल जाईल, ही गोष्ट माझे कान घेत नाहींत. तसेंच, ज्यांवर मीं लोकांचा न्यायमन-सुबा व बंदोबस्त करण्याचें मोठें जबाबदारीचें काम सोंपविलें आहे, अशा योग्यतेचे लोक तुजपाशीं घाणेरडी गोष्ट काढण्याइतका फाजीलपणा करतील अशीही शंका मला येत नाहीं.' हें ऐकून अरूया म्हणते, 'महाराज, माझ्या बोलण्यावर आपला भरंवसा बसत नसेल तर, या कामीं अत्यंत विश्वासास्पद व थोर योग्यतेचे असे जे मीं साक्षीदार ठेविले आहेत, त्यांच्या शब्दावर तरी निदान आपण विश्वास ठेवाल अशी मी आशा करितें!' मीं म्हटलें, 'कोठें आहेत तुझे साक्षीदार?' तिनें उत्तर केलें, 'ते माझ्या घरीं आहेत. कृपा करून आपण त्यांना आतांच्या आतां बोलावून सवाल करावे. मला खचीत वाटतें कीं, ते जीं काय उत्तरें देतील त्यांत असत्याचा लेशही नाहीं अशी आपली खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं.'

हें ऐकतांच मीं बन्नूच्या घरीं तावडतोब शिपाई पाठविले. तेव्हां त्यानें, ते तिघे असामी ज्या पेटयांत होते त्या त्यांच्या हवालीं केल्या. शिपायांनीं त्या माझ्या समोर हजर करतांच अरूया म्हणाली, 'ह्या पेटयांत माझे साक्षीदार आहेत.' असें बोलून तिनें जवळच्या

किल्ल्या काढून त्या तिन्ही पेट्या उघडिल्या. त्यावरोबर हकीम, काजी व सुभेदार हे तिघेही अर्धे दिगंबर, तोंडें उतरून गेलेले, व अत्यंत लज्जायमान होऊन खालीं मान घातलेले असे तेथें पाहून मला व कचेरींतल्या सर्व लोकांस किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे! त्यांची ती भंबेरी उडालेली पाहून मला हंसल्यावांचून रहावेना; व मी हंसायाला लागल्यावरोबर सारी मंडळी पोट धरधरून हंसूं लागली. तथापि मीं लागलीच हंसणें बंद करून गांभीर्य धारण केलें, व त्या पेट्यांतल्या तिघां असामींची त्यांच्या अपराधास योग्य अशी चांगली बोडंती केली. अशा प्रकारें सर्व लोकांदेखत त्या तिघांची अप्रतिष्ठा करून त्यांपैकीं दानीप याजकडून मीं बन्न यास चार हजार मोहरा देवविल्या, आणि बाकीच्या आपल्या दोघां कामगारांस तत्काळ बडतर्फ करून टाकिलें. नंतर त्या पेट्या वगैरे जिकडच्या तिकडे नेण्यास सांगून मीं अरूया हीस ह्मटलें, 'अगे, पण ज्याच्या योगानें हे तिघे असामी तुला येवढे भुलून जाऊन यांनीं आपली नाचक्की करून घेतली, तें तुझें रूप कसें काय आहे हें मला एकवार नीट पाहिलें पाहिजे. याकरितां तूं आपल्या तोंडावरचा बुरखा काढ पाहूं?' तिनें लागलाच बुरखा काढला. तेव्हां भरकचेरींत अशा प्रकारें उभें रहाण्यानें जो तिला संकोच व लज्जा उत्पन्न झाली, त्यामुळें तिच्या नैसर्गिक अनुपम सौंदर्यास एके प्रकारें विशेषच शोभा आली. फार काय सांगूं? पण तशा प्रकारचें मोहक स्वरूप ह्या वेळेपर्यंत कांहीं माझ्या पहाण्यांत आलेलें नाहीं. असो. तिला पहातांच एकंदरीनें माझेंही देहभान ठिकाणावर न राहून मी भरदरबारांत बोलून गेलों कीं, 'ओ हो! ही तर देवांगनेलाही लाजविणारी आहे! हिला पाहून तो हकीम, काजी व सुभेदार हे आषकानें वेडे झाले यांत कांहीं विशेषसें नवल नाहीं!'

अरूया हिचें अनुपम लावण्य पाहून माझी एकट्याचीच अशी स्थिति झाली असें नाहीं. तर सारी सभा तटस्थ होऊन एकसारखी

तिजकडे पहात व तिच्या रूपाचें वर्णन करीत राहिलों. तिनें आपली हकीकत पूर्वी थोडक्यांत सांगितली होती, ती मीं तिला विस्तारें-करून सांगावयास आज्ञा केली. ती तिनें इतक्या दिलदारपणानें, चातुर्यानें व मोहक रीतीनें सांगितली कीं, ती ऐकून आम्ही अगदीं थक्क होऊन गेलों. ज्याच्या त्याच्या तोंडून तिची स्तुति ऐकूं येऊं लागली, व बन्नू याचा सांप्रत जरी पैशाअडक्यासंबंधानें पडता काळ आला आहे, तरी असलें लोकोत्तर स्त्रीरत्न त्यास प्राप्त झाल्यामुळें एकंदरीनें त्याच्यासारखा सुखी प्राणी जगतांत नाहीं, अशा प्रकारचे उद्गार सर्वतोमुखीं ऐकायाला येऊं लागले.

माझ्या हुकमाप्रमाणें अरूया हिनें आपली हकीकत सांगितल्या-वर तिची मीं दाद घेऊन तिला न्याय दिला याबद्दल तिनें माझे मोठे आभार मानिले, व ती आपल्या घरीं निघून गेली. पण काय सांगूं ? ती माझ्या नजरेसमोरून जरी नाहींशी झाली, तरी तिनें माझ्या अंतःकरणांत सततचें बिऱ्हाड घेतलें. सारांश, त्या वेळेपासून तिजखेरीज दुसरी कोणतीही गोष्ट मला सुचेनाशी झाली. अशा प्रकारें माझें मन अगदीं अस्थिर झालें. तेव्हां मीं तिच्या नवऱ्यास बोलावून आणाविलें व त्याला एकांतीं नेऊन पुढीलप्रमाणें त्याशीं बोललों :—मीं ह्मटलें, 'बन्नूमिय्या ! तुझ्या औदार्यामुळें सांप्रत तुजवर कोणता प्रसंग गुजरला आहे तें सर्व मला कळलें आहे. त्यामुळें तुझ्या मनाला केवढें औदासीन्य प्राप्त झालें आहे, तसेंच तुझ्या स्वतःच्या वाईट स्थितीमुळें तुला जें दुःख झालें आहे त्याही-पेक्षां, लोकांत तुला पहिल्याप्रमाणें डामडौलानें व सढळ हातानें वागतां येत नाहीं ही गोष्ट तर तुझ्या मनाला किती जाचत आहे, हेंही मी पूर्णपणें जाणत आहें. तर पहिल्याप्रमाणें तुला आपल्या स्नेह्यांसो-बत्यांबरोबर ख्यालीखुशाली करतां यावी, त्यांच्या गरजा भागवितां याव्या, व वाटेल तितका दानधर्म करितां यावा, अशा प्रकारची तुझी स्थिति पुनः करून सोडण्याचा मीं विचार केला आहे—तोही फिरून असा कीं, तूं कितीही उधळेपणा केलास तरी तुला पैशाची झगून कधींही वाण

पडूं नये. सारांश, तुला मीं गज्रांतलक्ष्मीपति करण्याचें मनांत आणिलें आहे. पण गड्या! येवढें होण्यास माझी एक गोष्ट तूं ऐकिली पाहिजेस. ती कोणती तर, तुझ्या बायकोवर माझें पराकाष्टेचें मन बसलें असून तिच्या प्राप्तीकरितां रात्रंदिवस माझा जीव तळमळत आहे. तेव्हां तूं तिचा घटस्फोट करून तिला माझ्या स्वाधीन कर. मित्रा, येवढें जर मजकरितां करशील तर तुला ह्मटल्याप्रमाणें मी धनाढ्य करून सोडीन, व त्याखेरीज माझ्या जनानखान्यांतील शेंकडों तरुण व रूपवती दासींपैकीं जी तुला पसंत पडेल ती मी तुला देईन. तूं पाहिजे तर याच वेळेस मजबरोबर चल व तुला कोणती हवी ती पारखून घे.'

बन्नू यानें उत्तर केलें, 'महाराज! आपण मला जी देणगी देतां म्हणून म्हणतां ती कितीही मोठी असली तरी तिच्या लालचीनें मी आपली बायको कदापि सोडणार नाहीं. सरकार! आपल्या संपत्तीची कथा काय? पण साऱ्या जगाच्या संपत्तीपेक्षांही माझी बायको मला प्रिय आहे! अहो, माझ्याच स्थितींत आपण आहां अशी कल्पना करा, म्हणजे आपल्या पैशाला भुलून मीं असलें कृत्य करण्यास तयार व्हावें हें मला उचित आहे कीं काय, याचा फाड आपणच आपल्या मनाशीं कराल. आतां इतकें जरी मी बोललों, व येवढी जरी माझी बायको मला प्यारी आहे, तरी मला सोडून अन्य ठिकाणीं तिला विशेष सौख्य होत असेल तर त्या प्रीत्यर्थ मी आपल्या स्वतःच्या सुखावर पाणी सोडण्यास तयार आहें! तर मी आतां वरीं जातों, व तिच्या सौंदर्याचा आपल्या मनावर काय परिणाम झाला आहे, व तिला मीं सोडलें असतां मला आपण काय काय देण्यास तयार आहां तें सर्व तिला कळवितों. मग कदाचित् अशा मोठ्या वैभवास भुलून तिनें जर मनापासून आपली काडी तोडून घेण्याची इच्छा दर्शविली, तर मी बिलकूल मागेंपुढें न पाहतां आपल्या स्वाधीन तिला आणून करीन. मग तिच्या वियोगानें माझें कांहीं झालें तरी त्याबद्दल मी काडीइतकी फिकीर करणार नाहीं!'

बन्नू हें सर्व इतकें प्रांजलपणें बोलला कीं, त्याच्या खरेपणा-विषयीं बिलकूल शंका मला आली नाहीं. त्यानें घरीं जाऊन हा सर्व वृत्तांत बायकोला सांगितला. आणि शेवटीं म्हणाला, 'प्रिये! याप्रमाणें ज्याअर्थी राजाचें मन तुजवर बसलें आहे, त्याअर्थी तुझ्या सुदैवानें तुजकडे चालत आलेलें वैभव व सुख यांचा तूं धिक्कार करूं नये असें मला वाटतें. तो वयानें तरुण व प्रेमळ असल्यामुळें मज मंदभाग्याच्या संगतीं असण्यापेक्षां त्याच्या सहवासांत तुला शतपट अधिक सौख्य, आनंद व समाधान होण्याचा खचीत संभव आहे. बन्नूच्या तोंडचे हे शब्द ऐकून अरूया हिला फार दुःख झालें व तिचें तोंड अगदीं उतरून गेलें. ती म्हणते, 'प्रियकरा! राजा मजवर आसक्त झाला आहे म्हणून मीं तुम्हांला सोडून त्याजकडे जावें ही गोष्ट तुमच्या तोंडून ऐकण्यांत मला सुख आहे असें तुम्हांला वाटतें काय? थोरवी व वैभव यांच्या योगानें माझें सत्व डळमळेल असें तुम्ही समजतां काय? असें असेल तर मला तुम्हीं अद्यापि पुरती ओळखलीच नाहीं असें मी म्हणतें! असो. शेवटीं एकवार हेंच सांगतें कीं, तुम्हांवर कसलेही प्रसंग आले तरी त्यांची विभागी होण्यांत जें मला सौख्य होईल त्यापुढें चक्रवर्ती राजाचें पट्टराणीपदही खरोखर मला अगदीं तुच्छ आहे!'

अरूया हिचें हें भाषण ऐकून बन्नू याचें अंतःकरण गारेगार होऊन गेलें. त्यानें अत्यंत प्रेमानें तिला आलिंगन देऊन म्हटलें, 'प्रिये! परम सुशीले! तुझ्या थोरवीचें वर्णन मी काय करूं? पण खरोखर मी अंतःकरणपूर्वक सांगतों कीं, मजपुढें ज्याला तूं तुच्छ मानतेस त्याच्याच समागमांत असण्यास तूं योग्य आहेस! हें पहा, मी म्हातारा झालों आहें व तूं भरज्वानींत आहेस, तेव्हां मज-पासून तुला सौख्य तें काय होणार आहे? परमेश्वरानें तुझी माझी गांठ घालून दिल्यापासून मजकडून तुला सुखाचा लाभ फारच थोडा झाला असेल. तूं मात्र आपल्या सद्गुणांच्या योगानें मला धन्य करून सोडलेंस. तात्पर्य, मी स्वतः होऊन तुला सोडचिठी

देतों, तर तूं माझें कसें होईल याबद्दल कांहींएक मनांत आणूं नको, व अशा अपूर्व सौख्यलाभास पराङ्मुख होऊं नको !'

बन्नू हा इतकें बोलला तरी त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उलटें असें होऊं लागलें कीं, तो जितका जितका तिचें मन वळविण्याचा प्रयत्न करी, तितके तितके ज्यास्त आडफांटे ती त्याला आणी. शेवटीं ह्या झगड्यामध्यें सत्त्वशीलतेचाच जय होऊन बन्नू आपल्या बायकोस म्हणतो, 'प्रिये ! कांहीं चिंता नाहीं. तूं आपलें अंतःकरण जें एकवार मला वाहिलेंस त्यांतच ज्याअर्थी तुझ्या सर्व सुखाची मर्यादा आहे, त्याअर्थी तुझ्या इच्छेविरुद्ध कोणतीही गोष्ट तुला याउपर करण्यास मी सांगत नाहीं. पण राजाला मी आतां जाऊन सांगूं काय ? तो माझी मार्गप्रतीक्षा करून राहिला आहे, व आपल्या मनाप्रमाणें गोष्ट घडून येईल असें त्यास वाटत आहे. तेव्हां मीं त्याजकडे जाऊन नकार सांगितला असतां त्याची आपणांवर इतराजी होईल त्याचें कसें ? तूं विचार कर कीं, तो आपला राजा आहे. त्याची सत्ता अमर्यादित आहे. कदाचित् तो जुलमानेंही तुला मजपासून घेऊन जाईल. त्याजपुढें मज पामराचा टिकाव कसा लागणार ?'

अरूया उत्तर करते, 'हें आपणांवर महत्संकट आलें आहे हें तर स्पष्टच आहे. पण तें टाळणें केवळ अशक्य आहे असें नाहीं. माझ्या बुद्धीला असें वाटतें कीं, आतां तुह्मी राजाकडे मुळीं जाऊंच नये; कां कीं, गेलां तर येऊन जाऊन त्याला हेंच सांगणार कीं नाहीं, कीं माझी बायको आहे त्या गरिबीच्या स्थितींतच रहाण्यास खुष असून तुह्मी तिला ज्या थोर पदास चढवूं इच्छितां त्याची तिला गरज नाहीं. तर असें त्याला मुद्दाम जाऊन सांगून त्याच्या कोपाग्नीच्या तडाक्यांत सांपडण्यापेक्षां, आपली बरोबर घेतां येण्यासारखी चीजवस्त असेल ती घेऊन एकदम हें डमास्कस शहर सोडून आपण चालतें व्हावें हें बरें. आपला वाली परमेश्वर आहे. तो आपली उपेक्षा करणार नाहीं.'

बन्नू यास बायकोचा हा सल्ला ठीक वाटून त्यानें त्याप्रमाणें करण्याची ताबडतोब तयारी केली. तीं दोघें त्याच दिवशीं तेथून निघालीं, व त्यांनीं केरो शहराचा मार्ग धरिला. हें त्यांचें गुप्त कृत्य दुसरे दिवशीं सकाळीं त्यांच्या पूर्वी सांगितलेल्या ह्मातान्या दासी-कडून मला कळलें. ही दासी त्यांच्या फार विश्वासांतली होती. तिला तीं बरोबर नेत होतीं, पण ती जाण्यास खूष नव्हती. बन्नू हा अजून कां आला नाहीं, म्हणून त्याच्या शोधासाठीं मीं आपला एक विश्वासू मनुष्य त्याचे येथें पाठविला असतां त्या दासीला तो मजकडे घेऊन आला, व अशा रीतीनें तिजकडून मला ही बातमी कळली. माझे मनोविकार माझ्या स्वाधीन नसते, व मीं आपली इच्छा तृप्त करण्याचा हेकाच धरिला असता, तर अरूया हिनें पोबारा करण्याची येवढी शिताफी केली असतांही तिला मीं तेव्हांच पकडून आणून आपल्या जनानखान्यांत ठेवून दिलें असतें ! पण असें करणें अन्यायाचें असून, अशा प्रकारें जबरदस्तीनें एखाद्या माणसाच्या इच्छेविरुद्ध त्याला कांहीं गोष्ट करायाला लावणें हें मला अगदीं आवडत नसल्यामुळें मीं पुढें त्या बाबतींत कांहीं एक केलें नाहीं.

सारांश, या कारणास्तव मीं तिच्या इच्छेप्रमाणें तिला निघून जाण्यास बिलकूल प्रतिबंध न करतां आपल्या दुष्ट मनोविकारांसच आळा घालण्याचा यत्न चालविला. पण आश्चर्याची गोष्ट किती विचित्र आहे पहा ! त्याच्या शरसंधानांतून सुटून जाण्याचा आव जो कोणी घालतो तो दुःखच पावतो ! अरूया हिजविषयींचे विचार मी आपल्या मनांतून नाहींतसे करण्याविषयीं आजपर्यंत हरप्रयत्न केले. पण माझ्या अंतःकरणांत तिनें जें बिऱ्हाड घेतलें तें अगदीं कायमचें होऊन बसलें आहे ! तिचें सौंदर्य व सद्गुण यांची वारंवार मला आठवण होऊन, आज वीस वर्षें मला माझ्या जनानखान्यां-तील सर्व स्त्रिया तिजपुढें तुच्छ भासत आहेत. त्या स्त्रियांच्या योगानें मला अगदींच समाधान होत नाहीं असें नाहीं. पण तें तितक्याच

वेळापुरतें असतें. पुढें त्याला वाढ लागून त्याचें दढीकरण मुळींच होत नाहीं !

---

याप्रमाणें डमास्कसच्या राजानें आपली गोष्ट संपविली. तेव्हां अतल्मुल्क हा त्यास विचारतो, ‘ बरें, पुढें अरूया हिचें काय झालें हें आपणांस माहीत आहे काय ? ’ त्यानें उत्तर केलें, ‘ ती डमास्कस येथून गेल्यापासून तिची कांहीं एक वार्ता मला समजली नाहीं. ’ सैफउल्मुल्क हंसून म्हणतो, ‘ तर मग एकंदरीनें आपण तिघेही मोठे विचित्र स्वभावाचे आहों खरे. कसे तें पहा. महाराजांचें मन एका सामान्य वृद्ध मनुष्याच्या स्त्रीवर बसलें; पण त्यांच्यापेक्षां तोच तिला प्रिय वाटला असतांही आज वीस वर्षेंपर्यंत व्यर्थ तिचा एकसारखा ध्यास ते घेऊन बसले आहेत. माझीही गोष्ट अशीच. मी सुलेमान राजाच्या वेळच्या एका स्त्रियेचें वेड घेऊन झुरत राहिलों आहें, आणि वजीर साहेबांचा प्रकारही पुष्कळ अंशीं असाच आहे.’ तो मग अंमळ सांवरून घेऊन म्हणतो, ‘ पण राजकन्या झालिका हिचा त्यांस अगदींच विसर पडणें गैरवाजवी होईल; कां कीं, तिचे त्यांजवर महदुपकार झालेले आहेत. ’

सैफउल्मुल्क याचें हें बोलणें ऐकून राजास फार हंसें आलें. इतक्यांत, तिकडून कित्येक उंट व घोडे येत असून ते एका कुरणाकडे चालले आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यावरून राजा आपल्या वजिरास व मित्रास म्हणतो, ‘ हें खटलें काय आहे तें पाहूं या बरें ? ’ त्यावरून हे तिघे घोड्यांवर बसून त्यांच्या मागोमाग गेले. तों तें सर्व खटलें कुरणांत उतरलेलें त्यांच्या नजरेस पडलें. ते अगदीं जवळ जाऊन पहातात तों तेथें मोठमोठे श्रीमंती थाटाचे कित्येक तंबू ठोकलेले त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांपैकीं एक तंबू फारच छानदार किनखापानें मढविलेला होता. त्या तंबूत एक मोठा उंच, भव्य, व बहुमोल पोषाख केलेला मनुष्य लोडाशीं टेंकून बसलेला होता. त्याजपुढें पक्वान्नांनीं भरलेलीं सोन्याचीं ताटें मांडलेलीं होतीं, व जवळच एका मेजावर कित्येक चमत्कारिक तऱ्हेचीं

सोन्यारुप्याचीं भांडीं ठेवलेलीं होतीं. तो मनुष्य पन्नाशींच्या जवळ जवळ आलेला होता. तो एकटाच भोजन करीत असून, पंचवीस तीस मोठमोठे कामगार त्याची बरदास्त राखीत होते, व तंबूच्या दाराशीं दोन हत्यारबंद गुलाम पहारा करीत होते.

राजा व त्याचे दोघे सोबती या तिघांची व त्या मनुष्याची एकदमच नजरानजर झाली. तेव्हां त्यानें त्यांची पूसतपास करण्याकरितां आपल्या एका कामगारास तंबूच्या बाहेर पाठविलें. त्या कामगारानें, तुम्ही कोण व कोठें चाललां आहां असें त्यांस विचारिलें. तेव्हां बद्रुद्दीन राजा म्हणतो, 'साहेब, आम्ही तिघे जवाहिरे आहों. आम्ही अस्राखानहून येथें आलों असून बगदादेस जाण्याचा आमचा विचार आहे. आम्हीं आपलें नांवगांव तुम्हांस सांगितलें, तसेंच तुम्हीं आपल्या धनीसाहेबांचेंही कृपा करून आम्हांस सांगाल तर मेहरबानी होईल. आम्हांस वाटतें कीं, तुमचे धनीसाहेब मोठे कुलीन व थोर राजपुरुष असून ते शौकाखातर प्रवास करीत आहेत.' त्या कामगारानें उत्तर केलें, 'नाहीं महाराज. तसें कांहीं नाहीं. आमचे धनीसाहेब एखाद्या राजाच्या किंवा मोठ्या सरदाराच्या कुळांत उत्पन्न झालेले नाहींत. तथापि ते येवढे थोर व उदार आहेत कीं, कित्येक राजपुरुषही त्यांजपुढें फिके पडतील. त्यांचें नांव अबुलफौरीज साहेब असें असून, त्यांनीं मोठमोठ्या सफरी केल्या असल्याकारणानें त्यांना 'बडे मुशाफर' असें नांव पडलें आहे. ते बसरा येथचे राहणारे असून त्या शहरांत त्यांनीं राजवाड्यासारखा मोठा भव्य व सुशोभित वाडा आपल्याकरितां बांधलेला आहे. त्यांजकडे जे कोणी येतात त्यांचा ते फार चांगला आदरसत्कार करितात, व प्रत्येकाला कांहीं तरी बक्षीस किंवा नजराणा दिल्यावांचून जाऊं देत नाहींत. त्यांच्या येथें बहुधां दररोज बसरा येथील बडे लोकांकरितां मेजवानी किंवा दुसरा कांहीं ख्यालीखुशालीचा प्रकार करण्यांत येत असतो, आणि बसऱ्याचे राजेसाहेबांस तर यांच्याशीं संभाषण करण्याची इतकी आवड आहे कीं,

यांच्या साहसकृत्यांची हकीकत ऐकण्याकरितां ते यांस नेहमीं बोलावून नेत असतात.' हें ऐकून बद्रुद्दीन राजा म्हणतो, 'तर मग यांची हकीकत एकंदरीनें फारच मजेची असली पाहिजे.' तो कामगार म्हणतो, 'मजेची म्हणजे काय विचारितां? असल्या विचित्र गोष्टी फारच क्वचित् तुमच्या ऐकण्यांत आल्या असतील. यांनीं हिंदीमहासागराच्या अनेक सफरी केल्या असून यांना त्यांतील बहुतेक सर्व बेटांची माहिती झालेली आहे. यामुळें तिकडच्या नवल वाटण्यासारख्या शेंकडों गोष्टी सांगून बसल्याच्या वडे लोकांस व राजेसाहेबांस रंजविणें हें यांच्या नित्य पाठांतलें झालें आहे.'

इतकें बोलून तो कामगार परत आपल्या धन्याकडे गेला, व हे गृहस्थ व्यापारी आहेत असें त्यानें त्यास सांगितलें. तें ऐकतांच तो उठून आदरपूर्वक त्यांना आंत घेऊन येण्याकरितां तंबूच्या बाहेर गेला. उभयपक्षांचे फार फार सलाम झाल्यावर अबुलफौरीज यानें या तिघां जणांस, तंबूंत येऊन आपल्याबरोबर भोजन करण्याविषयीं आग्रहपूर्वक विनंति केली. त्यांनीं त्याच्या विनंतीस मान देऊन त्याप्रमाणें केलें. सर्वांचें भोजन झाल्यावर अबुलफौरीज याच्या नोकरांनीं हिरे माणकें जडविलेल्या सोन्याच्या पेल्यांत उत्तम प्रकारचें मद्य आणिलें. तें त्यांनीं यथेच्छ प्राशन केलें.

हा प्रकार चालला असतां अबुलफौरीज याचें समयोचित व रंगेल भाषण ऐकून दमास्कसचा राजा, त्याचा वजीर व मित्र हे फारच खूष झाले. राजास, आपल्याला अशा प्रकारच्या गुलहौशी मनुष्याच्या सहवासाचा लाभ घडल्याबद्दल परमानंद झाला, व आपण सर्वजण मिळून बरोबरच मार्गाक्रमण करूं असें त्यानें अबुलफौरीज यास म्हटलें. अबुलफौरीज यानें मोठ्या आनंदानें त्यास आपला रुकार दिला, व नंतर आणखी त्यांचें संभाषण चाललें. इकडे अबुलफौरीज याच्या नोकरांनीं उंटावर सामान भरून, हे बसले होते तो शिवाय करून बाकीच्या सर्व तंबूंची बांधाबांधी केली. इतकें झाल्याबरोबर अबुलफौरीज हा उठून एका घोड्यावर बसला, व हे

तिघे वेषधारी व्यापारी आणि आपला लवाजमा यांसह तो मार्ग क्रमूं लागला. अबुलफौरीज याच्या बरोबर सुमारें दोनशें हत्यारबंद लोक असल्यामुळें त्यांना चोराचिलटांची धास्ती मुळींच नव्हती. सबब ते हलक्या हलक्या मजला करीत मजेनें चालले.

हे तिघेजण अबुलफौरीज याच्या गोष्टी अतिशय चित्त देऊन ऐकत, यामुळें यांचें व त्याचें फार सख्य जमून आलें. यांची जिज्ञासा पाहून तो बोलतांना मोठा रंगांत येई. पुढें आपल्या प्रवासाच्या हकीकती त्यांस विस्तारेंकरून सांगण्यास त्यानें आरंभ केला. तो म्हणाला, 'माझ्या वयाच्या लोकांपैकीं फारच थोडक्यांनीं माझ्याइतका प्रवास केला असेल. हिंदीमहासागराची मला इतकी माहिती आहे कीं, तितकी खुद्द माझ्या देशाचीही मला नाहीं. मीं जे चमत्कार पाहिले आहेत ते इतके विलक्षण आहेत कीं, ते लिहून ठेवण्याच्या भरीस मी मुळींच पडत नाहीं; कां कीं, त्या सर्व निव्वळ खोटया गोष्टी आहेत असें लोकांस भासण्याचा संभव आहे.!'

हें ऐकून तर या तिघांजणांस अबुलफौरीज याच्या गोष्टी ऐकण्याविषयीं फारच उत्कंठा लागली, व त्याप्रमाणें त्यांनीं त्यास बोलूनही दाखविलें. अबुलफौरीज त्यांस म्हणतो, 'गृहस्थहो ! माझ्या गोष्टी ऐकण्याविषयीं तुम्ही येवढे जर अतुर आहां, तर मजकडून कांहीं हरकत नाहीं. पण तुम्हांला त्यांतला पुष्कळ भाग खरा वाटणार नाहीं हें मी अगोदर सांगून ठेवितों बरें ! ' असें म्हणून त्यानें पुढीलप्रमाणें आपली हकीकत सांगण्यास आरंभ केला:—

---

## अबुलफौरीज नामक महान् दर्यावर्दी याच्या सफरींची हकीकत.

### [ सफर पहिली. ]

अबुलफौरीज म्हणतो,—मी बसरा येथील एका व्यापारी जहाजाच्या कप्तानाचा मुलगा आहें. त्या जहाजाचा मालकही माझा

बापच होता. त्यानें हिंदीमहासागरांत अनेक सफरी केल्या, व मला समजूं लागलें नव्हतें तेव्हांपासूनच तो प्रत्येक वेळीं मला आपल्याबरोबर नेऊं लागला. यामुळें, मी वीस वर्षांचा झालों तोंच त्या अफाट महासागरांतील बहुतेक बेटांची मला माहिती झाली. माझ्या बापास व्यापारांत चांगलें यश येऊन तो थोडक्याच वर्षांत बसऱ्यांतील अत्यंत श्रीमान् गृहस्थांत मोडूं लागला.

एके दिवशीं बाप मला म्हणाला, 'मुला, सिंहलद्वीपांत माझा एक अडत्या आहे. त्याच्या खात्याच्या हिशोबाची भानगड पडली असल्यामुळें तो रुजू करून पुरा करावयाचा आहे. त्याकरितां मीं तुला तेथें पाठविण्याचा विचार केला आहे.' मी बापास सोडून अद्याप एकटा कोठेंही गेलों नव्हतों. सबब प्रथम ही गोष्ट माझ्या जिवावर आली. परंतु तें सुंदर द्वीप पहाण्याची मला फार इच्छा झाल्यामुळें शेवटीं मीं ती गोष्ट आनंदानें कबूल केली. त्या बेटांत पूर्वीं मी बापाबरोबर गेलों होतों खरा, पण त्या वेळीं मी लहान असल्यामुळें मला तेथील मजा पाहण्यास सांपडली नव्हती. असो; नंतर थोडक्याच दिवसांनीं मीं निघण्याची सर्व तयारी केली, आणि सुरतेवरून सिंहलद्वीपास जात असलेल्या एका व्यापारी जहाजांत बसून निघालों.

आम्ही बसऱ्याच्या आखातांतून जे निघालों ते एकदम आर्मझ येथें मुक्कामास गेलों. तेथें थोडे दिवस राहिल्यावर आम्ही इराणी आखातांतून पूर्वेचे बाजूनें सुरतेचा रोंख धरून निघालों, व त्या शहरीं नियमित वेळांत सुरक्षित जाऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं जो माल उतरावयाचा होता तो उतरल्यावर आम्ही सिंहलद्वीपास चाललों. तेथेंही जाईपर्यंत आम्हांस सुदैवेंकरून कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा अडथळा झाला नाहीं. त्या द्वीपाची राजधानी जें शिलंदिव शहर तेथें जातांच मीं प्रथम माझ्या बापाचा अडत्या हबीब याचा ठावठिकाण तेथील लोकांस विचारिला. हबीब हा मोठा धनाढ्य व प्रख्यात व्यापारी असून त्याची साख मोठी होती,

यामुळें त्याच्या घराचा वगैरे पत्ता लागण्यास मला मुळींच उशीर लागला नाहीं. हबीब यानें माझा इतका चांगल्या प्रकारें आदर-सत्कार केला कीं, माझ्या बापाच्या उत्तम स्नेह्यांत मीं त्याची गणना केली. प्रथम उभयतांचे सलाम झाल्याबरोबरच त्यानें मला म्हटलें कीं, 'हें घर आपलें आहे, येथेंच तुम्हीं राहिलें पाहिजे.' असें त्यानें म्हटल्यावर मलाही त्यास अर्थात् नकार करतां येईना.

हबीब हा कामाकाजांत फार हुशार व चोख असल्यामुळें आमचा फार दिवसांचा हिशेब होता तरी तो थोडक्याच वेळांत आटपून गेला. मधून मधून मी, त्या शहरांत जीं दर्शनीय स्थळें होतीं तीं पाहण्यास जात असें. तितक्या वेळांत मीं तेथील लोकांचे कायदेकानू, रीतीरिवाज, धंदे व राज्यरीति यांची माहिती करून घेतली. सारांश, सुमारें महिन्या दीड महिन्यांतच तेथलें माझें सर्व कामकाज व हिंडणेंफिरणें संपून परत जाण्याची माझी तयारी झाली; व त्याच संधीस सुरतेचें एक व्यापारी जहाज, कांहीं माल तेथें आणून तेथला परत घेऊन जाण्याकरितां आलें होतें, त्यांत बसून निघण्याचा मीं निश्चय केला.

मी निघणार त्याच्या आदले दिवशीं अशी गोष्ट घडली कीं, मध्यान्हाचे सुमारास मी बाहेरून हबीब याचे घराकडे परत येत असतां रस्त्यानें मला एक स्त्री आढळली. ती तरुण व ठाणमाणानें मोठी सुबक असून तिचा पोषाख फार उंची होता. ती बाजारांतून कांहीं जिन्नस विकत आणण्याकरितां गेलेली होती, व ते जिन्नस घेऊन तिचा गुलाम तिच्या मागून चालला होता. तिनें तोंडावरून बुरखा घेतला होता, तरी फक्त तिची चालण्याची ढब व शरिराची ठेवण पाहूनच तिच्या सौंदर्याची मीं कल्पना केली. मी तिजकडे पहात उभा राहिलों, तों अधिकाधिकच माझें लक्ष्य तिच्याकडें वेधून मी त्या तल्लीनावस्थेंत बोलून गेलों कीं, 'ओ हो! काय मापुक प्राणी आहे! ही खचीत येथल्या राजाची प्रियकरीण असावी.' हे माझ्या तोंडचे शब्द ऐकून त्या स्त्रीला मोठें नवल वाटलें, व

ती मजकडे लक्ष्यपूर्वक पहात थोडा वेळ उभी राहिली. नंतर, मीं केलेल्या ह्या सलगीबद्दल आपल्याला आनंद झाला कीं वाईट वाटलें हें शब्दांनीं अगर खुणांनीं कांहीं एक न दर्शवितां ती तशीच पुढें चालती झाली. इकडे माझी स्थिति अशी झाली कीं, मीं जें हें कांहीं अंशीं अविचाराचें काम केलें त्याबद्दल माझें मन मला खाऊं लागलें, व आजपर्यंत जे मनोविकार माझ्याठायीं उत्पन्न झाले नव्हते, ते त्या स्त्रीला पाहिल्यापासून एकदम माझ्या अंतःकरणांत उद्भवून, तिला आपला राग आला असेल कीं काय ह्मणून मी मोठी काळजी करूं लागलों.

अशा स्थितींत मी असतां एका गुलामानें मला हांक मारली. हा गुलाम त्या पूर्वी सांगितलेल्या स्त्रीच्या मागून चालला होता तोच होय, असें मीं ओळखिलें; व त्यावरून मला दुप्पट काळजी उत्पन्न झाली. मीं त्यास विचारिलें, 'कायरे बाबा, माझ्याशीं तुला काय काम आहे?' त्यानें मोठ्या अदबीनें उत्तर केलें, 'महाराज, मी नेईन तिकडे आपण माझ्यामागें चलावें अशी आपणांस विनंति करण्याविषयीं मला आज्ञा झालेली आहे.' मीं ह्मटलें, 'ही आज्ञा तुझ्या धनिणीनें तुला केली असेल तर तिचे शब्द मला शिरसा वंद्य आहेत, व कांहीं होवो, त्याप्रमाणें करण्यास मी मोठ्या खुषीनें तयार आहें.' तो म्हणाला, 'तुम्हांला बोलावण्यांत माझे धनिणीचा काय उद्देश आहे, तो तिनें मला कळविला आहे; परंतु मी तुम्हांस सध्या इतकेंच सांगतों कीं, तिच्या इच्छेप्रमाणें तुम्ही मजबरोबर आल्यास तुम्हांला पश्चात्ताप करण्यास ती गोष्ट कारणीभूत होणार नाहीं.'

हें त्या गुलामाचें बोलणें ऐकून मी त्याच्या मागोमाग चाललों. मला दुसरे दिवशीं निघावयाचें होतें, यास्तव त्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे आतां लक्ष्य देणें बरोबर नाहीं, असा विचार माझ्या मनांत पुष्कळ वेळां आला. पण तो सगळा फुकट गेला, व तो गुलाम जिकडे नेईल तिकडे मी मोठ्या उत्सुकतेनें चाललों. त्यानें मला आडरस्त्यांनीं एका मोठ्या हवेलीपाशीं नेलें. तींत

आम्ही गेल्यावर तो मला एका प्रशस्त व सुशोभित महालांत घेऊन गेला, व तुमच्याकडे कोणी तरी येईल तोंपर्यंत येथें बसा, असें त्यानें मला सांगितलें. त्या महालांत नानाप्रकारच्या सुंदर व चमत्कारिक चिजा होत्या, त्यांकडे माझें लक्ष्य वास्तविक लागून रहावें, पण माझ्या मनांत त्या स्त्रीच्या संबंधाचे सर्व विचार घोळत असल्यामुळें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे माझें चित्त बिलकुल जाईना.

अशा प्रकारें मी विचारांत गुंतून गेलों असतां त्या ठिकाणीं कित्येक स्त्रिया आल्या. त्या खरोखर फार सुंदर होत्या. तरी पण, जिनें माझें मन मोहून टाकिलें होतें तिच्यापुढें त्या कांहींच नव्हत्या. बराच वेळ झाल्यावर शेवटीं ती अनुपम लावण्यवती तेथें प्राप्त झाली. तिच्या ठाणमाणावरून व चालण्याच्या ढबीवरून मीं तिला सहज ओळखली. नंतर तिनें तोंडावरचा बुरखा काढला, तेव्हां पूर्वी तिच्या सौंदर्याविषयीं जी माझी कल्पना झाली होती त्याहूनही ज्यास्त सुरेख ती मला दिसली. ती मूळचीच सुंदर असून खेरीज रत्नादिकारांच्या बहुमोल अलंकारांनीं विभूषित असल्यामुळें तर तिचें तेज पहाणारास केवळ दिपवून टाकण्यासारखें होतें. माझीही स्थिति अर्थातच तशी झाली. हें पाहून तिनें किंचित् हास्य केलें. ती, सिंहासनाच्या आकाराचें लहानसें कोच तेथें होतें त्यावर जाऊन बसली; व पूर्वी सांगितलेल्या त्या स्त्रिया तिच्या दोन्ही बाजूंस बसल्या. त्या सर्व तिच्या दासी होत्या.

ती स्त्री बसल्यावर मला मोठ्या प्रेमानें म्हणाली, 'तरुण गृहस्था! अलीकडे ये. हें पहा, भररस्त्यासारख्या ठिकाणीं तूं माझ्याशीं जें अविचाराचें वर्तन केलेंस तें मींच म्हणून सहन केलें. दुसरी एकादी असती तर तिची शीर तेव्हांच चढून गेली असती. पण तूं परदेशी असल्यामुळें येथील रीतरिवाज तुला माहीत नाहींत, सबब तुजवर फारशी करडी नजर करणें रास्त होणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर तुला जी काय बुद्धि झाली तीपासून तुझें कांहीं एक वाईट न होतां उलटें तुझें कल्याणच व्हावें असा योग आल्याचा

रंग मला दिसत आहे. थोडक्यांत मी तुला इतकेंच सांगतें कीं, जर तूं अंतःकरणपूर्वक मजवर प्रेम ठेवून माझी मर्जी संपादन करशील, तर आजपर्यंत मजकडून जो मान कोणालाही मिळाला नाहीं तो तुला मिळण्याविषयीं खात्री ठेव.'

हे शब्द ती इतक्या दिलदारपणानें व अंतःकरणाच्या खऱ्या कळवळयानें बोलली कीं, त्या योगानें, तिनें मजवर केलेल्या त्या कृपेचें मोल मला विशेषच वाटूं लागलें; व मी परमानंदांत गुग होऊन गेलों. मीं तिच्या पायांवर डोकी ठेवून ह्मटलें, 'बाईसाहेब, तुह्मी जें काय बोललां तें मी बरोबर समजलों कीं नाहीं याचा मला संशय वाटतो, पण माझा समज बरोबर असेल तर मी असें म्हणतो कीं, तुम्हीं मला जो हा मान दिला, त्यासारखी पात्रता माझ्या अंगीं मुळींच नाहीं; व जर कांहीं असेल, तर ती मी तुह्मांस अत्यंत पूज्य मानतों यांतच काय ती आहे.' ती बोलते, 'असें असेल तर फारच बरें. तूं आपली योग्यता जितकी कमी समजशील तितका तुझा अधिकच फायदा होईल. बरं, पण तुझें नांव काय, तूं रहाणारा कोठचा, व येथें आलास कशाकरितां, हें अगोदर सांग पाहूं?'

तिला मीं आपली सर्व हकीकत थोडक्यांत सांगितली. पण शेवटीं जेव्हां मी बोललों कीं, उदईक मला स्वदेशीं जाण्यास निघावयाचें आहे, तेव्हां तिला फार वाईट वाटून ती म्हणाली, 'काय, अबुलफौरीज! तूं इतक्यांत आह्मांला सोडून जाणार? अरे, साऱ्या हिंदीमहासागरांत हें सिंहलद्वीप उत्तम गणलें जात असून येथें आणखी कांहीं दिवस मजेंत चालवावेसें तुला वाटत नाहीं काय?' मीं उत्तर केलें, 'बाईसाहेब, आपण ह्मणतां तें अगदीं खरें आहे. अत्यंत अरसिक मनुष्य असला तथापि त्याच्या मनाची देखील, येथें कितीही राहिलें तरी तृप्ति होणार नाहीं. मग माझी गोष्ट कशाला पुसतां? वास्तविक पुसाल तर अगोदर या सुंदर स्थळीं माझें मन अतिशय रमलें आहे. पण त्यांतून हा आजचा आपल्या दर्शनाचा प्रसंग तर इतका कांहीं आनंददायक झाला आहे कीं,

येथून निघून जाणें माझ्या खरोखर मोठें जिवावर आलें आहे !' ती किंचित् हंसून म्हणते, 'तर मग एकंदरीनें तुझा इतक्यांतच जाण्याचा उद्देश नाहीं हें खरें ना ?' मीही तसेंच थोडें हंसून ह्मटलें, 'बाईसाहेब, आपल्यासारख्याच्या कृपेची आशा उत्पन्न झाल्यावर आपले पाय सोडून जाण्याचें माझ्याही मनांत वास्तविक येईल असे आपलें मन तरी आपणांस सांगतें काय ?' ती ह्मणते, 'ठीक आहे. तुझे हे विचार पाहून मला खात्री वाटते कीं, तू माझ्या मर्जीस उतरशील; व आपल्या कृपेस पात्र म्हणून मीं जी तुझी निवड केली तीबद्दल मला मोठा आनंद वाटत आहे.'

असें म्हणून तिनें मला आपल्या शेजारीं कोचावर बसण्यास सांगितलें. मीं थोडासा संकोच केला, परंतु तिच्या बोलण्यांत तिची वृत्ति मला इतकी गंभीर दिसून आली कीं, आपण बसलों नाहीं तर हिला उलटा राग येईल, व हिच्याशीं आपण सेवकांच्या नात्यानें वागण्यापेक्षां बरोबरीच्या नात्यानेंच वागण्यांत हिला आनंद आहे असें वाटल्यावरून तिच्या सांगण्याप्रमाणें मीं केलें. नंतर ती मला ह्मणाली, 'माझें नांव शीलवंती. माझा बाप येथील राजाचा मुख्य वजीर होता. तो मरण पावला असल्यामुळें मला वाटेल तशी आपली स्वतःची व्यवस्था लावण्यास मुखत्यारी आहे. येथल्या अनेक अमीरउमरावांनीं आपल्याशीं विवाह करण्याविषयीं माझें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण मीं त्या सर्वांना नकार केला असून अद्याप कोणाच्याही वचनांत मी गुंतलें नाहीं. तुझी माझी रस्त्यांत प्रथम नजरानजर झाली तेव्हां तूं जे शब्द बोललास त्यांनें मला मोठें कौतुक वाटलें; व मीं तुजकडे लक्षपूर्वक पाहिलें तों तूं माझ्या मनांत फारच भरून गेलास. माझ्या बापानें चाळीस वर्षें नोकरी केली. तेवढ्या काळांत त्यानें अपार द्रव्य संपादन करून ठेविलें आहे. तर तूं आपल्या गुणांनीं मला प्रसन्न करून घेऊन मजबरोबर या संपत्तीच्या उपभोगाचा वांटेकरी झाला नाहींस तर त्यांत दोष कोणाचा ? सर्वथैव तुझाच असें मी म्हणेन !'

या° तिच्या बोलण्यावर मीं जें तिला उत्तर दिलें, त्यांत तिजवि-षयीं आपलें प्रेम व पूज्यबुद्धि हीं जितकीं मला प्रकट करतां आलीं तितकीं मीं करून दाखविलीं. तसेंच, तुझ्या अपार संपत्तीपेक्षां मी तुझ्या अंतःकरणाला ज्यास्त मोल देतों असेंही तिला बोलून दाख-विलें. हे माझे विचार ऐकून तिला मोठा संतोष झाला असें दिसलें. नंतर आमचें दुसऱ्या इकडच्या तिकडच्या गोष्टींविषयीं बरेंच संभा-षण झालें. त्यांत, ह्या स्त्रीच्या ठायीं हिच्या सौंदर्यास शोभतील असे मनाचे धर्मही परमेश्वरानें उत्पन्न केले आहेत असें मला पूर्णपणें दिसून येऊन माझ्या अंतःकरणास फारच आनंद झाला.

आमचें संभाषण चाललें असतां तितक्यांतच दहा बारा गुलाम तेथें आले. त्यांनीं उपाहाराकरितां उत्तम प्रकारची मेवामिठाई व फळफळावळ आणली होती. ती त्यांनीं मेजावर मांडून सर्व तयारी केल्यावर शीलवंतीनें मला हातीं धरून मेजाशीं नेलें, व आम्हीं दोघें शेजारीं फराळास बसलों. त्या सर्व वस्तूंत ज्या अत्युत्तम होत्या त्या तिनें स्वतः आपल्या हातानें मला दिल्या. पुढें ते गुलाम मद्य घेऊन आले. तें त्यांनीं सोन्याच्या व स्फटिकाच्या नकशीदार पेल्यांत भरून आम्हांपुढें ठेविलें. तें किती नामी होतें म्हणून सांगूं? तें प्राशन केल्यानें जो कांहीं मला आनंद झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. पण याहीपेक्षां, शीलवंतीनें एक पेला भरून प्रेमभ-रित मुद्रेनें किंचित् हास्य करून जेव्हां माझ्या हातीं दिला, तेव्हां तर माझ्या आनंदांत आणखी आपकाच्या जोराची भर पडून माझ्या अंतःकरणाची जी काय अवस्था झाली तिचें वर्णन प्रत्यक्ष बृहस्पती-च्यानेंही होईल कीं नाहीं याची मला शंका वाटते!

असो. उपाहार चालला असतां तिच्या माझ्या संभाषणांत पुष्कळ मजेच्या गोष्टी निघाल्या. तिचा स्वभाव विनोदी असून मला रंगांत आणण्याविषयीं तिचा विशेष प्रयत्न चालला असल्यामुळें तर तिचा प्रत्येक शब्द व प्रत्येक हावभाव यांस अत्यंत रमणीयत्व येत चाललें, पुढें तिनें प्रत्येक वेळीं माझ्या हातांत मद्याचा पेला

देण्यापूर्वी त्यांतील थोडें मद्य आपण प्राशन करावें, आणि, अबुल-फौरिज, याची तर चव पहा कशी आहे ती ! असें म्हणून तो माझ्या हातीं द्यावा. या योगानें तर त्या मद्याची रुचि मला अधिकाधिकच लागून मी तिच्या हातच्या मद्याचें—अथवा तिच्या प्रेमाचेंच कां म्हणाना—मनसोक्त प्राशन करून मोठी मान्यता पावलों.

फराळ झाल्यावर शीलवंतीच्या दासींनीं दोन मेळे केले. एका मेळ्यानें गाणेंबजावणें करण्यास सुरवात केली, व दुसरा नृत्य करूं लागला. त्या स्त्रिया आपापल्या कसबांत अत्यंत कुशल असल्यामुळें त्यांनीं जी बहार करून सोडली तींत मी अगदीं तल्लीन होऊन गेलों. शीलवंतीच्या मनाची स्थितिही तशीच होऊन गेली. आम्ही मधून मधून एकमेकांकडे पहात असूं व आपले मनोविकार उष्ण श्वासोच्छ्वासांनीं प्रकट करीत असूं. शेवटीं त्या स्त्रियांचें नृत्यगायन संपल्यावर शीलवंतीनें एक मद्याचा पेला हातांत घेऊन व मजकडे नेत्रकटाक्ष फेंकून प्रेमभरांत पुढील अर्थाचें गाणें गाइलें:—

[ साक्या. ]

**सुंदर मदिरे ! अग्नितुल्य तूं तेजस्वी या लोकीं ॥**
**तुझ्या सेवनें मदन हृदयिं तो खवळे हें अवलोकीं ॥ १ ॥**
**अबलेची तर खरिच दुर्दशा करिशी तूं गे बाई ॥**
**प्रियकर मग तिज संधि साधुनी मृगिसम घेऊनि जाई ॥२॥**

हे गाणेंबजावणें आटोपल्यानंतर कांहीं वेळानें संध्याकाळ झाली. तेव्हां मी घरीं जाण्याकरितां शीलवंतीचा निरोप घेऊं लागलों. तेव्हां ती त्या संबंधानें आपली नाखुषी दर्शवून मला म्हणाली, ' मला जें जें म्हणून प्रिय तें तें करण्यास आपण मागें घेणार नाहीं म्हणून जें तूं मला वचन दिलेंस त्याचा अर्थ हा काय, कीं तूं आतांच्या आतां चालता होणार ? मला वाटतें, मीं जें काय तुझें स्वागत केलें तें तुझ्या मनास न आल्यामुळें तुला येथें रहाण्याचा कंटाळा आला. वास्तविक पहातां, ज्याच्या अंतःकरणांत एखाद्या स्त्रीविषयीं प्रेमांकुर उद्भवला आहे त्या मनुष्याचें असें वर्तन पाहून

कोणासही आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. अरे, आषकाच्या आधीन झालेल्या मनुष्यानें रात्र केव्हां होईल म्हणून तळमळत असावें, कीं ती होतांच आपल्या प्रियतमेस सोडून जाण्याचें मनांत आणावें ?' मी बोललों, 'बाईसाहेब, माझे मनोधर्म आपण बरोबर जाणले नाहींत हें पाहून मला फार वाईट वाटतें. आपण केलेल्या स्वागताचें मोल न समजण्याइतका मी अरसिक मनुष्य आहें अशी कल्पना आपण केली काय ? छी ! छी ! अशी गोष्ट आपण मनांत येऊं देऊं नका. बाईसाहेब, आपण केलेल्या स्वागतानें माझ्या अंतरात्म्यास काय वाटलें तें त्याचें तोच जाणे ! या जिव्हेस तें बोलून दाखविण्याचें सामर्थ्य नाहीं ! पण खरें पुसाल तर, अशा वेळीं मी आपली रजा घेऊन जर येथून गेलों नाहीं, तर आपण केलेल्या आदरसत्काराचा मीं दुरुपयोग केला कीं काय असें माझें मन मलाच खाऊं लागेल, या भीतीनेंच मीं आपणांपाशीं जाण्याची गोष्ट काढली, दुसरें कांहीं नाहीं. बाकी मी गेलों असतां आपल्या वियोगदुःखामुळें माझें अंतःकरण केवळ पोळून जाणार आहे, हें मी शपथपूर्वक सांगतों.' ती म्हणते, 'या तुझ्या बोलण्यांत मी सांगतें या दोन गोष्टींपैकी कोणती तरी एक गोष्ट संभवते. एक तर तूं माझें अंतःकरण अद्यापि पूर्णपणें जाणलें नसावें; व जाणलें असल्यास, अशा ठिकाणीं रात्रीच्या वेळीं राहिल्यानें सभ्यपणाचा अतिक्रम होईल कीं काय ही भीति तुझ्या मनांत आली असावी. पण ती आली असल्यास अगदीं गैरसमजुतीची होय हें पक्कें समज.' मीं ह्मटलें, 'तर मग बाईसाहेब, मी आतां उघड उघड विचारतों कीं, आपल्या येथें मीं रात्रीच्या वेळीं रहावें असें आपल्या मनांत होतें हें मीं समजावें कसें ?' ती बोलते, 'समजावें कसें ह्मणजे? तूं येथें आल्यापासून मीं ज्या प्रकारें तुझ्याशीं वागलें व बोललें, त्यावरून असें अनुमान करण्यास तुला हवी तितकी जागा होती ! असो, तर एकंदरीनें याचें तात्पर्य मी येवढेंच काढतें कीं, मी तुझ्याशीं आतांपर्यंत जी इतकी प्रेमानें व उल्हासानें वागलें, त्या मानानें मजविषयीं तुला असावी तितकी आस्था नाहीं !'

आपल्याविषयीं अनास्थेचा आरोप शीलवंतीनें जो हा मजवर केला त्यास आपण बिलकुल पात्र नाहीं असें अनेक प्रकारांनीं तिला मीं समजावून सांगितलें. मीं अत्यंत प्रेमळ पण स्पष्ट शब्दांनीं तिची अशी खात्री करून दिली कीं, तुझा मजबद्दल झालेला समज अगदीं चुकीचा आहे, व ती गोष्ट शेवटीं तिनेंही कबूल केली. पण तिला मीं हेंही बोलून दाखविलें कीं, तुझ्या सहवासापासून मला जरी पराकाष्ठेचा आनंद झाला आहे, तरी एके प्रकारें माझें मन अस्वस्थ आहे. नंतर, येथें आल्यापासून हबीब यानें माझी कशी बरदास्त ठेविली वगैरे सर्व वृत्तांत तिला सांगून मीं म्हटलें, 'यावरून, बाईसाहेब, मी येवढा वेळ घरीं आलों नाहीं याबद्दल हबीब यास किती काळजी लागली असेल, व रात्रींही मी न गेलों तर तो किती चिंतातुर होईल याचा तुम्हीच आपल्या मनाशीं विचार करा.

हबीब यास माझी वास्तापुस्त काय आहे हें कळणें जरूर आहे ही गोष्ट शीलवंतीनें कबूल केली. पण मी त्याजकडे जाऊन लगेच परत येतों असें जरी तिला परोपरी सांगितलें, तरी ती मला स्वतःला म्हणून जाऊं देईना. तिला वाटलें कीं, हा गेल्यानें हबीब यास हा सर्व प्रकार कळेल, व याच्याशीं ( माझ्याशीं ) तो बुद्धिवाद करून आपली जी प्रेमाची घडी बसत चालली आहे तिचा विवाड करून टाकील. यास्तव हबीब यास फक्त चिटी पाठविण्यास तिनें मला परवानगी दिली. त्या चिटींतही, मी कोठें व कोणत्या स्थितींत आहे हें त्यास कळविण्याची तिनें मला मनाई केली. फार काय सांगूं ? पण तिनें विचार करून शेवटीं त्या चिटींतील मजकूर कसा लिहावयाचा तो स्वतः तोंडानें सांगितला— इतकी तिनें या कामीं पराकाष्ठेची काळजी घेतली. सारांश, मला हबीब यास त्या चिटींत इतकेंच फक्त लिहितां आलें कीं, ' मी खुशाल असून कांहीं जरूरीच्या कामामुळें थोडे दिवस माझें निघणें होत नाहीं, व सध्या आपल्या सहवासाचा लाभ मला अंतरला आहे

याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटते, पण आपण मजबद्दल कांहीं एक काळजी करण्याचें कारण नाहीं.'

शीलवंतीनें तें पत्र हबीब याजकडे पोंहोचतें करण्याची तजवीज केली. मीं आपला जाण्याचा बेत लांबणीवर टाकिला याजबद्दल तिला फार आनंद झालासें दिसलें. पुढें तिनें मला आपला सर्व वाडा दाखविला. त्यावरून एकंदर तिचें वैभव तिच्या थोर पदवीस शोभण्यासारखें आहे असें मला दिसून आलें. असो; नंतर निजावयाची वेळ झाली तेव्हां, तिनें मजकरितां एका स्वतंत्र जागेची पूर्वींच योजना करून ठेविली होती तेथें मला नेलें. मग तेथून ती गेली, व माझ्या शुश्रूषेकरितां कित्येक गुलाम तिनें पाठवून दिले. त्यांनीं माझी निजायाची सर्व व्यवस्था लाविली.

मी बिछान्यावर पडल्यावर, आतांपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींचा स्वस्थपणें विचार करूं लागलों. मीं मनांत म्हटलें, 'हें स्थळ कितो गुप्त आहे बरें! येथें मी कसा अकल्पित रीतीनें येऊन पडलों! अशा प्रकारें माझें भाग्य उदयास येईल हें माझ्या स्वप्नींही नव्हतें! हो, पण इतक्यांतच मी आपल्या मनांत मांडे खातों हें वाजवी नाहीं! या प्रकरणाचा शेवट कसा होणार याचा नेम तरी काय सांगावा? ही सुंदरी आपल्याला प्राप्त होईल अशी आशा करण्यास मला खरोखर जागा आहे काय? छी! छी! अबुलफौरीज! तूं या मनोराज्यांत व्यर्थ गढून जाऊं नको. ती तुला प्राप्त व्हावी असा कांहीं योग दिसत नाहीं तर तूं भावी सुखाच्या आशेंत उगीच घोटाळूं नको; कां कीं, त्या आशेचा तंतु शेवटीं एकाएकीं तुटला म्हणजे एकदम आपण स्वर्गांतून खालीं मृत्युलोकीं येऊन आपटलों असें तुला वाटून अनावर दुःख मात्र होईल!'

ह्या असल्या विचारांनीं माझ्या मनाची भारीच चलबिचल व तळमळ होऊं लागली. पण कांहीं वेळ गेल्यावर मी दुसऱ्या बाजूनें त्या गोष्टीचा विचार करूं लागलों. तव्हां असें माझ्या मनांत आलें कीं, शीलवंती ज्या प्रकारें यवढा वेळ माझ्याशीं वागली, त्यांत तिचा

हेतु मला फसविण्याचा आहे असा अंदेशा घेण्यास बिलकूल जागा नाहीं; तिच्या नोकरांचाकरांचेंही आपल्याशीं फार अदबीचें व निष्कपट वर्तन दिसून आलें आहे; खेरीज मजविषयीं तिच्या अंतःकरणांत खरें प्रेम उत्पन्न झालें असल्याचा प्रत्यय तर अनेक वेळां तिच्या बोलण्याचालण्यावरून व कृतींवरून आपल्याला आला आहे. सारांश, याप्रमाणें कांहीं वेळ तिच्यावर माझा भरंवसा बसून माझें मन शांत होई; पण फिरून थोड्या वेळानें तो भरंवसा नाहींसा होऊन मन उदास होई. तात्पर्य, ज्याप्रमाणें एखाद्या जहाजास विरुद्ध दिशांनीं वारा लागला असतां त्याची गत होते, त्याप्रमाणें ती सारी रात्र पळभरही डोळा न लागतां द्विधा स्थितींत मीं घालविली.

इतक्यांत एकाएकीं उजाडलें. तों सूर्याचे कोमल किरण, मी ज्या महालांत निजलों होतों त्यांत पडले, व त्यांच्या योगानें तथील बहुमोल सामान चकाकूं लागून त्याची शोभा मला मोठी रमणीय दिसूं लागली. त्यामुळें माझे डोळे अगदीं दिपून गेले; व या सुंदर हवेलीचें काम कर्त्यांचें नसून जादूच्या योगानें हें प्रतिस्वर्गभुवनच येथें उत्पन्न केलें आहे कीं काय, असें मला वाटलें. मी बिछान्यावरून उठतांच, रात्रीं जे गुलाम माझ्या तैनातीस शीलवंतीनें पाठवून दिले होते ते कित्येक उत्तम प्रकारचे झगे घेऊन मजकडे आले. त्यांपैकीं एक झगा हिरव्या रेशमाचा असून त्यावर सोनेरी नकशीचें काम केलेलें होतें. तो मला फारच आवडल्यावरून मीं घेतला. माझा पोषाख झाला असें कळतांच शीलवंती ही माझ्या समाचाराकरितां तेथें आली. वास्तविक पुसाल तर मीच उठून प्रथम तिच्या महालांत तिला सलाम करण्याकरितां जाणार होतों; पण मला फिरून भेटण्याची तिलाही अतिशय उतावळी झालेली असल्यामुळें तिला मी जाईपर्यंत धीर कोठला निघणार? असो; तिनें मला विचारिलें, 'रात्रीं तुला झोंप कशी काय लागली?' मीं प्रांजलपणें उत्तर केलें, 'बाईसाहेब, सारी रात्रभर माझा डोळा म्हणून मुळींच लागला नाहीं; कां कीं, अवघा वेळ आपल्याविषयींचे विचार माझ्या मनांत

चालले होते; व मी उघडपणें सांगतों कीं, आतां आपली वास्तविक कृपा मजवर झाल्यावांचून ह्या देहाला सुख व विश्रांति हीं कधींही मिळावयाचीं नाहींत.' यावर ती किंचित् हंसून बोलली, 'तुझे हे शब्द बेंबीच्या देंठापासून निघाले आहेत कीं नाहींत याचा आणखी थोडा प्रत्यय पाहिल्यावांचून मी तुझ्याशीं या बाबतींत ज्यास्त कांहीं बोलणार नाहीं !'

अशा स्थितींत शीलवंतीच्या वाड्यांत मी आठ दिवस राहिलों. या अवधींत एखाद्या राजपुत्राप्रमाणें तिनें माझा सर्व प्रकारें मानमरातब ठेविला, व सभ्यपणाची मर्यादा न सोडतां जेवढीं म्हणून आपल्या प्रेमाचीं चिन्हें मला दाखविण्यासारखीं होतीं तेवढीं तिनें दाखविल्यावांचून ठेविलीं नाहींत. यानंतर एके दिवशीं आम्ही उभयतां बागेंत फिरत असतां ती मला म्हणाली, 'अबुलफौरीज ! आजपर्यंत तुझा माझा सहवास झाला त्यांत तुझें जें वर्तन मला दिसून आलें, त्यावरून तुझें मजवर अंतःकरणपूर्वक प्रेम आहे असें मला वाटतें. याकरितां तुला आपलें तनमनधन अर्पण करून सुखी करावें असा मीं विचार केला आहे. तूं माझ्या शरीररूपी गुलाबाचीं फुलें तोडण्याची इच्छा करीत होतास, त्याला मध्यंतरीं असलेल्या कांट्यांचा अडथळा ज्या कामदेवानें निवारण केला त्याचे अनन्यभावें तूं उपकार स्मर. आतां प्रियकरा ! मीं ज्याअर्थी तुजकरितां येवढें केलें त्याअर्थी तूंही पण मजकरितां कांहीं तरी करावें हें तुला उचित नाहीं काय ?' मीं कृतज्ञतापूर्वक अत्यंत नम्रतेनें उत्तर केलें, 'बाईसाहेब ! आपण मला असा प्रश्न केला याचेंच मला मोठें दुःख वाटतें. मी फार कांहीं बोलून दाखवीत नाहीं, पण आपल्याकारितां हा अबुलफौरीज जीव सुद्धां खर्ची घालण्यास तयार असून तसें करण्यांत त्याला मोठें भूषण आहे असें तो समजतो !' ती म्हणते, 'मी तुझ्यापाशीं जें काय मागणार आहें तो एके प्रकारें माझा तुझ्यावर आणखी अनुग्रहच होणार आहे असें समज; व तुझें मजवर खरोखरच प्रेम आहे म्हणून जें मी समजतें, तशी

गोष्ट वास्तविक असेल तर माझें मागणें तूं कबूल करशील.' मी बोललों, 'बाईसाहेब ! काय असेल तें लवकर स्पष्ट बोला. हें करण्यास जितका जितका वेळ लागत आहे तितकें तितके माझे प्राण व्याकुळ होत आहेत. आणखी तें काय सांगूं ?' ती म्हणाली, 'तुझ्यापाशीं माझें येवढेंच मागणें आहे कीं, तुझें मजवर अखंड प्रेम असावें. म्हणजे त्यापासून मला खरें समाधान व सुख होणार आहे; व ही गोष्ट करण्याबद्दल तूं देवाची शपथ वहा; तसेंच, इतकें केल्यानंतरही, न जाणों कदाचित् तुझा माझा वियोग होण्यास कांहीं कारण घडेल तर तें न घडावें याकरितां तूं माझ्याशीं विधियुक्त लग्न लाव.'

शीलवंती शेवटीं जें काय बोलली त्याशिवाय बाकीच्या तिच्या भाषणानें मला अत्यानंद झाला. पण शेवटच्या बोलण्यानें त्या सगळ्यावर विरजण पडून माझ्या मनाला मोठें दुःख झालें. मला वाटलें होतें कीं, ती मजपाशीं लग्नाखेरीज दुसरी कांहीं गोष्ट काढील; कारण, अग्निपूजक जे प्राचीन इराणी लोक त्यांच्या एका पंथापैकीं ती असून मी मुसलमान असल्यामुळें माझ्याशीं लग्न लावण्याची इच्छा तिनें प्रगट करावी ही गोष्ट विचित्र आहे; व ही गोष्ट ज्याअर्थी तिनें आपण होऊन काढली, त्याअर्थी यांत तिचा कांहीं तरी कावा असावा असें माझ्या मनांत आलें, व मी आश्चर्यचकित होऊन स्तब्ध बसलों; इतकेंच नाहीं, तर माझें तोंड खाडकन् उतरून जाऊन, जो मी एका क्षणापूर्वी आनंदाची केवळ मूर्ति होतों तो एकदम अत्यंत दुःखी, उदासवाणा, व विपत्तीच्या फेऱ्यांत पूर्णपणें सांपडलेला असा दिसूं लागलों !

या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें माझें म्हणणें काय पडतें हें समजण्याविषयीं शीलवंती फारच उत्सुक असल्यामुळें मजकडे तिचें एकसारखें लक्ष्य लागून राहिलें होतें, व ती मोठी धूर्त असल्यामुळें, माझ्या चेहऱ्यावरून माझ्या मनाची स्थिति तिनें तेव्हांच ताडली. ती उग्र स्वरूप धारण करून धिक्कारयुक्त मुद्रेनें मला म्हणते, 'माझा

हा विचार तुला नापसंत पडेल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. उलट मी असें ... होतें कीं, तो ऐकून तुला परमानंद होईल; पण माझें बोलणें ऐकल्याबरोबर तुझ्या मनाची चलबिचल झाली, हें पाहून मला अतिशय वाईट वाटत आहे. अरेरे! माझें पाणि-ग्रहण करणें ही गोष्ट तुला अपमानाची वाटते काय ?' मीं उत्तर केलें, 'बाईसाहेब! आपण प्रेमळ व उदार अंतःकरणानें जी देणगी मला देत आहां तिची किंमत मी जाणत नाहीं असें नाहीं. परंतु ही गोष्ट घडण्यास परमेश्वरानें अपरिहार्य अडचण आणून ठेवलेली आहे, यामुळें माझा कांहीं एक इलाज चालत नाहीं; आणि हें माझें दुर्दैव, मला प्राप्त होणाऱ्या अप्रतिम वैभवाच्या व सौख्याच्या आड आलें हें पाहूनच केवळ मी दिलगीर झालों, दुसरें कांहीं नाहीं.' शीलवंती बोलते, 'मला असें वाटत होतें कीं, येऊन जाऊन काय ती माझीच उच्च पदवी तुला सुखी करण्याच्या मार्गांत विघ्न आणील. पण मीं मनाचा धडा करून आपला दर्जा एकीकडे ठेविला, व आपलें तनमनधन तुला अर्पण करण्यास तयार झालें. तेव्हां आतां कोणताही अडथळा या कामीं येणार नाहीं असें मला वाटलें. पण पहातें तों तिसराच कांहीं प्रकार मध्यंतरीं उद्भवला! बरें, तूं जी अपरिहार्य अडचण म्हणून म्हणालास ती कोणती तेवढी सांग तर पाहूं ?' मीं उत्तर केलें, 'अडचण दुसरी कसली असणार आहे ? माझ्या धर्माची बाब हीच अडचण. जी स्त्री मुसलमानी धर्माची नसेल तिच्याशीं लग्न करण्यास आम्हांस सक्त मनाई आहे.' शीलवंती म्हणते, 'अरे, धर्मसंबंधांत तुझ्याहून मी ह्मणजे कमी विचारी आहें असें नाहीं. मीही पण, मला साऱ्या पृथ्वीचें राज्य कोणीं दिलें तरी मुसलमानाशीं लग्न करण्यास तयार होईन असें समजूं नको. या गोष्टीचा मीं पूर्वींच विचार करून असा मनसुबा ठरविला होता कीं, आपला उभयतांचा विवाह होण्यापूर्वीं तुजकडून तुमच्या पैगंबराच्या खोट्या धर्माचा त्याग करवावा व आमच्या धर्माची दीक्षा तुला द्यावी ह्मणजे झालें. मला

खचीत वाटलें होतें कीं, मजकारितां तूं खुषीनें आपल्या धर्माचा त्याग करशील व अग्निपूजक होशील. खेरीज, ज्या देवाची आम्ही आराधना करतों त्याच्या दृष्टीनें, आपलें तनमनधन अर्पण करण्यांइतकी ज्यावर आपली प्रीति बसली, त्याजकडून अशा प्रकारें धर्मांतर करविणें हें महत्पुण्य आहे. आतां तुझ्या ह्या कृतीनें काय होणार आहे तें पहा. मला याप्रमाणें प्राप्त होणाऱ्या पुण्यास मी मुकणार, व मी आपला सगळा मोठेपणा एकीकडे ठेवून सर्वथैव तुझ्या स्वाधीन होत असतां माझा धिक्कार तूं करतोस त्या अर्थीं कृतघ्नतेचें पाप तुझ्या पदरीं येणार!'

शीलवंती हे शेवटचे शब्द इतक्या आवेशानें बोलली कीं, त्या योगानें मी ज्यास्तच गोंधळून जाऊन मला कांहींएक सुचेनासें झालें. हें पाहून तर ती मजवर अतिशयच खवळली. तिनें निराशेनें माझा नानाप्रकारें निषेध केला, व तिच्या नेत्रांतून ज्या अश्रुधारा चालल्या त्यांच्या योगानें माझ्या हृदयाचें विदारण झालें. एकंदरीनें तिच्या प्रेमपाशांत सांपडलेल्या मजसारख्या सत्त्वधीर पुरुषाच्या मनावर तिच्या या शोचनीय स्थितीचा किती भयंकर परिणाम झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे! माझें स्वतःचें दुःख तिला झालेल्या दुःखामुळें दुणावून माझें देहभान बहुतेक नाहींसें झालें, व मी तिच्या अश्रूंनीं मोहित होऊन स्वार्थ व परमार्थ या दोहोंचाही त्याग करण्यास तयार होणार, इतक्यांत महासमर्थ पैगंबरानें माझें सत्त्व रक्षण करण्यासाठींच जणूं काय मला सहाय होऊन, कांहीं झालें तरी स्वधर्मत्याग न करण्याचा माझा निश्चय त्या आणीबाणीच्या प्रसंगीं कायम राखिला!

अप्सरेसारखी परम रूपवती स्त्री व तिची अपार संपत्ति हीं प्राप्त होत असतां त्यांचा केवळ स्वधर्मश्रद्धेप्रीत्यर्थ त्याग करणारा जो मी, त्याचें धैर्य पाहून शीलवंती अत्यंत चकित झाली. मुसलमानी धर्मांत, वेळ पडेल तसे वागणारे अनेक लोक आहेत असें तिनें ऐकिलें होतें, यामुळें तिचें ह्मणणें मी सहज कबूल करीन असें

तिला साहजिकच वाटलें होतें; आणि या गोष्टीमुळेंच विशेषें माझ्या नकाराबद्दल तिला परमावधीचें दुःख झालें. तथापि इतक्याही उपर, माझें मन विशेष विचाराअंतीं वळूं शकेल अशी तिला आशा उत्पन्न होऊन तिनें माझा नाद अगदींच सोडून दिला नाहीं ती मला म्हणाली, ‘ तुझें अन्यायी व निष्ठुरतेचें वर्तन पाहून खरोखर मीं यापूर्वीच आपल्या उभयतांच्या प्रेमसंबंधाचे ‘एक घाव दोन तुकडे’ करून टाकायाला पाहिजे होते, व तसें अद्याप माझ्या हातून झालें नाहीं हें माझें स्वभावदुर्बलत्व पाहून माझी मलाच लाज वाटते! तथापि अजून तुझें मन कदाचित् फिरेल अशी मला आशा असल्यामुळें मी तुला आणखी आठ दिवस विचार करण्यास फुरसत देतें. यांत माझा हेतु इतकाच कीं, कांहीं झालें तरी पुढें मागें मला दोष देण्यास तुला कोणत्याही प्रकारें जागा राहूं नये. तरी पण मी इतकें सांगून ठेवितें कीं, याप्रमाणें एक आठवडाभर विचार करूनही माझें म्हणणें नाकबूल करण्याचाच तुझा हेका कायम राहील तर त्यापासून, मजसारख्या मानिनीचें मन दुखविल्याबद्दल मला जो क्रोध येईल त्याचा तुझ्यावर फार भयंकर परिणाम होईल ! ’

इतकें बोलून ती मजपासून निघून गेली. तिची त्या वेळची एकंदर मुद्रा खरोखरच अशी दिसत होती कीं, इतक्याही उपर तिजशीं विवाह करण्याचें शेवटीं मीं नाकारल्यास ती निकरास आल्यावांचून राहणार नाहीं, असें तीवरून स्पष्ट माझ्या नजरेस आलें. त्यावरून माझ्या मनाची जी स्थिति झाली ती काय सांगूं? मला ‘ इकडे आड आणि इकडे विहीर ’ असें होऊन गेलें. कारण एक तर, आपल्या धर्माचा त्याग करणें माझ्या जिवावर आलें, व दुसरें असें कीं, तसें न केलें असतां शीलवंतीच्या समागमाचें सुख प्राप्त होण्याची आपणास आशा नाहीं. तेव्हां मी दुःखाचा सुस्कारा टाकून आपल्याशींच बोललों, ‘ सुंदरी ! अशा स्थितींत तुजपासून मला सुख होण्याची आशा धरणें व्यर्थ आहे; कां कीं, धर्मत्याग करण्याची गोष्ट मला कदापि मान्य होणार नाहीं; तरी पण, मनमोहिनी ! तुजवर बसलेलें माझें प्रेम कमी कर-

खरी ताकद माझ्या अंगीं आतां राहिली नाहीं. यापुढें माझ्या अंगांत जीव असेल तोंपर्यंत सदोदित तूं माझ्या अंतःकरणरूपी राज्याची सर्व प्रकारें मालकीण होऊन रहाणार आहेस!'

शीलवंतीनें मला विचार करण्यास दिलेले आठ दिवस अशा त्रःखमय विचारांतच निघून गेले. अत्यंत दुर्लभ असें जें तिच्या समागमाचें सुख तें आपल्याला अनायासें प्राप्त होत असतां आपण होऊनच त्यास पराङ्मुख होतों ही गोष्ट माझ्या काळजाला जरी झोंबून गेली होती, तरी त्यांतही लक्ष्यांत ठेवण्यासारखा प्रकार हा कीं, माझें सत्त्वधैर्य अणुमात्रही चळलें नाहीं! आठ दिवसांची मुदत संपल्यावर शीलवंतीनें जेव्हां पाहिलें कीं, याला आपला विचार मान्य नाहीं, तेव्हां फिरून आणखी आठ दिवसांची मुदत तिनें मला दिली. या मुदतींत तिला आपला हेतु साधेल म्हणून जो आशातंतु उरला होता, तो बळकट करण्याकरितां तिनें आपल्या मनमिळाऊ स्वभावानें हरप्रयत्न करून पाहिले, पण इतकें करूनही आपणाला कांहींच फायदा होण्याचें चिन्ह दिसत नाहीं असें जेव्हां या दुसऱ्या मुदतीनंतर तिला दिसून आलें, तेव्हां तिनें मला आपल्या थोरल्या महालांत बोलावून नेलें. हा महाल तिच्या वाड्यांतील सर्व महालांत अत्यंत सुंदर होता. तेथें ती सिंहासनावर बसली असून सभोंवतीं तिच्या दासी उभ्या राहिल्या होत्या. या वेळेस तिचें स्वरूप इतकें गंभीर व उग्र दिसत होतें कीं, तिच्या स्थितींतल्या अत्यंत सुंदर व प्रेमळ स्त्रीला शोभण्यासारखें तें मुळींच नसून एकाद्या कडक व निष्ठुर न्यायाधिशास शोभण्यासारखेंच तें विशेष होतें!

हा सर्व प्रकार पाहून, आपल्याला शेवटचें जें काय हिला सांगावयाचें तें सांगण्याची वेळ आली आहे असें मीं सहजच अनुमान केलें. तिला जें काय उत्तर द्यावयाचें त्याविषयीं मीं आज पंधरा दिवस पूर्णपणें विचार केला असून मनाचा धडाही पक्का केला होता; तथापि तिच्या सन्मुख जातांना मी थरथरां कांपूं लागलों. मी सिंहा-

सन्मुख उभा राहतांच तिनें आपल्या [illegible] दासीस इतरत्र निघून जाण्यास सांगितलें. त्या गेल्यांवर तिनें आपली मुद्रा जरा कमी निष्ठुर करून मला विचारलें, 'कसें काय? अबुलफारीज! तुझ्या माथ्यांतील वेड अजून गेलें कीं नाहीं? व मजविषयीं तुला कांहीं अनुकंपा उत्पन्न झाली कीं नाहीं?' हे शब्द ती इतक्या करुणस्वरानें बोलली कीं, माझ्या अंतःकरणास ते अगदीं झोंबून गेले, व मज क्षुधितापुढें हें अत्यंत सुंदर पक्कान्नांचें ताट वाढून आलें असतां तें झुगारून देण्यास मला आतां प्रवृत्त झालें पाहिजे हा दुःखकारक विचार मनांत येऊन माझें देहभान नाहींसें झालें, व मी सिंहासनाजवळ मूर्छित होऊन पडलों!

माझी ही अवस्था पाहून शीलवंतीला माझी कींव आल्यावांचून राहिली नाहीं. ती चटकन् सिंहासनावरून उठली व स्वतः हात देऊन मला उठवूं लागली. मीं किंचित् शुद्धीवर येऊन डोळे उघडले व हा प्रकार पाहिला तेव्हां मला पराकाष्ठेचें कौतुक वाटलें व गहिंवर आला. तशीच तीही सद्गदित झालीशी दिसली. मीं तिला हलकेच म्हटलें, 'बाईसाहेब! या हतभाग्य प्राण्याची तुम्ही कशाला येवढी कींव करतां? हा तुमच्या कृपेस बिलकूल पात्र नाहीं.' ती किंचित् गहिंवरून म्हणते, 'तें तर खरेंच; तुझ्यावर दोषारोप करण्यास मला सबळ कारण आहे यांत संशय नाहीं. परंतु, तुझ्यावरील माझ्या प्रेमाचा मोबदला तूं मला दिला असतां जी मी आपल्या स्वभावदुर्बलत्वास्तव अद्यापिही गतगोष्टी विसरून जाण्यास तयार आहें, त्या माझी मर्जी तूं आतां न संपादशील तर त्यांत तुझाच दोष आहे. तूं सर्व गोष्टींचा चांगला विचार कर, व स्वतः होऊन घरीं चालून आलेल्या लक्ष्मीस लाथ मारून हांकून देऊं नको!'

मीं दुःखाच्या व निराशेच्या स्वरानें उत्तर केलें, 'बाईसाहेब! आपण ज्या शर्तीवर आपलें तनमनधन मला अर्पण करतां, त्यांपैकीं एक इतकी कठिण आहे कीं, तिच्याहून मला दुसरी कोणतीही गोष्ट अवघड वाटत नाहीं!' ती म्हणाली, 'वाहवा! प्रत्यक्ष माझ्या सं-

ती ता
व ...ंत ...ा प्राप्तीचा जेथें प्रश्न आला तेथें तूं असले कुत्सित विचार काढून आपल्या जन्माचें नुकसान करून घ्यावेंस हें तुला योग्य ...ें काय ? अथवा तसें कशाला ? मी उघड उघडच तुला विचारतें कीं, तुला या जगांत मजहून अधिक प्रियकर अशी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं असें जें मी समजतें तीच अगोदर माझी चूक आहे कीं काय ?' मीं उत्तर केलें, 'छी! छी! बाईसाहेब आपली समजूत मुळींच चुकीची नाहीं. मला या जगांत आपणांहून प्रिय असें खरोखरच कांहीं नाहीं; परंतु स्वधर्मत्याग हाच नीचपणा मानून तो करण्याचें धैर्य ज्याच्या अंगीं नाहीं असा जो मेषमात्र पुरुष मी, तो तुमच्या योग्यतेस कसा साजेल बरें ?' इतकें मी बोलल्यावर ती माझें भाषण पुढें बिलकूल ऐकून न घेतां अत्यंत कोपायमान होऊन म्हणते, 'बस, बस, पुरे! निमकहराम मनुष्या! असलें कृत्रिमी भाषण करून माझ्या डोळ्यांत तूं धूळ घालूं पहातोस काय ?—— यापेक्षां मजवर तुझें मुळींच प्रेम नमून माझ्याशीं विवाह केल्यानें तुला सुख होणार नाहीं असें स्पष्ट रीतीनें बोलून दाखवितास तर काय वाईट होतें ? जा, तूं माझ्या खरोखरच योग्यतेस साजण्यासारखा नाहींस. तुजसारख्या खालच्या घरचे वांसे मोजणाऱ्या माणसाचा मगदूर न ओळखून आतांपर्यंत जो मीं तुझ्याशीं लवळपणा केला त्याची मला अतिशय शरम वाटते! असो. झाली ती गोष्ट झाली; पण यापुढें मी तुझें तोंड पाहूं इच्छीत नाहीं.!'

शीलवंतीचे हे शब्द ऐकून माझ्या अंगाचा अगदीं थरकांप झाला. तीही तशीच क्षणभर स्तब्ध बसली. नंतर क्षणाभरानें जरा शांत होऊन म्हणते, 'अबुलफौरीज! आतां तुझें मुखावलोकन पळभरही मला नको. मी जातें व तुझी व्यवस्था काय करावयाची ती तुला कळवितें, तोंपर्यंत येथें बैस.' असें बोलून ती महालांतून चालती झाली. तिला अत्यंत क्रोध आलेला होता, व मी अतिशय खजील होऊन गेलों होतों. पण आम्हां उभयतांचेही हे दोन्ही विकार

वास्तविक भीतिदायक होते. अंतर्यामीं आम्हा दोघानाहीं निराळ्याच गोष्टीचा चटका लागून राहिला होता !

असो. शीलवंती अशा प्रकारें रागारागानें निघून गेली, तेव्हां आपणावर आतां कांहीं तरी मोठें जबरदस्त संकट गुजरणार असें मी सहजच भाकित केलें. माझा स्वभाव मोठा लहरी आहे. प्रेमाकरतां प्राण गेला तरी बेहत्तर आहे, व ज्यावर आपलें प्रेम आहे त्याच्या हातून जर तो गेला, तर त्यांत विशेष मजा आहे, असें मी मानणारा आहें. पण स्वतःचा जीव हा सर्व वस्तूंहून मनुष्यास प्यारा आहे अशी जी सार्वत्रिक म्हण आहे तिचेंच वेड सांप्रतच्या प्रसंगीं माझ्या डोक्यांत भरून, या संकटांतून आपली कशी तरी सुटका करून घेतली पाहिजे असें माझ्या मनांत आलें. पण हें घडावें कसें ? शीलवंतीच्या दासींचा मजवर सक्त पहारा असून माझ्या बापाचा अडत्या व परम मित्र हबीब—ज्याच्या घरीं मी उतरलों होतों—त्यास ही आपली स्थिति कळवण्यासही मला बिलकूल मार्ग नव्हता. असो, आपला काय सोक्षमोक्ष करावयाचा तो शीलवंती लवकरच करील असें मला वाटत होतें. पण तीन वार गेले तरी तिजकडून मला कांहींच निकाल न कळतां मी तसाच कुचमत पडलों होतों. लोक जें म्हणतात कीं, संकट यावयाचें असेल तर तें प्रत्यक्ष आलेलें पुरवलें, पण त्याच्या भयानें एकसारखें झुरत रहाणें हें मृत्यूपेक्षांही वाईट, तें अगदीं खरें आहे. मला ह्या अधल्यान् मधल्या स्थितीचा इतका कंटाळा येऊन गेला कीं, जें काय एकदां व्हावयाचें असेल तें होऊं दे परतें, पण अशा स्थितींत आयुष्य कंठण्यापेक्षां मरणही आलें तर पुरवेल अशी माझी अवस्था होऊन गेली !

असें होतां होतां एकदांचा निर्वाणीचा दिवस येऊन ठेपला. त्याचे आदले दिवशीं रात्रीं मला झोंप बिलकूल लागली नसून मी एकसारखा तळमळ करीत पडलों होतों. सारांश, इतके जे हे माझे संकटाचे दिवस गेले त्या सर्वांत ही रात्र अतिशय भयंकर

गली. उजाडल्यावर मी उठून कपडे करूं लागलों तों शीलवंतीचे पांच सहा गुलाम मजकडे आले. त्यांनीं आपल्याबरोबर दुसरे कित्येक लोक आणिले होते. त्यांचा पेहराव सिंहलद्वीपच्या लोकांच्याहूनें अगदीं निराळा होता. त्यांचा जो मुख्य होता त्यानें बराच वेळ लक्ष्यपूर्वक मजकडे पाहिलें. नंतर मोठ्या गांभीर्यानें तो मला ह्मणाला, 'चल माझ्यामागें.' मी निमूटपणें त्याच्या मागें चाललों. शीलवंतीच्या वाड्याबाहेर पडल्यावर मीं त्या लोकांपैकीं एकास विचारिलें, 'मला तुम्ही नेणार तरी कोठें?' त्यानें उत्तर केलें, 'तें आम्ही तुला सध्या सांगूं शकत नाहीं; कां कीं, तसें करण्याची आह्मांस सक्त मनाई आहे.' पुढें आम्ही बंदरापर्यंत तसेच गेलों, व त्या ठिकाणीं जहाज तयार होतें त्यांत सर्वजण बसलों.

आमचें जहाज चालू झाल्यावर जहाजाचा कमान मला म्हणाला, 'मी गोवळकोंडचा रहिवाशी असून शीलवंतीनें तुला गुलाम ह्मणून मला विकलें आहे. तिनें तुझ्या संबंधानें मला फार बजावून सांगितलें आहे कीं, याला कधींही परत बसऱ्यास जाण्यास मोकळीक देऊं नका.' याहून ज्यास्त कांहीं एक त्यानें मला सांगितलें नाहीं, व शीलवंतीच्या संबंधानेंही त्यानें मला कांहीं एक विचारलें नाहीं. यावरून, मजवर ती फिदा झाल्याची व तिचें म्हणणें मीं नाकबूल केल्याची गोष्ट तिनें त्यास कळूं दिली नसून, मला अशा रीतीनें हातानिराळा जो तिनें केला त्याचेंही कारण त्यानें मला विचारण्याचे भरीस पडूं नये असें त्याजपासून तिनें वचन घेतलें असावें असें मीं अनुमान केलें.

अशा प्रकारें शीलवंतीनें जो माझा सूड उगवला त्याबद्दल तिला मी विशेष दोष देऊं इच्छीत नाहीं; कां कीं, तिच्या संबंधानें माझ्या हातून जो एके प्रकारें अन्याय व निष्ठुरता घडली त्याबद्दल याहून विशेष कडक शासन ती मला करील असाच माझा अजमास होता, व एका अर्थी त्या शासनास मी योग्यही होतों. मजवर असा प्रसंग आल्याकारणानें मला यावज्जीव आपल्या बापाची भेट अगर देशाचें

दर्शन होण्यास मार्ग नाहीं, हें माझ्या मनांत येऊन मला प्रथम अतिशय दुःख झालें. पण त्यास सादर झाल्यावांचून परिणाम नाहीं, हें मनांत आणून मीं आपला दुःखभार होईल तितका कमी करण्याचा यत्न चालविला. माझा धनी मोठा सज्जन असून गुणग्राहक होता. तेव्हां एकाद्या सांगकाम्याप्रमाणें मी त्याच्याशी न वागतां मोठ्या धूर्ततेनें व तत्परतेनें त्याचें मन अगोदरच जाणून बहुतेक सर्व कामें करीत असें. तेणेंकरून दिवसेंदिवस त्याची मर्जी मजवर फारच बसत चालली.

आम्हीं सिंहलद्वीपच्या बंदरांतून गलबत जें हांकारलें तें त्या बेटास वळसा घालून उत्तरेकडे बंगालच्या उपसागरांत नेलें. तेथें आम्ही येवढ्या भयंकर वादळांत सांपडलों कीं, तसा प्रसंग मजवर आजपर्यंत कधींच आला नव्हता. या वादळाच्या योगानें आमचें गलबत आग्नेयीकडे फारच दूर जाऊन गोवळकोंड्यास जाण्याचा आमचा मार्ग भलतीकडेच राहिला. आम्हीं गलबत आपल्या आटोक्यांत ठेवण्याविषयीं होता तितका प्रयत्न केला. पण तो सर्व व्यर्थ जाऊन आम्ही त्या अफाट समुद्रांत कोठें जाऊन पडलों हें आम्हांस कळेनासें झालें. शेवटीं खलाशी लोक अतिशय दमून जाऊन निराशेनें त्यांनीं त्यांजवर मेहनत करण्याचें सोडून दिलें, व वारा आणि समुद्राच्या लाटा हीं त्यास जिकडे नेतील तिकडे नेवोत असें म्हणून त्यांनीं आपला हवाला सर्वस्वी ईश्वरावर टाकून दिला.

हें वादळ बहुतेक एकसारखें पंधरा दिवस चाललें होतें. या अवधींत वाऱ्याचा जोर इतका कांहीं विलक्षण होता कीं, त्यानें आम्हांस तितक्यांत सुमारें पांचशें कोस आमच्या मार्गाच्या बाहेर कोणीकडच्या कोणीकडे नेऊन टाकिलें. या प्रसंगीं आमच्या डाव्या बाजूस सुमात्रा व जावा, उत्तरेस मलाका आणि दक्षिणेस फिलिपाईन हीं बेटें असून खलाशांस गैरमाहीत अशा मध्यंतरींच्या अफाट समुद्रांत आम्ही येऊन पडलों. शेवटीं वाऱ्याचा जोर कमी झाला, व तो पूर्वेच्या बाजूनें बेताचा वाहूं लागला. येणेंकरून

त्या मनुष्याचें हें शेवटचें बोलणें ऐकून तर याचें डोकें फिरलें असावें अशी जी पूर्वी आह्मीं कल्पना केली होती ती अधिकच दृढ झाली. दुसरें असेंही आम्हांस वाटलें कीं, भुकेपुढें याला कांहींच सुचत नाहीं, यामुळेंही कदाचित् हा असें बोलत असेल. भुकेमुळें तो पाय आपटायाला लागला, दांत खाऊं लागला, आणि भयंकर रीतीनें डोळे फिरवूं लागला. शेवटीं एकदांची त्याजपुढें अन्नाची रास येऊन पडली. त्याबरोबर त्याचा इतका विलक्षण अधाशीपणा दिसून आला कीं, तो पाहून आह्मी अगदीं आश्चर्यचकित होऊन गेलों ! तें अन्न चांगल्या पांच सहा धिप्पाड पुरुषांना पुरण्यासारखें होतें. तरी त्यानें तें हां हां म्हणतां चट्ट करून टाकिलें. नंतर त्यानें, जणूं काय अधिकाराच्याच जोरानें, आम्हांला आणखी अन्न घेऊन येण्यास सांगितलें. तेव्हां हा राक्षसी प्राणी खातो तरी किती, हें पाहण्यासाठीं कप्तानानें आणखी पहिल्याइतकें अन्न आणवून तें त्यास खाण्यास दिलें. हा दुसरा हमालाही त्यानें पहिल्याप्रमाणेंच पट्दिशीं नाहींसा करून टाकिला. तथापि या वेळीं आम्हांला वाटलें कीं, आतां ज्यास्त कांहीं हा मागणार नाहीं. पण आमची ही समजूत चुकीची ठरली; कां कीं, त्यानें आणखी आमच्यापाशीं मागणी केलीच. तेव्हां जहाजावरील एका नोकरास त्याचा हा विलक्षण खादाडपणा व दांडगेपणा सहन न होऊन तो त्याला घालवून देण्याकरितां धक्के देऊं लागला. त्याबरोबर त्यानें आपले दोन्ही हात त्या नोकराच्या खांद्यांवर टाकून आपल्या तीक्ष्ण नखांनीं त्याचें पोट फाडून त्याचे तुकडे तुकडे केले ! हा भयंकर प्रकार पाहून आमचे लोक पराकाष्ठेचे चवताळून गेले, व एकदम पांच पन्नास तरवारींचे घाव मोठ्या जोरानें त्याच्या अंगावर पडले. पण चमत्कार असा झाला कीं, त्याला बिलकूल इजा न होतां आमच्या मंडळीच्या तरवारींना मात्र खांडी पडल्या ! कां कीं, त्या राक्षसाच्या अंगाचें कातडें काळ्या पत्तरासारखें कठीण होतें ! याप्रमाणें आमच्या तरवारींपासून त्याचें कांहीं एक झालें नाहीं, पण

आम्हांला मात्र त्यानें बक्षिशी दिल्यावांचून सोडलें नाहीं ! त्यांत आमच्यांपैकीं एकजण जो विशेष खवळलेला होता व त्याचा सूड घेण्यासाठीं दांतओंठ खात होता, त्याला तर त्यानें एकदम ओढून असें कांहीं जोरानें आपटलें कीं, त्यासरसें त्याचें डोकें व ऊर फुटून आमच्या डोळ्यांदेखत त्यानें प्राण सोडला !

आमच्या तरवारींचा कांहींएक उपयोग होत नाहीं असें जेव्हां आम्हांस दिसून आलें, तेव्हां आम्ही सर्व मिळून त्याजवर हल्ला करून त्यास समुद्रांत लोटून देण्याचा यत्न करूं लागलों. पण त्याची शक्ति अगोदरच अचाट पडली, व खेरीज त्यानें गलबताचें फळींत आपलीं नखें इतकीं जोरानें रोंवलीं कीं, समुद्राच्या कितीही मोठमोठ्या लाटा आल्या तरी त्यांच्यानें जसें त्यांतील खडकांचें कांहीं एक वांकडें होत नाहीं, त्याप्रमाणें आमचा सारा यत्न निष्फळ झाला ! आमच्या क्रुद्ध व दुःखी मुद्रा पाहून त्याचे मनाला कांहींच न वाटतां तो उलटा हंसून म्हणाला, 'गडेहो ! तुम्हीं हा जो उद्योग आरंभला आहे तो अगदीं अविचाराचा आहे. त्यापासून तुमचा कांहींएक फायदा होणार नाहीं. तुम्हांला आपल्या जिवाची परवा असेल तर तुम्ही आपले निमूटपणें माझें ऐकत चला. तुमच्यासारखीं धिंगामस्ती करणारीं शेंकडों घुंगुरटीं मीं आजपर्यंत रेशमासारखीं मऊ करून टाकिलीं आहेत. आतां थोडक्यांत तुम्हांस इतकेंच सांगतों कीं, माझ्या इच्छेविरुद्ध तुम्हीं काडीइतकें वर्तन केल्यास तुमच्या दोघां सोबत्यांची जी गत मीं इतक्यांत केली तीच तुह्मां सर्वांची करून टाकीन हें पक्कें लक्ष्यांत ठेवा.'

हे त्या राक्षसाचे शब्द ऐकून आमची अगदीं पांचांवर धारण बसून गेली, व आम्हीं त्याची कोणत्याही प्रकारें अवज्ञा न करण्याचा निश्चय केला. आम्हीं मुकाट्यानें पुनः अन्नाची रास त्याजपुढें घातली. त्यानें पूर्वीप्रमाणेंच त्या अन्नाचा एका क्षणांत चट्टामट्टा केला. आतां तरी त्याची भूक शांत झाली असेल असें आम्हांला वाटलें. पण तसें बिलकूल झालें नाहीं; येवढेंच नव्हे, तर त्याला

उलटी आणखी ज्यास्तच खा खा सुटली ! परंतु आम्ही सारे नमून आहों असें शेवटीं जेव्हां त्याचे नजरेस आलें, तेव्हां तो फार खुषींत आला. त्यानें बोलून दाखविलें कीं, ' तुम्हीं माझी शक्ति न जाणून माझे विरुद्ध जो वेडेपणाचा यत्न केला, त्यामुळें मला निकरावर यावें लागलें, याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटते. बाकी खरें पुसाल तर, तुम्हीं मला समुद्रांतून काढलें व माझे प्राण वांचविले याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहें; कारण आणखी कांहीं वेळ मी तसाच पाण्यांत राहिलों असतों तर खचीत उपास पडून मरून गेलों असतों. आणखी हेंही तुम्हांला सांगतों कीं, अन्नसामग्रीनें भरलेलें दुसरें एखादें जहाज मला आढळल्याबरोबर त्यावर मी जाईन; व मग अर्थातच मजपासून तुम्हांला होत असलेला त्रास नाहींसा होईल.' हें तो मोठ्या रंगांत येऊन बोलत होता व मधून मधून नानाप्रकारच्या गमती करीत होता. वास्तविक पुसाल तर त्याच्या संबंधानें आमच्या मनांत जी पराकाष्ठेची धास्ती बसून गेलेली होती ती जर मुळींच नसती, तर त्याच्या या रंगेलपणापासून आम्हांला मोठी करमणूक झाली असती.

पुढें लागलाच त्यानें चवथ्यानें जेवणाचा हुक्का मागितला. तो आम्हीं भरल्यावर मात्र दोन तासपर्यंत त्यानें कांहींएक मागितलें नाहीं. या अवधींत तो इतका शांत व मनमिळाऊ दिसत होता कीं, आह्मांला त्याचा मोठाच चमत्कार वाटला. त्यानें आम्हांपैकीं प्रत्येकाला त्याचा देश व तेथील रीतीभाती वगैरे विचारल्या. आम्हांला वाटलें कीं, यानें जो आतांपर्यंत अमर्याद आहार केला आहे त्याच्या योगानें याला मांद्य येऊन याला झोंपेची गुंगी येईल, व तसें झालें म्हणजे तो जागा होण्यापूर्वी एकदम आपणांला त्यास समुद्रात लोटून देतां येईल. येवढाच काय तो आम्हांला आपल्या संरक्षणाचा आशातंतु राहिला होता. कारण, जरी आम्हांजवळ अन्नसामग्री भरपूर होती, तरी त्याच्या ह्या खाण्याच्या प्रमाणाचा विचार केला असतां ती सरून जाण्यास फारसा वेळ लागणार

नव्हता. असो, पण हा कांटा काढून टाकण्याचा जो एकच शेत्र-टचा उपाय आमच्या लक्ष्यांत आला होता, व ज्याच्या आशेवर आम्ही मोठ्या उड्या मारीत होतों, तोही अगदींच कुचकामाचा ठरला. कारण त्या दुष्टानें, जणूं काय आमच्या मनांतला हेतु अंतर्ज्ञानानें ओळखून आम्हांस सांगून टाकलें कीं, 'मला झोंप कधींच येत नाहीं!' तो आणखी असेंही म्हणाला कीं, 'इतर प्राण्यांस विश्रांतीकरितां व थकवा जाण्याकरितां निद्रा अवश्य असते. पण तसें माझें मुळींच नाहीं. मी जें पुष्कळ अन्न खातों, तेंच मला विश्रांतीच्या ऐवजीं उपयोगीं पडून माझा थकवा नाहींसा करतें. यामुळें मला झोंपेची मुळीं गरजच लागत नाहीं.'

त्या राक्षसी माणसानें आम्हांपैकीं प्रत्येकास आपापली हकीकत सांगण्यास सांगितल्यावरून ती आम्हीं इत्थंभूत त्यास कथन केली. या करमणुकीनें तरी निदान याचा थोडा डोळा लागेल असें आम्हांस वाटलें होतें. पण तसें कांहीं एक घडून न येतां त्याच्या म्हणण्याचाच प्रत्यय आम्हांस उत्तम प्रकारें आला! इतकें झालें तेव्हां मात्र आम्हांस खचीत वाटलें कीं, आतां आमच्या नशिबाच्या खडतरपणाची कमाल झाली! इतक्यांत एकाएकीं आकाश सर्व अंधारमय होऊन गेलें. तेव्हां आम्हांस असें वाटलें कीं, आतां लव-करच वादळ होणार. या योगानें आम्हांस एके प्रकारें आनंदच झाला. कारण आम्हांस वाटलें कीं, कदाचित् आमची सुटका व्हाव-याची असली तर अशाच चमत्कारिक योगानें होईल; एरव्हीं या स्थितींत ती होण्याचा मुळींच रंग दिसत नाहीं. आम्हांस असें वाटलें कीं, आमचें गलबत वादळांत सांपडून एखाद्या बेटाच्या नजीक खडकाला आपटून फुटून गेल्यास फिरून आपणांला आपले प्राण वांचवितां येतील व अशा प्रकारें या दुष्टाच्या संगतीपासून आपली मुक्तता करून घेतां येईल. हा वादळांत सांपडण्याचा प्रकार आम्हांस आणखीही एका कारणाकरितां बरा वाटला. तें कारण हें कीं, आमच्या जवळची सर्व अन्नसामग्री संपल्यावर मग आम्हां

स्वतःवरच या राक्षसाच्या भक्ष्यस्थळीं पडण्याचीं पाळी येईल हें आम्ही पक्कें जाणून होतों !

सारांश, आतां लवकर मोठें थोरलें वादळ केव्हां होईल याची आह्मी मार्गप्रतीक्षा करीत बसलों, व जें कोणीं कधींच अशा प्रसंगीं केलें नसेल तें आम्हीं या वेळीं केलें—काय तर, या क्रूराच्या हातीं सांपडण्यापेक्षां आम्हांस वादळांत समुद्रामध्यें बुडवून मार, अशी आम्हीं परमेश्वराची प्रार्थना केली ! पण सांगण्यास दुःख वाटतें कीं, आमचें हें सर्व अनुमान व आशा अगदीं फुकट गेली; कां कीं, आकाश जें अंधारमय झालें त्याचें कारण वादळ वगैरे कांहींएक नसून, तिकडील समुद्रावर आढळणारा 'रुख' या नांवाचा विजातीय प्रचंड पक्षी आमच्या नजीक आलेला होता, हें होय. हा विलक्षण प्राणी मोठ्या जोरानें गलबतावर आला, व आह्मां सर्वांच्या मध्यभागीं राजाप्रमाणें खुशाल मजा मारीत बसलेल्या त्या राक्षसी माणसास एकदम उचलून घेऊन गेला ! त्या पक्ष्यानें इतकें अकल्पित हें काम केलें कीं, त्या राक्षसास आपल्या संकटाच्या निवारणार्थ उपाय करण्यास बिलकूल अवसर सांपडला नाहीं ! इतकेंच नव्हे, तर त्यानें हें धूड आमच्यांतून केव्हां उचललें तें देखील आह्मांस प्रथम कळलें नाहीं ! मागाहून जेव्हां आम्ही वर पाहूं लागलों तेव्हां तें आमच्या लक्षांत आलें !

त्या दोघांचा विलक्षण झगडा सुरू झाला. तो मनुष्य देहभानावर आल्यावर जेव्हां त्याला आढळून आलें कीं, आपणास एका पक्ष्यानें आपल्या पंज्यांत धरलें आहे, तेव्हां तो आपल्या संरक्षणाच्या उद्योगास लागला. त्याचे हात मोकळेच होते, त्यामुळें त्याला आपल्या अणकुचीदार नखांचा उपयोग करण्यास कांहीं अडचण नव्हती. तीं नखें त्यानें त्या पक्ष्याच्या पोटांत खुपसून तें फाडलें, व त्यांतलें मांस बकाबक तो खाऊं लागला. त्या पक्ष्यास दुःखाच्या वेदना सहन न होऊन त्यानें ज्या भयंकर किंकाळ्या फोडल्या त्यांच्या योगानें दशदिशा दणाणून गेल्या. त्या पक्ष्यानेंही आपल्या शत्रूचा सूड

घेण्याकरितां सवड साधून आपल्या एका पंज्यानें त्याचे दोन्ही डोळे फोडून टाकले. याप्रमाणें त्या पक्ष्यानें त्या राक्षसाची त्रेधा उडवून टाकली, तथापि त्यानें आपली चिकाटी न सोडतां, पक्ष्याच्या पोटां-तलें बहुतेक मांस पार केलें. शेवटीं पक्ष्यानें निराश होऊन आपली चोंच त्या राक्षसाच्या डोक्यांत मोठ्या आवेशानें खुपसून त्याचा मोक्ष करून टाकला ! यानंतर लागलेच ते दोघेही पूर्णपणें हतवीर्य होऊन आमच्या गलबतानजीकच धाडकन् समुद्रांत पडून मरून गेले.

अशा प्रकारें परमेश्वराच्या अगाध लीलेनें आम्ही एकाएकीं मृत्यू-च्या हातून सुटलों. आमच्या गलबतावरील सर्व लोकांस त्या प्रसंगीं इतका कांहीं आनंद झाला कीं, घटकाभर आह्मांस त्याखेरीज दुसरें कांहींच सुचेना. प्रत्येकजण हर्षातिशयांत निमग्न होऊन हंसूं खेळूं व नाचूं बागडूं लागला, व ज्या पक्ष्यानें आमचा वैरी निर्दाळला त्याच्या मरणाबद्दल सर्वांना मोठी हळहळ वाटली. असो; पुढें आह्मीं आपलें गलबत तसेंच चालविलें. कित्येक दिवसपर्यंत आम्हांला या विलक्षण गोष्टीखेरीज दुसरी गोष्टच सुचली नाहीं. आम्हांस राहून राहून असें आश्चर्य वाटावें कीं, जगांत अशा प्रकारची माणसांची जात कशी उत्पन्न व्हावी कोण जाणे! पुढें बरेच दिवसपर्यंत आम्हांस अनुकूल वारा लागून शेवटीं एकदांची जमीन आमच्या दृष्टीस पडली. त्याबरोबर आम्हीं वेध घेऊन पाहिलें तों जावा बेटाच्या पश्चिमेस व सुमात्रा बेटाच्या पूर्वेस आमचें गलबत असल्याचें आह्मांस दिसून आलें. तेथून संडाची सामुद्रधुनी जवळच होती; तिकडे आम्हीं आपल्या गलबताचा रोंख वळविला. आणि सुदैवानें तितक्यांत असें झालें कीं, वाऱ्याचा रोंख पूर्वेकडे होता तो बदलून उत्तरेकडे फि-रला. त्यामुळें आम्हांस त्या सामुद्रधुनींतून जाणें फारच सोपें पडलें. आम्ही थोडक्याच वेळांत तिच्या पार होऊन ब्यांटम नामक बंदरीं पोहोंचलों. ब्यांटम येथें आम्हीं सामानसुमानाची भरती करून घे-तली. तेथून बटेविया नामक शहर सुमारें तीस पसतीस कोस होतें. त्या ठिकाणीं आमच्या कप्तानास कांहीं काम असल्यामुळें तिकडे

आम्हीं आपलें गलबत चालविलें. या गोष्टीचा मला फारच आनंद झाला; कां कीं, बटेविया हें मोठें नांवाजलेलें शहर असून तेथें चीनच्या राज्यांतील बहुतेक सर्व प्रेक्षणीय वस्तु पहाण्यास सांपडतात असें मला माहीत होतें. असो, तेथून पुढें आम्हीं आपलें गलबत गोवळकोंडच्या राज्याकडे हांकारलें, व सुमारें एक महिन्यानें त्याच्या राजधानींत येऊन दाखल झालों.

आमच्या गलबताचा कप्तान अत्यंत लोकप्रिय असल्यामुळें तो शहरांत जातांच लोकांनीं त्याचा मोठा सन्मान केला. तो फार दिवसांनीं सुरक्षित परत आला हें पाहून सर्व लोकांस व विशेषेंकरून त्याच्या मुलांमाणसांस जो कांहीं आनंद झाला त्याचें किती तरी वर्णन करावें! त्याची बायको व मुलगी यांवर त्याचें पराकाष्ठेचें प्रेम होतें. त्या उभयतांच्या स्वाधीन त्यानें मला करून त्यांस असें सांगितलें कीं, 'हा गुलाम मला फारच पसंत पडला आहे, व म्हणून मीं तो तुम्हांला दिला आहे. तो जरी गुलाम आहे, तरी त्यास तुम्ही घरांतल्या माणसाप्रमाणें वागवून तो जें काय स्वसंतोषानें काम करील तेवढेंच त्याजकडून घेत जा.' मींही आपल्या हुशारीनें, शहाणपणानें व उद्योगतत्परतेनें थोडक्याच काळांत त्यांची इतकी मर्जी संपादली कीं, त्या घरांत माझ्याखेरीज पान हलेनासें होऊन गेलें. माझे सोबती म्हणजे त्या घरांतील दुसरे गुलाम यांना वास्तविक पहातां या गोष्टीमुळें माझा हेवा उत्पन्न व्हावा, पण तसें बिलकूल झालें नाहीं. मीही अर्थात् आपल्याकडून होईल तितका त्यांच्या उपयोगीं पडत असें, व पुष्कळ वेळां माझ्या वशिल्यानें त्यांना त्यांच्या योग्यतेपेक्षां ज्यास्त बक्षिशी घरांतील मनुष्यांकडून मिळत असे.

माझा धन्याचा व माझा ऋणानुबंध वाढतां वाढतां इतका वाढला कीं, शवटीं एके दिवशीं तो मला म्हणाला, 'अबुलफोरीज, (कारण मीं आपलें नांव गांव त्याजपाशीं कांहींएक चोरलें नव्हतें) तुला मी माझ्या इतर गुलामांप्रमाणें न लेखतां तुझी

योग्यता विशेष रीतीनें जाणत आहें हें तुझ्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें, नसेलच. प्रथम तूं जेव्हां माझ्या दृष्टीस पडलास तेव्हां तुजविषयीं माझ्या हृदयांत अनुकंपा उत्पन्न झाली, व त्याच वेळेपासून, नशिबानें तुझ्या कपाळीं जें दास्य आलें त्याजपासून तुला होणारें दुःख होईल तितकें कमी करण्याविषयीं माझा यत्न सतत चालू आहे; व आजमितीस तर तुजविषयीं माझा ग्रह किती अनुकूल झाला आहे, तें मी आतां जें काय तुजशीं बोलणार आहें त्यावरून पूर्णपणें तुझ्या लक्ष्यांत येईल. हें पहा, माझी मुलगी तूं पाहिलीच आहेस. सौंदर्यांत तिची बरोबरी करणारी या गोवळकोंड्यांत एकही मुलगी असेल कीं नाहीं याची मला शंका आहे. ह्या माझ्या सुंदर आवडत्या व एकुलत्या एक मुलीचें तुझ्याशीं लग्न लावून द्यावें असा माझा विचार ठरला आहे. या बाबतींत तिच्याशीं माझें बोलणें झालें आहे त्यावरून तूं तिला आवडतोस असें मला समजलें आहे.'

कप्तानाचें हें बोलणें ऐकून मी अगदीं गोंधळांत पडून गेलों, व मला कांहीं एक उत्तर देतां येईना. त्यावरून आपण बोललों ही गोष्ट यास रुचली नाहीं हें त्यानें सहज ताडलें. तो मला म्हणतो, 'काय? माझें बोलणें तुला पसंत पडलें नाहीं? तुझ्यासारख्या गुलामगिरीच्या स्थितींतल्या मनुष्यास मजसारख्या थोर व श्रीमान् मनुष्याचा वारस होण्याची व माझी सुंदर कन्या ( हिचें नांव फक्रिनिषा असें होतें ) ही प्राप्त होण्याची सोन्यासारखी संधि आली असतां त्वां ती दवडावी या गोष्टीचें मला मोठें आश्चर्य वाटतें!' मीं म्हटलें, 'महाराज, मजप्रमाणें तुम्ही मुसलमान असतां तर तुम्हीं मनांत आणलेला विचार मला किती मानवला असता, हें मला बोलून देखील दाखवितां येत नाहीं! पण तुम्ही पडलां मूर्तिपूजक,—' तो मध्येंच बोलतो, 'येवढीच तुझी अडचण असेल तर ती सहज नाहींशी करतां येईल. कशी ती ऐक. मीं मुसलमानी धर्म स्वीकारण्याचा निश्चय केला आहे, व माझ्या मुलीचाही तोच बेत झाला आहे. माझ्या धर्मगुरूंनीं आमच्या धर्माविषयींची पूज्यबुद्धि माझ्या

मनांत भरवून देण्याचा जरी आजपर्यंत अतिशय यत्न केलेला आहे, तरी खरोखर मी तुला सांगतों कीं, इहलोकच्या जड वस्तूंना दैवत मानणें या गोष्टीचा माझ्या मनाला तिटकारा वाटूं लागला आहे, व अशा प्रकारच्या या जगांतील काल्पनिक देवतांहून अत्यंत श्रेष्ठ असा कोणी तरी एकच परमेश्वर या ब्रह्मांडाचा नियंता आहे, अशी माझ्या मनाची खात्री झाली आहे; म्हणून, अबुलफौरीज, तूं कांहीं एक शंका मनांत न आणतां व यत्किंचितही विलंब न लावतां माझ्या ह्मणण्यास रुकार दे.'

फक्रिनिशा ही खरोखरच मोठी सुंदर होती. यास्तव ती मला देण्याचा माझ्या धन्यानें जो विचार केला होता त्यांत माझें निःसंशय हित होतें. तसेंच धर्मसंबंधाची अडचण काढून टाकण्याची जी त्यानें योजना केली होती तीही कांहीं वाईट नव्हती. तथापि एकंदरीनें हा संबंध आपणास सुखकारक होईल असें माझें मन घेईना. पण ही गोष्ट आपण धन्यास उघडपणें सांगितली असतां, शीलवंतीनें आपणास जसे खडे चारलें तसाच कठिण प्रसंग येथेंही आपणावर येईल असें मला वाटल्यावरून, मीं होय नाहीं कांहींच न सांगतां ती गोष्ट तशीच मोघम ठेविली. पण असें करणें हा माझा रुकारच असें समजून माझ्या धन्यानें आपल्या बायकोस व मुलीस, सदहू गोष्टीस माझी कबुली असल्याचें जाऊन कळविलें.

थोडक्याच वेळानें फक्रिनिशा हिजशीं माझें संभाषण झालें. त्या वेळीं तिची वृत्ति अतिशय आनंदी दिसली. त्यावरून मी तिच्या मनांत फारच भरलों होतों असें मला दिसून आलें. ती मला म्हणाली, 'अबुलफौरीज, बाबांनीं माझें तुजशीं लग्न लावून देण्याचा विचार केल्यामुळें मला परमानंद झाला आहे. कारण, यांत तुझा जरी कदाचित् तोटा असला तरी त्याकडे लक्ष्य न देतां, माझें पाणिग्रहण केल्यावर जेणेंकरून माझ्या सुखाची वृद्धि होईल तें करण्यास सर्व प्रकारें तूं झटशील अशी माझी खात्री आहे.' मीं तीस ह्मटलें, 'सुंदरी! मजबद्दल तुला जी खात्री वाटत आहे

ती अगदीं यथार्थ असून तुजकरतां मी करणार नाहीं अशी कोणतीही गोष्ट या जगांत नाहीं.' ती बोलते, 'तूं मजकरितां काय करावें म्हणून ह्मणशील तर ऐक या शहरांत एक व्यापारी आहे. त्याचा मुलगा व मी या उभयतांचीं मनें एकमेकांवर बसलीं आहेत. त्या व्यापाऱ्यानें मजबद्दल माझ्या बापाशीं अनेक वेळां गोष्ट काढली. पण त्याच्या व आमच्या घराण्याचा फार पूर्वींपासून द्वेष असल्यामुळें माझा बाप त्यास नकार करतो. तर आतां ही गोष्ट सिद्धीस नेण्याकरतां मीं काय युक्ति योजिली आहे ती सांगतें. तूं माझ्याशीं रीतीप्रमाणें लग्न लावावेंस; मग दुसरे दिवशीं जणूं काय माझा तुला कांहीं कारणामुळें रोष येऊन तूं माझा घटस्फोट करावास. पुढें या गोष्टीचा तुला पश्चात्ताप झाला असा बहाणा करून तूं फिरून माझा स्वीकार करण्याची इच्छा करावीस. पण पुनः तुझा माझा संयोग होण्यास, धर्मप्रमाणें मध्यंतरीं कोणाशीं तरी माझा निका लागला पाहिजे; तर त्या प्रसंगीं तूं माझ्या प्रियकराची त्या कामीं योजना करावीस.' मीं म्हटलें, 'पुरे, मी सर्व समजलों. कोणीकडून तरी तुझ्या प्रियकराचा व तुझा संयोग व्हावा, येवढ्याचकरितां मीं तुझ्याशीं लग्न लावावें ह्मणून तूं इच्छितेसना? ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें मी करण्यास तयार आहें. तुजसारख्या सुंदरीचें मजसारख्यास अत्यंत दुर्लभ असें प्रेमसौख्य अनायासें लाधलें असतां त्यास जाणूनबुजून अंतरणें ही गोष्ट जरी परम कठिण आहे, तरी ती करण्याइतकें मानसिक धैर्य माझ्या अंगीं आहे. पण अशी गोष्ट मीं केली असतां तुझा बाप मला काय ह्मणेल? त्याचे मजवर केवढे उपकार आहेत हें तूं जाणतच आहेस. माझी अशी वर्तणूक पाहून तो अत्यंत चकित होईल, व मला बोलबोलून माझ्या टाळक्याचा केंसन्केंस नाहींसा करील. तर त्या प्रसंगीं मी त्यास काय उत्तर देऊं?' ती म्हणते, 'त्या संबंधानें तूं कांहींएक फिकीर करूं नको. मी जसें तुला करायाला सांगेन तसें तूं बरोबर वठवून दे. मग तुजवर कोणताही दोष न येईल असें करण्याचें मजकडे लागलें.'

फक्रिनिसा हिनें याप्रमाणें माझी खात्री केल्यावर, ती जसजसें सांगेल तसतसें करून तिच्या सुखाचा मार्ग सुलभ करण्याच्या कामास मी लागलों. माझें आश्वासन तिला मिळाल्यावर तिलाही मोठा आनंद झाला, व आम्हां उभयतांचा विवाहसमारंभ लवकर उरकून टाकण्याविषयीं तिनें बापाच्या मागें एकसारखा तगादा लावला. तिनें लागलीच मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली, व थोड्याच दिवसांनीं आम्हां उभयतांचा विवाह झाला. फक्रिनिसा ही अत्यंत सुंदर व प्रेमळ होती. तथापि तिला दिलेलें वचन पुरें करण्याकरितां मीं आत्मसंयमन करून तिजशीं नवऱ्याचें नातें केवळ नांवाला मात्र ठेविलें, व ही जणुं काय कोणी एकानें आपली ठेवच आपल्या पतीवर आपणापाशीं थोडे दिवस ठेविली आहे, तर तिला हात न लावतां जशीच्या तशीच ती त्याची त्याला दिली पाहिजे, असें माझ्या अंतःकरणांत पुरतें बाणून गेलें होतें. ही मौल्यवान् ठेव मीं लवकरच कशी परत केली तें सांगतों. लग्न झाल्यावर लवकरच मीं फक्रिनिसा हिचा घटस्फोट केला. तेव्हां मीं भविष्य केल्याप्रमाणें तिचा बाप अत्यंत आश्चर्यचकित होऊन या गोष्टीचा खुलासा विचारण्याकरितां माझ्या घरीं आला. (कारण, माझें लग्न झालें त्याच दिवशीं मी फक्रिनिसा इजसह निराळ्या घरांत रहावयास गेलों होतों.) तिचा बाप मला विचारतो, 'अहो, तुम्हीं माझ्या मुलीची काय म्हणून काडी तोडून दिली?' मीं उत्तर केलें, 'याचें कारण असें कीं, तिचें वास्तविक प्रेम मजवर नसून दुसऱ्याच एका गृहस्थावर बसलें आहे. तेव्हां जिचा आपला दिल एक नाहीं, अशा स्त्रीचा उपभोग तिच्या इच्छेविरुद्ध मारून मुटकून घेणें अगदीं गैरवाजवी आहे असें मला वाटल्यावरून मला तीस सोडचिट्ठी देणें भाग पडलें.' माझें येवढें नीतिधैर्य पाहून त्याला हंसूं आलें व तो मला ह्मणाला, 'तुमच्या या बोलण्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं. ती अजून हूड आहे, तेव्हां जसजसें तिला समजूं लागेल तसतशी तुह्मांवर तिची प्रीति वृद्धिंगत होईल. तर तुह्मी फोक

विचार करून तिचा फिरून स्वीकार कराल अशी मला उमेद आहे.' मीं त्याच्या तोंडापुरतें त्याला होय ह्मटलें. तेव्हां तो ह्मणतो, 'आतां मी गांवांत फिरतो, व तुह्मी पुनः मुलीचा स्वीकार करण्यापूर्वी, धर्मशास्त्राप्रमाणें थोडा वेळ तिच्याशीं एखाद्याचा निका लागला पाहिजे, त्याकरितां कोणी माणूस पाहून त्याला आज रात्रींच काजीसुद्धां येथें घेऊन येतों. मग रात्रीच्या रात्रीं हा विधि उरकून गेल्यावर, उदईक त्या मनुष्यानें फक्रिनिषा हिचा घटस्फोट केला ह्मणजे मी तुह्मांकडे येईन, आणि नंतर आपण पुढच्या तजविजीस लागूं.'

फक्रिनिषा हिचा बाप मजकडे आला त्या वेळेस त्याची मुद्रा फार खिन्न होती. पण तो परत जातांना त्याला बरेंच समाधान वाटलें, असें मला दिसलें. त्यानें, मुलीशीं थोडा वेळ निका लावण्याकरितां जो इसम पहावयाचा, त्यासंबंधी सर्व काम मग मजवरच सोंपविलें. तेव्हां मीं स्वतः शहरांत फिरून फक्रिनिषा हिच्या प्रियकराचा तपास लावला, व त्याच रात्रीं दुय्यम काजीसमोर त्या दोघांचा निका लावण्याची तजवीज केली.

त्या उभयतांनीं ती रात्र एकमेकांच्या समागमांत घालवल्यावर दुसरे दिवशीं फक्रिनिषा हिचा प्रियकर हा जेव्हां अर्थातच तिची काडी तोडून टाकीना, तेव्हां मी तिच्या बापाकडे गेलों, व त्या मनुष्यानें आज सकाळींच काडी तोडून देण्याचें वचन दिलें असतां तो आतां उलटून पडला आहे असें त्यास सांगून, या गोष्टीमुळें आपणाला परमावधीचें दुःख झालें आहे असें बाह्यात्कारीं त्यास दाखविलें.

फक्रिनिषा हिचा बाप म्हणतो, 'थांबा, तो मनुष्य कोण आहे तो मला अगोदर पाहूं द्या. जर तो कोणी भिकारी गल्लीकुचींतला असेल, तर त्यास सामदामानें मी ताळ्यावर आणून मुलीला तो सोडून देईल असें सहज करीन.' याप्रमाणें तो बोलत असतां तितक्यांत दुय्यम काजी तेथें येऊन फक्रिनिषा इच्या बापास म्हणाला, 'अहो साहेब, तुमच्या जांवईबोवांना तुमच्या मुलीचा फिरून अंगीकार

करितां यावा म्हणून मध्यंतरीं रिवाजाप्रमाणें तिच्याशीं निका लावण्या-सार्ठी तुम्हीं ज्याची योजना केली, तो सामान्य मनुष्य नसून अमीर नांवाच्या श्रीमान् व्यापाऱ्याचा मुलगा आहे, व तो तुमच्या मुलीस सोडचिठी देऊं इच्छीत नाहीं. यास्तव तुमच्या ह्या जांवईबोवांस ती जन्माची अंतरली. अमिराचा तुमचा बरेपणा नाहीं ही गोष्ट मला ठाऊक आहे. पण आतां ज्या अर्थीं त्याच्या मुलाशीं अशा रीतीनें तुमच्या मुलीचें लग्न लागून ती त्याच्या जन्माची सोबतीण झाली आहे, त्या अर्थीं तुम्ही पूर्वीचें सर्व विसरून जाऊन उभयतांचा सल्ला होईल असें कराल तर बरें होईल. '

दुय्यम काजी हा येवढेंच बोलून राहिला नाहीं. तर या बाबतींत अमीर याशीं बोलणें चालणें करून तुह्मां उभयतांचा स्नेह जमण्याविषयीं होईल तितकी खटपट मी करतों. असेंही तो फक्रिनिषा हिच्या बापास म्हणाला. फक्रिनिषा हिचा बाप हाही मोठा शहाणा व विचारी होता. यास्तव सांप्रत-च्या प्रसंगीं दुय्यम काजीच्या सल्ल्याप्रमाणें करणें हेंच उचित आहे असें त्याच्या लक्ष्यांत तेव्हांच आलें. अमीर हाही फ-क्रिनिषा हिच्या बापाप्रमाणेंच पोक्त विचार करणारा माणूस अस-ल्यामुळें दुय्यम काजीच्या मध्यस्थीनें तो व फक्रिनिषा इचा बाप यांच्यांतलें वितुष्ट नाहींसें होऊन थोडक्याच वेळांत त्यांचा स्नेह जमू-न आला. या सर्व गोष्टींतून आणखी एक चांगली गोष्ट निघाली, ती ही कीं, झाला तो प्रकार एकंदरीनें ठीक झाला, पण यांत बिचारा अबुलफौरीज हा मात्र विनाकारण ठार बुडला, असें फक्रिनिषा हिच्या बापाच्या लक्ष्यांत येऊन त्याला माझी कींव आली; व त्यानें माझें नुकसान भरून देण्याकरितां ह्मणून मला बरीच मोठी रक्कम बक्षीस दिली; व खेरीज बसऱ्यास परत जाण्यासही परवानगी दिली.

अशा प्रकारें फक्रिनिषा हिच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येऊन तिच्या प्रियकराचा व तिचा संयोग झाला, आणि खेरीज त्या दोन घराण्यांमधील बहुत दिवसांचा द्वेष नाहींसा होऊन त्यांची

एकी झाली. यानंतर थोडक्याच दिवसांनीं मी गोवळकोंड्याहून निघालों, व सुरतेस जाणाऱ्या कांहीं लोकांच्या सोबतीनें नजीकच्या बंदरांत जाऊन दाखल झालों. तेथून लवकरच त्या शहरीं जाण्यास गलबत निघालें, त्यांत आह्मी बसलों; व मध्यंतरीं कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा अडथळा न येतां थोडक्याच दिवसांत तेथें सुरक्षित जाऊन पोहोंचलों. तेथून बसरा येथें जाण्यास जर लागलेंच मला गलबत मिळालें असतें, तर मी ताबडतोब निघालों असतों. पण गलबत न मिळाल्यामुळें मला सुरतेस मुक्काम करणें भाग पडलें. सुरत हें शहर फार मजेदार असून तेथें नानाप्रकारच्या चमत्कारिक चिजा पहाण्यासारख्या असल्यामुळें निदान थोडे दिवस तरी तेथें रहाण्याचा कोणास कंटाळा येण्यासारखा नाहीं. त्या ठिकाणीं उत्कृष्ट सार्वजनिक हमामखाने असून लोकांची तेथें जशी गर्दी असते तशी दुसऱ्या कोणत्याही शहरांत नसेल. त्या हमामखान्यांत केव्हां केव्हां मी स्नानास जाई. तसेंच शहरांत व त्याचे भोंवतीं अनेक सुंदर राया व बागा आहेत, त्यांपैकीं पुष्कळ सार्वजनिक उपयोगाकरितां केलेल्या आहेत, त्यांतूनही मी कधीं कधीं फिरायाला जात असें.

याप्रमाणें एके दिवशीं मी मजेनें सहल करीत असतां कोणी बराच वयस्क मनुष्य मला भेटला. त्यानें मोठ्या सभ्य रीतीनें मला सलाम केला. तेव्हां मींही त्यास उलट सलाम केला, व आमचें उभयतांचें संभाषण सुरू झालें. त्या गृहस्थाच्या बोलण्यावरून तो मोठा स्पष्टवक्ता व निष्कपट असावा असें मला दिसलें. तेव्हां मींही त्याशीं तशाच रीतीनें बोलूं लागलों. तो मला ह्मणाला, ' मी मूर्तिपूजक आहें. माझ्या मालकीचें एक गलबत येथें आहे. त्यांत बसून मी दरवर्षी समुद्राची थोडीशी सफर करीत असतों. ' मींही त्याला आपला मुसलमानी धर्म आहे असें उघडपणें सांगितलें, व आजपर्यंतचा आपला वृत्तांत थोडक्यांत निवेदन केला.

मजवर आलेल्या संकटांची हकीकत जेव्हां त्यानें ऐकिली तेव्हां त्याला मोठा गहिंवर आला असें दिसलें. तें पाहून मला फार

आश्चर्य वाटलें. तें माझ्या मुद्रेवरून त्यानें ताडलें; व मला ह्मणतो, 'मुला, तुजवर आलेल्या संकटांचा वृत्तांत ऐकून मला वाईट वाटलें, याबद्दल तुला विस्मय झाला असें स्पष्ट दिसतें. पण मुला, खरोखर पुसशील तर माझा स्वभावच असा आहे कीं, इतरांचें दुःख पाहून मी तत्काळ दुःखी होतों. त्यांतूनही, तूं जरी परधर्मी आहेस, तरी काय असेल तें असो, तुझी हकीकत ऐकून माझ्या अंतःकरणास पराकाष्ठेचें वाईट वाटलें. फार काय सांगूं? पण तुजवर आलेल्या संकटांचा इतिहास प्रत्यक्ष तूं आपल्या बापास सांगितला असतास तर त्याला जें दुःख झालें असतें, त्याहूनही अधिक तो ऐकून मला झालें आहे!'

अशा प्रकारें प्रेमपूर्वक कोणी मनुष्य आपल्याशीं बोलला असतां त्याशीं तशाच रीतीनें आपण बोलले पाहिजे हें उघड आहे. तेव्हां, त्या मनुष्याचें कळवळ्याचें भाषण ऐकून मलाही त्यास गोड वाटेल असें उत्तर द्यावें लागलें हें सांगावयास नकोच. माझें भाषण ऐकून तो फार खूप झाला असें दिसलें. तो मला ह्मणतो, 'अरे गृहस्था, आज मी फिरावयास निघालों तेव्हां मला फार चांगली वेळ लागली होती असें दिसतें; कां कीं, तुजसारख्या सज्जनाची गांठ पडून मला इतका आनंद झाला आहे कीं, तसा आजपर्यंत कधींच झाला नव्हता! तुजविषयीं माझ्या मनांत जो प्रेमाचा उद्भव झाला तो क्षणोक्षणीं वृद्धिंगतच होत आहे, व तुझ्या समागमावांचून मला एक पळभरही चैन पडणार नाहीं, अशी माझी स्थिति होऊन गेली आहे. तर चल आतां आपण बरोबरच शहरांत जाऊं; व तूं आजपासून माझ्याच येथें रहायाला ये. माझें हल्लीं बरेंच वय झालेलें आहे, व मजपाशीं पैसाअडका रगड असून मला संतति मुळींच नाहीं; यास्तव मीं तुला आपला वारस करण्याचें मनांत आणलें आहे.' इतकें बोलून त्यानें मला पोटाशीं धरलें व केवळ पुत्रवात्सल्यानें मला गाढ आलिंगन दिलें!

त्या वृद्ध मनुष्याच्या ह्या अलौकिक ममतेबद्दल मीं त्याचे 'मना-

पासून आभार मानिले. त्यानें, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी तुला कदापि अंतर देणार नाहीं असें पुनः पुनः बोलून दाखविलें; व मींहीं त्यास आपली कृतज्ञता तशीच अंतःकरणपूर्वक दर्शविली. सारांश, आह्मां उभयतांच्या ह्या मुलाखतीचा व संभाषणाचा परिणाम असा झाला कीं, आह्मी दोघे हातांत हात घालून शहरांत निघून आलों. त्यानें मोठ्या सत्कारानें मला आपल्या घरीं नेलें. त्याचें घर, सुरत शहरांत जीं मोठीं श्रीमंती थाटाचीं घरें आहेत त्यांपैकीं होतें. देवडीवाल्यानें दरवाजा उघडला, तों नेहमींप्रमाणें प्रथम माझ्या दृष्टीस चौक न पडतां निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर फुलझाडांचे दोन वाफे मला दिसले. त्यांतून घरांत जाण्याला मोठा रस्ता होता. तो मातीचाच होता, तथापि तो संगमरवरी दगडांच्या फरशीप्रमाणें कठिण व गुळगुळीत होता. पुढें मला असें समजलें कीं, सुरत येथील सर्व श्रीमंत गृहस्थांच्या घरांची अशीच रचना आहे. असो. आह्मी या मधील रस्त्यानें त्या इमारतीच्या मुख्य व सुंदर भागांत गेलों. त्या ठिकाणीं जिकडे तिकडे सोनेंरुपेंच जरी केवळ चकाकत नव्हतें, तरी तेथील सर्व व्यवस्था अत्यंत आल्हाददायक होती. तेथील छत व झालरी आणि कोचांच्या चादरी ह्या तागाच्याच मजबूत कापडाच्या होत्या, तरी त्यांच्या योगानें त्या जागेस फारच शोभा आलेली होती; कां कीं, मसुलीपट्टण व कारोमांडल किनाऱ्यावर जीं दुसरीं प्रसिद्ध शहरें आहेत तेथल्या नामांकित कापडांपैकीं तें कापड असून त्यावर फारच सुंदर प्रकारची वेलबुट्टी काढलेली होती.

त्या ह्यातार्‍या गृहस्थानें घरांतील एका मोठ्या उत्तम प्रकारच्या हौदावर स्नान केलें, व मलाही तें करण्यास सांगितलें. त्या हौदांतील पाणी इतकें थंडगार व स्वच्छ होतें कीं, तें किती अंगावर घ्यावें असें मला होऊन गेलें. स्नान आटोपल्यावर आह्मी एका दिवाणखान्यांत गेलों. तेथें उत्तम प्रकारची मेवामिठाई व फळफळावळ नकशादार चिनी तबकांत उपाहाराकरितां आणून ठेवलेली असून आमच्या शुश्रूषेकरितां नोकर लोक उभे होते. फराळ

झाल्यावर आम्हांस त्या नोकरांनीं मद्याचे पेले भरून आणून दिले. ते आम्हीं यथेच्छ पिऊन आनंद केला.

आमचें खाणेंपिणें आटोपल्यावर तो गृहस्थ मला म्हणाला, 'मुला, मी आतां तुला एक महत्वाची गुप्त गोष्ट सांगणार आहें. ती तूं ऐकलीस ह्मणजे तुझ्याठायीं माझें केवढें प्रेम आहे याबद्दल तुझी खात्री होईल. मी चार पांच दिवसांत एका बेटाची सफर करण्याकरितां निघणार आहे. त्या वेळेस तूं मजबरोबर चल. त्या बेटांत मोठमोठ्या खाणी आहेत. त्यांत फार मोठीं व मौल्यवान् अशीं मोत्यें सांपडतात. ही गोष्ट फक्त मलाच माहीत आहे. पूर्वी एका गलबताच्या कप्तानापाशीं मी नोकर होतों, त्याचा माझा अत्यंत ऋणानुबंध जुळल्यामुळें त्यानें ती मला सांगितली. त्या बेटांत मनुष्यांची वस्ती मुळींच नसून तेथें वाघ अतिशय आहेत. परंतु त्यांचें निवारण करण्याचें साधन मला माहीत आहे.' मीं त्यास ह्मटलें, 'त्या कप्तानानें हें साधन तुम्हांस सांगून दिलें हे त्याचे तुह्मांवर मोठे उपकार होत यांत संशय नाहीं; कां कीं, अशा साधनावांचून तेथें जाणें म्हणजे मृत्युमुखांत पडणें होय!' तो ह्मणाला, 'तें साधन म्हणजे कांहीं मंत्रतंत्र नव्हे; तें अगदी सोपें आहे. तें असें कीं, मोठमोठ्या चुडी पेटवून रात्रीच्या वेळेस तेथें जावयाचें. त्या चुडींच्या प्रकाशाला भिऊन वाघ पळून जातात. तर त्याप्रमाणें आपणांला त्या ठिकाणीं जाऊन सुरक्षित येण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाहीं. तेथून आपण हवीं तितकीं उत्तम प्रकारचीं मोत्यें आणून तीं येथें विकूं. त्यांचा जो पैसा येईल तो, व मीं आजपर्यंत याच उद्योगावर कमविला आहे तो मिळून कित्येक लाखांची मत्ता होईल. तिचा उपभोग माझ्या पश्चात् तुलाच मिळेल.'

आपल्या बोलण्यांत असत्याचा लेशही नाहीं असें मला भासविण्याकरितां तो मनुष्य मला आपल्या तिजोरीच्या खोलींत घेऊन गेला, व तेथें असलेले रुपयांचे व मोहरांचें ढीग मला दाखवून म्हणाला, 'कसें काय! हें द्रव्य पाहून तुझ्या तोंडाला पाणी सुटलें

कीं नाहीं ? व तुला त्या बेटाची सफर एकवार करावीशी वाटते कीं नाहीं ?' मीं उत्तर केलें, 'माझ्या मनांत ती गोष्ट भरली आहे. पण मला आपल्या बापास एकवार आपली खबर कळवावी असें वाटतें. ती इतकीच कीं, मी सुरतेपर्यंत सुखरूप आलों असून कांहीं विशेष कारणाकरितां येथें माझा कांहीं दिवस मुक्काम होणार आहे. तुमची परवानगी असल्यास या मजकुराचें पत्र आतांच मीं लिहितों.' त्यानें ठीक आहे असें म्हटल्यावरून मीं त्याप्रमाणें बापास पत्र लिहिलें. मीं पत्र बंद केल्यावर त्या गृहस्थानें तें माझ्या हातून घेतलें, व तुझ्या वडिलांस हें प्रविष्ट होण्याचें आतां मजकडे लागलें, असें म्हणाला.

थोडेच दिवसांनीं आमची निघण्याची तयारी झाली. आम्हीं तीन आठवडेपर्यंत समुद्राचा प्रवास केल्यावर एक ओसाड बेट आह्मांस आढळलें. तेथेंच आपल्याला जावयाचें आहे असें तो म्हातारा मला म्हणाला. बेटाजवळ गेल्यावर आम्हीं गलबत नांगरविलें, व रात्र होण्याची वाट पहात बसलों. त्या गृहस्थानें खलाशांस गलबतावरच रहाण्यास सांगितलें, व फक्त मला बरोबर घेऊन तो बेटांत जाण्यास निघाला. आम्हीं दोघांनीं हातांत सुर्‍या पेटवून घेतल्या होत्या व खेरीज त्या संपल्यावर आणखी लावण्याकरितां त्यांचें एकेक जुडगें काखेंत मारलें होतें. तसेंच आम्हीं मोत्यें भरण्याकरितां पिशव्याही घेतल्या होत्या. अशा तयारीनिशीं आम्ही मोत्यांच्या खाणी शोधीत चाललों. थोडक्याच वेळांत आम्हांस एक मोठी व फार खोल अशी खाण आढळली. तेव्हां तो गृहस्थ मला ह्मणतो, 'मुला, हिच्यांत उतर. आपल्याला येथें उत्तम प्रकारचीं मोत्यें सांपडतील असें वाटतें.' असें बोलून त्यानें एक मोठा सोल खाणींत सोडला. त्याला धरून मी खालीं उतरलों. मी तळाशीं पोहोंचलों तों माझ्या पायांना मोत्यांचे कित्येक शिंपले लागले. ते मीं घेऊन पिशवींत भरले, व ती त्या दोराला बांधली. म्हाताऱ्यानें ती वर ओढून घेतली व तिच्यांतील शिंपले उघडून पाहिले तों त्यांतील मोत्यांची अद्याप पूर्ण वाढ झाली नाहीं, असें त्यास आढळून आलें. त्यावरून

त्यानें पिशवी परत खालीं सोडून दिली; व मला म्हणाला, ‘ हीं मोत्यें अजून घेऊन जाण्यालायक झालीं नाहींत. याकरितां हे शिंपले होते तसे ठेवून दे. पुढील वर्षापर्यंत त्यांतील मोत्यें मोठीं होतील, तेव्हां तीं आपण घेऊन जाऊं.’

म्हाताऱ्याच्या सांगण्याप्रमाणें मीं केलें. नंतर त्या दोराला धरून मीं वर आलों. पुढें आम्ही दुसऱ्या एका खाणीपाशीं गेलों. ती पहिलीच्याहूनही खोल असून त्या बेटाच्या मध्यभागीं असणाऱ्या टेंकडीवर होती. या खाणींतील शिंपले मोठे सुरेख होते. मीं ते पिशवींत भरून पूर्ववत् ती दोराला बांधली, व म्हाताऱ्यानें ती वर घेऊन शिंपले ओतून घेतले. असें आम्हीं कित्येक वेळां केलें. नंतर तो थेरडा हंसून मला म्हणतो, ‘ बच्चाजी ! आतां रामराम ! तुम्हीं माझ्या फार उपयोगीं पडलां हे तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं !’ मीं त्यास म्हटलें, ‘अहो बाबा, असें काय बोलतां ? मला वर घ्याल कीं नाहीं ?’ तो म्हणतो, ‘ तूं आहेस तेथेंच चांगला आहेस. येवढा मोठा मौल्यवान् मोत्यांचा बिछाना तुला खुशाल मजेनें सदोदित पडून राहण्याकरितां मीं दिला आहे, तर आणखी वर येऊन तुला काय करावयाचें आहे ?’ नंतर आणखी उपहासपूर्वक मला म्हणतो, ‘ मी असाच दरवर्षी तुझ्यासारखा एक तरणा मुसलमान येथें आणून सोडून देतों. तुझा तो पैगंबर मोठीं अद्भुत कृत्यें करतो असें तुमचे लोक समजतात, तर आतां त्याची तूं प्रार्थना कर. तो तुजसारख्या आपल्या निस्सीम भक्ताच्या साहाय्यास धांवून आल्यावांचून रहाणार नाहीं ! ’ असें म्हणून तो पाषाणहृदय म्हातारडा मला रडतओरडत तसाच खड्ड्यांत सोडून देऊन तेथून चालता झाला !

मीं म्हटलें, ‘ भगवंता ! ह्या हतभाग्य अबुलफौरीजवर तूं येवढा कोप करण्यासारखा त्यानें तुझा अपराध तरी कोणता केला होता ? अथवा मीं स्वतः होऊनच आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला तेव्हां त्या संबंधानें मी तुला तरी काय म्हणून दोष देऊं ? त्या

हरामखोर मूर्तिपूजकानें मजपुढें जी एकदम साखर पेरली तिला म्यां महामूर्खानें भुलून एकाएकीं त्याजवर विश्वास ठेवला, हा माझाच मूर्खपणा नव्हे काय? त्यानें ज्या द्रव्याच्या राशी मला दाखविल्या त्या त्यानें कोणाचा घातपात न करितां मिळविल्या असतील किंवा कसें, याबद्दल माझ्या मनांत अंदेशा सहज आला पाहिजे होता. पण मी पडलों अकलेचा खंदक! तेव्हां मला ह्या गोष्टी सुचणार कशा? हो—पण आतां या पश्चात्तापाचा काय उपयोग? जें घडावयाचें तें घडून चुकलें. तें आतां परत येत नाहीं. तथापि माझा पक्का भरंवसा आहे कीं, ज्या दैवाच्या विचित्र गतीनें मी या खड्ड्यांत पडलों आहें, तेंच मला फिरून अनुकूल झालें तर यांतूनही मी वर निघून मला सुखाचा काळ येईल!'

हा शेवटचा विचार माझ्या मनांत आल्यामुळें मीं निराश होऊन आपल्या जिवाची आशा सोडली नाहीं. मी सारी रात्रभर त्या खाणींत इकडून तिकडे व तिकडून इकडे असा एकसारखा फिरत होतों. माझ्या पायाला तेथें हाडें लागलीं त्यावरून मीं अनुमान केलें कीं, जे कोणी दुर्दैवी लोक मजप्रमाणेंच यापूर्वीं या म्हाताऱ्याच्या फांशांत सांपडले ते येथें सर्व मरून गेले असावे. परंतु या गोष्टीमुळें-ही माझें धैर्य विशेष न खचतां, जणूं काय पैगंबराच्याच प्रेरणेनें, त्या खाणींत मला एक खिंडार दिसलें त्याकडे जाण्याची मला बुद्धि झाली. तेथें मी जातांच मला कांहीं भयंकर ध्वनि ऐकूं आला. हें काय आहे तें समजावें म्हणून मी कान देऊन थोडा वेळ उभा राहिलों. तों हें डोंगराच्या भेगांतून समुद्राचें पाणी शिरून तें एकत्र होऊन या ठिकाणीं येऊन पडत आहे असें मला दिसून आलें. पण हेंही फिरून कोठच्या तरी एखाद्या मोठ्या वाटेनें परत समुद्रा-कडे जात असलेंच पाहिजे, असा आणखी साहजिकच मीं तर्क केला. तेव्हां यांत उडी टाकून आपल्या नशिबाची शेवटची परीक्षा पहावयाची असा मीं निश्चय केला; कां कीं, एक तर सुदैवानें मी त्या पाण्याबरोबर वहात जाऊन बाहेर पडलों तर जीव बचावून निघून जाईन; नाहींपेक्षां बुडून मरून जाऊन दुःखापासून एकदांचा

मुक्त तरी होईन, असें मला वाटलें. मग क्षणाचाही विलंब न करितां मीं त्या पाण्यांत उडी टाकिली. प्रथम मी अगदीं गुद्रमरून गेलों, व मला शुद्ध नाहींशीं झाली. तशाच स्थितींत ओहोळाबरोबर जो मी वहात गेलों, तो बाहेर येऊन किनाऱ्यावर पडलों. तेव्हां मला शुद्ध आली.

अशा रीतीनें मी मृत्यूच्या दाढेंतून बाहेर पडलों. तेव्हां ही गोष्ट परमेश्वराच्या कृपेवांचून घडली नाहीं असें समजून मीं तिजबद्दल त्याचे मनोभावेंकरून आभार मानिले. नंतर मीं पुढील प्रमाणें महंमदाची प्रार्थना केली. मीं ह्मटलें; 'पैगंबरमहाराज! सांप्रत आपल्या साहाय्याची मला जितकी जरूर आहे तितकी यापूर्वी कधींच नव्हती. पहा, आपण आपल्या अगाध लीलेनें मला त्या खड्ड्यांतून बाहेर काढिलें; पण आतां येथें जर मला मांसाहारी पशूंनीं खाऊन टाकिलें अथवा भुकेनें माझा प्राणान्त झाला, तर येवढ्या संकटांतून जो मी आपल्या कृपाप्रसादानें वांचून आलों त्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं!'

याप्रमाणें प्रार्थना केल्यावर मला मोठा धीर आला, व मीं किनाऱ्याच्या नजीकच बेटांत इकडे तिकडे जरासा हिंडलों. मला त्या म्हाताऱ्याचें जहाज कोठेंच दिसलें नाहीं; कां कीं, तो मात्रागमनी माणूस तें घेऊन केव्हांच निघून गेला होता. त्यानें बेटांत वाघ अतिशय आहेत असें मला पूर्वी सांगितलें होतें, यामुळें त्यांपैकीं एखादा येऊन आपणाला केव्हांच चट्ट करून टाकील अशी मला एकसारखी धास्ती वाटत होती; पण माझ्या सुदैवानें त्या वेळीं एकही वाघ तेथें आला नाहीं, व थोडक्याच वेळांत असा चमत्कार झाला कीं, एक मोठें जहाज नजीकच समुद्रांतून चाललेलें तेथून माझ्या दृष्टीस पडलें. तेव्हां मीं आपला रुमाल वर करून, त्यावरील लोकांनीं आपल्या मदतीस यावें म्हणून त्यांना खूण केली. माझा यत्न उत्तम प्रकारें सिद्धीस गेला; कां कीं, लागलीच त्या लोकांनीं एक होडी मजकडे पाठविली व तींतून त्यांनीं मला जहाजावर घेतलें.

या जहाजाचा कप्तान माझ्या बापाचा जिवलग स्नेही असून त्यावरचे सर्व खलाशी हे बसऱ्याचे रहाणारे होते. ही गोष्ट प्रथम जेव्हां मला समजली, तेव्हां मला केवढा आनंद झाला असेल याची तुम्हीच कल्पना करा. मी या बेटांत कशा कशा प्रकारें आलों याबद्दलची हकीकत जी त्यांस सांगितली ती त्यांनीं फार लक्ष्यपूर्वक ऐकिली, व त्या म्हाताऱ्या मनुष्यानें माझा विश्वासघात करून मला संकटांत पाडलें याबद्दल त्यांना पराकाष्ठेचें वाईट वाटून त्यांनीं त्यास शेंकडों शिव्याशाप दिले. हें झाल्यानंतर प्रथम मीं कप्तानास आपल्या बापाचें वर्तमान पुसलें. तेव्हां तो ह्मणाला, 'आम्ही बसरा सोडून निघालों त्याच दिवशीं त्यांची माझी गांठ पडली असून त्या वेळीं ते चांगले सुखरूप होते. नंतर मीं दुसऱ्या कित्येक घरगुती गोष्टींच्या संबंधानें कप्तानास हकीकत विचारली. ती त्यानें सांगितल्यावर फिरून त्या विश्वासघातकी म्हाताऱ्याच्या संबंधानें आमचें संभाषण चाललें. तेव्हां एकवार बेटावर जाऊन त्या खाणी पहाव्या असा सर्वांचा निश्चय ठरला. आम्ही पुष्कळ असामी असल्यामुळें वाघांची आम्हीं फारशी परवा केली नाहीं, व रात्र होण्याची वाटही पाहिली नाहीं. आम्ही लागलीच गलबत नांगरून किनाऱ्यावर गेलों, व बाण आणि तरवारींनिशीं बेटांत शिरून सर्व खाणी पाहिल्या. आम्हीं मोत्यांच्या अगणित शिंपा वेंचून घेतल्या—इतक्या कीं, त्यांतील मोत्यें काढून घेण्यास आम्हांस सबंध तीन दिवस लागले! तीं एकेकाच्या वाटयास इतकीं आलीं कीं, त्या संबंधानें कोणाचीही इच्छा यत्किंचित् देखील अतृप्त राहिली नाहीं.

यानंतर आमच्या जहाजावर असलेलें सुरतेचें रंगीत कापड विकावयाकरितां आम्ही सिंहलद्वीपास चाललों. तेथून आम्हांस परत दालचिनी खरेदी करून आणावयाची होती. असो; आम्ही मोठया मजेनें गलबतांत बसून सिंहलद्वीपाकडे चाललों असतां एकाएकीं मोठें वादळ उसळून आमचें गलबत भलतीकडेच अफाट समुद्रांत गेलें! एक आठवडाभर तर आम्ही कोठें आहों हें आम्हांस कांहींच कळेना!

नंतर वादळ शांत झालें. तथापि आतां पुढें काय करावें व कोठें जावें हें आम्हांस कांहींच सुचेना. शेवटीं फिरून एकाएकीं वाऱ्याचा एक मोठा सोसाटा येऊन त्याच्या योगानें तें गलवत एका मोठ्या पर्वताचे बाजूस गेलें. हा पर्वत अगदीं नीट गेलेला असून तो इतका चकचकीत दिसत होता कीं, जणूं काय तो उत्तम शुद्ध केलेल्या पोलादाचाच आहे असें एखाद्यास वाटावें. इतक्यांत एक म्हातारा खलाशी दुःखाचा मोठा सुस्कारा टाकून म्हणाला, 'अरेरे ! आपला सर्वस्वी नाश झाला ! या ठिकाणासंबंधानें मीं अनेकांच्या तोंडून गोष्टी ऐकिलेल्या आहेत. त्यांनीं असें सांगितलें कीं, याच्या नजीक जे कोणी जातात ते तेथें जणूं काय मंत्राच्या योगानें बांधल्याप्रमाणें राहून जातात. त्यांना पुनः तेथून निघून जाण्याची बिलकूल शक्ति राहत नाहीं.'

हे त्या म्हाताऱ्या खलाशाच्या तोंडचे शब्द ऐकून जहाजावरील सर्व लोकांस अपरिमित दुःख झालें. एकजण म्हणतो, 'हीं मोत्यें आपणास सांपडल्याचा उपयोग काय ? हीं आतां येथच्या येथेंच रहाणार व वरते जीवही जाणार !' दुसरा म्हणतो, 'अहो, पण अशा प्रकारच्या संकटांत आपण पडणार हें इतक्या लोकांपैकीं कोणाच्याही ध्यानांत ह्यापूर्वीं कसें आलें नाहीं ?' तिसरा एकजण, आतां आपली बायको व मुलें फिरून आपल्या नजरेस पडणार नाहींत असें समजून इतका कांहीं आक्रोश करूं लागला कीं, त्याच्या योगानें सर्वच लोकांना सर्व कांहीं उदास भासूं लागलें. चवथा एक असामी एकीकडे जाऊन गुडघे टेंकून, पैगंबरानें या बिकट प्रसंगीं आपणास साहाय्य करावें म्हणून मनोभावेंकरून त्याची प्रार्थना करूं लागला. माझ्या स्वतःविषयीं म्हणाल तर, इतरांचें दुःख पाहूनच मला काय वाईट वाटलें तें वाटलें. बाकी वास्तविक जें संकट आम्हांवर आलें होतें त्यामुळें मी कांहीं फारसा डगमगलों नाहीं. मीं कप्तानास म्हटलें, 'अहो साहेब ! कोणतेंही संकट मनुष्यावर आलें असतां त्यानें बायकांसारखें रडत बसून कसें होईल ? विचार करून

त्या संकटांतून पार पडण्याचा कांहीं तरीं उपाय शोधणें हेंच त्यास योग्य आहे. मी तुम्हांस खचीत सांगतों कीं, सांप्रतच्या प्रसंगीं माझें धैर्य कांहीं फारसें सुटलें नाहीं. मला वाटतें, आपण या डोंगराचा माथा चढून जावें म्हणजे येथून पार पडण्याची कांहीं तरी युक्ति आपल्याला सांपडेल.' कप्तान हा इतरांप्रमाणें घाबरून गेला नव्हता खरा. तरी तो मला म्हणाला, 'तुम्ही म्हणतां तसें करण्यास मजकडून जरी कांहींएक हरकत नाहीं, तरी एकंदरीनें मला असें वाटतें कीं, आपणांला आतां येथून पार पडणें म्हणजे बहुतेक मुष्किलीचीच गोष्ट आहे.' इतक्यांत आमचें गलबत डोंगराच्या पायथ्यानजीक आलें. तेव्हां कप्तान व मी असे दोघेजण होडींत बसून किनाऱ्यावर गेलों; व लागलीच डोंगर चढूं लागलों. त्याच्या माथ्यावर जाण्यास आम्हांस बरीच मेहनत पडली.

त्या ठिकाणीं आह्मांस एक फार उंच व मोठा असा हिरव्या रंगाचा मनोरा आढळला. त्यावर एक दहा हात उंचीचा पोलादी खांब होता. त्याच्या तळाशीं सोन्याच्या सांखळीस अडकवलेला अगरूच्या लांकडाचा लहानसा नगारा असून तो वाजविण्याकरितां एक तांबड्या रंगाची वांकडी काठी होती. त्या नगाऱ्यावर एक टेंबुरणीच्या लांकडाची लहानशी फळी अडकवलेली असून तीवर पुढील मजकूर सोनेरी अक्षरांनीं लिहिलेला होता. तो असा:—"दुर्दैवानें जर एखादें जहाज या डोंगरानजीक आलें तर तें येथें अडकून पडेल. त्याला पुढील तजवीज केल्यावांचून तें जागचें हलवितां येणार नाहीं. जहाजावरील कोणा तरी एका माणसानें या वांकड्या काठीनें येथल्या नगाऱ्याला तीन ठोके दिले पाहिजेत. पहिल्या ठोक्याला जहाज डोंगरापासून एका तिराच्या टप्प्याइतकें दूर जाईल; दुसऱ्या ठोक्याला तें इतकें दूर जाईल कीं, त्यावरील लोकांस डोंगर दिसेनासा होईल; आणि तिसरा ठोका दिल्याबरोबर तें आपल्या योग्य मार्गास लागेल. परंतु हे ठोके देणारा मनुष्य मात्र असा असला पाहिजे

कीं, त्यानें इतरांस जाऊं देऊन आपखुषीनें येथें राहण्याचें कबूल केलें पाहिजे."

हा त्या फळीवरील लेख वाचल्यावर आह्मी हें वर्तमान आपल्या लोकांस सांगण्याकरितां परत आलों. प्रत्येकजणास आपली सुटका होण्याचा मार्ग सांपडला ह्मणून मोठा आनंद झाला. पण त्याकरितां एकजण बळी जावयास पाहिजे होता, तें काम अर्थातच कोणीही पतकरीना. तेव्हां मीं स्वतः होऊनच ह्मटलें, 'बरें, तुमच्यांपैकीं कोणीही येथें राहूं इच्छीत नाहीं, तर सर्वांच्या जिवाकरितां मी आपला राहण्यास खुषी आहें. माझें काय होणार असेल तें होवो. मात्र, तुम्ही बसरा येथें पोहोंचल्यावर हा सर्व वृत्तांत माझ्या बापास सांगून माझ्या वांट्यास आलेलीं सर्व मोत्यें त्याच्या स्वाधीन करण्याविषयीं मला वचन दिलें पाहिजे, येवढी माझी अट आहे.' हें ऐकून ते सर्व एकदम ह्मणाले, 'हो हो—आह्मी अवश्य तुमच्या ह्मणण्याप्रमाणें करूं; न करूं तर परमेश्वर आमचा सत्यनाश करील!' कप्तानानें असेंही मला सांगितलें कीं, 'तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें करण्याचा तुमचा निश्चय झालाच असेल तर आह्मी सिंहलद्वीपासही अगोदर न जातां बसऱ्यास परत जाऊन आधीं तुमच्या वचनांतून मुक्त होऊं.' या गोष्टीस इतर लोकांनींहीं मोठ्या संतोषानें रुकार दिला. कप्तानानें, मजवर हा जो प्रसंग आला त्याबद्दल आपली दिलगिरी दर्शविली. परंतु माझ्यापेक्षां त्याला आपल्यावरचें संकट टाळण्याची काळजी साहाजिकच विशेष होती, तेव्हां त्याची ही दिलगिरी फारशी मनापासून नव्हती, हें उघड आहे. असो. मी गलबतावरील सर्व लोकांस शेवटचा सलाम करून त्यांचा निरोप घेतल्यावर त्यांनीं मला किनाऱ्यावर सोडून दिलें. नंतर मी डोंगराच्या माथ्यावर चढून त्या नगाऱ्यापाशीं गेलों, व लागलीच तेथल्या त्या वांकड्या काठीनें पूर्वी सांगितलेल्या नगाऱ्यावर एक ठोका दिला. त्याबरोबर आमचें गलबत ठिकाणापासून सुटून भराभर चालू लागलें; व दुसरा ठोका देतांच तें माझ्या दृष्टीच्या टप्प्याच्या पार निघून गेलें. यानंतर मीं

तिसरा ठोका दिला; व पुढें आतां आपल्या नशिबीं काय असेल तें होईल असें म्हणून क्षणभर तसाच स्तब्ध उभा राहिलों.

नंतर मीं फिरून पैगंबराची प्रार्थना केली; आणि जणूं काय त्याचें आपल्याला खचीत साहाय्य आहे असें माझ्या मनानें घेऊन मी तसाच पुढें धीर धरून डोंगरांतून चालूं लागलों. सुमारें एक तासभर चालल्यावर माझ्या दृष्टीस एक वृद्ध मनुष्य पडला. त्याला टक्कल पडलें असून त्याची दाढी लांब व शुभ्र होती, आणि डोळे अगदीं खोल गेलेले होते. तो इतका खंगून गेलेला दिसत होता कीं, एका श्वासासरसा याचा प्राण जाईल कीं काय असें मला वाटलें. तो एका झोंपडीच्या तोंडाशीं दगडावर बसलेला असून त्याच्या हातांत लहानशी काठी होती. मीं त्याच्याजवळ जाऊन मोठ्या अदबीनें त्याला सलाम केला आणि म्हटलें, 'बावाजी, मी नुकताच एक जहाज सोडून आलों. तें जहाज या डोंगरानजीक आल्यावरोबर अडकून पडलें, व नंतर थोड्या वेळापूर्वी मीं त्या मनोऱ्याला अडकवलेल्या नगाऱ्याला ठोके देतांच तें फिरून आपल्या मार्गास लागलें. या गोष्टी कोणाच्या शक्तीनें घडल्या तेवढें कृपा करून सांगाल काय?'

हें माझें बोलणें ऐकून तो वृद्ध मनुष्य आपल्या हातांतील काठीला टेंकून मोठ्या सायासानें हलकेच उभा राहिला. नंतर डोकें हालवून व मला उलट सलाम करून ह्मणतो, 'अशीं जहाजें या डोंगराकडे अनेक येतात, व तीं सर्व लाटांच्या जोरानें येतात, दुसरें कांहीं नाहीं. तीं ज्याच्या योगानें अडकून पडतात व फिरून चालूं लागतात, तें नगाऱ्याचें यंत्र कोणीं तयार केलें तें मला माहीत नाहीं. त्याविषयीं माहिती तुम्हांस हवी असेल तर असेच पुढें जा, म्हणजे माझ्याहूनही म्हातारा एक माझा भाऊ आहे तो तुम्हांला भेटेल व तो सांगेल.' तेव्हां मी त्यास सलाम करून तसाच पुढें चाललों, तों थोड्याच वेळानें दुसरा एक वृद्ध मनुष्य मला आढळला. पण हा पहिल्यापेक्षां जरा जोरदार दिसत होता. याचे केस. नुकतेच

कोठें पिकायाला लागले होते; व हा पहिल्याचा वडील भाऊ तर शोभत नव्हताच, पण धाकटा भाऊ कदाचित् म्हणतां आला असता. असो. मीं पहिल्या मनुष्याप्रमाणेंच ह्यालाही प्रश्न केला. तेव्हां तो म्हणतो, 'तें यंत्र कोणीं केलें ही गोष्ट मलाही पण माहीत नाहीं. तुम्हांस तिच्या माहितीची जरूर असेल तर आमचा सर्वांत वडील भाऊ आहे तो ती तुम्हांस सांगेल. येथून असेच पुढें जा म्हणजे लवकरच तुमची त्याची गांठ पडेल.'

या दुसऱ्या मनुष्याच्या सांगण्याप्रमाणें मी तसाच पुढें चाललों असतां थोडक्या वेळानें मला एक मनुष्य जमीन खणतांना आढळला. हा तर चांगला तरणा बांड दिसत होता, व याचे सारे केंस काळेभोर होते; आणि याच्या अंगांत इतकी तरतरी दिसत होती कीं, पहिल्या दोघां इसमांचा हा वडील भाऊ नसून त्यांच्याहूनही धाकटा असावा असें स्पष्ट दिसत होतें. मीं त्यास ह्मटलें, 'बावाजी, या डोंगरावरचें तें नगाऱ्याचें यंत्र कोणीं केलें याबद्दल मीं दोघां वृद्ध मनुष्यांस माहिती विचारिली असतां त्यांनीं सांगितलें कीं, आमचा वडील भाऊ आहे त्याला जाऊन तुम्ही ती विचारा.' हें ऐकून तो मनुष्य किंचित् हंसला आणि म्हणाला, 'हो, त्यांनीं तुम्हांस खरेंच सांगितलें. मी त्या दोघांहूनही वडील आहें.' हें त्या मनुष्याचें बोलणें ऐकून मला मोठा चमत्कार वाटला. याहूनही, तो पुढें जें काय बोलला त्याचा तर मला विशेषच चमत्कार वाटला. तो ह्मणतो, 'लोक आह्मां तिघांस 'डोंगरांतले म्हातारे' ह्मणतात. पहिल्या प्रथम जो तमच्या दृष्टीस पडला तो आह्मां सर्वांत धाकटा. त्याचें वय पन्नाशीच्या जवळजवळ आहे. पण तो अगदीं खल्लड झालेला दिसतो याचें कारण असें कीं, त्याची बायको मोठा द्वाड असून त्याचीं पोरें फारच खट्याळ निघालीं. यामुळें त्याला जो अतिशय त्रास झाला त्या कारणानें त्याची अशी अवस्था होऊन गेली. दुसऱ्याची उमर पाऊणशेंच्या आंत बाहेर आहे. पण तो पहिल्याहूनही तरुण व सशक्त दिसतो.

याचें कारण त्याला बायको चांगली मिळाली होती, व मुलें त्याला मुलींच नव्हतीं; आणि माझी गोष्ट अशी आहे कीं, माझ्या वयाला जरी शंभर वर्षें छोटून गेलीं आहेत, तरी मी त्या दोघांहूनही तरणा दिसत असून माझ्यांत ताकद जास्त आहे. याचें कारण मीं लग्न मुळींच केलें नाहीं. आतां त्या यंत्राच्या संबंधानें तुम्हीं विचारिलें, तर तें हिंदुस्थानांतील कोणा एका जादूगारानें तयार केलें अशी मला ऐकीव माहिती आहे. याहून जास्त कांहीं मला त्या संबंधानें ठाऊक नाहीं.' नंतर मीं त्यास पुसलें कीं, 'येथून जवळ कोठें मनुष्याची वस्ती आहे काय?' त्यानें उत्तर केलें, 'होय, तुम्ही असेच या रस्त्यानें पुढें जा, म्हणजे लवकरच तुम्हांला एक मोठें मैदान लागेल. त्याच्या शेवटीं असाच एक पर्वत आहे. त्याच्या पायथ्याशीं दोन रस्ते फुटतात—एक उजवे बाजूकडे जातो, व दुसरा डावे बाजूकडे जातो. त्यांपैकीं उजवे बाजूकडील रस्त्यानें तुम्ही जा, म्हणजे तुम्हांला एक मोठें उत्कृष्ट बंदर लागेल. मात्र डावे बाजूकडील रस्त्यानें जाऊं नकाहो! कां कीं, तो रस्ता एका अरण्यांत जात असून तेथें रानटी क्रूर लोकांची वस्ती आहे. त्यांच्या हातीं जो कोणी परदेशी मनुष्य सांपडेल त्याला ते जिवंत म्हणून कधींही जाऊं द्यावयाचे नाहींत!'

या मनुष्यानें मला जी ही माहिती सांगितली तिजबद्दल मीं त्याचे आभार मानिले, व त्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्याविषयीं खबरदारी घेण्याचा निश्चय केला. त्यानें ज्या मार्गानें मला जावयास सांगितलें होतें तसा मी गेलों असतां मला नेमकें तें बंदर लागलें. तेथील वस्ती फार दाट असून, तेथल्या सडका व घरें मोठीं पहाण्यासारखीं होतीं. त्या बंदरांत जहाजांची तर अतिशय गर्दी होती. त्यावरून या ठिकाणीं व्यापार मोठाच चालत असला पाहिजे असें मीं अनुमान केलें. तें अगदीं खरें ठरलें. तेथें, कानडा व विसापूर येथून मिरीं भरून आलेलीं, व कानानोर येथून वेलदोडे भरून आलेलीं व कित्येक दालचिनी भरून आलेलीं अनेक जहाजें मला

आढळलीं. तसेंच बहुतेक सर्व मोठमोठ्या ठिकाणचे व्यापारीही तेथें मला भेटले. अशा प्रकारें त्या बंदराचा देखावा मीं कौतुकपूर्वक पहात असतां कोणी एक मनुष्य माझ्याजवळ आला. आम्हां उभयतांची नजरानजर होतांच आम्हीं एकमेकांस ओळखलें. हा मनुष्य माझ्या बापाचा सिंहलद्वीप येथील अडत्या हबीब हा होता! आम्हां उभयतांनाही एकमेकांची फिरून भेट झाल्यामुळें आनंदाचें केवळ भरतें आलें व आम्ही एकमेकांस कडकडून भेटलों. हबीब यास मोठा गहिंवर येऊन तो म्हणतो, 'अबुलफौरीजसाहेब! अशा रीतीनें एकाएकीं तुमची माझी या ठिकाणीं गांठ पडेल हें कोणाच्या स्वप्नींही तरी होतें काय? अहो, मला शेवटीं भेटल्यावांचून व माझा निरोप घेतल्यावांचून, तुम्ही सिंहलद्वीप सोडून गेलां हें झालें तरी कसें? असा कोणता दुर्धर प्रसंग तुम्हांवर आला होता, व आज सुदैवानें फिरून तुम्ही अकल्पित माझ्या दृष्टीस पडण्याचा योग कसा आला हें सर्व कृपा करून मला सांगा. तें ऐकण्याविषयीं मला परकाष्ठेची उत्कंठा लागली आहे.'

तेव्हां मीं, शीलवंतीची माझी प्रथम गांठ पडल्यापासून आज-पर्यंतचा माझा सर्व वृत्तांत त्यास सविस्तर निवेदन केला. इतकें झाल्यावर तो मला म्हणाला, 'मीं येथें जहाजांत दालचिनी भरून आणली होती. ती हल्लीं विकून टाकून तिचा पैसा उभा केला आहे, व चोवीस तासांत माझा येथून निघण्याचा बेत झाला आहे. तुम्हांस मी आतां आपल्याबरोबर घेऊन जाणार. मला या गोष्टीचा किती आनंद झाला आहे हें सांगतां देखील येत नाहीं! नंतर तो व मी नेमल्या वेळीं जहाजांत बसून सिंहलद्वीपास जाण्यास निघालों. आम्हांस एकसारखा अनुकूळ वारा लागल्यामुळें थोड्याच दिवसांत आम्ही सिंहलद्वीपास जाऊन पोहोंचलों.

सिंहलद्वीपास गेल्यावर मला शीलवंतीचें वर्तमान कळण्याविषयीं मोठी उत्सुकता उत्पन्न झाली. तिनें माझ्याशीं जें वर्तन केलें त्याव-रून तिजविषयीं पूज्यभाव माझ्या मनांत रहावा असें जरी नव्हतें,

तरी काय असेल तें असो, तिजविषयींचें माझें प्रेम मुळींच नाहींसें झालें नव्हतें. सबब मी एके दिवशीं सकाळीं उठून, तिचें वर्तमान काय आहे त्याचा तपास लावण्याकरितां निघालों. इतक्यांत रस्त्यामध्यें मला एक गुलाम भेटला. तो मला ह्मणतो,'महाराज, तुह्मी मला ओळखतां काय?' मीं उत्तर केलें, 'नाहीं; तरी पण तुला मीं पाहिलें असावेंसें मला वाटतें. तें कोठें व केव्हां हें मात्र पक्कें स्मरत नाही.' तो म्हणतो, 'पण तुमचें मला चांगलें स्मरण आहे. तुम्ही जातीनें मुसलमान असून तुमचें नांव अबुलफौरीज असें आहे. माझी यजमानीण शीलवंती हिचे येथें तुह्मी होतां तोंपर्यंत तुमच्या शुश्रूषेचें काम मजकडे होतें. तिचा मी गुलाम असून अद्यापिही तसाच तिच्यापाशी आहे. शेवटीं ज्या कप्तानाच्या हवालीं तिनें तुम्हांस केलें, त्याला मीच तिजकडे घेऊन गेलों होतों. तें काम करण्याचें माझ्या नशिबीं आलें या गोष्टीबद्दल मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें, हें मी खचीत सांगतों.'

त्या गुलामाचें हें बोलणें ऐकून मला जो कांहीं आनंद झाला तो किती म्हणून सांगावा! मीं लागलीच त्यास एक हिऱ्याची आंगठी बक्षीस दिली, आणि म्हटलें, 'मित्रा, ती माझी प्रियतमा शीलवंती कोठें आहे तें मला लवकर सांग पाहूं? तिनें जरी मला अत्यंत निर्दयपणानें वागविलें आहे, तरी तिजविषयींचें माझें प्रेम अद्यापि अणुमात्रही कमी झालें नाहीं. तिच्या येथें मी होतों तेव्हां ज्या स्थितींत ती होती त्याच स्थितींत ती अजून आहे काय?' तो उत्तर करतो, 'नाहीं महाराज. गेल्या दोन महिन्यांत तिच्या स्थितींत मोठाच फरक झाला आहे. येथील राजसाहेबांच्या दरबारचा एक म्हातारा मुत्सद्दी आहे त्याचें तिजवर मन बसल्याकारणानें राजेसाहेबांच्या आग्रहास्तव त्यास वरणें तिला भाग पडलें.'

हें वर्तमान ऐकून मला इतकें अनावर दुःख झालें कीं, तें पाहून त्या गुलामास मोठा गहिंवर आला. तो म्हणतो, 'महाराज, माझ्या धनिणीचें लग्न झालें हें ऐकून तुह्मांस जें परमावधीचें दुःख झालें तें

पाहून खरोखर पुसाल तर माझ्या अंतरात्म्याला मोठी तळमळ लागून राहिली आहे. पण वास्तविक पाहतां यांत तुमचाच दोष आहे. तुम्हीं तिच्या म्हणण्याप्रमाणें त्याच वेळेस जर धर्मांतर केलें असतें तर तिशीं तुमचा विवाह होऊन आज मितीस तुम्ही अपार संपत्ति व सौख्य भोगीत राहिलां असतां. मी जर तुमच्या ठिकाणीं असतो, तर तुमच्या इतका विचार देखील केला नसता. फार काय सांगूं ? पण शीलवंतीनें जें जें म्हणून मला सांगितलें असतें तें तें मीं तत्क्षणीं करून टाकिलें असतें. सारांश काय कीं, तुम्हीं असा वेडेपणा केला नसता तर तुम्हांला व तिला—उभयतांनाहीं—जें दुःख सोसावें लागलें तें मुळींच लागलें नसतें. कारण तुमची तशी वाट लागल्यावर तीही म्हणजे सुखांत राहिली असें नाहीं. ती जी पुढें आजारी पडली ती मरतां मरतां वांचली. असो, पण आतां तुम्ही येथें आल्याची खबर मी तिला सांगूं कीं नको, याचा मला विचार पडला आहे ! कारण तिला म्हातारा नवरा मिळाल्यामुळें ती अगोदरच दुःखांत आहे, व त्यांत आणखी तुम्ही आलां हें तिला कळलें, म्हणजे तिचें दुःख दुणावेल. बरें, इकडे तुमची अशी कांहीं कष्टमय स्थिति झाली आहे कीं, तुमच्या बाबतींत कांहीं एक न करणेंही मला बरें दिसत नाहीं.' मग अमळ विचार करून म्हणतो, 'कांहीं चिंता नाहीं. आज मी तिला, तुमची गांठ पडली होती हें वर्तमान सांगतों. तसेंच तिच्या दासीच्या द्वारें असेंही तिला आणखी कळवितों कीं, गत-गोष्टींचा तुम्हांस पश्चात्ताप झाला असून तिजकरितां तुम्ही आपल्या धर्माचा त्याग करण्यास एका पायावर तयार आहां.' मीं म्हटलें, 'छी ! छी ! तूं असें कांहीं एक तिला कळवूं नको; कां कीं, अद्यापि तिच्या समागमाचें सौख्य मला प्राप्त होण्यासारखें असलें तरी त्या साठीं जर मला धर्मत्यागासारखें पाप माथीं घ्यावें लागणार असेल, तर जळो तें सौख्य, मला त्याची जरूर नाहीं ! तिला तूं येवढेंच सांग कीं, तूं मला अंतरलीस, यामुळें मी हताश झालों असून तुझीही स्थिति आणखी चांगली नाहीं हें ऐकून तर मी विशेषच दुःखी झालों आहे.'

तुमचें काम मी अगदीं तुमच्या सांगण्याप्रमाणें करीन, त्यांत बिलकूल कसूर करणार नाहीं, असें शपथपूर्वक त्या गुलामानें मला वचन दिलें. खेरीज माझें दुःख आणखी हलकें व्हावें म्हणून तो असेंही म्हणाला कीं, शीलवंतीला तुमचें वर्तमान ऐकून बहुधा तुमची दया आल्यावांचून रहाणार नाहीं अशी मला खात्री वाटते. इतकें त्याचें माझें संभाषण झाल्यावर तो निघून गेला, व मी कांहीं दुःख व कांहीं आनंद मानीत तसाच राहिलों. कारण तिची स्थिति मनांत आणून मी दुःख करीत होतों; तरी पण मला असेंही वाटत होतें कीं, ती मला आपली एकांतीं भेट घेण्यास परवानगी देईल, व अशा प्रकारें तिचें माझें प्रेम फिरून वृद्धिंगत होईल. हा विचार मनांत येऊन मी एके प्रकारें आनंद मानीत होतों; आणि हबीब याचे घरीं तो गुलाम आपला शोध घेण्यास येईल म्हणून दररोज वाट पहात होतों; कारण हबीब याचे घरीं माझें बिऱ्हाड असल्याचें मीं त्यास सांगितलें होतें. असो; पण त्या गुलामाच्या व माझ्या भेटीस एक महिना होऊन गेला तरी तो जेव्हां मजकडे आला नाहीं, व शीलवंतीकडील वर्तमान मला कांहींच कळलें नाहीं, तेव्हां फिरून माझी निराशा होत चालली.

मीं मनांत असा तर्क केला कीं, त्या गुलामास आपल्या धनिणीच्या मानसिक स्थितीचा अदमास बरोबर करतां आला नसावा—एक तर, ज्या श्रीमान् गृहस्थाशीं तिचें लग्न झालें आहे तो तिला आवडता असून त्यावर तिचें चांगलें प्रेम असावें, अथवा तसें नसलें तरी, मजवरील तिच्या आसक्तीवर तिच्या पातिव्रत्याचा पगडा बसला असावा. ही शेवटची गोष्टच खरोखर संभवनीय आहे असें माझ्या मनानें पूर्णपणें घेतल्यावरून मीं फिरून निराश होऊन शीलवंतीचा नाद सोडून दिला, व हबीब यानें शहरापासून दोन तीन कोसांवर शेतांत एक उत्तम हवाशीर बंगला बांधलेला होता, तेथें करमणुकी खातर राहण्यास निघून गेलों.

पण तेथें गेल्यावर माझ्या मनाची अगदीं उलट स्थिति झाली,

ज्या गोष्टींचा आपल्याला विसर पडावा व आपल्या मनाचें रंजन व्हावें म्हणून मी इच्छीत होतों, तीच एकसारखी त्या ठिकाणीं माझ्या मनांत बोलूं लागली. एके दिवशीं मी सहज फिरतां फिरतां बंगल्यापासून बराच दूर नदीकिनाऱ्यानें चाललों असतां मला एक सुंदर देवालय आढळलें. त्याचें अत्यंत सुरेख बांधकाम पाहून मी आनंदातिशयांत निमग्न झालों असतां जवळच कित्येक लोक बांबू, कडबा वगैरेंची एक झोंपडी तयार करीत होते, तिकडे एकाएकीं माझें लक्ष्य गेलें. हें तुम्ही काय करीत आहां म्हणून मीं त्या लोकांना प्रश्न केला. तेव्हां त्यांपैकीं एकजण म्हणतो, ' तुम्हीं हा प्रश्न विचारला यावरून येथें तुम्ही अगदी नवखे आहां असें मला वाटतें, अहो, ही आमची स्मशानभूमि आहे, व ही सतीची चिता आम्हीं करीत आहों. ज्या उत्तम पातिव्रता स्त्रिया असतात त्या, पति मरण पावला असतां मागें राहून वैधव्य भोगण्यापेक्षां त्याच्या प्रेताबरोबर जिवंत जळून जाणें हें बरें, असें समजून त्याप्रमाणें करितात; व जी स्त्री असें करील ती ' सती गेली ' असें म्हणण्याची वहिवाट आहे, हा विधि मोठ्या समारंभानें होत असून ही एक आमच्या धर्माची बाबच आहे. जी स्त्री अशा प्रकारें सती जाते तिची कीर्ति अजरामर रहाते. येथील राजदरबारचा एक मोठा मुत्सद्दी मरण पावला असून त्याची स्त्री त्याजबरोबर सती जाणार आहे त्याकरितां ही तयारी चालली आहे. '

हें सतीचें प्रकरण मला अगदींच माहीत नव्हतें असें नाहीं. पण सती जातांना मीं प्रत्यक्ष कधींच पाहिलेली नव्हती. तेव्हां ती पहाण्याची आतां आयती संधि आली आहे ती दवडावयाची नाहीं असा मीं निश्चय केला. त्या लोकांच्या ह्या धर्मवेडेपणाचा मला मोठा चमत्कार वाटला, व अशा प्रकारें मनुष्यानें आत्महत्या करणें ही केवढी खेदाची गोष्ट आहे असें मीं मनांत म्हटलें. असो. लवकरच तो सती जाण्याचा भयंकर प्रसंग गुजरण्याची वेळ आली, व तो पहाण्यास हजारों लोक तेथें जमले. त्या चितेंत जळणाऱ्या स्त्रीचें

जे अप्तसोयरे होते ते सर्व पायीं आले होते. बाकीच्यांपैकीं मोठमोठे लोक घोड्यांवर बसून आले होते, व कांहीं पालख्यांतही बसून आले होते. त्यांच्यापुढें त्यांचे गुलाम चालत असून त्यांच्यापैकीं कित्येकांच्या हातांत निशाणें होतीं व कित्येक वाद्यें वाजवीत चालले होते. तेथें शहरचा कोतवालही कित्येक बडे लोकांसह हत्तीच्या अंबारींत बसून आला होता. सुमारें चार पांच घटकांच्या आंतच त्या ठिकाणीं एकंदर पंचवीस हजारांवर मनुष्य जमलें. हा एकंदर समारंभ आपल्याला पहाण्यास सांपडावा म्हणून मी त्या गर्दीत घुसून चितेच्या अगदीं जवळ जाऊन उभा राहिलों. तेथें सुमारें वीस धर्माधिकारी हातांत पोथ्या घेऊन मंत्र म्हणत बसलेले होते. सूर्यास्त होऊन अंधकार पडावयास लागणार इतक्यांत त्या सती जाणाऱ्या स्त्रीच्या नवऱ्याचें प्रेत उत्तम प्रकारच्या पालखींत घालून लोकांनीं तेथें आणलें. त्याच्या मागून ती स्त्री पांढऱ्या रंगाच्या शृंगारलेल्या घोड्यावर बसून येत होती. तिजबरोबर बारा स्त्रिया उत्तम प्रकारचे पोषाख व मौल्यवान् अलंकार घालून चाललेल्या होत्या. ह्या सर्व स्त्रिया तिच्या दासी असून तिजसह त्या वाजत गाजत येत होत्या. त्यांच्या मागून तिचीं सर्व आप्तसोयरीं येत असून, 'आपल्या कुळांत अशी परम भाग्यवती स्त्री निपजली म्हणून तीं माणसें मोठा आनंद-घोष करीत होतीं.

सतीला दोघां धर्माधिकाऱ्यांनीं हात देऊन घोड्यावरून उत-रिलें, व नदीकांठीं ज्या ठिकाणीं तिच्या नवऱ्याचें प्रेत ठेवलेलें होतें तेथें तिला ते घेऊन गेले. तिनें त्या प्रेतास स्नान घातलें, व धर्माधिका-ऱ्यांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं लागलीच तें चितेच्या झोंपडींत नेऊन ठेविलें. त्याबरोबर तीही चितेपाशीं गेली, व तिनें चितेस कित्येक प्रदक्षिणा घातल्या. आपणाला आतां येथें जळून खाक व्हावयाचें आहे हें ती पूर्णपणें जाणत होती इतकेंच नाहीं, तर त्याकरितां चाललेली सर्व तयारी प्रत्यक्ष पहात होती. तथापि तिचें धैर्य यत्किं-चितही कमी झालेलें दिसत नव्हतें. तिनें मोठ्या दिलदारपणानें

आपल्या आप्त स्त्रियांची शेवटची भेट घेतली, व तिच्या दासींनीं मोठ्या दुःखानें तिला शेवटचे मुजरे केले. तिनें त्यांस आपल्या दास्यांतून मुक्त करून आपल्या अंगावरचे सर्व अलंकार बक्षीस दिले. इतका वेळपर्यंत त्या सती जाणाऱ्या स्त्रीचें तोंड माझ्या चांगलेसें नजरेस पडलें नव्हतें. तें या वेळीं एकाएकीं पडून ती स्त्री शीलवंती आहे असें जेव्हां मला दिसून आलें, तेव्हां मला कवढें आश्चर्य वाटलें असेल याची कल्पना करणें सुद्धां अशक्य आहे!'

मीं मनांत म्हटलें, 'भगवंता! मला हा दृष्टिभ्रम तर झाला नाहीं ना? खरोखर शीलवंतीच का अशा अत्यंत दुःखदायक रीतीनें मरण पावत आहे! छी! छी! मला उगीच हा भास झाला असें वाटतें. पण फिरून नीट न्याहळून पहातों तों ही शीलवंतीच याविषयीं अंदेशा नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली. तेव्हां, मला तो पुढें होणारा भयंकर प्रकार पाहवेना म्हणून, तिच्या हातांत धर्माधिऱ्यांनीं चितेस अग्नि लावण्याकरितां कांकडा पेटवून दिल्यावरोवर मी तडक बंगल्याकडे यावयास निघालों. त्या वेळीं माझें मन इतकें उदास होऊन गेलें होतें कीं, त्याचें शब्दांनीं वर्णनच करतां येणार नाहीं! आतां काय करावें, काय बोलावें, व कोठें जावें, हें मला कांहींच सुचेना. मी एकसारखा फिरून फिरून त्या सतीच्या चितेकडे बघत असें, व ती चिता जळूं लागून तिच्या ज्वाळा वर आकाशांत गेलेल्या जेव्हां माझ्या दृष्टीस पडल्या, तेव्हां तर माझें काळीज अगदीं फाटून गेलें!

शेवटीं मी हळहळत शहरांत हबीब याचे घरीं आलों. त्यानें माझी उदास वृत्ति पाहून तिचें कारण मला विचारलें. मी त्यास तें सांगत असतां माझ्या नेत्रांतून एकसारखे अश्रु गळत होते. ते पाहून त्यालाही मोठा गहिंवर आला, व त्याच्या नेत्रांतूनही अश्रु आल्यावांचून राहिले नाहींत. तो म्हणतो, 'शीलवंती ही आपल्या त्या म्हाताऱ्या नवऱ्याकरितां अशा प्रकारें मरून गेली या गोष्टीचें मला मोठें आश्चर्य वाटतें; कां कीं, तो तिला आवडत नव्हता असें लोक

म्हणतात. ' मीं म्हटलें, ' तर मग तिनें सती जाणें किंवा न जाणें हें तिच्या हातचें होतें, असें तुम्ही म्हणतां कीं काय ? माझी तर आतांपर्यंत अशी समजूत झाली आहे कीं, येथील मूर्तिपूजकांच्या कोणत्याही स्त्रीला पतीच्या मागें मुळींच जिवंत रहातां येत नाहीं. ' हबीब म्हणतो, ' तसें कांहीं एक नाहीं; इतकेंच नव्हे, तर सती जाणारी स्त्री खरोखर खुषीनें सती जाते कीं नाहीं याबद्दल बारीक रीतीनें चौकशी केली पाहिजे असा सरकारचा हुकूम आहे. चौकशीचें काम चाललें असतां अधिकारी लोक तसें न करण्याविषयीं तिचें मन वळविण्याचा होईल तितका यत्न करितात; आणि जर तिचा निश्चय ढळत नाहीं असें त्यांस दिसून आलें तरच ते तिला परवानगी देतात. आतां झालेल्या प्रकारावरून असें दिसतें कीं, शीलवंतीनें आपल्या नवऱ्याच्या प्रीतीस्तव नव्हे, तर आपणाला जन्मांतरीं चिरकाल सुख व्हावें अशा समजुतीनें आपखुषीनें आपणास मृत्युमुखांत लोटून घेतलें असलें पाहिजे; कारण, जी स्त्री असें करते तिला तशा प्रकारचें सुख प्राप्त होतें असें त्यांच्या शास्त्रांत सांगितलें आहे. खेरीज अशा स्त्रियांना मागें लोकांत मानही मोठा मिळतो. फार काय ? पण त्यांना देवता मानून देवळांत त्यांचें पुतळेही उभे करतात. सारांश, अशा कारणास्तव ह्या स्त्रिया मोठ्या दिलदारपणानें मरणास तयार होतात. '

हबीब याचें हें बोलणें ऐकून मीं त्यास म्हटलें, ' शीलवंतीवर जितकें माझें प्रेम होतें तितकेंच जर तिचें मजवर असतें, तर मला वाटतें, ती खचीत मरणास तयार झाली नसती. निदान तिनें पूर्वीं जी अट मला सांगितली होती ती फिरून एकवार सांगून पाहिली असती, व मीं ती ह्याही वेळीं कबूल केली नसती तर मग तिनें हा मार्ग स्वीकारला असता. आतां ती अट कबूल करणें माझ्या जिवावर आलें असतें ही गोष्ट निराळी. ' या शेवटच्या गोष्टीमुळें खरोखर पहातां एकपरी तिचें मरण मला समाधानास कारण व्हावयास पाहिजे होतें. पण वास्तविक तसा प्रकार न होतां तिच्या मरणाचें

विचार जों जों माझ्या मनांत येत तों तों माझें दुःख द्विगुणित होई. मीं फिरून हबीब यास ह्मटलें, ' आतां मला शीलवंतीचें विस्मरण पडावें ही गोष्ट खरी. पण तसें होण्याची मला मुळींच आशा नाहीं, व अशा स्थितींत यापुढें या ठिकाणीं मला सुखानें रहाणें मुष्कि-लीचें आहे. सबब मला आतां बसऱ्यास परत जाण्यास परवानगी द्या. हबीब यानेंही विचार करून मला रुकार दिला. तेव्हां हिंदु-स्थानास जाणारें एखादें जहाज पहाण्याच्या मी उद्योगास लागलों. मला लवकरच, सुरतेहून छींट भरून आलेलें एक जहाज आढळलें. त्यांतील मालाची विक्री झाल्यावर तावडतोब तें परत निघावयाचें होतें, सबब त्यांतच जाण्याचा मीं निश्चय केला.

पण हें जहाज निघण्यास जो कांहीं थोडा अवधि होता त्या अवधींत माझ्या मनाचें औदासीन्य फारच वाढलें. तें कमी करण्यास हबीब यानें नाना उपाय केले. परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं शेवटीं तर, तेथल्या सुस्वरूप व उत्तम गाणाऱ्या नाय-किणी आपल्या येथें आणवून त्यांजकडून माझ्या मनोरंजनार्थ दररोज त्यांचें नृत्यगायन त्यानें करवीत जावें. यांत त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, यांपैकीं एखाद्या खुपसुरत नायकिणीवर माझें मन बसावें. व त्या योगानें तरी मला शीलवंतीचा विसर पडावा.

हा क्रम चालू होऊन एक दोन दिवस झाले तों एके दिवशीं एक गुलाम हबीब याचे घरीं येऊन माझ्याशीं एकांतीं कांहीं बोला-वयाचें आहे असें म्हणूं लागला. हा शीलवंतीचाच गुलाम होता. सुमारें एक महिन्यापूर्वी जो मला भेटला होता, व तुमच्याकरतां तिच्याशीं मी बोलेन असें म्हणाला होता, तोच हा होय. असो. तो मला एकांतीं नेऊन पुढीलप्रमाणें माझ्याशीं बोलला. तो म्हणतो, ' महाराज, मी बोलल्याप्रमाणें तुम्हांस येऊन भेटलों नाहीं यांत माझा कांहीं एक अपराव नाहीं. माझ्या धनिणीनें, खब-रदार त्याजकडे फिरून जाशील तर, अशी मला सक्त ताकीद केल्यामुळें माझा नाइलाज झाला. ती खानदानींतली व करारी स्वभा-

नाची बायको असल्यामुळें, अतःपर तुमच्याशीं संबंध ठेवावयाचा नाहीं असा जो एकवार तिनें निर्धार केला, तो बिलकूल ढळण्यासारखा नव्हता. तिची जरी नवऱ्यावर प्रीति नव्हती, तरी त्याशीं तिनें बेइमानीपणा केला नाहीं येवढेंच नव्हे, तर त्याजबरोबर सहगमन करून तिनें लोकांत अजरामर कीर्ति मिळविली. असो. हा विषय आतां सोडून, ज्या कामाकरितां मी आलों आहें त्या संबंधानें मी तुमच्याशीं बोलतों. हल्लीं मी दुसऱ्या एका श्रीमान् स्त्रीच्या येथें राहिलों आहें. ती शीलवंतीसारखीच परम रूपवती असून तुम्हांवर तिचें मन बसलें आहे. तुम्ही लवकरच सुरतेस जाणार म्हणून समजतें. परंतु त्यापूर्वीं, तुमच्या नशिबानें हा जो योग आला आहे, त्याचा तुम्हीं उपयोग करून घ्यावा असें माझें तुम्हांस सांगणें आहे. "

त्या गुलामाचें बोलणें ऐकून मला आनंदापेक्षां आश्चर्यच विशेष वाटलें. मी त्यास बोललों, ' मित्रा, तुझ्या नव्या धनिणीचें मजवर प्रेम बसलें आहे म्हणून तूं जें म्हणतोस, त्याबद्दल कृतज्ञता दर्शविण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं, हें सांगण्यास मला मोठें दुःख वाटतें. कारण शीलवंतीची मूर्ति जणूं काय एकसारखी माझ्या डोळ्यांपुढें असल्यामुळें तिच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार माझ्या मनांत येत नाहीं. ह्याकरितां तुझ्या धनिणीचा शब्द मी खालीं पाडल्याबद्दल तिनें मला क्षमा करावी. यांत तिचा मीं कोणत्याही प्रकारें अपमान केला असें बिलकूल होत नाहीं.' गुलाम बोलतो, ' मीं हें जें काम अंगावर घेतलें त्यांत मला यश तर खास येत नाहीं, हें तुमच्या बोलण्यावरून उघड दिसतें. तरी पण इतकें मला खचीत वाटतें कीं, शीलवंतीविषयींचें प्रेम तुमच्याठायीं कितीही जागृत असलें, तरी एकवार तुम्ही जर कृपा करून माझ्या या धनिणीची भेट घ्याल, व तिचें तुमचें क्षणभर बोलणेंचालणें होईल, तर त्यापासून तुम्हांस आनंद होऊन तुमच्या चित्तास समाधान वाटेल अशी माझी खात्री आहे.' मीं त्यास म्हटलें, 'अरे, तुझी ही समजूत फार चुकीची आहे. मनुष्याच्या मनोधर्मांची तुला परीक्षा नाहीं.

तुझ्या पहिल्या धनिणीच्या संबंधानें तुझी अशी कल्पना होती कीं नाहीं, कीं मी येथें आल्याची बातमी तिला कळतांच माझ्या भेटीविषयीं ती अगदीं आतुर होईल म्हणून?' तो म्हणतो, 'त्या बाबतींत तुम्हीं मला जो दोष दिला तो अगदीं बरोबर आहे. पण सांप्रत जी गोष्ट मीं तुम्हांपाशीं काढली आहे तिच्या संबंधानें मला विशेष खात्री आहे. मी आतां जास्त बोलून उगीच तोंडाची वाफ दवडीत नाहीं. तुम्ही मजकरितां येवढेंच करा कीं, आज रात्रीं मी तुमच्याकडे येईन, तेव्हां मी नेईन तेथें मजबरोबर येण्याची तेवढी कृपा करा.' मीं ह्मटलें, 'छी! छी! तूं कितीही सांगितलेंस तरी तुझ्या बोलण्यावर माझा भरंवसा बसत नाहीं. स्त्रियांचा स्वभाव पुरता मी ओळखून आहें. याकरितां फिरून मी आगींतून निघून फुपाट्यांत पडण्यास खुषी नाहीं. असें समज कीं, तिचें माझें संभाषण होऊन ती मजवर वास्तविक आसक्त झाली असतांही तिच्या प्रीतीचा मोबदला मजकडून जर तिला मिळाला नाहीं तर तिला केवढा ताप होईल? व त्याचा कदाचित् मजवर केवढा अनिष्ट परिणाम होईल?' यावर त्या गुलामानें माझी पुष्कळ खातरजमा करून मला जरी सांगितलें कीं, ती स्त्री मोठी शहाणी व विचारी असल्यामुळें, शीलवंतीवरील तुमच्या प्रेमांत कदापि अंतर पडावयाचें नाहीं असें तिला दिसून आलें असतां त्या संबंधानें ती तुम्हांला कांहीं दोष देणार नाहीं. तथापि मला म्हणून त्याच्या बोलण्यास रुकार द्यावासा वाटेना; इतकेंच नव्हे, तर त्या गुलामानें त्या स्त्रीच्या संबंधानें यापुढें कांहींच बोलणें ऐकूं नये असेंही माझें मत झालें. तेव्हां तो तसाच आल्या वाटेनें निघून गेला. पण फिरून तो रात्रीं मजकडे आला, व त्यानें एक पत्र माझ्या हातीं दिलें. त्यांतील मजकूर पुढीलप्रमाणें होता:—"माझ्या गुलामाशीं तुमचें जें संभाषण झालें त्यापासून मला दुःख तर झालें नाहींच, पण उलटा आनंद झाला. आणखी त्या गुलामानें तुमच्या मनोवृत्ति ज्या मला कळविल्या, त्यामुळें तुमच्या भेटीची मला फारच उतावळी झाली आहे; व शीलवंतीवर तुमचें उत्कृष्ट प्रेम आहेसें जें दिसतें तें

जर खरोखरच असेल, तर तुमच्या माझ्या भेटीमुळें परस्परांस अनिर्वाच्य आनंद व सौख्य होईल हें खचीत समजा. ”

ह्या मजकुराचा अर्थ नीटसा माझ्या लक्ष्यांत येईना. मला असें वाटलें कीं, हें उगीच वेडयासारखें कांहीं तरी लिहिलेलें आहे. तथापि त्याचा ताबडतोब उलगडा पडल्यावांचून मला चैन पडेना; सबब मी लागलाच त्या गुलामाच्या बरोबर निघालों. त्यानें मला एका लहानशा घरामध्यें नेलें, व मी आपल्या धनिणीस तुम्ही आल्याची खबर कळवितों, असें म्हणून आपण निघून गेला. थोडक्याच वेळानें त्याची धनीण आली. तिला मी पहातों तों, ज्या शीलवंतीची जळून रक्षा झाली असें मी समजत होतों, तीच ही आहे असें मला स्पष्ट दिसलें. तेव्हां माझ्या मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पना तरी करतां येईल काय ?

अबुलफौरीज हा याप्रमाणें आपली गोष्ट सांगत असतां, शीलवंती ही अद्यापि जिवंत असल्याचें जेव्हां डमास्कसचा राजा व त्याचे दोन्ही सोबती यांनीं ऐकिलें, तेव्हां खरोखरच त्यांना, आतां हा बरळायाला तर नाहींना लागला ? असें वाटून ते आश्चर्यचकित होत्साते क्षणभर एकमेकांकडे पहात स्तब्ध राहिले ! अबुलफौरीज याच्या हें लक्ष्यांत येऊन तो किंचित् हंसला, व तशीच त्यानें आपली गोष्ट पुढें चालविली. तो म्हणतो, ‘ त्या स्त्रीस पाहून, हें पिशाच तर नव्हेना, अशी माझी समजूत प्रथमतः झाली. नंतर लागलीच, साऱ्या जगांत जिला आपण प्रिय मानीत होतों, ती ही स्त्री अशा रीतीनें क्षणभर माझ्या दृष्टीस पडून त्यापासून पुढें मला एकसारखें दुःख होणार असें समजून मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. माझी ती खेदयुक्त मुद्रा पाहून तिला इतकें कांहीं हंसूं आलें कीं, तें सांगतां पुरवत नाहीं ! ती म्हणते, ‘ अबुलफौरीज ! मीं तुला भेटीकरतां बोलवलें तें तुला भिवविण्याकरितां नव्हे हें खचीत समज. तूं जी आपल्यासमोर पहात आहेस ती शीलवंतीची छाया नव्हे, तर खुद्द शीलवंतीच आहे. मला पाहून या वेळीं तुझ्या मनाचा

घोंटाळा झाला यांत वास्तविक पहातां कांहीं नवल नाहीं. एखादें मनुष्य मरण पावलें अशी आपली खात्री झालेली असतां तें एकाएकीं आपल्या नजरेस पडलें तर आपणाला भीति व आश्चर्य वाटणें अगदीं साहजिक आहे. असो. मी खचीत—खचीत—जिवंत आहें ही तूं आपल्या मनांत अगोदर पक्की गांठ बांधून ठेव; म्हणजे तुझें भय नाहींसें होईल, व मग मी तुला हें सर्व गूढ उलगडून सांगेन.'

शीलवंती पुढें बोलते, 'मीं आमच्या मुख्य धर्माधिकाऱ्याची चांगली मूठ दाबल्यामुळें त्यानें मोठ्या शिताफीनें माझा प्राण वांचविला. त्यानें आपल्या अत्यंत विश्वासांतल्या इतर धर्माधिकाऱ्यांकडून त्या चितेच्या झोंपडींत गुप्त भुयार तयार करविलें, व त्यांतून तशीच चोरवाट बाहेर पार निघून जाण्याजोगी बनविली. पुढें योग्य वेळीं मीं झोंपडींत शिरून रीतीप्रमाणें चिता पेटविल्यावर लागलीच त्या भुयारांत उतरलें, व चोरवाटेचें तोंड बंद केलेलें होतें तेथें जाऊन बसलें. नंतर माझ्या नवऱ्याचें प्रेत साफ जळून जाऊन जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर रात्रीचे वेळीं त्या धर्माधिकाऱ्यानें स्वतः येऊन मला बाहेर काढिलें व येथें आणिलें. हें घर मीं आपल्या विश्वासू गुलामाकडून पूर्वीच भाड्यानें घेऊन ठेवलेलें होतें.'

मीं म्हटलें, 'पण प्रिये! हें सती जाण्याचें ढोंग करून लोकांस अशा प्रकारें फसविण्याचें तुला काय कारण होतें? तुला सती गेलेंच पाहिजे असा कांहीं तुजवर कोणाचा जुलूम नव्हता, तेव्हां तूं येवढी यातायात करून आपल्या जिवाला शीण कशाकरितां करून घेतलास?' ती उत्तर करते, 'प्रियकरा! माझ्या मनांत स्वधर्माचा त्याग करून पैगंबराचा धर्म स्वीकारावा व तुझ्या जन्माची सोबतीण व्हावें असें आलें, तेव्हां त्याकरितां ह्या मार्गाचें अवलंबन केल्याखेरीज मला गत्यंतरच नव्हतें. आतां मी मरून गेलें अशी माझ्या आप्तसोयऱ्यांची खात्री झाल्यामुळें, मला येथून निघून तुजबरोबर बसऱ्यास येण्यास कोणतीही अडचण राहिली नाहीं. ह्या ज्या माझ्या कृतीनें तुला व साऱ्या जगाला थक्क करून सोडलें, ती करण्यास मला

प्रवृत्त होण्याचें मुख्य कारण ह्याखेरीज दुसरें कोणतेंही नाहीं. माझ्या ह्या कृतीनें साऱ्या जगाला थक्क करून सोडलें असें जें मीं म्हटलें, तें कसें तें सांगतें. माझ्या म्हाताऱ्या नवऱ्यावर माझें मुळींच प्रेम नसून केवळ राजांच्या आज्ञेस्तव मीं त्यास वरिलें, ही गोष्ट सर्वांस महशूर असल्यामुळें मजकडून असें जिवावरचें व घोर कृत्य घडलें हें पाहून लोकांस साहजिक आश्चर्य वाटलें, दुसरें काय ?'

मीं म्हटलें, ' तर मग प्रिये ! एकूण तूं ह्या अबुलफौरीजकरितां येवढी युक्ति लढविलीस व इतका खटाटोप केलासना ? अहाहा ! माझ्या प्रेमाकरितां, समागमाकरितां, व मला सुखाच्या शिखरास नेऊन पोंचविण्याकरितां तूं धर्मांतर करून व आपलें घरदार सोडून मजबरोबर येणारना ? सुंदरी ! या क्षणीं मजसारखा सुखी प्राणी साऱ्या त्रिभुवनांत नसेल असें मला वाटतें ! ' असें म्हणून मीं हर्षनिर्भर होऊन तिच्या चरणीं लोटांगण घातलें. तेव्हां ती मला उठवून म्हणते, ' प्रियकरा ! तुला या सांप्रतच्या सौख्यप्राप्तीविषयीं येवढा आनंद मानण्याचें फारसें कारण नाहीं; कां कीं, या शीलवंतीचें आतां पूर्वीसारखें महत्त्व राहिलें नाहीं. हें पहा, मजपाशीं जी येवढी अपार संपत्ति होती ती नाहींशी झाली असून तुला देण्यास फक्त माझें अंतःकरण तेवढें मजपाशीं शिलक राहिलें आहे ! मला आपल्या पैशापैकीं पुष्कळ मोठी रक्कम, सती जाण्याची परवानगी मिळविण्यासाठीं सरकारांत नजराणा म्हणून भरावी लागली, व राहिलेंसाहिलें माझें द्रव्य, पुढें जे धर्माधिकारी मला जिवानिशीं पार पाडण्याच्या उपयोगीं पडले त्यांस मला द्यावें लागलें. '

हे शीलवंतीचे शब्द ऐकून, तिजविषयीं माझ्या मनांत जी प्रीति व पूज्यभाव वसत होता, तो व्यक्त करून दाखविण्यास हा समय चांगला आहे असें जाणून मी तीस बोललों, ' हृदयंगमे ! तुजप्रमाणेंच माझेंही तुजवर निरपेक्ष प्रेम आहे कीं नाहीं याविषयीं तूं अंदेशा मनांत आणलास हा माझा मोठा अन्याय केलास असें म्हटल्यावांचून मला राहवत नाहीं ! प्रियतमे ! मी शपथ वाहून सांगतों कीं, तुझ्या

वाड्यांत मी असतां जेव्हां तूं मला आपली अमर्याद संपत्ति दाखविलीस, तेव्हां तिकडे माझें बिलकूल लक्ष्य न जातां फक्त तुझ्या अंतःकरणाकडेच तें लागून राहिलें होतें!' मी इतकेंच बोलून राहिलों नाहीं. तर केवळ स्वार्थासाठीं म्हणून कांहीं एखादी गोष्ट करण्याचा मला किती तिरस्कार आहे, हें मीं तिला अनेक प्रकारांनीं सांगून, शेवटीं तुजखेरीज मी दुसऱ्या कशाचीही बिलकूल पर्वा करीत नाहीं, असेंही आणखी एकवार तिला बोलून दाखविलें. इतकी माझी परीक्षा पाहिल्यानंतर, आपल्या कसोटीस हा पक्का उतरला असें बघून तिनें हास्यवदन केलें, व मला म्हणाली, 'आतां माझें व तुझें मनोगत बरोबर जुळलें, यांत शंका नाहीं. तेव्हां आतां वास्तविक गोष्ट तुला सांगणें इष्ट आहे. ती ही कीं, 'माझें द्रव्य इतकें खर्च झालें, तथापि मी अगदींच कफल्लक होऊन गेलें आहे असें नाहीं. मजपाशीं अद्यापि जो कांहीं अंश उरला आहे तो तुला व मला आनंदानें राहून कालक्रमणा करितां येण्यास पुरे इतका आहे.' नंतर, मध्यंतरीं तिजपासून मला जो कांहीं ताप झाला त्याचा संबंध काढून ती म्हणाली, 'त्याविषयीं मला पराकाष्ठेचें वाईट वाटतें. पण तूं इतकें खचीत समज कीं, त्यामुळें मला अनिर्वाच्य दुःख होऊन त्या रूपानें मीं, भोगावी त्याहून जास्त शिक्षा त्याजबद्दल भोगिली आहे!' हें झाल्यावर आम्हीं होईल तितकें लवकर बसऱ्यास जावयाचा निश्चय केला. पूर्वीं सांगितलेल्या सुरत येथील जहाजावरचा सर्व माल या वेळीं विकून खलास झाला असून तेथून जो न्यावयाचा त्याचीही भरती होत आलेली होती, आणि तें जहाज बहुतेक निघण्याच्या तयारींतच होतें.

निघण्याच्या दिवशीं मीं हबीब याचा निरोप घेतला व रात्रीस शीलवंतीला घेऊन बंदरावर गेलों. तिचे कांहीं परम विश्वासू गुलाम होते, त्यांजवळ तिचा सारा ऐवज होता; त्या गुलामांसह आम्हीं जहाजांत बसून निघालों.

आम्हास कांहीं एक त्रास किंवा अडथळा न होतां आम्ही सुरतेस

सुखरूप जाऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं कर्मधर्मसंयोगानें बसऱ्यास जाण्याच्या तयारींत असलेलें एक जहाज आम्हांस आयतेंच आढळलें. त्यांत आम्ही लागलीच बसून, परमेश्वरकृपेनें लवकरच मोठ्या आनंदांत बसरा येथें जाऊन पोहोंचलों. मी सुखरूप घरीं आलों असें पाहून माझ्या बापाला जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. आम्ही उभयतां एकमेकांस कडकडून भेटल्यावर मीं शीलवंतीस त्याजकडे नेलें. तिच्या गुणांचें वर्णन त्याजपाशीं करण्याचें मला कांहीं प्रयोजन नव्हतें; कारण तिची प्रसन्न मुद्रा, सौंदर्य, व दिलदारपणा हींच तिच्या थोरपणाची साक्ष होती. त्यानें तीस मोठा मान दिला व बापाप्रमाणें तिला आपली ममता दर्शविली. तिची सर्व हकीकत मीं त्यास सांगितल्यावर आपलें एकंदर प्रवासवृत्त त्यास कथन केलें. तें ऐकिल्यावर तो मला म्हणाला, 'तूं आपला मोत्यांचा वांटा मला पोंचता होण्यासाठीं ज्या कप्तानाच्या स्वाधीन केलास त्यानें तो इमानेइतबारें आणून माझ्या हवालीं केला.' यानंतर रिवाजाप्रमाणें काजीसमक्ष शीलवंतीनें माझा धर्म स्वीकारल्यावर तिचा माझा विवाह फार मोठ्या थाटानें झाला. त्यानिमित्त एक आठवडाभर आमच्या येथें सारखा उत्सव चालला होता.

डमास्कसचा राजा व त्याचे सोबती यांस अबुलफौरीज म्हणतो, 'ही माझ्या पहिल्या सफरीची हकीकत झाली. हींतील कित्येक गोष्टी तुम्हांस मोठ्या अलौकिक वाटल्या असतील. पण याहींपेक्षां विलक्षण अशा गोष्टी अद्यापि मला तुम्हांस सांगावयाच्या आहेत, त्या आतां उद्यां सांगेन. त्या ऐकून तुमची खात्री होईल कीं, अशा प्रकारचे प्रसंग दुसऱ्या कोणाही मनुष्यास क्वचित्च घडले असतील.' इतकें बोलून अबुलफौरीज थांबला. कारण, त्याला स्वतःला विसांवा पाहिजे होता, व आपल्या श्रोत्यांसही कंटाळा आला असेल कीं काय असा त्यास अंदेशा आला. आणखी त्या दिवशीं त्या मंडळींनीं मजलही नेहमींपेक्षां जास्त मारली होती. सबब संध्याकाळ होतांच एका डोंगराच्या पायथ्याशीं सोईची जागा

पाहून त्यांनीं तंबू ठोकिले, व रात्रीं खुशाल जेवणखाण करून ते झोंपीं गेले.

दुसरे दिवशीं सर्व मंडळी वाट चालू लागली असतां डमास्कस-च्या राजा व त्याचे सोबती यांनीं अबुलफौरीज यास आपला वृत्तांत पुढें चालविण्याविषयीं विनंति केल्यावरून त्यानें तो पुढीलप्रमाणें सांगितला. [ हा पुढच्या खंडांत येईल. ]

खंड चवथें समाप्त.

PRINTED AT THE 'INDIRA' PRESS, POONA.